# महाराष्ट्रांत विनोबा

[ खानदेशमधील पदयात्रा ]

●

## भाग चौथा

१५५९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५४८

REFBK-0010281

परंधाम प्रकाशन

३५७२०
१०.१२.८३
निबंध
१५रु

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५७२० वि: निबंध
क्रमांक ........................ नों: दि: १०-१२-८३

# महाराष्ट्रांत विनोबा

[ खानदेशमधील पदयात्रा ]

●

भाग चौथा

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५७२० वि: निबंध
क्रमांक नों: दि: १०।१२।६३

●

REFBK-0010281

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०२८१

आक्टोबर १९५९ ]

[ मू. १ रुपया

भाऊ पानसे
ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम विद्यापीठ
पो. पवनार, जि. वर्धा.

आवृत्ति १ ली–प्रति २०००
सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक :
भाऊ पानसे
परंधाम मुद्रणालय, परंधाम
पवनार, जि. वर्धा.

# निवेदन

"महाराष्ट्रांत विनोबा" चे ३ खंड या पूर्वी च वाचकांच्या हातांत पडले आहेत. आज हा चौथा आणि शेवटचा खंड वाचकांना सादर करीत आहोंत.

हे चारी खंड या पूर्वीच प्रसिद्ध व्हायला हवे होते; परंतु मजकूर वेळेवर न मिळाल्यामुळें आणि अन्य हि मधून मधून कांहीं अडचणी उपस्थित झाल्यामुळें हीं सर्व प्रवचनें वाचकांच्या हातीं पडायला वेळ लागला, त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी.

या चौथ्या खंडांत शेंवटीं परिशिष्टांत ३ प्रकरणें दिलीं आहेत. कालानुक्रमानें हीं प्रवचनें दुसऱ्या खंडांत यायला हवीं होतीं, परतु तेथें तीं न देतां या खंडाच्या शेंवटीं दिलीं आहेत. कारण हीं तीन्ही प्रवचनें मूळ हिंदींतून दिलेलीं होतीं. पू. विनोबांच्या मुक्कामावर निरनिराळ्या संस्थांच्या सभा नेहमीं च होत असतात. त्या सभांतील हीं भाषणें आहेत. म्हणून परिशिष्टांत त्यांना स्थान दिलें.

या पूर्वीच्या तीन खंडांचें महाराष्ट्रानें स्वागत केलें आहे आणि या चौथ्या खंडाकडे त्याचे डोळे लागून आहेत. पण प्रामुख्यानें ह्यांतील भाषणें खानदेशमधील असल्यामुळें खानदेशची जनता या खंडाचें विशेष स्वागत करील अशी आशा आहे.

—प्रकाशक

# अनुक्रमणिका


१ आपल्याला धर्म-स्थापना करायची आहे १

२ ज्ञानदेवांनीं पाषाणाला पाझर फोडला ११

३ ज्ञानेश्वरी हा धर्म-ग्रंथ आहे १७

४ दुःख-निरसनाचा कार्यक्रम—सहयोग सहभोग ४४

५ ग्रामस्वराज्याचें लेणें तयार करा ५४

६ विश्वशांतीकरतां सैन्य-मुक्तीची हिंमत कोण करणार ? ६१

७ ‘ तुझें आहे तुजपाशीं ’ ६९

८ महाराष्ट्रानें विचार करावा ७४

९ खानदेशाला आवाहन ८०

१० सत्य, प्रेम, करुणेच्या आचरणानें आजचें कोडें सुटेल ८९

११ गीता-प्रवचनाच्या जन्मस्थानीं ९५

१२ नव्यायुगाचें नवें चिंतन १००

१३ स्वातंत्र्यदिनाचें चिंतन १०७

१४ बालकांशीं गुजगोष्टी ११५

१५ ग्रामस्वराज्य कसें येईल ? ११७

१६ अणुयुगाला अनुकूल चिंतन ११९

१७ विज्ञानयुगांत शक्तीचा स्रोत १२४

परिशिष्ट :

१ ग्रामोद्योगाचीं पांच बोटें १३८

२ भारतीय स्त्री आणि संन्यास १४४

३ स्त्रियांनीं अहिंसेचें शस्त्र हातीं घेऊन जगाचें नेतृत्व करावें १५२

90269
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक 3५५२० वि: निबंध

# महाराष्ट्रांत विनोबा

## भाग चौथा

## आपल्याला धर्मस्थापना करायची आहे १

### ' धर्म ' शब्दाचें वैशिष्ठ्य

आपल्या या भारत भूमीमध्यें अगदीं प्राचीन वेदकालापासून आजपर्यंत 'धर्म' हा एक शब्द सतत चालत आला आहे. त्या शब्दाला दुसऱ्या कोणत्या हि भाषेंत नेमका प्रतिशब्द मिळत नाहीं. धर्म या शब्दाचा अनुवाद आपल्याला दुसऱ्या भाषेंत करायला सांगितला तर मोठा फजीता होईल. धर्म हा संस्कृत शब्द आहे. पण मराठीमध्यें त्याचा अर्थ देतांना, धर्म म्हणजे धर्म असें लिहिलें जातें. जसें लहान मुलाला विचारलें कीं तुझ्या बाबाचें नांव काय तर तो सांगतो ' बाबा ', त्याला दुसरें नांव माहीत च नसतें, तसें धर्म या शब्दाचें आहे. हिंदुस्थानांत एवढ्या भाषा आहेत पण त्या सगळ्यामध्यें धर्म हा एक च शब्द चालतो.

वेदामध्यें वर्णन आहे कीं विष्णूनें तीन पावलें टाकलीं. एक स्वर्गांत, दुसरें अंतरिक्षांत आणि तिसरें पृथ्वीवर. हीं तीन पावलें कशासाठीं टाकलीं ? " अतो धर्माणि धारयन् " धर्माचें धारण करण्याकरतां, तिन्ही जगांना धर्माचें वळण लावण्याकरतां, धर्माचा धडा घालून देण्याकरतां विष्णूनें तीन पावलें टाकलीं. या च प्रमाणें देवांचें हि वर्णन आहेः

यज्ञेन यज्ञं अयजन्त देवाः तानि धर्माणि प्रथमानि आसन् ।

देवांनीं यज्ञ निर्माण केला आणि लोकांनां प्रथम धर्म शिकवला. कर्तव्य व दुसऱ्यांकरतां त्याग करायला शिकविलें. यज्ञ म्हणजे तीळ, तांदुळ, तूप जाळायचें असें नव्हे तर यज्ञ म्हणजे परोपकार. ज्ञानदेवानें म्हटलें आहे, "आपुलां अथवा परावां । ठाईं उपकरसी पांडवा । तेणें यज्ञें होय बरवा । याज्ञिक बाळा"

आपल्यावर व दुसऱ्यांवर जो उपकार करायचा त्याला धर्म म्हणतात. म्हणजे त्यांत नुसता परोपकार च नव्हे तर स्वोपकार पण आहे. म्हणजे उभयतांच्या भल्याकरतां झिजणें याला म्हणायचें यज्ञ. तो हा यज्ञ, प्रथम धर्म आहे असें वेदांनीं सांगितलें.

## लोक सोप्या धर्माचें पालन कां करीत नाहींत

गीतेंत भगवंतांनीं म्हटलें कीं मी लोकांना मानवसेवेचा धर्म सांगतों आहें. मानवरूपानें जी भगवत्मूर्ति आपल्यासमोर प्रकट झाली आहे, जिला हजारों डोकीं, हजारों हात, हजारों पाय इत्यादि आहेत तिची परमेश्वरभावनेनें सेवा करणें हा " राजविद्या राजगुह्य " योग आहे, हा अगदीं सोपा आहे, असें भगवान् सांगत आहेत. परंतु ज्ञानदेवांना मोठें आश्चर्य वाटतें कीं इतका हा सोपा धर्म लोक कां पाळीत नाहींत ; " जे एकोत्तरेयाचिया वाढी । जळतिये आगीं घालिती उडी । ते अनायासे स्वगोडी । सांडिती केवी ।" एक टका मिळविण्याकरितां लोक जळत्या आगींत उडी घेण्याचें साहस करण्यास देखील तयार होतात परंतु मानवसेवेच्या कामांत अनायास लाभणारी गोडी, हा सोपा धर्म, या कामांत शंभर टके नफा होणार आहे असें असतांना, हे लोक हा धर्म कसा सोडतात हें मला समजत नाहीं असें ज्ञानदेव म्हणतात. ज्ञानदेवांनीं दुसरी एक विलक्षण च उपमा देऊन म्हटलें आहे कीं " पाहें पां दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदराआड । परि तें अव्हेरूनि गोचिड । अशुद्धचि सेवि ।" ज्याप्रमाणें गोचिड दुधानें भरलेल्या स्तनाजवळ राहून हि दूध सेवन करण्याऐवजीं रक्तच सेवन करते त्याप्रमाणें भ्रांत लोकांना विषयाविषयीं कामना वाटते, आणि म्हणून हृदयामध्यें जो अत्यंत रमणीय राम आहे सर्व सुखाचा आराम आहे तिकडे त्यांचें लक्ष जात नाहीं.

## सेवेला देहाची गरज

हा धर्म अतिशय सोपा आहे. फक्त थोडी सेवा हवी. " पत्रं पुष्पं फलं तोयं " यापेक्षां देवाला जास्त कांहीं नको. अतिथींची, गरिबांची, दुःखितांची सेवा करा म्हणजे झालें. तुम्ही सेवा करण्याकरतांच हा मानवमूर्ति परमेश्वर समोर उभा राहिला आहे. तो जर उभा राहिला नसता तर आपल्याला सेवा करायला मिळाली नसती. रामदासांनीं लिहिलें आहे

"देहावेगळी सेवा पावेना। देहावेगळी सेवा फावेना " मला जर देह मिळाला नसता तर मी सेवा करूं शकलों नसतों व स्वामीला जर देह नसता तर तो सेवा घेऊं शकला नसता. लोकांना सेवेचें सुख देतां यावें म्हणून परमेश्वरानें देह धारण केला आहे. आणि आम्हांला सेवा करतां यावी म्हणून त्यानें आम्हांला देह दिला आहे. आम्हांला जर हा देह, हात पाय, कान नसते तर आम्ही सेवा कशी करूं शकलों असतों ? असा हा धर्म मी तुम्हांला सांगत आहें असें भगवंतांनीं गीतेंत सांगितलें आहे. आणि ज्ञानदेवांना मोठें आश्चर्य वाटतें आहे कीं इतका सोपा धर्म लोक कां आचरीत नाहींत !

## अजून धर्म-स्थापना झाली नाहीं

आज सकाळीं आम्ही कांहीं मंडळी वाटेंत थोडा वेळ एका शेतांत एकांत स्थान पाहून बसलों होतों. मोकळें आकाश, सुंदर हवा, सूर्य उगवण्याची वेळ, विशाल जमीन अशा सृष्टीच्या सान्निध्यांत आम्ही चर्चा करीत होतों. त्यांत मीं म्हटलें कीं अजून धर्म-स्थापना झालेली नाहीं. हीच गोष्ट मी कांहीं महिन्यापूर्वीं कर्णाटकच्या यात्रेंत प्रथम बोललों होतों. तुम्हांला वाटेल हा मनुष्य काय बोलून राहिला आहे. वेदानें धर्म सांगितला, अनादिकालापासून धर्म हा शब्द चालत आलेला आहे आणि अजून धर्म स्थापन झालाच नाहीं असें हा म्हणतो ! हो, स्थापन झाला नाहीं, असें च माझें म्हणणें आहे. तुम्ही विचाराल हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती इत्यादि अनेक धर्म आहेत आतां तुम्ही आणखी कोणता नवीन धर्म काढणार आहांत ? पण मला तुम्हांला सांगायचें हें आहे कीं हे सगळे धर्म नसून पंथ आहेत. "प्रथम पाऊली पावविला पंथ" पहिलीं पावलें टाकण्यासाठीं हे सगळे पंथ निर्माण झाले आहेत. हिंदु पंथ, मुसलमान पंथ, बौद्ध पंथ, ख्रिस्ती पंथ असे अनेक पंथ आहेत. ज्याप्रमाणें लहान मुलांना पहिलीं पावलें टाकायला शिकवितात त्याप्रमाणें धर्माचीं पहिलीं पावलें टाकायला शिकविणारे हे सारे पंथ आहेत. हे सगळे दिवे लावलेले आहेत. सूर्य उगवला नाहीं तोंवर हे दिवे राहणार. हिंदु दिवटी मुसलमान दिवटी, ख्रिस्ती दिवटी इत्यादि सर्व दिवट्यांचें काम रवि उगवला नाहीं तोंवर च चालेल. पहिलीं पावलें टाकतांना

आपण अंधारांत चाचपडूं नये म्हणून या लहान लहान दिवट्या लावल्या आहेत.

## 'प्रथम पाऊली पावविला पंथ'

एक मातीचा पशुपति. शंकर करायचा. त्याची पूजा करायची आणि मग त्याचें विसर्जन करायचें. त्याच प्रमाणें मातीचा अथवा चंदनाचा गणपति करायचा त्याची यथासांग दहा दिवस पूजा करायची आणि मग तो बुडवायचा. अशा प्रकारें हिंदुधर्मानें गणपति बनवायला आणि बुडवायला शिकविलें आहे. म्हणजे बनविणारे व बुडविणारे तुम्ही नसता हें दाखविलें आहे. आवाहन आणि विसर्जन हें च पूजेचें लक्षण आहे. तो गणपति नसून तें चंदन, पीठ किंवा माती आहे. त्याच्यामध्यें गणपतीची स्थापना करणारे तुम्ही "गणानाम् त्वाम् गणपतिम्" गणपतीचें गणपति तुम्ही आहांत. तुम्हीं गणपति बनविला, तुम्हीं त्यांत प्राण घातला. आतां प्राण काढून घेतल्यावर गणपति म्हणजे चंदन, पीठ किंवा माती राहणार, मातींत माती मिसळणार. असा आवाहन आणि विसर्जनाचा प्रयोग करून खरा परमेश्वर तुमच्या हृदयांत आहे हें दाखविण्याकरतां, बनविण्याचा आणि तोडण्याचा कार्यक्रम आपल्याकडून करवून घेतला जात आहे. "प्रथम पाऊली पावविला पंथ" आमच्याकडून या प्रमाणें पहिलीं पावलें टाकून घेतलीं, परंतु अजून खरा धर्म बनलेला नाहीं, तो यापुढें बनायचा आहे.

## विज्ञानयुगांत खरा धर्म टिकेल

आजपर्यंत खरा धर्म बनला नाहीं याचें कारण असें कीं तो मानसिक भूमिकेवर राहिला. आतां तो जेव्हां विज्ञानाच्या भूमिकेवर येईल तेव्हां खरा धर्म बनेल. विज्ञानामुळें जगाचें स्वरूप स्वच्छ कळेल. आज ब्राह्मणाला भोजन द्यायचें म्हणजे धर्म नंबर एक मानला जातो व आग्रह करून त्याच्या पोटांत लाडू ठोसायचे म्हणजे धर्म नंबर दोन मानला जातो. परंतु हा पहिला हि धर्म नाहीं व दुसरा हि धर्म नाहीं हें विज्ञान सांगेल. भुकेलेल्यांना जेवायला घालायचें हा खरा धर्म आहे आणि त्यांना हि पोटभर जेवा रे असें म्हणणें हा धर्म नाहीं. पण अलिकडे पंक्तींतून "सीताकांत स्मरण जय जय राम"

असे म्हणून आणली एक लाडू पोटांत ढकलतात! हे असले जुनाट धर्म, म्हणजे धर्माच्या नावानें जे अधर्म चालले ते आतां विज्ञानयुगांत टिकणार नाहींत. लोक म्हणतात अशा रीतीनें विज्ञानाच्या वाढीमुळें हे धर्म बुडलें तर कसें होईल ? धर्म टिकणार कसा ? ? याला च म्हणतात "चोराचा उलटचा." विज्ञानामुळें अधर्म टिकणार नाहीं, धर्म च टिकणार. बुद्धीच्या कसोटीवर कसला जाणारा, मानसिक कल्पना. कामना इत्यादींच्या वर गेलेला व जगांतले सगळे भेदभाव, उपासनेसकट सगळे भेदभाव काढून टाकणारा धर्म च टिकणार.

## पूजा कोणाची करायची

मीं उपासनेचें नांव घेतल्यामुळें तुम्हांला वाटत असेल कीं माझ्या मुखानें भयंकर गोष्ट निघत आहे. परंतु उपासना म्हणजे काय हें समजून घ्या. उपासना म्हणजे देवाजवळ बसणें. देवाच्या जवळ कोणीं बसावें ? जो देव नसेल त्यानें बसावें. पण जो देव असेल त्यानें कोठें बसावें ? नामदेव गुरूच्या दर्शनाकरतां विसोबा खेचराकडे गेला होता. विसोबा निजला होता व त्याचा पाय पिंडीवर होता. तें पाहून नामदेवाला वाटलें कीं हा मला खूप गुरु भेटला. याला शिष्टाचार, धर्ममर्यादा देखील माहीत नाहीं. असें वाटून त्यानें विसोबाचा पाय उचलून बाजूला ठेवला. त्याबरोबर ती पिंडी च सरकली व पायाखालीं गेली. तेव्हां नामदेवाला कळलें कीं धर्म म्हणजे काय वस्तु आहे. आपण सगळे देवाच्या खांद्यावर मांडीवर बसलों आहोंत, तिथून उतरणें शक्य नाहीं, म्हणून हा दगड आणि तो दगड यांत फरक काय करायचा ? गुरूकडून हें शिकून मग नामदेव पंजाबांत गेला तेथें त्यानें एक भजन लिहिलें—

"एकै पाथर कीजे भाउ। दूजै पाथर धरीए पाउ
जे ओहु देउ त ओहु भी देवा। कहि नामदेउ हम हरिकी सेवा"

एका दगडाला देव मानायचें आणि दुसऱ्या दगडावर पाय ठेवायचे असा भेद कशाला ? तो दगड जर देव आहे तर हा हि देव आहे. कबीरानें देखील असें च म्हटलें आहे. तुम्ही दगडाची पूजा करीत बसता पण "घरकी चक्की कोई न पूजे ज्यापर पीसा खाय" दगडाची पूजा करणारे अन्ध

दगडाची पूजा करतील पण जो दगड आपल्या रोजच्या उपयोगाचा त्याची पूजा नाहीं करायचे !

**देव नापास झाला**

भावार्थ असा कीं आतांपर्यंत धर्माच्या नांवावर जें कांहीं शिकविलें गेलें तीं पहिलीं पावलें होतीं. ज्याप्रमाणें लहान मुलाला पांगुळगाडा देऊन चालायला शिकवितात त्याप्रमाणें थेट वेदापासून ज्ञानदेवापर्यंत आपल्या समाजाला एवढें च शिक्षण मिळालें आहे. याहून जास्त कोणाला करतां आलें नाहीं, याहून जास्त कोणी कांहीं करूं शकले नाहींत. सगळ्यांनीं मिळून, आटापिटा करून पहिलीं पावलें शिकविलीं. अजून दुसऱ्या पावलाचें शिक्षण मिळालें नाहीं आणि धर्म-स्थापना झाली नाहीं. या बाबतींत भगवंताला अपयश मिळालें आहे. त्याला धर्म-स्थापनेसाठीं वारंवार अवतार घ्यावे लागले याचा अर्थ असा कीं धर्मस्थापना अजून झाली नाहीं. जर झाली असती तर त्यानें दुसऱ्या एखाद्या कामाकरतां अवतार घेतला असता पण त्याला त्याच त्या कामासाठीं अवतार घ्यावा लागतो म्हणजे पुन्हः पुन्हां मॅट्रिकच्या परिक्षेला बसून नापास होणाऱ्या विद्यार्थ्यासारखी च स्थिति झाली. तो पुन्हां पुन्हां परीक्षा देतो व पुन्हां पुन्हां नापास होतो पुन्हां पुन्हां परीक्षा द्याव्यात पण त्या पुढच्या पुढच्या द्याव्यात. मॅट्रिकनंतर कॉलेजच्या द्याव्यात. तसें च देवाला पुन्हां पुन्हां धर्मसंस्थापनेकरतां अवतार घ्यावा लागतो म्हणजे तो अगदींच नापास झाला. तो केव्हां पास होणार आहे याची मी वाट पाहतों आहें.

**देवाचा अवतार नको, आमचा उद्धार हवा**

परंतु मला आशा आहे कीं तो आतां पास होईल, कारण आतांपर्यंत पक्षी एकाच पंखानें जोर करून उडण्याचा प्रयत्न करीत होता त्यामुळें जमिनीपासून जरा वर उडायचा प्रयत्न करायचा पण लगेच तो खालीं पडायचा. पुन्हां पुन्हां तो वर उडायचा प्रयत्न करीत असे आणि पुन्हां पुन्हां तो खालीं पडत असे. पण आतां त्या पक्षाला दोन पंख फुटले आहेत, आत्मज्ञान आणि विज्ञान. आतां देवाचें तें पुन्हः पुन्हां जन्म घेणें आपल्याला कांहीं पहावत नाहीं. आतां धर्मस्थापनेसाठीं तुमचे आमचे जन्म पुरेसे आहेत.

आतां आपण सगळयांनीं मिळून त्याला सांगावें कीं आतां तुझ्या अवताराची गरज नाहीं, आमच्या च उद्धाराची गरज आहे. तूं खालीं उतरण्याऐवजीं आम्ही च वर चढूं. नामदेवानें म्हटलें आहे "तुवां येथें यावें कीं मज तेथें न्यावें। खंती माझ्या जीवें मांडियेली।" नामदेवाच्या या दोन गोष्टींपैकीं पहिली गोष्ट मला नको आहे. आतां देवाचा अवतार नको आमचा च उद्धार हवा आहे. "भागलासि मायबापा बहु शीण केल्या खेपा" सदा सर्वदा तुला च वाऱ्या कराव्या लागणें हें तुला शोभणारें नाहीं व आम्हा मुलांना हि शोभणारें नाहीं. म्हणून आतां आम्हांला विज्ञान आणि आत्मज्ञान या दोन पंखांनीं उडायला शिकलें पाहिजे आणि धर्म-स्थापना केली पाहिजे. आतां कल्पना, वासना, कामना इत्यादींना वाव राहणार नसून आतां शुद्ध विचार च टिकणार. धर्म कोणी एक माणूस स्थापूं शकत नाहीं. या विज्ञानयुगांत विज्ञान आणि आत्मज्ञान दोन्ही मिळून धर्मस्थापनेचा प्रयोग होणार आहे.

## पंढरपूरचा निःशस्त्र देव

या प्रयोगाचें पहिलें लक्षण हें कीं सगळया देवांना निःशस्त्र केलें पाहिजे. आतांपर्यंत आम्ही मानवांनीं हातीं शस्त्रें घेऊन रक्षण करण्याचा प्रयत्न केला पण त्यानें रक्षण झालें नाहीं, उलट भक्षण च झालें. कुराणांत म्हटलें आहे कीं जेव्हांपासून लोखंडाचा शोध लागला तेव्हांपासून मनुष्याची परीक्षा सुरू झाली. आणि अगदीं पहिल्या प्रथम च आम्ही त्या परिक्षेंत नापास झालों. कारण आम्हीं आमच्या रक्षणासाठीं म्हणून तलवारी बनविल्या. पुढें लोकांना अक्कल आली कीं या प्रमाणें आपण आपल्या हातांत तलवार घेणें बरें नाहीं म्हणून त्यांनीं मग देवांच्या हातांत शस्त्रें दिलीं, सरकारच्या हातांत दंड दिला. देवांच्या हातांत शस्त्रें देऊन चतुर्भुज, अष्टभुजा, दशभुजा असे देव बनविले. जितक्या आयुधांचे शोध लागले तितके देवाचे हात आम्हीं वाढविले. प्रथम एक आयुध होतें तेव्हां धनुर्धारी राम बनविला. मग शंख चक्र गदा पद्म हातीं देऊन चार हातांचा देव बनविला. आतां आयुधें इतकीं वाढलीं आहेत कीं त्याला सहस्रावधि हात निर्माण झाले आहेत. आम्हीं सरकारच्या हातीं दंडशक्ति सोंपवून दिली आहे आणि देवतांच्या हातीं शस्त्रें दिलीं

आहेत. परंतु निःशस्त्र देवतेचा आरंभ आपल्या पंढरपूरच्या विठोबानें केला. तो तोंडानें बोलत नाहीं संकेतानें सांगतो. समोर भयंकर भीमानदी वाहते आहे ती कशी पार करायची हें तो कमरेवर हात ठेवून सांगत आहे. तो म्हणतो कीं संसारनदींत केवळ कमरेइतकें पाणी आहे तुम्ही सहज तरून जाल. याप्रमाणें तो मौनी असून हि संकेतानें ज्ञान देतो. तो दुसऱ्यांवर विचाराचें आक्रमण करीत नाहीं. "तुका म्हणे नेत्री केली ओळखण। तटस्थ तें ध्यान विटेवरी।" तो तटस्थ देव आहे आणि त्याला आपण निःशस्त्र बनविलें आहे. देवाला निःशस्त्र बनविण्याची कल्पना ज्यांना सुचली त्यांनीं अहिंसेचें पहिलें पाऊल टाकलें. ज्यांनीं स्वतःच्या हातांतील शस्त्रें देवाच्या हातीं सोंपविलीं त्यांनीं हि अहिंसेचें एक पाऊल टाकलें होतें. देवांच्या हातीं शस्त्रें सोंपवून आम्हीं त्यांची प्राणप्रतिष्ठा केली होती आणि म्हणून दुर्गा, काली, चामुंडी इत्यादींच्या हातीं शस्त्रें सोंपवून त्यांनीं आमचें रक्षण करावें असें आम्ही मानीत होतों. परंतु जेव्हांपासून पंढरपूरचा विठोबा निघाला तेव्हां शस्त्रें उरलीं नाहींत. तो फक्त इशारा करतो. ज्ञानदेवांनीं म्हटलें आहें "शब्देंविण संवादु दुजेंविण अनुवादु हें तंव कैसेनि गमे" शब्दाशिवाय म्हणजे मौनानें तो संवाद करतो आणि विठोबा एकटाच आहे दुसरे कोणी हि नाहीं तरी हि संभाषण कसें चालतें तें कळत नाहीं. असा हा अमूर्त आकारलेला आहे. त्यानें अनंत रूपें घेतलीं आहेत. म्हणून परमात्मभावनेनें त्याची सेवा करायची आणि आपली यच्चयावत् कृति त्याची पूजा आहे असें समजून करावयाची हें जेव्हां आपल्याला कळेल तेव्हां खरा धर्म स्थापन होईल. तोंवर घास घास चंदन घासत बसायचें, लेप चढवायचे पण त्यानें मुक्कामावर पोहोंचतां येणें शक्य नाहीं. तें फक्त पहिलें पाऊल आहे.

## तुकारामाची ईश्वर-दर्शनाची 'ॲसिस्टंट'

तुकारामाला चतुर्भुज देवाचें दर्शन झालें तेव्हां तो खूष झाला परंतु तो हुषार होता म्हणून देवाला म्हणाला "जातीचा मी वाणी पोटींचें हें कुडें। नका मजपुढें ठकाठकी." लोक समजतात कीं तुकाराम भोळा होता, वाणी असून हि त्याला नीट व्यापार करतां येत नव्हता आणि त्याच्या भोळसट-

पणामुळें त्याची फार दुर्दशा झाली. परंतु तुकारामाचें स्वतःविषयीं काय मत होतें तें या अभंगावरून कळतें. तो देवाला म्हणतो कीं "मी जातीचा वाणी आहें. तुमच्या पोटांतलें कुडें मला समजतें. मीं तुमचें राजकारण पक्कें ओळखलें आहे, तेव्हां देवा, तुम्ही मला फसवूं शकणार नाहीं." म्हणून जरी त्याला भगवंताचें चतुर्भुज दर्शन झालें आणि त्याचें त्यानें स्वागत केलें तरी तो पक्कें ओळखून होता कीं हें कांहीं आपल्या भक्तीचें फळ नाहीं.

पुष्कळ लोक मला विचारतात कीं याप्रमाणें देवाचें जें दर्शन होतें तें खरें कीं खोटें? मी उत्तर देतों, तें खरें हि नाहीं व खोटें हि नाहीं, तें मधलें आहे. तें एक आश्वासन आहे. ज्या प्रकारचें ध्यान करून भक्त ध्यास घेतो तसें त्याला आश्वासन मिळतें. तेव्हां तें दर्शन नसून आश्वासन आहे हें तुकारामाला मागाहून कळलें. जेव्हां तो आळंदीला ज्ञानदेवांच्या समाधीचें दर्शन घ्यायला गेला होता तेव्हां तिथें जवळ च पक्षी दाणे टिपीत होते. तुकारामानें समाधीला साष्टांग नमस्कार घातला तेव्हां पक्षी भुर्रकन उडून गेले. तेव्हां तुकारामाला कळलें कीं मला दर्शन झालें नाहीं, देवानें मला फसविलें. जर मला सर्वत्र हरिदर्शन झालें आहे व मला सर्वभूतीं प्रेम आहे तर या पक्षांना माझी भीति कां वाटावी? त्यांना माझी भीति वाटली त्याअर्थी देवानें मला ठकविलें हें खास. नंतर तुकाराम महाराज त्या च ठिकाणीं नामस्मरण करीत ताठ उभे राहिले आणि अंतःकरणांत प्रेम व करुणा भरलेल्या स्थितींत तीन दिवस उभे राहिल्यानंतर मग उडून झाडावर जाऊन बसलेले पक्षी त्यांच्या खांद्यावर येऊन बसले-तेव्हां मग तुकाराम महाराजांचें समाधान झालें.

या प्रमाणें तुकारामानें पांडुरंगाच्या कृपेला, जशी विज्ञानांत ॲसिड टेस्ट लावतात तशी ॲसिड टेस्ट लावली. शंक, चक्र, गदा, पद्मधारी रूपाचें दर्शन होणें हें कांहीं खरें दर्शन नाहीं. पांडुरंगाच्या कृपेची कसोटी म्हणजे "माझी कोणी न धरूं शंका। ऐसें हो कां निर्द्वंद्व। तुका म्हणे जें जें भेटे तें तें वाटे मी ऐसें" जेव्हां मला जें जें भेटेल तें तें माझें च रूप आहे असें वाटेल तेव्हां मला स्पष्ट दर्शन झालें व पांडुरंगाची कृपा झाली असें मी समजेन. याप्रमाणें तुकारामानें धर्म म्हणजे काय तें शिकविलें.

## विज्ञान व आत्मज्ञानाच्या आधारें धर्म-स्थापना

यापुढें धर्मस्थापनेसाठीं भगवंताला जास्त तकलीफ द्यायची नाहीं, तर विज्ञान आणि आत्मज्ञान या दोन साधनांनीं सर्वांचें प्रेम आणि सहकार्य साधून आपल्याला धर्मस्थापना करायची आहे, सर्व मानवांचा तो एकच धर्म होईल. ही गोष्ट वेदभगवान् बोलून राहिले आहेत. वेदामध्यें विश्वमानुष असा शब्द आला आहे. विश्वमानुषाच्या स्थापनेकरितां भूदान, ग्रामदान, सर्वोदयपात्र हीं सर्व कामें चाललीं आहेत. सर्वोदयपात्र म्हणजे सर्वोदयाला मान्यता. ज्या हातानें सर्वोदयपात्रांत मूठ टाकली जाईल त्या हातानें कधीं हि हिंसा केली जाणार नाहीं हें त्यामागें गृहित आहे. त्याचा हा नुसता आरंभ आहे. त्याची पहिली कसोटी म्हणजे केवळ देवता निःशस्त्र होऊन चालणार नाहीं तर मानव हि निःशस्त्र झाला पाहिजे, व सरकार हि निःशस्त्र झालें पाहिजे. यापैकीं पंढरपूरला देवता निःशस्त्र झाली आहे. त्याचा आमच्यावर वरदहस्त आहे. तें काम झालें आहे तेव्हां आतां मानवानें शस्त्रें सोडायचीं आहेत आणि सरकारला शस्त्रें सोडायला लावायचीं आहेत. हें जेव्हां होईल तेव्हां मानव-धर्माच्या स्थापनेचा आरंभ होईल. जोंवर हें होत नाहीं तोंवर मानवधर्म येणार नाहीं, त्याचें पहिलीं पावलें टाकण्याचें च चालू राहील. परंतु आजवर पक्षी एका च पंखानें उडत असल्यानें तें होत नव्हतें पण आतां दोन पंख, आत्मज्ञान आणि विज्ञान, लाभल्यामुळें हा पक्षी अंतरिक्षांत खूप उडेल. आतां आम्हांला मानवप्रेमाचा धर्म स्थापन करायचा आहे. त्यांत पूजाअर्चा राहणार नसून मानव-सेवा येईल. भक्तीचें सेवेमध्यें रूपांतर करणाऱ्या मानव-सेवा-धर्माची स्थापना आपल्याला करायची आहे.

शेवगांव (जि. अहमदनगर) ता. २५-७-५८

## सेवेसाठीं यात्रा

पैठणहून मी आतां इथें आलों आहें, तत्पूर्वी गोरोबा काकांचे तेर, मुकुंदराज आणि दासोपंतांची आंबेजोगाई हे सगळे पहात पहात मी येथें आलों. हीं स्थानें मी प्रथम च पाहत आहें. देहू, आळंदी आणि सज्जनगड पाहण्याचा योग मला यापूर्वी आला होता. माझी यात्रा आतां सात साडेसात वर्षे चालली असून ती जनतेच्या सेवेसाठीं आणि जनतात्म्याच्या दर्शनासाठीं चाललेली आहे. त्यांत काशी, गया, पुरी, कांची, कालडी आणि गोकर्ण इत्यादि अनेक स्थानें आलीं. हें पुण्य मला फुकटांत च मिळालें आहे. या पुण्यासाठीं मीं कांहीं ही यात्रा काढली नाहीं, सेवेसाठीं काढली आहे आणि या यात्रेंत ओघाओघानें हें हि पुण्य लाभत आहे. परंतु मी कांहीं पुण्याचा अभिलाषी नाहीं, मी सेवेचा अभिलाषी आहें. या यात्रेंत पंढरपूरला मी जरी अगदीं पहिल्या प्रथम च गेलों होतों तरी मीं भगवंताला असें सांगितलें कीं तुझ्या अटीवर मी तुझ्या दर्शनाला येणार नाहीं, माझ्या अटीवर येऊं देत असशील तर येईन. कारण भगवंताच्या दर्शनाच्या अटी काय आहेत तें मला माहीत आहे. रोज संध्याकाळीं प्रार्थनेंत मी त्या अटी–स्थितप्रज्ञाचीं लक्षणें–म्हणत असतों. जे स्थितप्रज्ञ आहेत त्यांना परमेश्वराच्या दरबारांत प्रवेश करण्याचा आणि दर्शन घेण्याचा हक्क आहे. त्या अटीवर न माझी प्रवेश मागण्याची योग्यता आहे, न मला असा प्रवेश मिळेल अशी आशा आहे. तशा अटीवर प्रवेश मागावा अशी माझी इच्छा देखील नाहीं. कारण स्थितप्रज्ञ होण्याची इच्छा राखण्याच्या लायकीचा सुद्धां मी नाहीं. इतकें असून रोज स्थितप्रज्ञाचे श्लोक मी म्हणत असतों आणि त्याचें विवरण करणारें एक भाष्य–स्थितप्रज्ञदर्शन–म्हणून मीं लिहिलें आहे. आणि तें जागजागीं लोक वाचतात.

## सेवेचें श्रेय नको

परंतु ती माझी एक फार दूरची आकांक्षा असली तरी आज कांहीं मी त्या पदवीला जवळून देखील स्पर्श करण्याला उत्सुक नाहीं. मी केवळ सेवेचा

उत्सुक आहें आणि ती सेवा सुद्धां माझ्या पदरीं पडूं नये अशी माझी इच्छा आहे. कारण ती सेवा सहज प्राप्त आहे आणि आजच्या काळाला व परिस्थितीला आवश्यक आहे. तेव्हां काळाचीच ती मागणी आहे आणि म्हणून माझ्या हातून जी कांहीं सेवा होईल ती काळानेंच करवून घेतली असें होईल, त्यामुळें मला त्या सेवेचें श्रेय मिळणार नाहीं. एक काडी गंगोत्रीला गंगेमध्यें पडली आणि तेथून वाहत वाहत १५०० मैल जाऊन ती समुद्राला मिळाली तरी पोहण्याचें श्रेय कांहीं त्या काडीला लाभलें नाहीं. कारण ती काडी प्रवाहानुसार वाहत गेली. ती प्रवाहाच्या विरुद्ध जर जाती आणि चार हात जरी जाती तरी तिला चार हात पोहण्याचें श्रेय मिळालें असतें. परंतु ती १५०० मैल जरी गेली तरी तिला पोहण्याचें श्रेय कांहीं मिळालें नाहीं. त्याचप्रमाणें मीं जी हातांत सेवा घेतली आहे ती जर प्रवाहाच्या विरुद्ध असती आणि ती थोडी हि माझ्या हातून घडली असती, तरी तिचें श्रेय मला मिळालें असतें. परंतु ही सेवा प्रवाहाला धरून आहे आणि काळाचीच ती मागणी असल्यामुळें जरी कांहीं सेवा घडत आहे तरी ती कांहीं माझ्या नांवानें जमा होणार नाहीं असा पक्का बंदोबस्त मीं करून ठेवलेला आहे. म्हणून सेवेची जरी मी इच्छा राखतों तरी त्या सेवेचें श्रेय माझ्या पदरीं पडूं नये अशी माझी इच्छा आहे आणि ती पार पाडण्याचा माझा प्रयत्न चालू आहे.

## शंकराचार्य, ज्ञानदेव व गांधींचा उपकार

इथें मी जो आतां पैठणहून आलों तो सेवेकरी या नात्यानें आलों आहें. ज्ञानदेवांचा मी आपल्याला पाईक समजतों. आज दुपारीं ज्ञानदेवांच्या भक्तांचा मेळावा होणार आहे. त्या मेळाव्यापुढें मला कांहीं बोलायचें हि आहे. तेव्हां ज्ञानदेवांच्या भक्त मंडळींमध्यें तशी कांहीं माझी योग्यता नसतांना हि आकांक्षेच्या जोरावर मी प्रवेश मागणार आहें. आणि आकांक्षेला कांहीं आधार लागतो, तो आधार मात्र मला आहे. ज्ञानदेवांच्या विचारांशीं लहानपणापासून आजतागाईत माझा निरंतर परिचय आहे आणि ते विचार मी सतत घोळत असतों. ते विचार मला जीवनामध्यें फार उपयोगी पडले आहेत आणि जें कांहीं जीवनामध्यें करण्यासारखें मला सुचलें त्या कामीं अधिकांत-अधिक मदत मला, शास्त्रग्रंथ जर सोडून दिले तर, शंकर, ज्ञानदेव आणि

गांधी या तिघांकडून मिळाली आहे. गांधीजींचा मला सहवास लाभला त्यांच्या विचारांचें आणि ग्रंथांचें अध्ययन तर झालें च पण त्यांचा सहवासहि लाभला आणि त्यांनीं जीं सेवाकामें उभीं केलीं त्यापैकीं कांहीं सेवाकार्यांमध्यें माझें तारुण्यांतलें जीवन खपलें त्यामुळें "महापुरुष-संश्रय" ज्याला म्हणतात तो मला पूर्ण अर्थानें लाभला आहे. संगति, विचारांचा लाभ आणि तदनुसार काम करण्याची संधि तिन्ही मिळून "महापुरुषसंश्रय" होतो, तो मला लाभला. त्यांचा माझ्यावर फार उपकार आहे. तसा च आदि शंकराचार्यांचा माझ्यावर उपकार आहे. कारण तत्त्वज्ञानाच्या ज्या शंका तार्किक मनामध्यें उठूं शकतात, त्या माझ्या हि मनामध्यें थोडयाफार उठूं शकतात. त्यांचें निरसन करण्याच्या कामीं मला आदि शंकराचार्यांची मदत अधिकाधिक झाली आणि त्यांनीं मांडलेले विचार नेमक्या त्या च भाषेंत जरी मला पटवितां आले नाहींत, अथवा कांहीं भिन्न भाषा वापरण्याची मला आज आवश्यकता भासली तरी सुद्धां त्यांचें विचारऋण सर्वस्वी माझ्या शिरावर आहे.

## आपलें स्थान हेंच जगाचें जीवनसूत्र

तुलनेनें कांहीं निष्पन्न होणार नाहीं परंतु ज्ञानदेवांचा माझ्यावर जो उपकार झाला आहे तो वर्णन करायला माझ्याजवळ शब्द च नाहीं. तो चिंतनावर आहे, हृदयावर आहे आणि माझ्या कार्यपद्धतीवर आहे. इतकेंच काय पण मी असेंहि मानतों कीं माझ्या शरिरावरहि आहे. इतका त्यांचा सर्व बाजूनें परिणाम माझ्या जीवनावर आहे. अशा स्थितींत ज्ञानेश्वर महाराजांनीं ज्या स्थानीं बसून ज्ञानेश्वरी लिहिली म्हणतात त्या स्थानीं मनानें मी कितीदां तरी आलों आहें. ज्ञानदेव महाराजांनीं ज्ञानेश्वरीच्या अंतीं या स्थानाचें नांव घेतलेलें आहे आणि 'जगाचें जीवनसूत्र' असें याचें वर्णन केलें आहे. आतां खरोखर जगाचें जीवनसूत्र कोठें आहे असें जर म्हटलें तर त्याचें अधिष्ठान आपल्या हृदयांतच सांपडणार आहे. परंतु इग्लंडचे लोक मोठ्या कौतुकानें सांगत असतात कीं सबंध जगाचें मध्यस्थान मध्य-बिंदु कोणता असेल तर तो इंग्लंड आहे आणि नकाशावरून ते दाखवतात हि कीं इंग्लडपासून सबंध जग समुद्राच्या मार्गानें कसें समान

अंतरावर आहे. मी पवनारला परंधामला रहात असतांना म्हणत असें कीं सबंध जगाचा मध्यबिंदु, सबंध जगाचें केन्द्र परंधाम पवनार हें आहे. आतां तें धाम नदीच्या पलीकडच्या तीरावर असल्यामुळें त्याला परंधाम तर म्हणतातच पण सर्वांत श्रेष्ठ चार धामें हिंदुस्थानच्या चारी बाजूला आहेत परंतु मध्यभागीं उपलब्ध नव्हतें तें परंधाम आहे आणि तें सबंध जगाचें मध्य स्थान आहे. ऋग्वेदामध्यें एक प्रश्न विचारला आहे कीं, या भुवनाचा नाभि काय आहे आणि पृथ्वीचा अंत कुठें आहे, पृथ्वी कुठें संपते ? त्या प्रश्नाचें उत्तर ऋषीनें दिलें आहे "इयं वेदिः परोअंतः पृथिव्याः" ही जी माझी वेदी आहे, म्हणजे ही ज्ञानभूमि, जिथून मला ज्ञान मिळालें आहे ती सबंध पृथ्वीचा शेवट आहे आणि "अयं यज्ञो भुवनस्य नाभिः" आणि हा जो मी यज्ञ करीत आहें तो संबध भुवनाचा नाभि आहे म्हणजे मध्यबिंदु आहे, तुंबा आहे. जसा चाकाच्या मध्यभागीं तुंबा असतो आणि त्याच्या चारी बाजूला आरे ठोकून बसविलेले असतात तसा या सबंध भुवनाचा नाभि "अयं यज्ञः" हा जो मी यज्ञ करीत आहें तो आहे. त्याप्रमाणें ज्ञानदेव महाराजांनीं जगाचें जीवनसूत्र इथें आहे असें म्हटलें तें कां ? तर ज्ञानविचार त्यांना इथें सुचला आणि त्यांनीं इथेंच तो लिहला म्हणून या स्थानाला त्यांनीं जगाचा मध्यबिंदु म्हटलें. असें जेव्हां मनुष्य मानतो तेव्हां जीवन पवित्र होतें. पवित्र स्थान आणखी कुठें तरी दुसरीकडे आहे आणि जिथें मी राहतों, जिथें माझें काम चाललें आहे तिथेंच नेमकें तें नाहीं असें जर आपण मानूं लागलों तर परमेश्वर दर्शनाची किल्ली आपण हरवली असें होईल. जेथें आपला जन्म झाला, जिथें आपल्याला सेवेची बुद्धि मिळाली तें स्थान या त्रिभुवनांत सगळ्यांत जास्त पवित्र आहे, असा जर आपल्याला अनुभव आला नाहीं तर परमेश्वर दर्शनाची किल्ली आपण गमावली. तुकाराम महाराज देहूमध्यें रहात होते, सर्व तऱ्हेचे कडू आणि गोड अनुभव त्यांना तिथें मिळून सुद्धां, अनेक तऱ्हेचा त्रास त्यांना तेथें झाला असतांना हि तें काय म्हणतात ? "धन्य देहू गांव" असा उदगार त्यांच्या मुखांतून निघाला कारण तुकाराम असें समजतो कीं, ज्या ठिकाणीं परमेश्वरानें आपल्याला जन्म

दिला जिथें आपल्याला सद्‌बुद्धि लाभली तें स्थान धन्य म्हणायचें नाहीं तर दुसरें कोणतें स्थान धन्य म्हणायचें ? राम अयोध्येला परत जातांना जवळच्या वानर मंडळींना अयोध्येकडे बोट दाखवून म्हणाले, ही माझी मातृभूमि आहे "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसि।" जशी जननी तशी जन्मभूमि स्वर्गापेक्षां हि थोर असते. तेव्हां ही धामदापुरी आहे; परंधाम देणारी मोक्ष देणारी ही माझी अयोध्या नगरी आहे असें मोठ्या प्रेमानें रामानें तिचें वर्णन केलें. तसेंच ज्ञानदेवमहाराजांनीं हें स्थान जगाचें जीवन सूत्र आहे असें म्हटलें तें सर्वथा योग्य आहे. पण जर कोणी असें म्हणूं लागला कीं हेंच जीवन सूत्र आहे आणि आम्ही जिथें राहतों तें जीवन सूत्र नाहीं तर आम्हीं जीवनच गमावलें. जेथें आम्ही राहतों त्या ठिकाणींच आम्हांला आमचें जीवन सूत्र हातीं आलें पाहिजे. ज्ञानदेव महाराजांना या ठिकाणीं जीवन सूत्र लाभलें आणि आमच्या मराठी भाषेचा सर्व श्रेष्ठ अलंकार आणि ज्याच्या आधारानें हा मराठी समाज आजपर्यंत जिवत राहिला आहे आणि पुढें हि ज्याच्या आधारानें तो जिवंत राहूं शकतो तो मराठी भाषेचा परमाधार, साहित्यशक्ति, योगशक्ति, शब्दशक्ति, भक्ति आणि अपरोक्षानुभूति या सर्वांनीं भरलेला अप्रतिम माधुर्यसागर असा जो ग्रंथ त्यांनीं आम्हांला दिला त्या स्थानीं येण्याचें भाग्य मला लाभलें याबद्दल मला फार धन्यता वाटते. ज्ञानदेवांचा अक्षर देह म्हणजे ज्ञानेश्वरी आहे. तो क्षर नाहीं अक्षर आहे. जो क्षर देह त्यांचा होता तो गेला. पंचत्वांत मिसळला. पण त्यांचा जो अक्षर देह आहे तो जसा संस्कृतामध्यें वेद सर्व प्रकारे आदि, काळानें आदि स्फूर्तीनें आदि ज्ञानसंपत्तीनें आदि त्याप्रमाणें मराठी भाषेचा वेदच त्यांनीं निर्माण केला आहे. आणि अगदीं आरंभीं पहिली ओळी म्हणून त्यांनीं जी लिहिली त्यामध्यें सुद्धां "ओम् नमो जी आद्या वेद प्रतिपाद्या" वेदानें ज्याचें प्रतिपान केलें आहे त्या भगवंताला नमन असो असें म्हणून त्यांनीं सूचित केलें आहे कीं हा वेदग्रंथ लिहला जात आहे. पुढें ते म्हणतात "माझे नित्य नवे श्वासहि प्रबंध होआवे," मला गुरूची कृपा लाभल्यामुळें माझे श्वास सुद्धां प्रबंध व्हावेत. ही जी भाषा घातली आहे ती वेदाला अनुलक्षून घातली आहे. "यस्य निश्वसितं वेदाः" वेद हे ज्या भगवंताचे निश्वसित आहेत म्हणजे श्वास आहे असें

म्हटलें जातें तिकडे लक्ष देऊन " माझे श्वास हि प्रबंध होआवे " अशी भाषा ज्ञानदेवांनीं घातली. केवढा त्यांचा आत्मविश्वास होता !

## ज्ञानदेवांनीं पाषाणाला पाझर फोडला

यावेळीं मी अधिक बोलूं इच्छित नाहीं. तिसऱ्या प्रहरीं मला पुन्हां बोलायचें आहे त्यामुळें यावेळीं मी ज्ञानदेवांना प्रथम भेटीं नमस्कार करण्यासाठीं म्हणून हे चार शब्द बोललों आहें. त्यांचें माझ्यावर अनंत अनंत उपकार आहेत आणि ते जन्मोजन्मीं फिटायचे नाहींत आणि म्हणून ते फेडण्यासाठीं अथवा दुसऱ्या कोणत्या च कारणासाठीं पुन्हां जन्म घेण्याची वासना न मी करीत नाहीं. कारण ते फिटणारच नाहींत. मीं जें कांहीं थोडें फार साहित्य लिहलें आहे, तें ज्ञानदेवांच्या चरणीं अर्पण असो, अशी भावनेनें च मीं तें लिहिलें आहे. ज्ञानदेवाचें रहस्य मी किती समजूं शकलों हें मी सांगूं शकत नाहीं. त्याची परीक्षा त्यांनींच घ्यावी. पण मीं जीं दोन अक्षरें लिहलीं त्याचें सर्व श्रेय केवळ त्यांनाच आहे. भाव त्यांनीं मला दिले, भाषा त्यांनीं मला दिली आणि जीवन-प्रेरणा त्यांनीं मला दिली. नाहीं तर मी मूळचा फार कठोर मनुष्य आहें. जमनालालजीसारख्या फार गोड मनुष्याची संगति मला लाभली आणि गांधीजींची संगति मला लाभली. आमचे एक मित्र विनोदानें म्हणाले होते कीं, जरी मला गांधींत तळला आणि जमनालालजींत घोळला, तरी विनोबा तो विनोबाच. तुपांत तळलें, आणि साखरेंत घोळलें तरी कारलें कडूच राहतें. तसें याचें आहे. ह्या मित्राचें म्हणणें अगदीं खरें आहे. पण माझ्या जीवनाला आणि हृदयाला कोणी गोडी आणली असेल आणि या पाषाणांतून जर कोणी पाणी काढलें असेल, पाझर फोडला असेल तर तो ज्ञानदेव महाराजांनीं फोडला. या पाषाणाला शंकराचार्यांनीं पाझर फोडला नाहीं त्यांनीं या पाषाणाला मजबूत केलें, या पाषाणाला गांधीजींनीं पाझर फोडला नाहीं त्यांनीं याच्यावर कारागिरी केली. पण याच्यांतून पाणी बाहेर काढण्याचा पराक्रम मात्र कोणीं केला असेल तर तो ज्ञानदेवांनींच केला. म्हणून आतां त्यांच्या चरणाला वंदन करून, तुम्हां सगळ्यांना भक्तिभावपूर्वक प्रणाम करीत आहें, जय जगत.

नेवासे, जि. अहमदनगर २८-७-५८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ३५५८० वि: निबंध
नों. दि: १०।१२।५३

# ज्ञानेश्वरी हा धर्म-ग्रंथ आहे : ३ :

मी एकदां असें सांगितलें होतें कीं जगामध्यें तीन फार मोठ्या शक्ति --आत्मज्ञानशक्ति, विज्ञानशक्ति आणि साहित्यशक्ति म्हणजे शब्दशक्ति-- काम करीत आहेत. जगावर या तीन शक्तींचा परिणाम सर्वांत अधिक झालेला आहे. त्यां पैकीं दोन शक्ति, शब्दशक्ति आणि आत्मज्ञानशक्ति, ज्ञानदेवांच्या ठिकाणीं एकवटलेल्या होत्या.

## शब्दापेक्षां जीवन अधिक प्रभावी

लोकचित्तावर जितका शब्दाचा परिणाम होतो त्यापेक्षां पुष्कळ अधिक परिणाम जीवनाचा होतो. म्हणून निर्गुण विचारानें जरी शब्द श्रेष्ठ ठरतो तरी समाजामध्यें विशिष्ट जीवनें अधिक परिणामकारी ठरतात. येशूख्रिस्ताचें जें जीवन आहे तें जर वजा केलें तर त्याच्या शिकवणीमध्यें असें कांहीं सामर्थ्य दिसून येणार नाहीं कीं जें करोडो लोकांना मोहित करील. आणि शंकराचार्यांच्या हि शब्दामागें जी जीवन-शक्ति होती ती वजा केली तर त्यांच्या ग्रंथामध्यें असें कांहीं सामर्थ्य दिसत नाहीं कीं ज्याचा परिणाम सबंध भारतावर आज १२०० वर्षें जसा चाललेला आहे तसा चालू रहावा. मला वाटतें कीं ती च स्थिति ज्ञानदेवांची सुद्धां आहे. त्यांच्या ठिकाणीं शब्द-शक्ति जरी बरीच प्रकट झाली आहे तरी त्याच्या मागें जे जीवन होतें तें जीवन फार मोहून टाकणारें आहे. तें जीवन जर नसतें तर जो ठसा, ज्ञानेश्वरी वाचणारांवर नव्हे तर न वाचणारांवर, उमटला आहे तो उमटला नसता.

आज तुम्ही पहाल कीं महाराष्ट्रामध्यें "ज्ञानदेव तुकाराम" असा घोष चाललेला आहे. असा घोष करणाऱ्या शंभरांपैकीं एखाद्याला च ज्ञानेश्वरी कळत असते, आणि पुष्कळांनीं ती वाचलेली हि नसते. अमृतानुभव तर दहा ज्ञानेश्वरी वाचणारांपैकीं एखादा च वाचीत असेल. फक्त ज्ञानदेवांचा हरिपाठ ही त्यांची सर्व लोकांना देणगी आहे. ब्राह्मणांची जशी संध्या त्याप्रमाणें सबंध महाराष्ट्रांतले खेडोपाडचे लोक हरिपाठाचा

जप करीत असतात. परंतु त्या लहानशा ग्रंथामध्यें ज्ञानदेवांची शब्द-शक्ति प्रकट होणें कठिण च. तेव्हां लोकांवर जो परिणाम आहे तो त्यांच्या शब्दशक्तीचा नसून त्यांच्या जीवनाचा तो परिणाम आहे.

येशूख्रिस्त, शंकराचार्य आणि ज्ञानदेव हीं तीन नांवें मला आज अशासाठीं आठवलीं कीं हे तीघे ब्रह्मचारी होते आणि त्यांच्या सबंध विचारामागें ब्रह्मचर्याची शक्ति प्रकट झालेली आहे. ब्रह्मचर्य म्हणजे पूर्ण मानव. आपण समाजामध्यें पाहतों कीं पिता आणि माता मिळून पूर्ण मानवत्व बनतें. एका च मानवामध्यें पितृत्व आणि मातृत्व विकसित होणें याचें नांव आहे ब्रह्मचर्य. आपल्याला माहीत आहे कीं ख्रिस्ताची मूर्ति अत्यंत प्रेममय आहे. करोडो लोकांना त्याचें जें आकर्षण आहे त्याचें मुख्य कारण त्याचें कोमल हृदय, त्याला वाटणारी करुणा आणि दु:खितांचें दु:ख निवारण करण्याची तळमळ. याशिवाय दुसरी भावना त्याच्या जीवनाला स्पर्श च करीत नाहीं. अशी त्याच्या मनाची ठेवण असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं अपार शिष्य-वात्सल्य प्रकटलें आणि म्हणून ख्रिस्त हा तारक झाला. जसा एखादा मित्र सखा उपयोगी पडावा त्या प्रमाणें तो विश्वाला उपयोगी पडतो.

माझें अनेक ख्रिस्ती लोकांशीं बोलणें होत असतें. मीं असें पाहिलें आहे कीं एखाद्या मुलाला आईसंबंधानें जें कांहीं वाटतें आणि शिवाय गुरूसंबंधानें जें कांहीं वाटतें तो दुहेरी भाव ख्रिस्तासंबंधीं ख्रिस्ती लोकांना वाटतो. जगामध्यें ख्रिस्ती लोक जिथें जिथें गेले त्या त्या ठिकाणीं ख्रिस्ताचें जें व्यक्तिमत्व आहे तें च त्यांनीं पुढें केलेलें आहे. अनाथांना, पतितांना, दु:खितांना, रोग्यांना, स्त्रियांना लोभनीय असें त्याचें चित्र डोळ्यापुढें उभें राहतें आणि म्हणून च ख्रिस्तीधर्म हा मानवसेवापरायण झालेला आहे. ख्रिस्ताच्या नांवानें सबंध जगामध्यें अनेक ठिकाणीं सेवेचीं केन्द्रें निघालेलीं आहेत. महारोग्यांची सेवा, इतर हि पीडितांची सेवा, दुष्काळग्रस्तांची सेवा, संकटांत सांपडलेल्या लोकांची सेवा करण्यासाठीं सबंध पृथ्वीवर ते लोक धावत असतात. त्यांना मीं विचारलें होतें कीं ख्रिस्ताचें नांव बाजूला सारून तुम्ही सेवा कराल तर तुमची ती सेवा लोकांना मानवणार नाहीं काय ? यावर त्यांनीं उत्तर दिलें

कीं 'आमचा असा विश्वास आहे कीं ख्रिस्ताचें नांव जर आम्ही घेणार नसूं तर आमची सेवा लोकांना मानवेल कीं नाहीं हा पुढचा प्रश्न आहे पण आमच्यानें ती करवेल कीं नाहीं हा च आमच्यापुढें प्रश्न आहे. आम्ही ती सेवा करूं च शकणार नाहीं. ख्रिस्ताची जी प्रेमळ मूर्ति आमच्या डोळ्यासमोर उभी राहते ती जर आमच्या डोळ्यापुढून दूर झाली तर आमच्या हृदयामध्यें आम्ही अशी कांहीं शक्ति पाहत नाहीं कीं कुष्ठरोगी लोकांत जाऊन राहूं आणि सेवा करतां करतां तो च रोग आपल्याला लागू झाला तर तो भगवद्प्रसाद समजूं, जसा आज आम्ही समजतों. ख्रिस्ताचें नांव, त्याची मूर्ति आमच्यासमोर आहे त्यामुळें च आम्हांला ती स्फूर्ति होते.

## करुणालय शंकराचार्य

शंकराचार्यांच्या जीवनामध्यें किती करुणा होती याचा सहसा अंदाज त्यांच्या ग्रंथांत लागत नाहीं. सूक्ष्म दृष्टीनें च तो पहावा लागतो. फार प्रखर बुद्धि काम करीत आहे असें त्यांचे ग्रंथ वाचतांना माणसाला भासतें. परंतु त्यांनीं जीं स्तोत्रें लिहिलीं आहेत तीं पाहिलीं म्हणजे त्यांच्या हृदयांतलें कारुण्य प्रकट होतें. भगवान् विष्णूचें एक स्तोत्र त्यांनीं लिहिलें आहे आणि तें शांकरमठामध्यें बहुधा रोज म्हणावें लागतें, "**नारायण करुणामय शरणं करवाणि तावकौ चरणौ**" यांत त्यांनीं परमेश्वराला करुणामय म्हणून आळवलेले असून त्या महापुरुषानें प्रार्थना अशी केली आहे कीं "अविनयमपनय विष्णो" हे विष्णो ! माझा अविनय दूर कर आणि "**भूतदयां विस्तारय**" माझ्या भूतदयेचा विस्तार कर. त्यांच्या या स्तोत्रांमध्यें त्यांचें हृदय प्रकट झालेलें आहे आणि त्यांच्या भाष्यामध्यें त्यांची बुद्धि प्रकट झालेली आहे. ख्रिस्ताचें हृदय आणि बुद्धि दोन्ही त्याच्या प्रत्येक शब्दांत उतरली आहे.

शंकराचार्यांनीं आपल्या आईला, मी केव्हांतरी येईन, असें वचन दिलें होतें. पुढें यात्रा करीत करीत जेव्हां ते आईजवळ आले त्या सुमारास आई शेंवटच्या आजारांत होती. त्यांनीं तिची सेवा केली. शेंवटीं तिचें शरीर पडलें. त्या वेळीं शंकराचार्यांचे जातवाले नंबुद्री ब्राह्मण त्यांच्या आईच्या प्रेताच्या दहनाला आले नाहींत, आणि त्या काळांत बिन-

जातवाले तर यायचे च नव्हते. कलियुगामध्यें ब्रह्मचर्याश्रमांतून संन्यास घेण्याचा अधिकार नाहीं अशी कल्पना त्या वेळच्या ब्राह्मणांनीं करून ठेवलेली होती. ब्रह्मचर्याश्रमांतून ग्रहस्थाश्रमांत असें पायरीपायरीनें गेलें तर च कलियुगांत संन्यासाचा अधिकार आहे आणि या माणसानें एकदम ब्रह्मचर्याश्रमांतून वरच्या पायरीवर चढण्याची हिंमत केली यांत धर्म-शास्त्राचा विरोध झाला असें म्हणून त्या ब्राह्मणांनीं शंकराचार्यांवर बहिष्कार टाकला होता. तें आईचें प्रेत स्मशानांत नेऊन कसें जाळायचें हा प्रश्न जेव्हां शंकराचार्यांच्या पुढें आला तेव्हां त्यांनीं तलवार हातांत घेऊन त्या प्रेताचे तीन तुकडे केले आणि एकेक तुकडा स्मशानांत नेऊन अलग अलग जाळला. कारण एवढें सबंध प्रेत उचलणें एका माणसाला शक्य नव्हतें. सुधारक सुधारणेसाठीं कुठपर्यंत सहन करीत असतात याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. ही कहाणी करोडो लोकांना माहीत नसते आणि ती माहीत सुद्धां नसणें यामध्यें शंकराचार्यांच्या नम्रतेची पराकाष्ठा आहे. म्हणजे या गोष्टीचा त्यांनीं कधीं हि कोठें हि उच्चार केला नसला पाहिजे. नाहींतर ज्यांचीं भाष्यें आज आपण इतकीं वर्षें वाचतों आहोंत त्यांनीं जर या घटनेवर चार अक्षरें लिहून ठेवलीं असतीं तर ती घटना अजरामर च झाली असती. परंतु त्यांनीं तिचा कधीं उच्चार हि केला नाहीं. पुढें हिंदुधर्मावर त्यांच्या जीवनाचा असा खोल ठसा उमटला कीं केरळमध्यें नंबुद्री जातीच्या ब्राह्मणांत प्रेताला जाळायला घेऊन जातांना त्या प्रेताच्या शरिरावर तीन ठिकाणीं सेंदराचे पट्टे ओढण्याची चाल पडली. शंकराचार्यांनीं आपल्या आईचे तीन तुकडे केले होते त्याचें स्मारक म्हणून आतां तो तीन पट्टे ओढण्याचा विधि च झालेला आहे. शंकराचार्यांच्या ठिकाणीं आईविषयीं जी उत्कट भावना होती ती त्यांच्या ब्रह्मचर्यांतून निर्माण झालेली होती. म्हणून त्यांनीं आपल्या शिष्यांना ब्रह्मचर्य-साधनेसाठीं शारदेची—ब्रह्मचारिणी शारदा अंबेची मूर्ति डोळ्यापुढें ठेवायला सांगितली आणि "कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति" एखादा कुपुत्र जन्माला येऊं शकतो परंतु कुमाता कधीं च होऊं शकत नाहीं असा त्यांनीं आपला निर्णय लिहून ठेवला. इतकें मातृगौरव त्यांच्या ठिकाणीं होतें. त्यांच्या शिष्यांनीं त्यांचें वर्णन केलें आहे "श्रुतिस्मृतिपुराणानाम् आलयम् करुणालयम्" वेदादि ज्ञानाचा

आणि करुणेचा आलय असें त्यांनीं म्हटलें. तेव्हां त्यांच्या ठिकाणीं जें कारुण्य उमटलें होतें त्या कारुण्यामुळें च तो माणूस सतत १६ वर्षें हिंदुस्थानभर फिरला.

## कर्मयोगी शंकराचार्य

आज लोक वाद घालतात कीं शंकराचार्य संन्यासी, संन्यासवादी होते आणि आम्ही कर्मयोगी आहोंत. कपाळाचे तुम्ही कर्मयोगी ! "**जिवा कर्मयोगें जनीं जन्म झाला**" तसले कर्मयोगी आहांत तुम्ही ! निरंतर १६ वर्षें फिरणारा माणूस कर्मयोगी नसेल तर कोण योगी असेल ? परंतु चित्तावर कर्म करण्याचा अहंकार ठेवून ते हिंडत नव्हते, आणि त्या कर्माला ते कर्म च म्हणत नव्हते. ते म्हणत कीं हें साधें जीवन आहे. हें कसलें कर्म ? ज्यांत कांहीं आटापीटा अहंकार असतो, ज्याचा चित्तावर बोझा, भार तें कर्म होय. "**न तत् कर्म येन बुद्धोः समुच्चयः स्यात्**" त्यांचें हें अगदीं प्रसिद्ध वाक्य आहे कीं ज्ञानी पुरुषाच्या हातून सहज लोकसंग्रहाचीं जीं कर्में होतात तीं कारुण्यप्रेरित असतात आणि त्याचा त्या ज्ञानावर कांहीं हि बोझा नसतो. तीं असतात म्हणजे छायेसारखीं असतात. जशी माणसाच्या बरोबर छाया असते, त्या छायेची अलग मोजदाद करीत नाहींत, त्या प्रमाणें तीं कर्में असतात आणि तीं कारुण्यप्रेरित असतात. तुम्ही जरा कल्पना करा कीं अशा करुणेशिवाय आजच्या सोयी व साधनें नसलेल्या त्या काळामध्यें शंकराचार्यांनीं केवढें महान् कार्य केलें ! आज ते रिपोर्ट, तो प्रेसमध्यें गाजावाजा, कायकाय चालतें आहे ! आणि इतकें सर्व करून करून त्या बिचाऱ्या विचाराचे हाल च होतात. ते विचार कधीं कोणाच्या हृदयांत जात च नाहींत. ऐकणाराला आपल्या स्वतःच्या हृदयांत विचार जाण्याची जितकी चिंता त्यापेक्षां प्रेसमधें रिपोर्ट जावा ही च जास्त चिंता. परोपकाराचीं च चिंता ! ज्ञानदेवांनीं एके ठिकाणीं वाक्य घातलें आहे "**म्हणोनिया बापा । जया आथी आपुली कृपा ।**" आपली स्वतःची ज्याला दया वाटत असेल त्यानें या विषयाकडे थोडें लक्ष द्यावें. पण आजकाल अशी भूतदया पाठीशीं लागली आहे कीं तिचा आपल्याशीं कांहीं संबंध च पोंचत नाहीं. अलिकडे आमच्या पाठीशीं हृदयपरिवर्तनाचें

भूत च लागलेलें आहे. आम्ही समजतों कीं आमचें हृदय अगदीं बरोबर जागेवर आहे आणि बाकीच्यांचीं हृदयें पालटायचीं आहेत! शंकराचार्यांच्या त्या काळामध्यें प्रसिद्धीचीं कांहीं हि साधनें नव्हतीं. परंतु प्रसिद्धी नव्हती म्हणून त्यांचें कांहीं बिघडत नव्हतें. त्यांच्यापाशीं शुद्धि होती. शुद्धीची गरज आहे. हृदयांत कारुण्य भरलेलें हवें. सांगायचें तात्पर्य असें कीं १६-१६ वर्षें दगदग करून तो मनुष्य शेंवटीं अल्पवयांत मेला. अक्षरशः त्यानें आपलें शरीर झिजविलें.

## शंकराचार्य मरत मरत जगले

आणि मरतां मरतां वाचत गेले अशी कहाणी आहे. प्रथम त्यांना आठ वर्षांचें आयुष्य लाभलें होतें. आठव्या वर्षीं मरणाची तयारी झाली. नदींत सुसरीनें त्यांना पकडलें. त्या वेळीं ते आईला म्हणाले, " आतां तरी देशील कीं नाहीं मला संन्यासाची परवानगी ?" तिनें परवानगी दिली. तेव्हां भगवान् म्हणाले, तूं आतां संन्यास घेतल्यामुळें तुझें पूर्वीचें जीवन आतां संपलें आहे आणि तुझें आठ वर्षांचें ठरलेलें आयुष्य होतें तें आतां दुप्पट झालें आहे. त्यानंतर सोळा वर्षांचें आयुष्य घेऊन ते निघाले. नर्मदेच्या किनाऱ्यावर कांहीं दिवस राहून गुरूंपाशीं अनुभव मिळविला, काशीला व बद्रिकेदारला जाऊन १६ व्या वर्षीं ग्रंथ लिहिले आणि आतां हें आयुष्य संपलें आहे म्हणून ते सारे भगवंताला अर्पण केले. तेव्हां भगवत् साक्षात्कार झाला आणि भगवंतांनीं सांगितलें कीं हे माझ्या मुला! मीं जें तुला आयुष्य दिलें होतें त्याचें तूं सार्थक केलेंस, आतां मी तुला पुन्हां १६ वर्षें देत आहें आणि ह्या पुढें हें ज्ञान सबंध भारतभर तूं लोकांच्या कानीं पोंचव. असा भगवंताचा आदेश मिळतांच १६ व्या वर्षापासून सतत पायपिटी सुरू करून केरळचा मनुष्य हिमालयांत जाऊन त्या ठिकाणीं समाधिस्थ झाला. या आख्यायिकेचा अर्थ जर विचारांत घेतला तर साध्या भाषेमध्यें असा निघतो कीं तो माणूस दोनदां मरणांतून वाचला.

## लोकजीवनावर प्रभाव टाकणारीं स्तोत्रें

अशा प्रकारें ते मरत मरत जगलें म्हणजे शरीर झिजवून झिजवून "**शांता महांतो निवसंति संतो। वसंतवत् लोक-हितं चरंतः**" असे परिव्राजक

बनून ते हिंडले. महापुरुष अत्यंत शांत आणि वसंताप्रमाणें लोकहिताचें आचरण करीत करीत हिंडत असतात असें सांगितलेलें आहे. त्यांनीं आपल्या परिव्रज्येला, त्या भटकत्या जीवनाला कसला आधार दिला तें पाहिलें म्हणजे त्यांच्या खोल बुद्धीची साक्ष पटते. " **सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज** " सर्व धर्म सोडून तूं मला शरण ये असें गीतेंत वाक्य आहे. त्याचा अर्थ सर्वसामान्य माणसें करतात तसा वेदान्तशास्त्र करीत नाहीं. वेदान्तामध्यें त्याचा अर्थ असा होतो कीं परिव्राजक शब्दाची ही व्याख्या आहे. ' **सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रजति परित्यज्य व्रजति** ' अशी उपपत्ति लावून सर्व परमेश्वरावर सोंपवून फिरत राहणें असा ईश्वर-शरणतेचा अर्थ केला आहे. आणि जशी ज्ञानदेवांनीं भाषा प्रकट केली " **विचरे विश्व होउनी विश्वामाजीं** " या प्रमाणें आचरण हि त्यांनीं केलें आणि विश्वमय बनून केवळ कारुण्यानें च ते हिंडले. पुष्कळांची अशी समजूत आहे कीं ते जिथें जिथें गेले त्या त्या ठिकाणीं त्यांनीं दिग्विजय केला. विद्वानांना जिंकलें हें तर त्यांनीं केलें च पण लोकांमध्यें जाऊन अगदीं लोकांच्या भाषेमध्यें त्यांना स्तोत्रें शिकविलीं. उत्तर हिंदुस्थानमध्यें काशीला असतांना त्यांनीं पाहिलें कीं हिंदी लोकांना चौपाया गाण्याची फार संवय. तुळसीदासांनीं चौपाया च लिहिलेल्या आहेत. त्या चौपाया ऐकून आचार्यांनीं चौपाई छंदांत लिहिलें " **गेयं गीता-नामसहस्रं, ध्येयं श्रीपति-रूप मजस्रम्** " याप्रमाणें लोकांच्या छंदामधें लिहून त्यांनीं लोकांना ज्ञान दिलें. त्यांनीं कारुण्यप्रेरित होऊन समाजसुधार हि केला. ते हियालयांत गेले होते. तेथें त्यांना मनुष्याचा बळि देणारे लोक सांपडले तेव्हां त्यांनीं त्या लोकांना सांगितलें कीं तुमचें हें जें करणें आहे तें धर्माला धरून नाहीं. बलिदानाचा हा अर्थ नाहीं. त्या नंतर शंकराचार्यांच्या जीवनस्पर्शानें ती नरबळीची चाल दूर झाली. असें त्यांचें चरित्र करुणेनें भरलेलें आहे. आणि हा जो त्यांच्या जीवनाचा करुणेचा पैलू आहे तो त्यांच्या भाष्यामध्यें त्यांनीं लपवून ठेवलेला आहे. परंतु त्यांचा लोकजीवनावर जो परिणाम झाला आहे तो त्यांच्या करुणामय जीवनाचा झालेला आहे.

**ज्ञानदेवांचे नियम तोडणारी आजची मराठी**

या नंतर मी ज्ञानदेवाकडे येतों. सबंध महाराष्ट्रामधें "**ज्ञानोबा माउली, ज्ञानोबा माउली**" हें जें चाललें आहे त्याचा अर्थ काय आहे? त्याचा अर्थ असा कीं ज्ञानदेवाचें जें ब्रह्मचर्य होतें त्यामध्यें स्त्री आणि पुरुष मिसळलेले होते. म्हणजे पूर्ण ब्रह्मचर्याचें जें लक्षण आहे तें त्यांच्यांत पूर्णपणें प्रकट झालें आहे. शंकराचार्यांमध्यें तें झांकलेलें आहे. रेड्याच्या पाठीवर मारलें व ज्ञानदेवांच्या पाठीवर वळ उठले वगैरे कहाण्या लोकांमध्यें प्रसिद्ध आहेत, परंतु त्या कहाण्यांपेक्षां हि एक गोष्ट पाहण्यासारखी आहे ती अशी कीं सबंध ज्ञानेश्वरीमध्यें तुम्हाला एक हि कठोर शब्द सापडणार नांहीं. बोलावें कसें, लिहावें कसें, त्याच प्रमाणें "**संन्यासिले अवगुण जिया वाचा**" वाचेने कोणते अवगुण सोडावे या बाबत ज्ञानदेवांनीं नियम घालून दिले आहेत. पण आजकाल साहित्यिक साहित्याच्या नांवानें त्यांतला प्रत्येक नियम मोडत असतात. दुसऱ्याच्या हृदयाला चिडवूं नये, वक्रोक्ति, व्याजोक्ति, अतिशयोक्ति नसावी, "**आच वेग विंदाण**" वेगानें आक्रमण करूं नये, सौम्यतेनें बोलावें, बोलणें अटीतटीचें नसावें, विंदाण म्हणजे कसब भास करायचा एका अर्थाचा आणि असायचें दुसरे, असें करूं नये. म्हणजे काय करावें व काय करूं नये याची त्यांनीं यादी च दिली आहे. परंतु तो प्रत्येक नियम मोडण्यामधें आजकाल साहित्यिकांना साहित्याचा गौरव वाटत असतो. अलिकडे वर्तमानपत्रांची म्हणा कीं वक्त्यांची म्हणा जी मराठी भाषा झाली आहे ती ज्ञानदेवांनीं घातलेल्या प्रत्येक नियमाचें उलंघन कसें केलें जातें याच्या उदाहरणादाखल वापरतां येईल. अमका अमक ठराव फेटाळण्यांत आला असें म्हणतात. म्हणजे त्याला 'फेटाळणें' हा च शब्द! त्या मल्याळम् भाषेमध्यें "अवतारिकच्युतु" म्हणतात. ठराव मांडला, म्हणजे ठरावाचा अवतार झाला. तसें च तो ठराव मोडला तर त्याचा निषेध झाला तो असंमत झाला असें म्हणतात. फेटाळला असें म्हणत नाहींत. आपल्याकडे काव्यामध्यें जितके संस्कृत शब्द मोरोपंत वापरतो तितके मल्याळम्मध्यें बोलण्याचालण्यांतल्या गद्यांत वापरतात. मल्याळम्चें प्राथमिक पुस्तक जेव्हां मी वाचीत होतों तेव्हां त्यांतील संस्कृत शब्दावर मीं खुणा केल्या. त्यांत मला खूप च संस्कृत शब्द आढ-

ळले. त्याचें कारण असें कीं शंकराचार्यांनीं संस्कृत हीच आपली भाषा बनविली व संस्कृतांत च त्यांनीं ग्रंथ लिहिले. त्यामुळें त्यांच्या ग्रंथांचें अध्ययन करण्यानें मल्याळम् भाषा संस्कृतमय झाली. म्हणूनच त्या भाषेमध्यें फार सौम्यतेनें विचार मांडला जातो. आपल्याकडे मराठींत जी भाषा रूढ झाली आहे ती अगदीं प्रखर, हाणून पाडणारी, मारक, बोचक, दाहक, अशी आहे. आणि हें सर्व सुमारें ७०-८० वर्षांतलें अलिकडचें जें मराठीं साहित्य आहे त्यामध्यें दिसून येतें. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं—मी एक उपमा देत असतों—जसा एखादा काचेचा पेला जमिनीवर आपटला म्हणजे त्याचे तुकडे तुकडे होतात. त्याप्रमाणें महाराष्ट्रामध्यें कोणत्या हि प्रश्नाचे तुकडे च होतात. इथें शाबूद प्रश्न रहात च नाहीं. व्याकरणाचा विषय जरी असला तरी त्यांत परस्परांवर जी टीका होईल ती अगदीं प्रखर स्वरूपाची होईल. इतिहाससंशोधनाचा विषय असला—नाना आणि महादजी—तर एकानें नानाचा पक्ष घेतला, दुसऱ्यानें महादजीचा असें होतें. इतिहाससंशोधनामध्यें हि तीव्र मतभेद होणार आणि प्रखर प्रहार होणार. यामुळें महाराष्ट्र शक्तिहीन बनत चालला आहे. त्याच्यांत शक्ति उरलेली नाहीं. जसे धीरगंभीर पुरुष आपले विचार पराक्रमानें, कृतीनें प्रकट करतात तसें न होतां शब्दामध्येंच सर्व असलेनसलेले भाव ओतून पराक्रमाच्या क्षेत्रांमध्यें आम्ही फिके पडत चाललों आहोंत, मी तुमच्यापैकीं च एक आहें. तुम्ही माझी ही टीका अंतः-परीक्षणाच्या दृष्टीनें समजून घ्याल अशी मी आशा करतों.

### ज्ञानदेवांची सौम्य भाषा

ज्ञानदेवांचा शब्द कसा पडतो आणि आमचा शब्द कसा पडतो तें पहा. ते किती सौम्य शब्द काढीत असतात आणि विषयाची मांडणी दुसऱ्याला यत्किंचित हि क्लेश होणार नाहीं अशा कुशलतेनें कशी करतात तें पाहण्यासारखें आहे. वेदावर ज्ञानदेवांइतकी प्रखर टीका क्वचित च कोणीं केली असेल. पण ती इतक्या गोडीनें केली आहे कीं ती लोकांना बोचली नाहीं. वेद त्रिगुणात्मक आहे असें गीतेंत जें वाक्य आलें आहे त्याच्या आधारावर त्यांनीं लिहिलें कीं वेद रजतमांनीं भरलेले आहेत आणि उपनिषदें हा त्यांतला सात्त्विक अंश आहे. तेव्हां त्यांतला तेवढा

सात्त्विक अंश घेऊन बाकीचें खुशाल टाकून द्या. वेद कृपण झालेला आहे, तो संपन्न आहे खरा पण संपन्न जरी असला तरी तो तीन वर्णांच्या च मागें लागला त्यामुळें "**कृपण ऐसा आन नाहीं**" त्याच्या सारखा श्रीमंत कोणी नाहीं तसा च त्याच्या सारखा कृपण हि कोणी नाहीं. ही काय लहान टीका झाली ? आणि वेदाची ती न्यूनता दूर करण्यासाठीं तो वेद आतां गीतारूपानें प्रकट झाला आहे, म्हणून त्याला कीर्ति लाभली आहे ; नाहीं तर तो निस्तेज पडत चालला होता. इथपर्यंत त्यांनीं वेदाबद्दल लिहून ठेवलें आहे. आणि वैदिकांबद्दल सांगतांना, 'वैदिकांचें जिणें म्हणजे काय तें जिणें ! अगदीं हीन जिणें तें !' असें वर्णन केलें आहे. पण तितकें करून हि त्यांच्या मनांत जो आदर आहे तो आदर कुठें हि कमी पडला नाहीं, आणि म्हणून त्यांची भाषा कुणाला बोचली नाहीं. आम्हांला महापुरुष म्हणजे बुद्धाचा पुतळा आठवतो. असा गंभीर असायचा तो कीं त्याला पाहून बाकीच्यांनीं स्तीमित स्तंभित च व्हावें, आदरानें नमस्कार करावा आणि दूर जावें. पण ज्ञानदेवांनीं महापुरुषाची कल्पना अशी केली आहे कीं ज्या प्रमाणें समुद्रामध्यें लाटा उसळत असतात परंतु मत्स्यांना त्याचें कांहीं हि भय वाटत नाहीं अथवा मासे किती हि खळबळ करीत असले तरी समुद्राला ज्या प्रमाणें त्यांचें कांहीं च वाटत नाहीं त्याप्रमाणें लोकांनीं किती हि त्रास दिला तरी त्याला कांहीं वाटत नाहीं. "**उन्मत्तेजगे**" जग जरी उन्मत्त झालें तरी त्याला खंति नाहीं आणि तो जरी खवळला तरी आपली आई खवळली आहे असें वाटून मुलांना तो बोचत नाहीं. म्हणजे महापुरुषाच्या ठिकाणीं त्यांनीं अशी कल्पना नाहीं केली कीं तो खवळत नाहीं. तो खवळेल पण समुद्र खवळला तरी माशांना त्याचें काय भय ? ते जसे समुद्राच्या पोटांत च आहेत त्या प्रमाणें तो जरी खवळला तरी सुद्धां जनता त्याच्या पोटामध्येंच आहे. जनतेचें आणि त्याचें एकमेकांशीं वर्तन म्हणजे जसें मुलानें आईला खुशाल लाथ मारावी आणि आईनें खुशाल त्याचा कान पकडावा असें असतें असें त्यांनीं वर्णन केलेलें आहे. महापुरुष जगाचे कान पकडूं शकतो आणि जग त्याला लाथा मारूं शकते. आणि इतकें असून हि दोघांना एकमेकांचा क्लेश मुळींच वाटत नाहीं. "**यस्मान्नो द्विजते लोको लोकान्नो द्विजते च यः**" यावर हें भाष्य आहे. आणि त्यांनीं जी मूर्ति आपल्या

डोळ्यासमोर ठेवली आहे ती जगामध्यें अगदीं मिसळून गेलेल्या पुरुषाची आहे. म्हणजे भगवान् कृष्णासारखी आहे. ते गवळ्यांत मिसळत, खेळी-मेळीनें राहत, यांत च त्यांचें महत्त्व किंवा मोठेपणा आहे. अशा प्रकारची अत्यंत विनयशील कल्पना त्यांनीं केली आणि " **जयाची विनय हे चि संपत्ति** " असें त्याचें त्यांनीं वर्णन केलें. भक्तांपाशीं तर विनय ही च संपत्ति आहे. म्हणून ज्ञानदेवांचें जें विचार-प्रकाशन आहे तें अत्यंत सौम्य प्रकाशनाचें एक उदाहरण आहे. आणि आमच्या साहित्याच्या उगमस्थानीं इतकें मार्दव आहे ही फार मोठी आनंदाची गोष्ट आहे आणि म्हणाल तर ती अभिमानाची हि गोष्ट होईल.

## ख्रिस्त तुकाराम आणि टॉल्स्टॉय यांचे शिव्याशाप हि गोड

जर तुलना करायची झाली तर मी खुशाल ज्ञानदेवांच्या सौम्यतेची तुलना ख्रिस्ताच्या सौम्यतेशीं करतों आणि नेहमीं च सांगत असतों कीं जें ख्रिस्ताला साधलें नाहीं तें ज्ञानदेवांना साधलें. "**वो अन् टू यू** " **वो अन् टु यू** " अरे पाप्यांनो तुम्हांला हाय हाय ! धिःकार तुम्हांला ! " **यी व्हायपर्स** " अरे सर्पांनो ! "**यी कास्ट नॉट पर्लस् बिफोर स्वाइन्स** " या डुकरांच्या समोर तुम्ही मोती टाकूं नका रे ! आतां साप काय, डुक्कर काय, समाजाला उपमा तरी काय काय दिल्या आहेत त्यानें ! तुकारामाचा च थाट आहे. त्यांत नवल कांहीं नाहीं. तो होता च मुळीं त्या खालच्या समाजांतला आणि म्हणून त्याच्या अंतःकरणामध्यें अत्यंत प्रेम भरलेलें असून सुद्धां " **तुका म्हणे माझें खवळलें तोंड** " माझें तोंड खवळलें आहे असें तुकाराम म्हणतो. हृदय अगदीं कोमल आणि तोंड मात्र खवळलेलें ही जी विसंगति आहे, खवळलेल्या तोंडाबरोबर मृदु हृदय, ती त्या ख्रिस्तामध्यें सांपडते. त्याच्या त्या आवेशामध्यें फार गोडी आहे. " **परपीडकतो आम्हा दावेदार** " जो परपीडक आहे तो आमचा दुष्मन आहे असें तुकाराम सांगून राहिला आहे. कारे बाबा दुष्मन आहे तुझा ? " **विश्वीं विश्वंभर म्हणूनिया** " आतां या दोन वाक्यांचा किती विरोध ! 'विश्वीं विश्वंभर आहे म्हणून कोणी परपीडा करणारा निघाला तर आम्हांला सहन होत नाहीं आणि त्याला मारावें ठोकावें असें वाटतें ' "**भलें तरी देऊं गांडीची लंगोटी।**

नाठाळाचे काठी देऊं माथा ।। तुका म्हणे हाणा त्याच्या तोंडावरी......" आतां काय करतां तुम्ही ! हें मातृहृदय आहे पण गुरुहृदय मात्र नव्हे. मातृहृदयांत कारुण्य आहे, प्रेम आहे. ही माउली आहे. गुरुमाउलींत ज्ञान आणि प्रेम दोन्ही एकत्र होतात "वो अन् टु यू, वो अन् टु यू" करीत करीत ख्रिस्त शेंवटीं फांसावर चढला. आणि फांसावर चढतांना त्याच्या आधीं तो न्यायाधीशापुढें उभा राहिला तेव्हां सुद्धां त्यानें त्याला चिडविलें च. 'कायरे, मी दुनियेचा राजा आहे असें तूं म्हणतोस ? "तें च तर तुम्ही म्हणता, आपल्या च तोंडून तर तें निघालें" असें त्या न्यायाधीशाला ख्रिस्त उत्तर देतो. म्हणजे फांसावर चढत असतांना सुद्धां त्याची चिडविण्याची हौस कांहीं गेली नाहीं, तिथें सुद्धां तो चिडवितो आहे. अशी चिडविण्याची हौस त्या सॉक्रेटीसला होती. आणि टॉल्स्टॉय तर अगदीं दात ओठ खाऊन अहिंसेचें प्रतिपादन करतो. तो अगदीं चवताळून आवेशानें, अत्यंत प्रखर वाणीनें अहिंसेचा बचाव करतो. टॉल्स्टॉय, तुकाराम, सॉक्रेटीस हीं माणसें होतीं. त्यांच्या ठिकाणीं—

"विश्वाभिराम-गुणगौरव-गुंफितानां
रोषोपि निर्मल-धियां रमणीय एव
लोकं पृणैः परिमलैः परिपूरितस्य
काश्मीरजस्य कटुतापि नितांत रम्या ।।"

केशरामध्यें जी कटुता ती कटुता या मंडळींमध्यें होती. नम्रबुद्धीच्या पुरुषाचा रोष सुद्धां रमणीय असतो. ज्या केशरामध्यें उत्तम गुण भरलेले आहेत, त्या केशरांतील जी कटुता आहे ती गोड आहे. तसें तुकारामानें जरी आम्हांला मारलें पिटलें तरी तें गोड च आहे. आणि ख्रिस्तानें जरी शिव्या शाप दिले तरी हि ते गोड च आहेत. कारण ते जगाच्या कल्याणाच्या प्रेरणेनें, तळमळीनें निघालेले आहेत आणि ते अशा महापुरुषांच्या मुखांतून निघालेले आहेत कीं ज्यांच्या पोटामध्यें सबंध विश्व मावतें आहे, त्यामुळें ते मोठें आदरणीय आणि गोड आहे यांत कांहीं शंका नाहीं.

## देवाला कोणी टाळूं शकत नाहीं

आमच्या सानेगुरुजींनीं एक कविता लिहिली होती. "**तूं मज मार मार आई तूं मज मार मार। मारुनि मारुनि तार आई तूं मज मार मार**" आम्ही मोटारींतून चाललों होतों व ते हे पद गुणगुणत होते. मी त्यांना म्हणालों, तुम्ही गाऊन दाखवा; नुसतें म्हणून कसें चालेल. तेव्हां ते म्हणाले, मला फार मोठे गातां येत नाहीं पण गातों, असें म्हणून ते गायला लागले. आणि त्यांचें गाणें ऐकतां ऐकतां माझ्या डोळ्यांतून अश्रु गळायला लागले. सानेगुरुजींचें हृदय इतकें प्रेमानें भरलेलें होतें. पण जर कां ते शिव्या शाप द्यायला लागले म्हणजे तुकारामाची च जात ती! तेव्हां हे जे लोक आहेत ते माउली होते; पण ज्ञानदेव गुरुमाउली आहेत. म्हणजे त्यांच्या मुखांतून बोचणारा शब्द कधीं हि निघाला नाहीं. तो शब्द ख्रिस्ताच्या मुखांतून निघाला आणि तत्परिणामी लोक चिडले. आतां मी त्या काळांत हजर नव्हतों आणि एवढ्या दोन हजार वर्षांनंतर मी ख्रिस्ताला अक्कल शिकवायला लागलों तर माझ्या उद्धटपणाची कमाल च होईल. परंतु हे जरी महापुरुष असले तरी सुद्धां आम्हांला खेळगड्यासारखे वाटतात. मला तुम्हां लोकांचें जसें भय वाटतें तसें महापुरुषांचें बिलकुल च वाटत नाहीं. गांधींच्यापाशीं मी राहत असें, पण लेशमात्र मला भय वाटत नसे. चालतांना बोलतांना मी त्यांच्याशीं वाटेल तें बोलावें, परंतु इतरांशीं बोलतांना मला फार जपावें लागे. तेव्हां ख्रिस्त, सॉक्रेटीस, तुकाराम यांचें विषयीं बोलतांना मला कधींच भय वाटत नाहीं. कारण ते क्षमाशील आहेत. त्यामुळें आम्ही कांहीं हि बोललों तरी ते क्षमा करायला बसलेले च आहेत. "**तूं माउलीहूनि मायाळ। चंद्राहूनि शीतळ। पाणियाहूनि पातळ। कल्लोळ प्रेमाचा**" ही तुकारामाची भाषा पहा. जेव्हां तो गोडीनें तन्मय होऊन देवाला आळवायला लागतो तेव्हां "**तुका म्हणे सीमा नाहीं तुझे दये। कोमल हृदये पांडुरंगा**" त्याच्या भाषेत कोमलता इत्यादि भाव प्रकट होतात. ते कांहीं सामान्य भाव नाहींत. पण जेव्हां तो चवताळतो त्यावेळेस मात्र तो देवावर हि रागावतो. आतां देवावर च रागवायचे तर त्याला मर्यादा कसली? देवा, मी आतां तुला शिव्या देणार

आहें असें म्हणतो आणि "**गाढव कुत्तरा खर अरे बैल तूं देवा भारवाही**" देवा, तूं कुत्रा आहेस, गाढव आहेस आणि बैल आहेस. आणि गंमत अशी कीं देव कांहीं तें नाकारीत नाहीं. तूं गाढव, कुत्रा, बैल आहेस असें यानें म्हणावें आणि देवानें कबूल करावें असें दोघांचें नातें आहे.

वेदामध्यें एक मंत्र आला आहे. "**गो असि इन्द्र गव्यते अश्वो अश्वायते भव**" जो घोड्याची इच्छा करतो त्याच्यासठीं तूं घोडा बनतोस; आणि जो गाय मागतो त्याच्यासाठीं तूं गाय बनतोस. आतां ज्याला गाय हवी त्याच्यासाठीं गाय बनणारा आणि ज्याला घोडा हवा त्याच्यासाठीं घोडा बनणारा त्याला कोण काय म्हणणार ! म्हणून तुला कोणी टाळूं शकत नाहीं. तुकारामानें बैल म्हटलें म्हणजे तो बैल बनतो आणि गाढव म्हटलें म्हणजे गाढव बनतो. पण तो अगाऊच सर्व बनलेला असल्यामुळें आतां त्याला कांहीं शिव्या लागूं होत नाहींत. पण याला शिव्या देण्याची हौस येते म्हणून तो शिव्या देतो.

## मराठी भाषा–ज्ञानेश्वरी = शून्य

ज्ञानदेवांच्या भाषेमध्यें जो फरक आहे त्यामुळें परिणाम हा झाला आहे कीं ज्ञानदेव सदासर्वदा सहन च करीत गेले. पहिल्यापासून अखेरपर्यंत सहन करण्याशिवाय त्यांनीं कांहीं च केलें नाहीं. आणि त्यामुळें आज इतकीं वर्षें युनिव्हर्सिटीच्या प्रोफेसरांच्या डोक्यावर सुद्धां तो बसलेला आहे. म्हणजे ज्ञानदेवांचें जीवन लोक-जीवनाहून अगदीं वेगळें असलें तरी ज्ञानदेवांचा शब्द वाचल्याशिवाय महाराष्ट्राला गति नाहीं अशी आज स्थिति आहे. मराठी भाषेंतून ज्ञानेश्वरी वजा केली तर, जरी मराठीं भाषेंत अपार साहित्य आहे ही गोष्ट खरी असली तरी, मराठी साहित्य उणे ज्ञानेश्वरी बरोबर शून्य असें च लिहावें लागेल. बाकीचे सगळे जें कांहीं आहे तें ज्ञानेश्वरीच्या बाहेर कांहीं च नाहीं. ज्ञानदेवांनीं जी शिकवण घालून दिली ती शिकवण जिरविण्याचा प्रयत्न आमच्या संतांनीं केला, एकनाथ काय तुकाराम काय रामदास काय नामदेव काय हे सगळे, जो विचार ज्ञानदेवांनीं समजावून सांगितला तो शिरोधार्थ करून चाललेले आहेत. ज्ञानानंतर भक्ति कशी हें सांगतांना ज्ञानदेव वेरूळच्या लेणीचा दृष्टांत देतात. "**देव देऊळ**

परिवारु । कीजे कोरूनि डोंगरु" एकाच डोगरांतून देव बनतो, भक्त बनतो, देऊळ बनतें एवढा भेद त्या एका दगडांत सांठला आहे, अद्वैत कायम राखून इतका भेद कायम ठेवला आहे. मग "तैसा भक्तीचा व्यवहारु का न व्हावा" अशीं अद्वैदामध्यें भक्ति कां येणार नाहीं ? काय अडचण आहे यायला ? भक्तीला क्रिया लागते च काय ? ज्ञानानंतर हि भक्ति असावी ही जी शैली आहे तीच शैली नाथांनीं, रामदासांनीं, तुकारामांनीं उचलली आहे आणि तीच नामदेवानें उचलली आहे. त्या रेषेच्या बाहेर कोणी हि गेलेले नाहीं. याचें कारण त्यांच्या त्या शद्वामध्यें त्यांनीं अनुभव ओतला आहे. एकंदर सबंध ज्ञानेश्वरीमध्यें त्यांनीं जें सांगितलें आहे, जी भाष्य-पद्धति ठेवली आहे ती गीतेच्या दुसऱ्या कोणत्या हि भाष्यांत दिसत नाहीं. कारण गीतेचें विश्लेषण करून त्यांत काय श्रेष्ठ आहे आणि काय कनिष्ठ आहे असें लोकांपुढें मांडावें असें त्यांच्या मनांत नव्हतें. फोटो एन्लार्ज करावा, नुसतीं प्रतिमा मोठी करून दाखवावी इतकें च होतें. त्यामध्यें ज्या ज्या ठिकाणीं जो जो विषय आला त्यांत त्यांनीं अगदीं समरस होऊन समतेनें वर्णन केलेलें आहे.

## ज्ञानेश्वरींत योग व भक्तीचें स्थान

योगाचा तो सहावा अध्याय आल्याबरोबर त्यांत जे योगाविषयीं ५-६ श्लोक आहेत त्यावर त्यांनीं त्या श्लोकामध्यें असलेलें नसलेलें अगदीं वाटेल तें सागूंन टाकलेलें आहे. त्या मूळच्या श्लोकांचा कांहीं पत्ता हि लागणार नाहीं, अशी सगळी हठयोगाची प्रक्रिया आणि कुंडलिनीचें वर्णन त्यांनीं त्यांत करून ठेवलें आहे. गीतेच्या श्लोकांत तें कांहीं नाहीं हें त्यांना माहीत आहे. यावर ते म्हणतात कीं तुम्ही गिऱ्हाइक आहांत, रसिक अहांत त्यामुळें तें घडी घातलेलें लुगडें मीं तुमच्यासठीं उघडें केलें आहे. घडी घातलेल्या लुगड्यामध्यें आंत जे असतें तें प्रकट होत नसतें. तसे गीतेचे श्लोक म्हणजे घडी घातलेलें लुगडें आहे तें मीं तुमच्यापुढें उघडलें आहे. पटले तर घ्या असें म्हणून त्या ठिकाणीं त्यांनीं योगाचें फार उत्कृष्ठ व तन्मयतेनें वर्णन केलें आणि म्हटलें कीं हा पंथराज आहे. लोकमान्यांनीं गीतारहस्यांत लिहून ठेवलें आहे कीं ज्ञानदेवांनीं गीतेचें सार पतंजलियोग हें काढलें आहे आणि

त्याला पंथराज म्हणून म्हटलें आहे. कांहीं बोध झाला नाहीं. कारण हा आहे सहावा अध्याय. थोडे पुढें सरकावें म्हणजे कळतें. त्याच्याच पुढें सातव्या अध्यायांत आलें आहे कीं ही माया नदी कोण तरून जाईल ? मोठ मोठे ज्ञानी तरायला गेले आणि गचक्या च खाल्या. हे नाहीं तरत ते नाहीं तरत अशी यादी चालली; आणि शेंवटीं सहाव्या अध्यायांत ज्या योगाचें पंथराज म्हणून वर्णन केलें आहे त्याच्या नांवानें लिहून ठेवलें आहे '**वरी कांहीं तरो ये योगे तरी विपाय तो**' आणि जर कदाचित योगानें देखील माया नदीला तरून जातां आलें तर तें नशीब च समजावें. म्हणजे योगानें देखील माया नदीला तरून जाऊ अशी खात्री नाहीं. मग कोण तरेल ? "**एथ एकचि लीला तरेले। जे सर्वभावें मज भजले। तया ऐलीच थडी सरलें मायाजळ।**" ज्यांनीं हरिनामाचा आश्रम घेतलेला आहे त्यांना मायाजंळ उरलें च नाहीं. बाकीच्या लोकांनीं तरण्याची खटपट केली आणि खाल्या मात्र गटांगळ्या! आणि योगी सुद्धां तरले च तर नशीब च समजा असें लिहून ठेवलें. म्हणजे काय झालें? पंथराज कोणीकडे गेला ? जरा आणखी पुढें सरकल्यानंतर भक्त कसे असतात तें सांगितलें आहे. "**योगेविण दावित कैवल्य डोळां**" योगाशिवाय साक्षात् डोळ्यांना, नेत्रांना मोक्षाचें दर्शन करवितात. एके ठिकाणीं त्यांनीं असें लिहून ठेवलें आहे कीं भक्तीपुढें योगानें आपल्या आठी अंगांसकट नमस्कार घातला. योगाचें वर्णन करीत असतांना त्यांनीं योगा-विषयींची प्रक्रिय मांडून त्याचा गौरव केला. कारण तो हि एक मार्ग आहे आणि त्याचा हि जीवनामधें उपयोग आहे.

पण जेव्हां ते भक्तीच्या वर्णनामध्यें आले तेव्हां त्यांनीं भक्तींत रंगून जाऊन भक्त कसा असतो तें सांगतांना सांगितलें कीं "**मोक्षाची सोडी बांधी करी**" मोक्षाला सोडतो आणि बांधतो. म्हणजे भक्त मुक्तीच्या पेक्षां सुद्धां श्रेष्ठच झाला; असा याचा अर्थ झाला. "**योगीयां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी। पाहतां पाहतां मना न पुरे धणी।**" योग्याला ज्याचें दर्शन दुर्लभ आहे त्याला मीं माझ्या नेत्रांनीं पाहिला. योगी डोळे मिटून, जग दूर सारून परमेश्वराला पाहणार. जग दूर करायचें म्हणजे जगाचा भाग जो देह तो दूर सारावा लागणार आणि जगाचा भाग जो डोळा

मन तें त्याला दूर सारावें लागणार, मग त्याला देव काय दिसणार, कपाळ? सबंध जग दूर सारून तो देव बघणार आणि देव म्हणून जो समोर उभा आहे त्याला तो दूर सारणार तर त्याला देव सापडणार कोठून ? म्हणून आहे त्या स्थितीमध्यें जर तो विश्वाकार पाहतां आला तर च तो दिसणार. म्हणून पुष्कळ लोकांना वाटतें कीं ज्ञानेश्वरीचें रहस्य सहाव्या अध्यायांतले ते जे कुंडलिनीचे श्लोक आहेत, तें आहे. ह्यावर मी असें म्हणण्याची हिंमत करतों कीं त्यांना कांहीं समजलें नाहीं.

**"माउली आत्मा" अद्वितीय शब्द**

ज्ञानदेव भक्तीचें वर्णन जितक्या प्रेमानें करतो तितक्या च प्रेमानें तो गुणविकासाचें हि वर्णन करतो. हा ज्ञानदेवाचा तमाम सगळ्या तत्त्व-ज्ञान्यांच्याहून विशेष आहे. ज्ञानदेवांनीं गुणविकासावर विशेष जोर दिला आहे "अमानित्वं अदंभित्वं" इत्यादि ज्ञानाचीं लक्षणें, "अभयंसत्त्वसंशुद्धि" हीं दैवी संपत्तीचीं लक्षणें; कायिक, वाचिक, मानसिक तपाचीं लक्षणें, वगैरे सगळे गीतेमध्यें १०-१२ श्लोकांत आहे. पण त्यावर त्यांनीं हजारों ओव्या लिहून टाकल्या आणि इतकें व्यवस्थित सुंदर चित्र उभें केलें कीं ते गुण चित्तामध्यें ठसावेत. समाजाचा गुणविकास झाला पाहिजे आणि गुणविकासाशिवाय परमार्थामध्यें प्रगति होऊं च शकत नाहीं ही भूमिका ज्ञानदेवांनीं घेतली. आणि पंधराव्या अध्यायानंतर, म्हणजे ज्ञानाचें पूर्ण वर्णन केल्यानंतर, जेव्हां मागाहून सोळावा गुणविकासाचा अध्याय आला त्यावेळेस ज्ञानदेवांनीं जो एक शब्द वापरला तो एक च शब्द ज्ञानदेवांच्या सबंध जीवनाचा आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचा दर्शक आहे. जेव्हां मनुष्य कामक्रोधा-दिकांतून दूर होतो, सज्जन-संगति घेतो आणि परमार्थाच्या मार्गाला लागतो तेव्हां शेंवटीं काय होत असतें ?

**"तेथ प्रियाची परम सीमा । तो भेटे माउली आत्मा."**

माझ्या वाचनांत ५-१५ भाषांचें साहित्य आलेलें आहे आणि त्या त्या भाषांतल्या उत्तमोत्तम संतांचे च ग्रंथ मीं वाचलेले आहेत. परंतु त्या सर्वांत आत्म्याला माउली म्हटलेलें मात्र माझ्या वाचनांत कुठें हि आलेलें नाहीं. परमेश्वराला माउली म्हणायची रीत आहे. गुरुमाऊली हि म्हणतात. परंतु "आत्मा माऊली" हा अगदीं अद्वितीय शब्दप्रयोग आहे. आणि त्याला

विशेषण काय लावलें आहे पहा. " **प्रियाची परमसीमा** " म्हणजे अत्यंत प्रेमास्पद. माउलीची आणि बालकाची जेव्हां भेट होत असते तेव्हां सबंध भय, दुःख इत्यादि नाहींशी होत असतात. भगवंतांनीं अर्जुनाला गीता सांगितली आणि शेंवटीं जें सांगायचें होतें तें गुह्य १८ व्या अध्यायाच्या शेंवटीं सांगितलें. पण जें सांगून सांगतां येणार नाहीं, जें शब्दामध्यें मावणार नाहीं तें सांगण्यासाठीं म्हणून त्यांनीं काय केलें ? " **मग सावळा सकंकणु बाहु पसरूनि दक्षिणु । आलिंगिला सशरणु । भक्तराज तो ।** " मग त्याला आलिंगन दिलें. जिथें शब्दानें बोलतां येणार नाहीं, जिथें मनाची गति नाहीं अशी कांहीं तरी वस्तु द्यायची होती ती देण्यासाठीं आलिंगन च उपयोगी पडूं शकतें, दुसरें कांहीं उपयोगी पडूं शकत नाहीं. देवाभक्ताच्या भेटींत शब्द उपयोगी पडत नाहीं, असें म्हणून त्यांनीं ज्ञानेश्वरी शब्दांत नाहीं संपविली तर प्रेमाच्या आलिंगनांत संपविली. आत्म्याची व्याख्या भल्याभल्यांनीं काय काय करून ठेवलेली आहे. तसल्या लांबलचक व्याख्येला आत्मा दाद देतो का ? " **निरुपचारा प्रेमा । विषय होय जें प्रियोत्तमा । तें दुजें नव्हे कीं आत्मा । ऐसें चि जाणावें** " ज्याच्या ठिकाणीं आपलें निरुपचार प्रेम आहे, ज्या प्रेमामध्यें उपचार नाहीं, 'या बसा लोडाशीं' हें नाहीं , ' **तें दुजें चि नव्हे कीं** " तो आपल्याहून वेगळा नाहीं, ' **आत्मा ऐसें चि जाणावें** ' अशी त्यांनीं आत्म्याची व्याख्या केली. तेव्हां ज्ञानदेव हा प्रेमाचा आचार्य आहे आणि त्यानें अशा प्रकारचें निष्कलंक प्रेम आमच्यापुढें ठेवलेलें आहे कीं ज्या प्रेमाला इतर वैष्णव संप्रदायामध्यें जो दोष लागला तो लागूं शकला नाहीं.

## ज्ञानदेवांनीं कर्मयोगाला योग्य स्थान दिलें आहे

ज्ञानेश्वरीमध्यें कर्मयोगाला गौण स्थान आहे असा आधुनिकांना भास होतो. त्याचें कारण आटापिटा म्हणजे च कर्म. म्हणजे जलाशयें निर्मावीं, समुद्रांत माती टाकून जमीन वाढवावी, हा जो क्षीण करणारा कर्मयोग आहे तसा कर्मयोग ज्ञानदेवांमध्यें उपलब्ध नाहीं. क्रिया संपून जें कर्म होतें तें तिथें आहे. ज्याप्रमाणें " **फळली केळी उन्मूळे**" केळी फळली. तिला फळें आलीं. फळल्यानंतर ती उन्मूळे म्हणजे तिचें मूळ ढासळतें " **तैसीं आत्मज्ञानें प्रबळें** " तसें प्रबळ आत्मज्ञान झाल्यामुळें " **जयाची क्रिया ढाळे ढाळे**

गळती आहे" ज्याची क्रिया हळू हळू कमी होते. पण क्रिया कमी होते म्हणून कर्म कमी कमी होतें असें नाहीं. क्रिया दर्शविण्यासाठीं आपण क्रियापद वापरीत असतों. आणि कर्म दर्शविण्यासाठीं प्रथमा अथवा द्वितीया विभक्ति लागते. क्रिया वेगळी, कर्म वेगळें. मीं हा विषय गीता-प्रवचनामध्यें फार खुलाशानें वर्णन केलेला आहे. क्रिया कमी असून कर्म कसें उत्कृष्ट असूं शकतें त्याचें उदाहरण हि दिलें आहे. म्हणजे क्रिया कमी करून सुद्धां कर्म-शक्ति वाढूं शकते अशा प्रकारची प्रखर प्रेरणा ज्यांत भरलेली आहे तो ज्ञानदेवांचा कर्मयोग आहे, आणि म्हणून तो च शोभणारा आहे. क्रियेचा आग्रह राखणारा जो कर्मयोग आहे तो शेंवटच्या अवस्थेमध्यें टिकणारा नाहीं. म्हणून कर्मयोगाचा जितका आग्रह राखणें योग्य आहे तितका ज्ञानदेवांनीं अगदीं नेमका राखला आहे आणि जितका राखणें योग्य नाहीं तितका नाहीं राखला. ज्ञानदेवांनीं ज्ञानाला जें महत्त्व दिलें आहे तें शंकराचार्यांपेक्षा कमी नाहीं. "**आंधळेया गरुडाचे पांख आहाती, ते कवणा उपेगा जाती**" आंधळ्या गरुडाचे पंख काय उपयो-गाला येणार? त्या प्रमाणें कर्म मात्र करतां आणि ज्ञान कांहीं च नाहीं, मग तुमचें कसें होणार? असा ज्ञानाचा महिमा सांगितला. आणि अगदीं शेंवटीं गीतेचें रहस्य सांगतांना बाकीचे सगळे विषय बाजूला सारून "**एथ अविद्यानाश हें स्थळ। तेणें मोक्षोपादान फळ। या दोहीं केवळ। साधन ज्ञान**" अविद्येच्या नाशाला ज्ञान हें च साधन आहे असा निर्णय देऊन त्यांनीं ज्ञानाचा महिमा कायम राखला. ज्ञानेश्वरच त्यांचें नांव आहे. "**लोपलें ज्ञान जगीं**" त्याकरतां च त्यांचा अवतार आहे.

## मराठी भाषिकांचा धर्मग्रंथ ज्ञानेश्वरी

म्हणून ज्ञानाचा महिमा यत्किंचित हि कमी न करतां कर्मयोगाला सुव्यवस्थित स्थान देऊन स्वधर्मनिष्ठा वाढवीत वाढवीत, वैराग्याचा उत्तम आधार घेऊन, योगाला ज्या कोपऱ्यांत जेथें बसवावयाचें होतें तेथें नीट बसवून आणि भक्तीची साखर सबंध दुधामध्यें घालून त्यांनीं आमच्यासाठीं अत्यंत मधुर असें परमामृत बनविलेलें आहे. माझ्या समजुतीनें धर्मग्रंथ या नात्यानें तुम्ही ज्ञानेश्वरीकडे बघाल तर च तुम्हांला ज्ञानेश्वरीचें मर्म कळेल.

"मी भाष्य लिहीत आहें, ज्ञानपर ग्रंथ लिहीत आहें" असें त्यांच्या मनांत नाहीं. "**किंबहुना तुमचें केलें धर्म-कीर्तन हें सिद्धी गेलें**" मी धर्मग्रंथ लिहीत आहें ही त्यांची भावना आहे.

पण मला हें केव्हां कळलें? मीं ज्ञानेश्वरी अनेक वेळां वाचली आहे आणि त्याचें विवरण हि माझ्या पद्धतीनें मी करीत असे. पण दुसऱ्या भाषेंतील उत्तमोत्तम ग्रंथांची मदत घेण्याची मला एक संवय आहे. कुराणामध्यें महंमदानें सारखें सांगितलें आहे कीं "परमेश्वर प्रत्येक जमातीमध्यें संदेश देणारा असा कोणीतरी पाठवीत असतो, हे अरबांनो! तुमच्यासाठीं अरबी भाषेंत बोलणारा मी आलों आहें. जर मी अरबी भाषेंत बोलणारा नसतों तर तुम्ही म्हणाला असता कीं दयाळू परमेश्वर आमच्या भाषेंत संदेश देत नाहीं काय? म्हणून परमेश्वराचा संदेश तुमच्या-पाशीं पोंचविण्याला तुयच्या भाषेंत मी आलों आहें. आणि अशा प्रकारें निर-निराळ्या समाजामध्यें परमेश्वराचा संदेश देणारे पाठविले गेलेले आहेत. त्या निरोप देणाऱ्यांमध्यें म्हणजे त्या प्रॉफेट्समध्यें आम्ही कांहीं सुद्धां फरक करीत नाहीं." असें इस्लामचें ब्रीद वाक्य आहे आणि याला इस्लाम धर्माची श्रद्धा असें म्हणतात. आज आम्हांला असें वाटतें कीं मुसलमान म्हणजे मार, ठोक, पीट, काप याशिवाय कांहीं अर्थ नाहीं. कारण त्यांचें मध्ययुगांतलें जें वर्तन झालें आहे तें तसें च झालें आहे. त्याला तुम्ही काय करणार? पण कुराणामध्यें मात्र "**ला इलाह इल्लल्लाह महमदूर रसूलुल्लाह**" असें लिहून ठेवलेलें आहे. म्हणजे कोणत्या हि रसूलां-मध्यें (प्रेषित) आम्ही कांहींहि फरक करीत नाहीं. सगळे रसूल सारख्या योग्यतेचे आहेत. आणि पुढें म्हटलें आहे "हे रसूलांनो तुमची एक स्वतंत्र जमात आहे. सगळ्या जगामध्यें पाठविलेले सगळे रसूल म्हणजे पैगंबर, संदेश वाहक, सारख्या योग्यतेचे आहेत आणि प्रत्येक जमातीमध्यें आणि प्रत्येक भाषेमध्यें संदेश-वाहक पाठविलेला आहे." हें वाचल्यावर मी विचार करूं लागलों कीं मराठी लोकांसाठीं परमेश्वरानें संस्कृतमधून संदेश पाठविला असेल का? वेद, उपनिषद, गीता हे सर्व तर माझें अगदीं प्राणतत्त्व आहे. मी वेद खातों, वेद पितों अशी माझी दशा आहे. वेद ही आमची प्रेमाची आणि आदराची जागा आहे यांत कांहीं वाद नाहीं. आणि ज्ञानदेवांनीं

लिहून हि ठेवलें आहे कीं " **नाहीं श्रुति परौती माउली जगा** " ज्ञानदेवांना माउली शब्दाचें वेड च आहे. आत्मामाउली, गुरुमाउली, श्रुतिमाउली गीतामाउली. मीं तुम्हांला मघां च सांगितलें होतें कीं ब्रह्मचर्यामध्यें माता आणि पिता एकवटल्याशिवाय पूर्णता च येत नाहीं. तेव्हां श्रुतीसारखी दुसरी माउली नाहीं असें ज्ञानदेव म्हणतात. यावर मी विचार करूं लागलों कीं ज्ञानदेव म्हणतात ही गोष्ट खरी परंतु मराठी भाषिकांना संदेश देण्याचें काम परमेश्वरानें केलें आहे कीं करण्याचें बाकी ठेवलें आहे ? तेव्हां मला ज्ञानदेवांची ती उक्ति आठवली, " **किंबहुना तुमचें केलें धर्मकीर्तन हें सिद्धी गेलें** " आपल्या ग्रंथाला त्यांनीं धर्मकीर्तन हें नांव दिलेलें आहे. आणि " **एथ माझें जी उरलें पाईकपण** " आतां मी फक्त सेवक उरलों. सबंध ज्ञानेश्वरी हा एक धर्मग्रंथ आहे असें त्यांनीं जाहीर केलेलें आहे. महाराष्ट्राला ज्ञानेश्वरीमुळें धर्मग्रंथाची उणीव राहिलेली नाहीं. समग्र धर्म समजण्यासाठीं मराठी भाषेशिवाय दुसरी कोणती हि भाषा शिकावी लागेल अशी गरज ज्ञानदेवांनीं शिल्लक ठेवलेली नाहीं.

## शब्द बाजूला सारून अर्थ घ्यावा

कृष्णानें अर्जुनाला गीता सांगितली हें खरें. ती त्यानें सांगितली नसती तर जगाला मिळाली नसती हें हि खरें. पण त्या कृष्णाच्या उक्तीला व्यासांनीं रूप दिल्यामुळें व्यासांचा आमच्यावर फार मोठा उपकार झालेला आहे असें ज्ञानदेवांनीं लिहून ठेवलें आहे. मी म्हणतों कीं व्यासांचा तो उपकार संस्कृतामध्यें च राहून गेला असता तर आमच्या सारख्या लोकांना कसा उपयोगी पडला असता? म्हणून अत्यंत करुणेनें प्रेरित होऊन ज्ञानदेवांनीं गीतेच्या निमित्तानें त्यांना जो धर्म सांगायचा होता तो सांगितला व ज्या ज्या खुंटीवर जो जो हार ठेवता आला तो हार तिथें ठेवला. आतां लोक विचारतात कीं या गीतेच्या श्लोकांतून हें भाष्य कसें काढलें ? तर मी त्यांना सांगतों, गीतेचा श्लोक ज्ञानदेवांना खुंटी आहे आणि त्या खुंटीवर त्यांना जें टांगायचें असतें तें त्या खुंटीवर ते टांगत असतात. म्हणून ज्ञानदेवांचा संबंध त्या त्या गीतेच्या शब्दार्थाशीं तुम्ही लावीत बसूं नका. ज्याप्रमाणें केळाचें साल काढून मग केळें खायचें असतें त्याप्रमाणें तुम्ही

शब्द बाजूला सारून मग आंतला गाभा घेतला तर च तुम्हांला त्यांतलें मर्म कळेल असें त्यांनीं च सांगून ठेवलें आहे–

" साच चि बोलाचें नव्हे हें शास्त्र। पैं संसार जिणते शस्त्र।
आत्मा अवतरविते मंत्र । अक्षरें इये।"

'आत्म्याला प्रकट करायला लावणारीं हीं मूर्तिमंत मंत्राक्षरें आहेत, हें शब्दाचें शास्त्र नाहीं,' अशा प्रकारें त्यांनीं जें शब्दांत प्रकट होणें शक्य नाहीं असें गुह्य मराठी भाषेंत प्रकट केलेलें आहे आणि तें त्या आरती करणाऱ्याच्या बरोबर लक्षांत आलेलें आहे–

" प्रगट गुह्य बोले। विश्व ब्रह्म चि केलें॥

त्यांनीं विश्वाला च ब्रह्म केलेलें आहे. विश्वाला बाजूला सारून कोपऱ्यांत कोठें तरी ध्यानामध्यें डोळे मिटल्यानंतर ब्रह्म सांपडायचें किंवा मेल्यानंतर वैकुंठांत, कैलासांत सांपडायचें ही भानगड च नाहीं. डोळे मिटल्यानंतर ब्रह्म दिसणार आहे काय ? डोळे मिटून त्याला पहायचें म्हटलें तर मग त्याचें वैभव काय ? म्हणून विश्व हें च ब्रह्म त्यांनीं प्रकट केलें.

## शून्यवादी गोरखनाथांचे पूर्णवादी शिष्य ज्ञानेश्वर

ज्ञानदेव हे गोरखनाथांच्या परंपरेंतले शिष्य होते. ते अनेक ठिकाणाहून सारग्रहण करीत चालले आहेत. त्यांनीं शंकराचार्यांपासून बिनतक्रार अद्वैत घेतलेलें आहे. भागवतांतून निमूटपणें भक्ति घेतलेली आहे, गोरखनाथांपासून योग घेतला आहे, भगवद्गीतेचा कर्मयोग विवरला आहे, सांख्यांची प्रक्रिया अगदीं सविस्तर वर्णन करून गुणविकास कसा करावा हें सांगितलें आहे, योगवासिष्ठांतून तात्पर्य काढून घेतलेलें आहे. असें जेथून जेथून त्यांना जें कांहीं सांपडलें तें त्यांनीं घेतलें आहे. पण ते घेत असतांना त्याला नवीन रूप देऊन घेतलेलें आहे, आणि तें पचविलें आहे. जुन्यांतून अद्वैत घेऊन त्याला भक्तीचें रूप दिलें आहे, भक्ति घेतानां तिला गुणविकासाचें रूप दिलें आहे, गुणविकास घेतांना आत्मज्ञानाची प्रक्रिया त्याच्या पाठीशीं लावलेली आहे, कर्मयोग घेतांना क्रिया काढून टाकून कर्मयोग वाढवावयाचा ही उपपत्ति सांगितलेली आहे. अशा रीतीनें त्यांनीं

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक ३५८२० वि: निबंध
नों. दि. ३१/०१/२५४३



जेथून जेथून जें जें घेतलें आहे तें घेतांना त्यांतली उणीव दूर करून घेतलेलें आहे. गोरखनाथांनीं अगदीं गरगरीत गोल शून्यवाद सांगितला आणि त्यांचा शिष्य जो ज्ञानदेव त्यानें पूर्णवाद सांगितला, इतका दोहोंत फरक आहे. एक शून्यवादी व दुसरा पूर्णवादी. त्यामुळें गोरखनाथ झाला गुप्तपंथी आणि ज्ञानदेव झाला उघडपंथी.

आतां हा गोरखनाथ आहे तरी कुठला ? जो उठला तो म्हणतो कीं गोरखनाथ आमच्या प्रांतांतला आहे. मी तमिळनाडमध्यें गेलों तेव्हां गोरखनाथ-मच्छींद्रनाथ ह्या जोडीच्या नांवावर तमिळ भाषेंत ग्रंथ आहेत हें पाहून मला आश्चर्य वाटलें. तो तमिळनाडमधला मनुष्य आहे असें तिथले लोक म्हणतात. बंगाली समजतात कीं गोरखनाथ आमचा आहे. आणि ओडिसामध्यें अशी ट्रॅडिशन आहे कीं गोरखनाथ हा पुरीला राहत होता, तेथें त्यानें योगाभ्यास केला. ज्याला तुम्ही उड्डीयानबंध म्हणता तो वस्तुतः ओडिसाचा बंध आहे आणि गोरखनाथानें तो ओडिसांत प्राप्त केला अशी ख्याति ओडिसामध्यें आहे. तिकडे गोरखपुरचे, उत्तर प्रदेशचे लोक तर गोरखनाथ आमचा च आहे म्हणतात. आणि पंजाब मधील जालंधरचे लोक म्हणतात कीं गोरखनाथांचा जो जालंधरपंथ आहे तो पंजाबचा आहे, म्हणून गोरखनाथ पंजाबी आहे. आणि इकडे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात कीं तो माझा गुरु आहे त्यामुळें तो मराठी आहे. आणि शिवाय त्याचीं जीं पदें आहेत त्यांत मराठी भाषा आहे. तेव्हां गोरखनाथ म्हणजे गुप्ततेची कमाल होता. त्याच्यासारखा हिंदुस्थानांत हिंडलेला मनुष्य शंकराचार्यांशिवाय दुसरा कोणी नाहीं, इतका तो महापराक्रमी पुरुष होऊन गेला. त्या गोरखनाथांनीं जो शून्यवाद दिला तो शून्यवाद घेऊन त्याचा ज्ञानदेवांनीं पूर्णवाद बनविला. शून्य आणि पूर्ण यांत फरक कांहीं च नाहीं. दोन्ही चक्राकार आहेत. ज्ञानदेवांनीं शून्याला पूर्ण केलें "**आणि गुरुशिष्याचिया एकांतीं । अक्षराची वदंति**" गुरुशिष्याच्या एकांतामध्यें कानांत जीं दोन अक्षरें सांगितलीं जातात ती भक्तजन "**मेघाचिया परी त्रिजगति गर्जति**" मेघाप्रमाणें तिन्ही जगामध्यें ओरडून ओरडून सांगत असतात. असें ज्ञानदेवांनीं वर्णन केलें आहे. म्हणजे गुरुमुखांतून जीं गुप्त अक्षरे श्रोत्याच्या कानांत पडायचीं तीं सबंध जगभर

जाहीर करण्याचें काम ज्ञानदेवांनीं केलेलें आहे आणि ही भवताची प्रतिज्ञा आहे असें म्हटलें आहे.

या बाबतीमध्यें ज्ञानदेवांचें जें कार्य आहे तें रामानुजांशीं समान आहे. रामानुजांची प्रसिद्ध गोष्ट आहे कीं त्यांना गुरूंनीं मंत्र दिला होता आणि तो गुप्त ठेवायला सांगितला होता. परंतु त्यांच्यानें राहवलें नाहीं आणि त्यांनीं त्या मंत्राची दीक्षा सर्वांना अगदीं उघड उघड दिली. हें गुरूला कळल्यावर गुरुमहाराज रागावले आणि त्यांनीं रामानुजाला बोलावून ताकीद देऊन सांगितलें कीं "हें तूं काय केलेंस? मीं तुला बजावलें नव्हतें कां कीं मंत्र गुप्त ठेवावयाचा आहे म्हणून ?" यावर रामानुज म्हाणाले "होय. तर मग आतां काय होईल ?" त्यावर गुरु म्हणाले "व्हायचें काय आहे, तुला दुर्गति मिळेल." मग रामानुज आपल्या पूजनीय गुरुजींना, त्यांच्याविषयीं त्यांनीं आपल्या ग्रंथांत सदासर्वदा फार आदर दर्शविला आहे, म्हणाले "पण ज्यांना मीं मंत्र सांगितला त्यांना काय गति मिळेल ?" तेव्हां गुरु म्हणाले "त्यांनीं मंत्र श्रद्धेनें ग्रहण केलेला आहे तेव्हां त्यांना सद्‌गति च मिळेल." तेव्हां "मग इतक्या सगळ्या लोकांना सद्‌गतीला पाठविण्यासाठीं मला एकट्याला जर दुर्गति लाभणार असेल तर कांहीं चिंतेचा विषय नाहीं" असें रामानुजांनीं आपल्या गुरूंना सांगितलें. हें जें रामानुजांचें कार्य तें ज्ञानदेवांनीं महाराष्ट्रामध्यें केलेलें आहे. म्हणजे ज्ञानदेवामध्यें शंकराचार्य, रामानुजाचार्य, गोरखनाथ, भगवद्‌गीता, योगवासिष्ठ सगळीं एकवटलेलीं आहेत. आणि त्यांची खुबी हि अशी आहे कीं ते कुठून कांहीं हि घेतांना कौशल्यानें त्यांतला जो अंश घ्यायला पाहिजे तो घेऊन आणि जेवढा अनावश्यक भाग आहे तेवढा बाजूला सारून घेत असतात. ही फार मोठी देणगी महाराष्ट्राला लाभली आहे.

## ज्ञानेश्वर संग्रहवादी होते आग्रहवादी नव्हते

ज्ञानदेवांच्या ठिकाणीं अत्युत्कृष्ट समत्व प्रकट झालेलें आहे असा माझा अभिप्राय आहे. "म्हणूनि तो दैवागळा। वानित असो वेळोवेळां। जे साम्यशेजे डोळा। लागला तया" साम्यरूपी शेजेवर निजलेला तो

महापुरुष आहे. म्हणजे त्यांना साम्याची हौस आहे. त्यांच्या एकूण सबंध वर्णनामध्यें समत्व साधलेलें आहे. आग्रह ही वस्तु ज्ञानदेवांपाशीं नाहीं. कोणत्या हि एका मुद्याचा आग्रह त्यांच्यापाशीं नाहीं. कारण त्यांनीं संग्रह केलेला आहे. ते आग्रहवादी नाहींत, संग्रहवादी आहेत. सबंध सद्विचारांचा संग्रह करून त्यांनीं फार सुंदर कुशल मूर्ति बनविलेली आहे. आणि शेंवटीं सांगितलें आहे कीं ही माझी वाङ्मयी मूर्ति आहे. "**गीता जाणा हे वाङ्मयी श्रीमूर्ति प्रभूची**' भगवंताची वाङ्मयी मूर्ति च –ज्ञानेश्वरी-त्यांनीं उभी केली आहे.

## ज्ञानदेवांची स्वतंत्र प्रज्ञा

इतकें असून बाणा कसा तो बघण्यासारखा आहे! अमृतानुभवामध्यें त्यांनीं आधार दिला कीं भगवान् विष्णु भगवद्गीतेमध्यें असे असे बोलले, आणि शिवसूत्रामध्यें भगवान् शंकरांनीं हा च विषय असा असा सांगितला. अशा रीतीनें त्यांनीं शिवरहस्याचा आणि गीतेचा आधार घेतला आणि मग काय म्हणतात "भगवान् विष्णूनें आणि शंकरानें सांगितलें म्हणून च मी म्हणतों असें नव्हे तर "**हे लाभे न बोलता हि**" ते जरी बोलले नसते तरी मी तसें च म्हणणार होतों.

आतां तुम्ही विसाव्या शतकांत आहांत आणि ज्ञानदेव तेराव्या शतकांत होता, ही गोष्ट तुम्ही विसरूं नये. तेराव्या शतकामध्यें शंकर अथवा कृष्ण म्हणतो आहे म्हणून च आम्ही मानतों असें नव्हे तर त्यांनीं असें म्हटलें नसतें तरी मी तें च सांगणार होतों हें म्हणणें म्हणजे केवढी आत्मनिष्ठा आहे! त्यांना आधार द्यावासा वाटला म्हणून त्यांनीं तो दिला, परंतु 'मी त्या आधारावर उभा नाहीं, मला अनुभवाचा आधार आहे' हें म्हणणे म्हणजे केवढी स्वतंत्र प्रज्ञा आहे! ज्ञानदेवांच्या ठिकाणीं जी प्रज्ञा आहे ती अद्भुत च प्रज्ञा आहे यांत शंका नाहीं.

## स्वतःचें हरवलेलें आत्मतत्त्व शोधण्यासाठीं संतचरित्रें गायचीं

त्यांची स्तुति करून मला आतां मिळणार काय? त्यांनींच लिहून ठेवलें आहे "**गेले मेले काय सांगाल गोष्टी। स्वयें आत्मज्ञानी घाली**

**परमात्मीं मिठी "** जे मेले गेले त्यांच्या कथा काय सांगत बसशील ? म्हणून ज्ञानदेवांच्या गोष्टी सांगत बसून आपलें कार्य होणार नाहीं. पण त्या गोष्टी सुद्धां सांगाव्याशा वाटतात आणि ऐकाव्याशा वाटतात. संतांचें वर्णन कशासाठीं करावयाचें असतें ? तें सुद्धां ज्ञानदेवांनीं लिहून ठेवलें आहे. " **हारपलें आपणपें ठावें । तै संतातें पाहतां गिवसावें** " आपलें आत्मतत्त्व जर हरवलें असेल तर संतांना पाहून सांपडतें. " **म्हणूनि वानावें आइकावें तें चि सदा** " म्हणून संतचरित्रें गायचीं. आतां मीं जें ज्ञानदेवांचें चरित्र गाइलें तें, आपलें जें हरवलेलें आत्मतत्त्व आहे, जें सांपडत नाहीं, तें शोधून काढण्यासाठीं एक मार्गदर्शक म्हणून मीं गाइलें

## ‘ पायींची वहाण पायीं बरी ’

एकदां तुकाराम महाराजांना एक मनुष्य भेटायला आला आणि म्हणाला तुमच्यापासून मला बोध घ्यायचा आहे, बोधामृत घेण्यासाठीं मी तुमच्याकडे आलों आहें. तेव्हां महाराज म्हणाले, माझ्या सारख्या दुबळ्यापासून तुला कसें काय बोधामृत मिळणार ? तो म्हणाला ‘ अशा गप्पा मारूं नका. मला ज्ञानदेवांनीं तुमच्याकडे पाठविलें आहे. ज्ञानदेव माझ्या स्वप्नांत आले आणि म्हणाले, तुझी समस्या तुकाराम सोडवील; त्यांच्याकडे जा. म्हणून मी आपल्याकडे आलों आहें. तेव्हां आतां तुमचें कांहीं चालणार नाहीं" असें त्यानें तुकारामाला अगदीं रोखठोक सांगितलें. त्यानंतर तुकारामानें त्याला उपदेश देण्याला सुरवात केली पण त्यांना या गोष्टीचें फार दुःख झालें कीं ज्ञानदेवांनीं या माणसाला माझ्याकडे पाठविलें. माझी काय योग्यता ? कुठें ज्ञानदेव आणि कुठें मी, म्हणून त्यांनीं एक अभंग लिहिला. " **तुका म्हणे नेणे युक्तीची ते खोली । म्हणूनी ठेविली पायीं डोई ।।** मला त्यांच्या युक्तीची खोली काय कळते ? " **मज पामरा हे काय थोरपण । पायींची वहाण पायीं बरी ।** " तुकाराम काय लहान होता ? जर महाराष्ट्रामध्यें एक च नांव घ्यायला सांगितलें तर ज्ञानदेवांचें नांव घ्यावें लागेल आणि दुसरे नांव घ्या म्हटलें तर " **ज्ञानदेव तुकाराम** " तिसरा कांहीं मधें शिरायचा नाहीं. इतका तो महान् पुरुष होता. तो स्वतःचें वर्णन करून, मी किती महान् आहे, सांगतो आहे. त्याला भय कांहीं नाहीं. म्हणून च तो कांहीं

खोटी नम्रता दाखवीत नाहीं "अणु रेणुया थोकडा तुका आकाशाएवढा। गिळुनि सांडीलें कलिवर" काय किमत आहे देहाची "भव भ्रमाचा आकार" "तुका म्हणे आतां उरलो उपकारापुरता" तो काय लहान माणूस होता ? पण एवढा तो तुकाराम ज्ञानदेवांचें वर्णन करतांना "मज पामरा हें काय थोरपण" कीं ज्ञानदेवांनीं उपदेशासाठीं मनुष्य पाठवावा, "पायींची वहाण पायीं बरी" मी पायांतली वहाण आहें अशी भाषा तुकारामानें वापरली. तेव्हां आतां मी त्यांचें काय वर्णन करणार ?

## राजा राम प्रजा राम अधिकारी राम

गीता-प्रवचनामध्यें मीं एके ठिकाणीं लिहून ठेवलें आहे कीं ज्ञानदेवांची मधुर वाणी चाखण्यासाठीं मला जर पुन्हां जन्म घ्यावा लागला तर घ्यायची माझी तयारी आहे इतकी धन्य वाणी मराठी भाषेमध्यें आली आहे. तर आतां आपण काय करायला पाहिजे ? तुकारामानें आम्हांला सांगितलें आहे कीं आम्हांला सर्वत्र रामराज्य करायला पाहिजे. हीं जीं किर कोळ राज्यें चाललीं आहेत तीं नांहीं ठेवायची. रामराज्य पाहिजे. रामराज्य कसें करायचें तेवढा अभंग सांगून माझें व्याख्यान मी संपवितों.

" राम राज्य राम प्रजा लोकपाळ। एकचि सकळ दुजें नाहीं "

ज्या राज्यामध्यें राम हा राजा, ज्या राज्यामध्यें राम च प्रजा आणि ज्या राज्यामध्यें लोकपाल म्हणजे अधिकारी राम आहे."

"मंगळावांचूनी उमटेना वाणी। अखंडींच खाणी ऐकी राशी"

आपल्या वाणींतून मंगलाशिवाय दूसरा शब्द च निघतां कामा नये,

" तुका म्हणें अवघें दुमदुमिलें देवें "

तुकाराम म्हणतात, देव अगदीं दुमदुमून भरला आहे, जगांत अगदीं गडगंज भरला आहे, एक कोपरासुद्धां शिल्लक नाहीं कीं ज्या ठिकाणीं देव नाहीं असें म्हणतां येईल.

" उरलें तें गावें हें चि आतां "

आतां मला केवळ गाणें एवढें च काम उरलेलें आहे, दुसरा कार्यक्रम राहिला च नाहीं

" मोडले हे स्वामी ठायाठाव सेवा "

कोणी एक स्वामी आणि कोणी एक सेवक असा भेद आतां उरलेला नाहीं.

" वाढवावा हेवा कोण्या अंगें "

तर आतां कोणत्या कारणासाठीं हेवा वाढविणार आम्ही ? कशाचा मत्सर आम्ही करणार ?

माझ्या मित्रांनो ! स्वराज्य झालेलें च आहे, आतां आपण असें स्वराज्य स्थापन करूं या, कीं ज्यामध्यें भेद म्हणून उरणार नाहीं. स्वामी नाहीं, सेवक नाहीं, मालक नाहीं, मजूर नाहीं, भेद च नाहीं. आणखी अधिकारी राम, प्रजा राम, राजा राम, यापेक्षां आणखी डेमॉक्रसीच्या कल्पना काय कराल ? तेव्हां आतां आपण तें च करूं या आणि अशी शपथ घेऊं या कीं आपल्या मुखांतून अमंगल शब्द च निघणार नाहीं.

**नेवासें जि. अहमदनगर**

ता. २८-७-५८

## दुःख-निरसनाचा कार्यक्रम–सहयोग व सहभोग : ४ :

### लोकमान्यांचीं दोन वैशिष्टयें

आज लोकमान्य टिळकांची पुण्यतिथि आहे. नवीन पिढीला लोकमान्यांचें दर्शन झालेलें नसल्यामुळें तिच्या दृष्टीनें लोकमान्य इतिहासांत च सामील झाले आहे. परंतु लोकमान्यांची विशेषता काय होती तेवढें आपण लक्षांत ठेवावें. हिंदुस्थानांत अनेक महापुरुष निर्माण झाले. त्या सर्वांचा आपल्यावर फार उपकार आहे. सर्वांच्या सर्व च गोष्टी आपण ध्यानांत ठेवीत नाहीं. एकेकाचा एकेक गुण, सार, तेवढें च ध्यानांत ठेवतों. विश्वामित्र म्हटला म्हणजे सतत प्रयत्नवाद, कुठल्या हि अडचणींना न जुमानणें, हार न खाणें हें ध्यानांत राहतें. वसिष्ठ म्हटल्यावर सागरासारखी शांति, चित्त चलित न होणें हें स्मरण राहतें. लोकमान्यांच्या जीवनांतलें सार हें कीं ते

सबंध जन्मभर जनतेच्या सेवेंत राहिले आणि त्यांनीं दु:खाचें मूळ पाहून त्यावर प्रहार केला. दु:ख-निवारणाचा प्रयत्न दयाळू लोक करीत असतात च. असे दयाळू लोक नसले तर जग टिकायचें नाहीं. परंतु दयाळू लोकांनीं जरी दयेचीं कामें केलीं तरी दु:खाच्या मुळावर च जोंवर प्रहार झाला नाहीं तोंवर दु:खें उत्पन्न होत च जातात आणि दयाळू लोक तळमळीनें तीं दु:खें निरसण्याचा प्रयत्न करीत च असतात. म्हणून दु:खाचें मूळ शोधून काढून त्यावर प्रहार केला पाहिजे. लोकमान्यांच्या काळांत पारतंत्र्य हें दु:खाचें मूळ आहे असें ठरलें आणि सबंध राष्ट्रानें निर्णय दिला कीं स्वराज्याशिवाय हिंदुस्थानचें दु:ख दूर होणार नाहीं. तेव्हां पारतंत्र्य हें दु:खाचें मूळ आहे असें ठरल्यानंतर लोकमान्यांनीं आपली सारी शक्ति त्या एका गोष्टीवर एकवटली आणि त्याला आध्यात्मिक तत्त्वज्ञान पाहिजे म्हणून गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला. यापुढे पुढच्या पिढीला लोकमान्यांची आठवण दोन गोष्टींमुळें राहणार. (१) दु:खाचें मूळ पारतंत्र्य आहे हें ओळखून स्वराज्याच्या चळवळींत त्यांनीं आपलें सर्वस्व अर्पण केलें आणि (२) त्याला आध्यात्मिक कर्मयोगाचा पाया गीतारहस्य लिहून दिला. याशिवाय त्यांचे जे गुण होते त्याचा हि लाभ देशाला झाला च.

## दु:खमूळ शोधण्यांत गांधीजी एक पाऊल पुढें गेले

पुढें गांधीजी म्हणाले कीं स्वराज्य नाहीं हें च दु:खाचें मूळ नाहीं, तर पूर्वी असलेलें स्वराज्य कां गेलें याचें शोधन करायला हवें. मूळ शोधतांना एकदम अगदीं खालची गोष्ट हातीं लागत नाहीं. कालमानानुरूप महापुरुष एक एक मूळ शोधून काढतात. प्रथम पारतंत्र्य हें दु:खाचें मूळ आहे असा शोध लागला. नंतर गांधीजींनीं दु:खाचें मूळ जें पारतंत्र्य तें कां आलें त्याचें मूळ शोधलें, आणि एक पाऊल पुढें जाऊन ते म्हणाले कीं आम्हांला शुद्ध स्वदेशी-धर्म घेतला पाहिजे. त्याकरितां नुसता इंग्रजी मालावर बहिष्कार टाकून निभणार नाहीं. केवळ इंग्रजी मालावर बहिष्कार टाकला तर मग जपानचा माल येथें येईल. म्हणून खेड्याखेड्यांतील लोकांची शक्ति जागृत होऊन ते सगळे लोक उद्योगाच्या आधारावर उभे झाले आहेत असें व्हायला पाहिजे. स्वातंत्र्य गमावण्याचें मुख्य कारण या प्रमाणें त्यानीं खोलांत जाऊन पाहिलें आणि

म्हणाले कीं आम्हीं लोक लोभामध्यें पडलों, नफ्याच्या मागें लागलों, आळस केला, उद्योग गमावले, देशांत फूट निर्माण केली म्हणून पारतंत्र्य आलें आहे. हें पारतंत्र्य आपल्याला घालवायचें असेल तर देशांत स्वदेशी-धर्माची स्थापना झाली पाहिजे, राष्ट्रांत ऐक्य निर्माण झालें पाहिजे.

## बुद्ध अत्यंत खोल गेले

बुद्ध भगवानांनीं सुद्धां अशा प्रकारें खोलांत जाऊन दुःखमूळ पाहिलें होतें. म्हणून च आज अडीच हजार वर्षांनंतर हि जगाला त्यांचें स्मरण होत आहे. दुःखाचें मूळ वासना आहे असें म्हणून त्यांनीं वासनेवर प्रहार केला. परंतु इतक्या खोलांतले पाणी सर्वांच्या च उपयोगी पडत नाहीं. लोकांची तहान वरवरच्या उथळ पाण्यांत च भागते. बुद्धानें ज्या खोलींत जाऊन दुःख-मूळाचें शोधन केलें तेंच खरें शोधन आहे. परंतु वेदान्त आणि बुद्ध धर्म यांनीं चंग कसून हि दुःखमूळाचें छेदन झालें नाहीं. जर छेदन झालें असतें तर आपण सारे मुक्त झालों असतों.

## दुःखें वाटून घेऊन सुखसाम्य आणण्याचा सोपा कार्यक्रम

आतां विज्ञानयुगांत आपण वासनेला जरी कापून टाकूं शकत नसलों तरी वासनेला सार्वजनिक रूप देऊं शकतों. जी माझी वासना आहे ती च सर्वांची आहे. तेव्हां सर्वांची वासना पूर्ण होईल तर माझी हि पूर्ण होईल. सर्वांची पूर्ण होईपर्यंत माझी पूर्ण होणार नाहीं. अशा प्रकारें वासनेला सार्वजनिक रूप द्यायला हवें. आजपर्यंत मी आणि माझी वासना एवढें च आपणां-समोर होतें. परंतु मी माझी वासना सोडून च दिली तर मुक्त होईन, इतक्या खोलांत जाऊन दुःखमूलाचा छेद करणें सर्वांना शक्य नसतें. म्हणून वासना सार्वजनिक करायची, म्हणजे वाटून घ्यायची. हें काम वासना समूळ सोडण्याइतकें कठिण नाहीं. सगळ्यांच्या बरोबर वाटून घेऊन सहभोग करणें सोपें आहे. भोगाला नाहींसें करणें ही गोष्ट एखाद्याला च साधेल, असे परम संन्यासी आजपर्यंत झाले आहेत आणि पुढे हि होतील. परंतु वासनेचा छेद करणारा संन्यासी बनायचें किंवा वासनेची पूर्ति करणारा परम स्वार्थी बनायचें असे दोन च पर्याय कां असावेत? या

दोहोंमधला सर्वांकरितां सुलभ असा मधला मार्ग म्हणजे सहभोगाचा आणि सहयोगाचा आहे. सगळे मिळून योगाभ्यास करूं, सगळे मिळून संयम करूं आणि सगळे मिळून भोगूं. सगळ्यांनीं मिळून परमार्थसाधना करायची आणि सगळयांनीं मिळून भोग करायचा. दुःख असेल तर तें सगळ्यांनीं वाटून घ्यायचें असें म्हटल्यावर प्रत्येकाच्या वाट्याला दुःखच येईल, सुख कोठून येणार असा प्रश्न कांहीं लोक विचारतात. परंतु दुःख वाटून घेतल्यानें कमी होतें, दुःख वाटून घेणें हें च सुख आहे. हें आमच्या ध्यानांत येत नाहीं. मी आजारी असलों आणि तुम्ही माझ्याजवळ येऊन प्रेमानें चार शब्द बोललात, सहानुभूति दाखविलीत म्हणजे तुमचें दुःख मला पोहोंचतें, त्यामुळें माझें दुःख दूर होतें. गांवाचीं दुःखें सर्वांनीं वाटून घेतलीं म्हणजे ती दूर होतील. कारण वाटून घेतल्यामुळें गांवांतले सगळे एक होतील आणि मग सुखोत्पत्तीचा कार्यक्रम सुरू करतील. दुःख वाटून घेतल्याशिवाय गांव एकवटणें अशक्य आहे. आणि एकवटल्याशिवाय सुखनिर्मितीचा कार्यक्रम करतां येणें अशक्य आहे. दुःख वाटून घेतल्याशिवाय जर सुखनिर्मितीचा कार्यक्रम करूं तर त्यामुळें सुखी लोक अधिक सुखी बनतात आणि दुःखी लोकांचे दुःख कायम च राहतें. ज्ञानदेवांनीं म्हटलें आहे कीं ज्यावेळीं सुखसाम्य होतें तेव्हां बुद्धीचें खरें वैभव प्रकट होतें. आपलें च घर भरण्यांत बुद्धीचें वैभव प्रकट होत नाहीं. म्हणून प्रथम दुःखें वाटून घ्यायचीं आणि मग सुख वाढवून तें हि समान वाटून घ्यायचें असा दुहेरी कार्यक्रम घेतला म्हणजे जगांतील दुःखमूळावर सामूहिक प्रहार होतो. दुःखमूळावर व्यक्तिगत प्रहार करणें म्हणजे वासना काढून टाकून संन्यासी होणें होय. ही एक उत्तम प्रक्रिया आहे परंतु ती सर्वांना साधणारी नाहीं. ज्या महापुरुषांनीं तसें केलें त्यांचा आम्ही सदैव गौरव करूं परंतु सर्व जनतेसाठीं तसा कार्यक्रम करायचा झाल्यास सहयोग आणि सहभोग हा च मार्ग घेतला पाहिजे.

## सहयोग आणि सहभोग यानें दुःखनिरसन

लोकमान्यांच्या काळांत पारतंत्र्य हें दुःखमूळ आहे असें ठरवून त्यावर प्रहार झाला. मग गांधीजींनीं अधिक खोलांत जाऊन दुःखमूळ कोणतें तें सांगितलें. आतां स्वराज्य आलें तरी दुःखें कायम च आहेत. तीं दूर करायला

त्यांचें मूळ शोधून काढलें पाहिजे. ग्रामदानाचा कार्यक्रम हा दुःखमूळ छेदनाचा कार्यक्रम आहे. आपली च वासना तृप्त करण्याचा प्रयत्न आपण करीत गेलों म्हणजे दुसऱ्याची वासना तृप्त होत नाहीं आणि त्यामुळें टक्कर निर्माण होते. माझे गरिबांत हि अनेक मित्र आहेत आणि श्रीमंतांत हि आहेत. गरिबांपेक्षां श्रीमंत मित्र हे जास्त रडणारे आहेत. घरांत पैसा आल्यामुळें प्रेमाचा ओलावा कमी होतो. सगळे सुखाच्या पाठीशीं लागतात, पण सुख कांहीं कोणाला मिळत नाहीं. म्हणून आतां स्वराज्या-नंतर सहभोगाचा आणि सहयोगाचा कार्यक्रम घ्या. सहभोगाचा कार्यक्रम जुना च आहे. आपण जेवतांना 'सहनाववतु' म्हणतों. हा कार्यक्रम जुना च असला तरी त्यावर आजवर अंमल झाला नाहीं. आतां या विज्ञान युगांत खेड्यांची उभारणी सहयोगच्या आणि सहभोगाच्या तत्त्वावर च होऊं शकतें आणि त्यानें च दुःखें निरसन होऊं शकतात.

## समान कार्यक्रमाभावीं देश निष्क्रिय राहतो

येथील एका गृहस्थानें मला कांहीं प्रश्न विचारले आहेत. त्यांतील एक प्रश्न असा आहे कीं आजच्या पक्षोपपक्षामध्यें जनतेचें ऐक्य कसें होईल आणि सार्वजनिक कार्य कसें करता येईल ?

स्वराज्यासाठीं आम्हांला एकवटावें लागलें म्हणून पक्ष कमी झाले. स्वराज्यानंतर भोग हातीं आला आहे. आतां वाटून घ्यायचें आहे असें समजून अनेक पक्ष पडले. लुटारू लोक सुद्धां लुटीच्या वेळीं कांहीं नीतिमत्ता पाळतात. पण मग लूट हातीं आली म्हणजे वाटणीच्या वेळीं भांडणें सुरू होतात. स्वराज्यानंतर भांडणें सुरू झालीं याचा अर्थ स्वराज्य हा धर्म झाला नाहीं, डाका झाला. आतां यावर उपाय काय तें शोधलें पाहिजे. पक्षांपक्षांतील चढाओढ, मत्सर, भांडणें, इत्यादींनीं कांहीं लब्धि होत नाहीं. भिन्नभिन्न पक्षांत विचार भेद हे असायचे च. एवढ्या मोठ्या राष्ट्रांत मत-भेद असणें स्वाभाविक च आहे. मतभेदाच्या आधारावर पक्ष होतात, ते रहावेत, पण मतभेदाप्रमाणें च मतैक्य हि असतें. सगळ्या सज्जनांमध्यें ज्या गोष्टींच्या बाबतींत मतैक्य असतें त्या गोष्टी शोधून काढून त्यांचा कार्यक्रम बनवून जनतेपुढें ठेवला म्हणजे आजची निष्क्रिय जनता कामाला लागेल

आज प्रत्येक पक्षाचे पुढारी दुसऱ्या पक्षाच्या पुढाऱ्याला शिव्या देतात, हीन, देशद्रोही वगैरे म्हणतात. आपल्या विचारांशीं ज्यांचा मेळ बसत नाहीं तो देशद्रोही अशी आज व्याख्या झाली आहे. एकमेकांनीं एकमेकांना राष्ट्रद्रोही म्हणायचें आणि जनतेनें दोघांना हि राष्ट्रद्रोही समजायचें असें आज चाललें आहे. याचा परिणाम असा होतो कीं लोकांची परमप्रिय निष्क्रियता कायम राहते. तुम्हीं मला दोन शिव्या दिल्या आणि मीं तुम्हांला दोन शिव्या दिल्या म्हणजे साहित्यांत चार शिव्या जमा झाल्या. आणि सर्व पक्षांच्या शिव्या एकवटल्या म्हणजे त्याला गांवाच्या उकिरड्याचें रूप येतें. आजच्या राजकीय पक्षांच्या कार्यपद्धतीमुळें जनतेला क्रियाशील होण्याचा कांहीं कार्यक्रम मिळत नाहीं. याचा सर्व पक्षांच्या शहाण्या लोकांनीं एकत्र येऊन विचार करायला हवा आणि सर्वांनीं मिळून कांहीं समान कार्यक्रम घ्यायला हवा. सफाईचा कार्यक्रम सर्वांना मान्य होण्यासारखा आहे, परंतु तो कांहीं दुःखमूळावर प्रहार करणारा कार्यक्रम होऊं शकत नाहीं. तो कार्यक्रम मला आवडतो हि. पण आज आपल्याला असा कार्यक्रम घ्यायला हवा कीं ज्यायोगें दुःखमूळावर प्रहार होईल. माझें असें नम्र मत आहे कीं ग्रामदानाचा कार्यक्रम अशा प्रकारचा असल्यामुळें याला सर्व जनतेचें सहकार्य मिळायला हवें.

## ग्रामदान राष्ट्रीय कार्यक्रम झाला

ग्रामदानाच्या कार्यक्रमाला सर्व पक्षांचें सहकार्य मिळेल अशी मीं पूर्वी अपेक्षा केली नव्हती. कांहीं मित्रांना घेऊन मी हें काम रेटीत होतों. त्यांतून पुढें शक्ति निर्माण झाली. कोरापुटच्या ग्रामदानामुळें संख्या वाढली आणि मदुरेच्या ग्रामदानामुळें गुण प्रकट झाला. त्यानंतर अशी भूमिका तयार झाली कीं नेत्यांचीं मतें या कामाला अनुकूल झालीं आणि येलवालला सर्वांनीं मिळून या कामाला आशीर्वाद देत म्हटलें कीं या कामाला सर्वांनीं बळ द्यावें. त्यानंतर हा कार्यक्रम राष्ट्रीय झाला आणि मला हि बळ आलें. नाहीं तर ज्यायोगें हा कार्यक्रम राष्ट्रीय बनावा असें माझ्याजवळ कुठलें बळ होतें? माझा कार्यक्रम केवळ माझ्या दोन पायांना लागू होता आणि म्हणून ते फिरत होते. कांहीं कार्यकर्ते हि माझ्या च प्रमाणें वणवण हिंडत पण त्यांची कांहीं

देखील सोय होत नसे. मीं अनेकदां म्हटलें कीं गांधीजींच्या काळांत त्यांनीं आपल्याला वनवासाचा (तुरुंगवास) कार्यक्रम दिला होता, आतां तुम्हीं जनवासाचा कार्यक्रम घ्या. आतां वनवास आणि जनवास एकच आहे. कारण तुम्ही ज्या खेडयांत जाल तिथें च तुम्हांला वनवास हि लाभेल. मी विनोदानें म्हणत असतों कीं मोठा डामरी रस्ता हा ग्रामदान रोड नसून इलेक्शन रोड आहे. प्रथम तुम्ही ग्रामदान रोडवर हिंडा. कोरापुटच्या जंगलांत भर पावसांत शेंकडों कार्यकर्त्यांनीं त्रास सोसून काम केलें. त्याचा परिणाम म्हणून तेथें शेकडों ग्रामदानें झालीं. आतां नेत्यांनीं या कार्याला संमति दिल्यामुळें मला इलेक्शन रोडवर सुद्धां हिंडायची हिम्मत आली आहे. आतां लोक माझें ऐकतील असें मला वाटतें. तेव्हां आतां आपण सर्व मिळून हा कार्यक्रम हातीं घेऊं या.

**संतांची शक्ति कशी प्रकट होईल**

एकानें असा प्रश्न विचारला कीं ही संतांची भूमि आहे. तेव्हां इथें कशा प्रकारचें कार्य करायला हवें ?

ही संतांची भूमि आहे हें खरें परंतु ती नवीन संतांची आहे कीं जुन्या च संतांची आहे ? म्हणजे, नवीन युगांत इथें संतांचें पीक निघत आहे का ? जुने संत होऊन गेले, ती फार जुनी गोष्ट झाली. आतां नवीन संतांची शक्ति प्रकट होण्याकरतां आपल्याला प्राथमिक स्वरूपाचा कार्यक्रम हातीं घ्यावा लागेल. त्याकरितां मीं असें सांगितलें आहे कीं घरोघर ,सर्वोदय-पात्र स्थापन करा. म्हणजे वाटून खाण्याचा संदेश, ती संतांची शिकवण घरोघर पोंचवा. या संतांच्या भूमींत संतांच्या नांवानें हें करायचें आहे. पूर्वीं संत घरोघर जाऊन भिक्षा मागत; परंतु आतां या विज्ञानयुगांत एकेकटयानें काम करायचें नसून सर्वांनीं मिळून करायचें आहे. आपल्या घरामध्यें 'सर्वोत्तमाचा दास' आला आहे असें समजून मूठभर धान्य सर्वोदय-पात्रांत टाकायचें आहे. जोंवर समाजांत सामुदायिक कार्य करण्याची शक्ति नव्हती तोंवर प्रयोगशाळेंतल्या प्रयोगाप्रमाणें व्यक्तिगत प्रयोग चालत असत. परंतु आतां विज्ञानयुगांत समुहानें गुणविकासाचा प्रयोग करायचा आहे. "**दिनाचा दयाळू मनाचा मवाळू**" असें गात गात घरोघर भिक्षा मागणारे आतां जाणार नाहींत. आतां सर्वोत्तमाच्या दासाचें पालन सर्वांना मिळून

करायचें आहे. लोक विचारतात कीं असे सेवक आहेत तरी कुठें ? कुराणमध्यें यावर उत्तर दिलें आहे "अल् गैब" जे अव्यक्तावर विश्वास ठेवतात ते माझे भक्त आहेत. जे व्यक्तावर च विश्वास ठेवतात, बघून च ज्यांचा विश्वास बसतो ते माझे भक्त नाहींत. म्हणून कुणी तरी दयाळू सेवक दिसल्यावर मग त्याच्याकरितां धान्य द्यायचें असें नव्हे तर अव्यक्त सेवकाकरितां द्यायचें अशी भक्ति तुम्हीं केली पाहिजे. म्हणजे आपल्यांतून च सेवक निघतील. खेड्याखेड्यांत या कामाकरतां सर्वोदय-मंडळें निर्माण झालीं पाहिजेत, त्यांच्या तर्फे सर्वोदय-पात्राची योजना झाली पाहिजे. अशा रीतीनें खेड्याखेड्यांत पात्राची व सेवकाची योजना होईल, तेव्हां तेथील संतांची जी गुप्त शक्ति आहे ती प्रकट होईल.

## लोभामुळें नैतिक पातळी घसरत आहे

एक प्रश्न असा विचारला आहे कीं स्वराज्यानंतर समाजाची नैतिक पातळी सर्वच क्षेत्रांत घसरत चालली आहे तर त्याकरतां काय करावें ?

प्रश्न विचारणाराचें हें कथन खरें नाहीं. सर्व च क्षेत्रांत नव्हे तर फक्त एका च क्षेत्रांत नैतिक पातळी घसरत आहे आणि ती हिंदुस्थानांत च नव्हे तर साऱ्या जगांत घसरत आहे. तें क्षेत्र म्हणजे आर्थिक क्षेत्र होय. बाकीच्या निति-मत्तेच्या सगळया क्षेत्रांत पातळी घसरली नाहीं. इतर पापें होत असलीं तरी वाढलेलीं दिसत नाहींत. परंतु आर्थिक क्षेत्रांतील पापें वाढलेलीं आहेत. प्राचीन ऋषींच्या काळांत जेवढी कामवासना होती त्यापेक्षां आज कमी आहे. तेव्हांपेक्षां आज क्रोध कमी आहे, ही गोष्ट निःसंशय आहे; परंतु आज लोभ वाढलेला आहे. काम क्रोध आज हि गेलेले नाहींत. पण पूर्वीं जराजराशा गोष्टीवरून मोठमोठे ऋषि शाप देत आणि त्यांच्या मुखांतून जें निघेल तें खरें होई. भगवंतानें मला जर वर दिला कीं तुझ्या शब्दाला किंमत आहे, तर मी विचार केल्याशिवाय शाप कसा देईन ? परंतु पूर्वींचे ऋषि साधा जेवायला उशीर झाला तरी शाप देत असत. महाभारतांत एक कहाणी आहे कीं एक ऋषि रागावला म्हणून आकाशांतून पक्षी जळून खालीं पडले. नंतर तो ऋषि एका घरांत गेला व जेवण मागूं लागला. त्या घरांतली साध्वी म्हणाली, कीं मी पतीची सेवा करून दोन मिनिटांत येतें. यावर तो ऋषि चिडला तेव्हां

१०२८७

देखील सोय होत नसे. मीं अनेकदां म्हटलें कीं गांधीजींच्या काळांत त्यांनीं आपल्याला वनवासाचा (तुरुंगवास) कार्यक्रम दिला होता, आतां तुम्हीं जनवासाचा कार्यक्रम घ्या. आतां वनवास आणि जनवास एकच आहे. कारण तुम्ही ज्या खेड्यांत जाल तिथें च तुम्हांला वनवास हि लाभेल. मी विनोदानें म्हणत असतों कीं मोठा डामरी रस्ता हा ग्रामदान रोड नसून इलेक्शन रोड आहे. प्रथम तुम्ही ग्रामदान रोडवर हिंडा. कोरापुटच्या जंगलांत भर पावसांत शेंकडों कार्यकर्त्यांनीं त्रास सोसून काम केलें. त्याचा परिणाम म्हणून तेथें शेकडों ग्रामदानें झालीं. आतां नेत्यांनीं या कार्याला संमति दिल्यामुळें मला इलेक्शन रोडवर सुद्धां हिंडायची हिम्मत आली आहे. आतां लोक माझें ऐकतील असें मला वाटतें. तेव्हां आतां आपण सर्व मिळून हा कार्यक्रम हातीं घेऊं या.

## संतांची शक्ति कशी प्रकट होईल

एकानें असा प्रश्न विचारला कीं ही संतांची भूमि आहे. तेव्हां इथें कशा प्रकारचें कार्य करायला हवें ?

ही संतांची भूमि आहे हें खरें परंतु ती नवीन संतांची आहे कीं जुन्या च संतांची आहे ? म्हणजे, नवीन युगांत इथें संतांचें पीक निघत आहे का ? जुने संत होऊन गेले, ती फार जुनी गोष्ट झाली. आतां नवीन संतांची शक्ति प्रकट होण्याकरतां आपल्याला प्राथमिक स्वरूपाचा कार्यक्रम हातीं घ्यावा लागेल. त्याकरितां मीं असें सांगितलें आहे कीं घरोघर ,सर्वोदय-पात्र स्थापन करा. म्हणजे वाटून खाण्याचा संदेश, ती संतांची शिकवण घरोघर पोंचवा. या संतांच्या भूमींत संतांच्या नांवानें हें करायचें आहे. पूर्वीं संत घरोघर जाऊन भिक्षा मागत; परंतु आतां या विज्ञानयुगांत एकेकट्यानें काम करायचें नसून सर्वांनीं मिळून करायचें आहे. आपल्या घरामध्यें 'सर्वोत्तमाचा दास' आला आहे असें समजून मूठभर धान्य सर्वोदय-पात्रांत टाकायचें आहे. जोंवर समाजांत सामुदायिक कार्य करण्याची शक्ति नव्हती तोंवर प्रयोगशाळेंतल्या प्रयोगाप्रमाणें व्यक्तिगत प्रयोग चालत असत. परंतु आतां विज्ञानयुगांत समुहानें गुणविकासाचा प्रयोग करायचा आहे. "**दिनाचा दयाळू मनाचा मवाळू**" असें गात गात घरोघर भिक्षा मागणारे आतां जाणार नाहींत. आतां सर्वोत्तमाच्या दासाचें पालन सर्वांना मिळून

करायचें आहे. लोक विचारतात कीं असे सेवक आहेत तरी कुठें ? कुराणमध्यें यावर उत्तर दिलें आहे "अल् गैब" जे अव्यक्तावर विश्वास ठेवतात ते माझे भक्त आहेत. जे व्यक्तावर च विश्वास ठेवतात, बघून च ज्यांचा विश्वास बसतो ते माझे भक्त नाहींत. म्हणून कुणी तरी दयाळू सेवक दिसल्यावर मग त्याच्याकरितां धान्य द्यायचें असें नव्हे तर अव्यक्त सेवकाकरितां द्यायचें अशी भक्ति तुम्हीं केली पाहिजे. म्हणजे आपल्यांतून च सेवक निघतील. खेड्याखेड्यांत या कामाकरतां सर्वोदय-मंडळें निर्माण झालीं पाहिजेत, त्यांच्या तर्फे सर्वोदय-पात्राची योजना झाली पाहिजे. अशा रीतीनें खेड्याखेड्यांत पात्राची व सेवकाची योजना होईल, तेव्हां तेथील संतांची जी गुप्त शक्ति आहे ती प्रकट होईल.

## लोभामुळें नैतिक पातळी घसरत आहे

एक प्रश्न असा विचारला आहे कीं स्वराज्यानंतर समाजाची नैतिक पातळी सर्वच क्षेत्रांत घसरत चालली आहे तर त्याकरतां काय करावें ?

प्रश्न विचारणाराचें हें कथन खरें नाहीं. सर्व च क्षेत्रांत नव्हे तर फक्त एका च क्षेत्रांत नैतिक पातळी घसरत आहे आणि ती हिंदुस्थानांत च नव्हे तर साऱ्या जगांत घसरत आहे. तें क्षेत्र म्हणजे आर्थिक क्षेत्र होय. बाकीच्या निति-मत्तेच्या सगळया क्षेत्रांत पातळी घसरली नाहीं. इतर पापें होत असलीं तरी वाढलेलीं दिसत नाहींत. परंतु आर्थिक क्षेत्रांतील पापें वाढलेलीं आहेत. प्राचीन ऋषींच्या काळांत जेवढी कामवासना होती त्यापेक्षां आज कमी आहे. तेव्हांपेक्षां आज क्रोध कमी आहे, ही गोष्ट निःसंशय आहे; परंतु आज लोभ वाढलेला आहे. काम क्रोध आज हि गेलेले नाहींत. पण पूर्वी जराजराशा गोष्टीवरून मोठमोठे ऋषि शाप देत आणि त्यांच्या मुखांतून जें निघेल तें खरें होई. भगवंतानें मला जर वर दिला कीं तुझ्या शब्दाला किंमत आहे, तर मी विचार केल्याशिवाय शाप कसा देईन ? परंतु पूर्वींचे ऋषि साधा जेवायला उशीर झाला तरी शाप देत असत. महाभारतांत एक कहाणी आहे कीं एक ऋषि रागावला म्हणून आकाशांतून पक्षी जळून खालीं पडले. नंतर तो ऋषि एका घरांत गेला व जेवण मागूं लागला. त्या घरांतली साध्वी म्हणाली, कीं मी पतीची सेवा करून दोन मिनिटांत येतें. यावर तो ऋषि चिडला तेव्हां

९०२८९
शाखा (स्थळ प्रत)

ती म्हणाली, कीं तुमच्या कोपानें जळायला मी कांहीं पक्षी नाहीं. हें ऐकून त्याला वाटलें कीं ही स्त्री ज्ञानी आहे. मग तो तिला शरण गेला व तिनें त्याला उपदेश केला. त्या च प्रमाणें पूर्वीच्या काळीं जमीन खूप व लोकसंख्या कमी म्हणून भोग-लालसा हि भरपूर वाढलेली होती. आतां कामक्रोध तितके जोरदार नाहींत पण लोभ मात्र फार जोरदार झाला आहे, आणि म्हणून अर्थशास्त्राच्या दृष्टीनें पापें होत आहेत. आज पूर्वीपेक्षां खोटें बोलणें जास्त वाढलें आहे पण तें लोभामुळें, पैसा मिळविण्याकरितां म्हणून वाढलें आहे. एखाद्या मनुष्याला वेड लागलें आणि वेडाच्या भरांत त्यानें खून केला तरी त्याला फाशीची शिक्षा होत नाहीं. कारण त्याला वेड लागलेलें असतें. तो खुनाचा दोष त्या वेडाच्या पोटांत येऊन जातो. वेड नसतांना खून केला तर तो स्वतंत्र दोष ठरेल. तसें च वेड्यानें दान केलें तर कायदा तें ओळखत नाहीं. वेड्याला दान लागत नाहीं, खून लागत नाहीं, त्याला वेड च लागलेलें असतें. त्या च प्रमाणें ज्ञानी माणसाला पाप लागत नाहीं, पुण्य लागत नाहीं, त्याला ज्ञान च लागतें. तो जें कांहीं करतो तें ज्ञान च करतो. मग त्यांत कोणाचें नुकसान होवो कीं लाभ होवो. त्या च प्रमाणें आजच्या जगांत जीं अनेक विविध प्रकारचीं पापें होत आहेत तीं त्या लोकांना मुळींच लागत नाहींत. कारण त्यांच्या पाठीशीं अर्थलोभ लागला आहे. आर्थिक क्षेत्रांत नैतिक पातळी घसरते आणि त्याचा परिणाम दुसऱ्या हि क्षेत्रावर होतो. कधीं कधीं अशा बातम्या ऐकूं येतात कीं आई-बापांनीं आपल्या मुलांना विष देऊन मारलें व कधीं ते स्वतः हि विष खाऊन मेले. याचा अर्थ त्या आईबापांना प्रेम, वात्सल्य नाहीं ते क्रूर आहेत असा नाहीं. परंतु आर्थिक दुर्दशेमुळें हीं पापें होत आहेत. हीं पापें जरी आर्थिक क्षेत्राच्या बाहेर चाललेलीं दिसत असलीं, तरी तीं आर्थिक पापमूलक च आहेत. हिंदुस्थानांत आणि जगांत जें आर्थिक पाप चाललें आहे त्यावर उपाय म्हणजे सहभोगाची योजना करणें. ती केली तर पुष्कळ पापें नाहींशीं झालेलीं दिसतील.

## व्यापाऱ्यांनीं खरे व्यापारी बनावें

व्यापाऱ्यांविषयीं एक प्रश्न विचारला आहे. मी व्यापाऱ्यांना नेहमीं म्हणतों कीं व्यापाऱ्यांनीं व्यापार करावा पण '**अव्यापारेषु व्यापार**' करूं

नये. अलिकडे तो च फार होतो. हिंदुधर्मानें व्यापाऱ्यांना जसा ताम्रपट लिहून दिला तसा जगांत कुठें हि आढळत नाहीं. हिंदुधर्मानें म्हटलें आहे कीं व्यापारीवर्ग जर लोकसेवक या नात्यानें परमेश्वरार्पणपूर्वक व्यापार करील तर त्याला त्या कर्मानें च मोक्ष मिळेल, मोक्षाकरतां त्याला दुसरें कांहीं करावें लागणार नाहीं. गीतेंत म्हटलें आहे "**आपुल्या आपुल्या कर्मीं दक्ष तो मोक्ष मेळवी**" ब्राह्मणानें वेदाभ्यास केला आणि वासना राखली तर त्याला मोक्ष मिळणार नाहीं. पण व्यापाऱ्यांनीं सेवेसाठीं व्यापार केला तर त्याला मोक्ष मिळेल. म्हणजे ब्राह्मणाचें वेदाध्ययन हें जितक्या योग्यतेचें आहे, तितक्याच योग्यतेचें व्यापाऱ्याचें सेवाकर्म आहे. असा विचार फक्त हिंदुस्थानांत च आढळतो. दुसरीकडे म्हटलें आहे कीं, "एक वेळ सुईच्या नेढ्यांतून ऊंट जाऊं शकेल पण श्रीमंताला ईश्वराच्या राज्यांत प्रवेश नाहीं." पण हिंदुस्थानांत मात्र असें म्हटलें आहे कीं व्यापार केला तरी त्याला मोक्ष मिळेल. मात्र त्यानें स्वतःसाठीं संग्रह करूं नये तर आपण साऱ्या समाजाचे ट्रस्टी आहोंत असें समजून समाजासाठीं संग्रह करावा. हिंदुधर्माची रचना अशी आहे कीं त्यांत चार वर्ण आणि चार आश्रम अशा एकूण सोळा अवस्थांपैकीं फक्त एका च वर्णाला व एका च अवस्थेंत परिग्रहाचा अधिकार दिला आहे. याचा अर्थ असा कीं बाकीच्या पंधरा अवस्थांचें पोषण करण्याची जबाबदारी त्या सोळाव्या अवस्थेवर टाकली आहे. व्यापाऱ्यांनीं विचार करावा कीं आपल्यावर टाकलेल्या एवढ्या मोठ्या जबाबदारीला लायक असें आपण आजवर काम केलें आहे काय ? नाहीं. तरी पण माझी व्यापाऱ्यांवरील निष्ठा अजून ढळली नाहीं. हिंदुस्थानचे व्यापारी बुद्धिमान् आहेत आणि त्यांची रहाणी साधी आहे. कांहीं व्यापारी इतके साधे आहेत कीं कंजूस म्हणून जगांत त्यांची प्रतिष्ठा पण राहिली नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत तर गांधीजींना तेथील व्यापाऱ्यांना सांगावें लागलें कीं तुम्ही इतके कंजूस होऊं नका. सदरा धुऊन घालत जा, चार सदरे ठेवत जा, नाहीं तर तुमची प्रतिष्ठा राहणार नाहीं. भावार्थ असा कीं व्यापाऱ्यांची साधी रहाणी कंजूसपणाच्या हद्दीपर्यंत पोंचली आहे. तेव्हां त्यांनीं कंजूसपणाचा दोष काढून टाकावा व साधेपणा ठेवावा. पुष्कळ व्यापाऱ्यांनीं मांसाहार सोडला आहे ही मोठी गोष्ट आहे.

त्यामुळें त्यांच्या चित्तांत दया आहे च. आतां मी त्यांना म्हणतों प्राण्यावर दया करता तशी माणसांवर करा. आपल्या जवळची संपत्ति आपली नसून समाजाची आहे या भावनेनें व्यापारी वागतील तर त्यांच्या हातून समाज-सेवा होईल. ग्रामदानकार्यांत व्यापाऱ्यांना फार मोठें स्थान आहे, तें त्यांनीं ओळखावें.

लासूर, जि. औरंगाबाद १-८-५८

## ग्राम-स्वराज्याचें लेणें तयार करा : ५ :

### लेण्यांची भव्य कल्पना

आज मीं इथलें लेणें पाहिलें. तत्पूर्वीं हि मीं हें लेणें पाहिलें होतें. मला सौंदर्य फार कांहीं समजत नाहीं, आणि शिल्पकला समजण्याला सुद्धां उत्तम कला यायला पाहिजे, तशी कला हि मला अवगत नाहीं. परंतु मागें जेव्हां मी इथें आलों होतों त्यावेळीं हें लेणें पाहतांना जी भावना मनावर उमटली होती आणि आज पुन्हां पाहतांना जी भावना उमटली त्यांत कांहीं फरक पडला नाहीं. इतकी अवीट गोडी यांत आहे कीं ती कांहीं केल्या विटतच नाहीं. सबंध धर्मविचार दगडांत कोरून तो लोकांसमोर ठेवायचा म्हणजे धर्माचें प्रत्यक्ष प्रदर्शन च. केवढी विशाल कल्पना लोकांसमोर ठेवली आहे! रामकथा, भागवतांतील कृष्ण चरित्र, दशावतार. शिवपुराण हें सारें एका दगडांत कोरलेलें आहे. परंतु हें एकटें च एक लेणें महाराष्ट्रांत नाहीं तर अशीं च लेणीं अजिंठा. भाजें, कारला येथें आहेत. हीं सगळीं लेणीं महाराष्ट्रांतील कारागिरांनीं च बनविलीं आहेत असें हि नाहीं. मजूर तर इकडचे च असतील; परंतु या कामासाठीं उत्तमांतले उत्तम कारागीर भारतांतल्या निरनिराळ्या भागांतून बोलाविले असतील. हें सारें महाराष्ट्रांत झालें असलें तरी सबंध भारताची प्रतिभा त्यामध्यें उमटली आहे. हें काम सुमारें तीनशें वर्षें होत होतें. या कल्पना सुद्धां इतक्या विशाल आहेत कीं त्या करण्याला आमचीं तोकडीं मनें अपुरी पडतात. येथें तीनशें वर्षें सतत हें च काम चाललें होतें. रोज कारागीर काम करीत. खपली फोडतांना सबंध योजना त्यांना आधीं करावी लागे. काय

काढायचें कसें काढायचें तें सर्व आधीं च ठरत असे. कारण एकदां खपली फोडल्यानंतर कांहीं चूक आढळली तर पुन्हां कांहीं जोडायची सोय नव्हती. मातीची मूर्ति करतांना त्यांत कांहीं चूक राहिली तर पुन्हां थापायची सोय असते तशी सोय येथें नाहीं. म्हणून सुरुवातीपासून च योग्य आकार द्यावा लागतो. त्यामुळें हीं कामें अत्यंत सावकाश सावकाश होत असतात. तीं होत असतांना त्यांत लोकांची धर्मभावना प्रकट होते आणि ही धर्माची मूर्ति प्रकट होत आहे असें त्यांना वाटतें.

## पंढरपूरची अद्भुत मूर्ति

अशीं जीं लेणीं असतात ती कोणत्या तरी राजाच्या काळांतलीं असणार च. त्यामुळें पल्लवांच्या वेळचीं कोणतीं, राष्ट्रकूटांच्या वेळचीं कोणतीं, चालुक्यांच्या वेळचीं कोणतीं वगैरे वगैरे इतिहास सांगितला जातो. पण त्या वस्तूमध्यें जें आहे तें वेगळें च आहे. ते तर बिचारे राजे च होते परंतु ज्यांनीं त्या मूर्ति घडविल्या त्यांची भावना काय होती हें त्या टूरिस्ट लोकांना आणि त्या इतिहास सांगणारांना हि कळण्यासारखें नाहीं. आज कांहीं अमेरिकन टूरिस्ट मुलीं माझ्या भेटीस आल्या होत्या. या देशांतील ज्या गोष्टी पाहण्यासारख्या आहेत त्यांतली ही एक आहे म्हणून त्या येथें आल्या होत्या. मीं त्यांना विनोदानें म्हटलें, " तुमच्या संख्येमध्यें मीं आज वृद्धि केली आहे. परंतु मला आज जें इथें सांपडलें आणि पूर्वीं हि जें सांपडलें होतें तें आणि पंढरपूरच्या विठोबाच्या मूर्तीमध्यें जें सांपडलें तें एक च आहे. तिथें एक ओबड धोबड देव उभा केला असून असंख्य लोक त्याच्या दर्शनाला जातात. इतकें च नव्हे तर तो देव म्हणजे एक सौंदर्य-निधान आहे अशी भक्त कल्पना करतात. परंतु प्रत्यक्षांत त्यांत कला मुळीं च नाहीं, पण तसा देव हि दुसरीकडे कुठें नाहीं. पंढरीच्या विठोबाची विशेषता ही आहे कीं तो निःशस्त्र आहे " वगैरे.

त्या देवतेमध्यें कोणत्या हि प्रकारचा भेद नाहीं. शिव आणि विष्णु एक व्हावेत म्हणून तिथें विठोबाच्या डोक्यावर जी शिदोरी दिली आहे ती लिंगाकार दाखविली आहे. विठोबा गवळ्याच्या पोराचें रूप घेऊन उभा आहे. भगवंताला भक्ताचें इतकें प्रेम असतें कीं तो त्याला आपल्या मस्तकावर

धारण करतो. त्याप्रमाणें तिथें शंकराला मुकुटावर धारण केलेला दाखवून शिव आणि विष्णु एक दर्शविले आहेत. तसें च ती मूर्ति बालमूर्ति केल्यामुळें तिला कांहीं वस्त्र नेसविण्याची गरज पडली नाहीं. आतां त्याला पीतांबर नेसवितात पण ही नेसविण्याची पद्धत पुढें आली. परंतु ती बाल कृष्णाची मूर्ति जवळ जवळ नग्न च आहे. त्यामुळें तिनें दिगंबर जैनांना हि जवळ केलें आहे. म्हणजे जैनांचा मुख्य विचार जो अहिंसा तो पूर्णपणें मान्य केला आहे.

त्या वेळीं महाराष्ट्र आणि कर्नाटकचे राजे एका च यादव वंशांतले होते. तेव्हां दोन्ही प्रदेशांतऐक्य असावें म्हणून कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमेवर म्हणजे पंढरपूरला ही देवता उभी केली. अशा रीतीनें तें एक अद्भुत शिल्प निर्माण केलें गेलें आहे. त्या मूर्तींतील कला ती कल्पनेची कला आहे. ती मूर्ति बनविण्यांत तशी कांहीं च कला नाहीं, अगदीं ओबड-धोबड मूर्ति आहे. इतकी साधी मूर्ति दुसरीकडे कुठें च नसेल. नेहमीं शिल्पी कांहीं ना कांहीं सौंदर्याची कल्पना करून मूर्ति बनवीत असतात. पण तिथली मूर्ति मात्र साधी, मजबूत आणि खंबीर आहे. ती भक्ताला आधार देणारी आहे. त्यांत बारीक सौंदर्य नाहीं. संसार-सागरांत गटांगळ्या खाणाऱ्या आम्हां भक्तांना बारीक सौंदर्याची मूर्ति उपयोगाची नाहीं. ज्याच्याकडे पाहिल्यावर हा आमचा उद्धार करेल असा विश्वास वाटावा अशी मजबूत मूर्ति आम्हांला पाहिजे आणि पंढरपूरला तें च दर्शन घडतें.

## शुद्ध महाराष्ट्रीय लेणें-ज्ञानेश्वरी

इथें विरूळला जी कलाकृति-लेणें-आहे तें अखिल भारतीय आहे. पण ज्याला शुद्ध मराठी लेणें म्हणतां येईल, म्हणजे जरी तें अखिल विश्वाचें लेणें असलें तरी, ज्यांत महाराष्ट्रीय कारागिरानें कारागिरी केलेली आहे असें लेणें म्हणजे ज्ञानेश्वरी हें आहे. आणि हें ज्ञानदेवांनीं स्वतःच लिहून ठेवलें आहे. "**केलें ज्ञानदेवें देशीकार लेणें**" ज्ञानदेवानें गीतारूपी पहाडांतून ज्ञानेश्वरीरूपी लेणें निर्माण केलें. तें अगदीं शुद्ध महाराष्ट्रीय लेणें आहे. परंतु त्यांत भाषा जरी मराठी असली तरी भाव कुठला आहे ते बघा. त्यांत

शंकराचार्यांचा व रामानुजांचा भाव आहे. शैवपंथ, विष्णुपंथ, बौद्ध, जैन धर्म, योगवासिष्ठ, भागवत भारतांतील शांतिपर्व, इत्यादि सर्वांचा ग्राह्यांश त्यांत दिसून येतो. तें गीतेवरचें तर कोरीव लेणें आहे च; पण त्यांत उपनिषद् आणि वेदांना हि सोडलें नाहीं. अशा तऱ्हेनें ज्ञानदेवानें इतकें विलक्षण समुच्चयात्मक लेणें केलें आहे कीं कोणत्या हि सद्भावनावान पंथाला तो ग्रंथ मान्य च व्हावा. त्यांतला कोणता ना कोणता अंश त्याच्या जीवनाला पुरावा, इतकी कुशल कारागिरी त्यांत केली आहे.

## अद्वैतांतील भक्तीला लेण्याची उपमा

या लेण्याचें रहस्य ज्ञानदेवांनीं इतकें अप्रतिम मांडलें आहे कीं तें पाहून त्यांच्या कल्पनाशक्तिविषयीं मन थक्क होऊन जातें. या लेण्यामध्यें सबंध भक्तिमार्ग प्रकट झालेला आहे. शैव आणि वैष्णव भक्तिमार्ग, वैष्णवांत राम आणि कृष्णाचें चरित्र, अवतार मीमांसा, इत्यादि सर्व येथें प्रकट झालें आहे. परंतु ज्ञानदेवांची अशी हौस आहे कीं अद्वैतांत भक्ति वसावी. अद्वैताला क्रिया सहन होत नाहीं, "**तौशी क्रिया कीर न साहे.**" परंतु अद्वैतामध्यें भक्ति आहे ही गोष्ट बोलण्याची नाहीं, अनुभवायची आहे.

"**तरी अद्वैतीं भक्ति आहे। हें अनुभवाचि जोगें नव्हे। बोला ऐसें**"

असें म्हणून त्यांनीं ज्ञानेश्वरीमधें हा विषय संपविला आहे. परंतु पुढें अमृतानुभवांत त्यांनीं म्हटलें कीं ज्यांत कोणती हि क्रिया लागू पडत नाहीं, अशी जी भक्ति ती अकृत्रिम भक्ति आहे. ज्या ठिकाणीं योग आणि ध्यान हे कंबर कसून थकतात तेव्हां विश्रांतिसाठीं भक्तीकडे येतात; असें लिहून ज्ञानदेवांनीं एक उपमा दिली आहे. ही गोष्ट तर्कानें किंवा शब्दानें सांगतां येत नाहीं ती अनुभवायची असते असें त्यांनीं ज्ञानेश्वरींत लिहिलें आहे परंतु माणसाच्या मनाची अनुकूल भूमिका करायला उपमा उपयोगी पडते आणि म्हणून त्यांनीं लेण्याची उपमा देऊन म्हटलें आहे "**देव देऊळ परिवारु। कीजे कोरूनि डोंगरु। तैसा भक्तीचा व्यवहारु। कां न होआवा।**" एका च दगडामध्यें रावण नांवाचा एक भक्त कोरला, त्याच्या डोक्यावर कैलास पर्वतावर बसलेले शंकर पार्वती कोरले,

त्यांत च फुलें कोरलीं, इतकें भक्तीचें विविध दर्शन तेथें होत असलें तरी एका दगडाशिवाय दुसरें तेथें कांहीं हि नाहीं. जर एका दगडांत इतका सगळा भक्तीचा व्यवहार त्या शिल्पकाराला करतां येतो तर आम्हांला अद्वैतामधें तसा भक्तीचा व्यवहार कां करतां येणार नाहीं? ह्या उपमेवरून ज्ञानदेवांच्या अद्भुत प्रतिभेचें दर्शन घडतें. नाहीं तर हिंदुस्थानमधें अद्वैत आणि भक्ति यामध्यें केवढा वाद चालला होता ! रामानुज, वल्लभ, मध्व इत्यादींचीं भक्तीचीं दर्शनें होतीं पण त्यांचा अद्वैताशीं विरोध मानला जात होता. ज्ञानमार्ग एका बाजूला आणि भक्तिमार्ग दुसऱ्या बाजूला अशी स्थिति झाली होती. ज्ञानदेवांनीं मात्र म्हटलें कीं हे सगळे निरनिराळे अनुभव आहेत, त्यांत भेद नाहीं.

आपण एका च जेवणांत तिखट, खारट, आंबट, गोड, तुरट, कडू इत्यादि षड्रस खातों आणि रसिकतेनें कोणत्या रसाचा किती उपयोग करावा तें आम्हांला साधतें. प्रत्येक रसाचें एक स्थान आहे. आपण चटणीचा ढीग ताटांत वाढीत नाहीं. भात, भाकरी, पोळी इत्यादि वस्तु जास्त प्रमाणांत खातों. याप्रमाणें आपण जेवणांत प्रत्येक वस्तूचें प्रमाण बसविलेलें आहे. त्याप्रमाणें पारमार्थिक जीवनांत सांख्य, योग, कर्म, अद्वैत, द्वैत विज्ञान इत्यादि सर्वांना जागा कां मिळूं नये ? ती ती वस्तु त्या त्या जागीं ठेवली म्हणजे सर्वांग-सुंदर परमार्थरूपी जीवनलेणें तयार होतें. म्हणून ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरीची रचना अशी कुशल केली आहे कीं तशी ती इतर कोणाच्या भाष्यांत आढळत नाहीं. बहुधा भाष्यकार त्यांना जें लिहायचें आहे तें सुरवातीला लिहून टाकतात आणि पुढें पुढें त्यांची प्रतिभा कमी कमी होत जाते. परंतु ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरीची अशी कुशल रचना केली आहे कीं प्रथम कर्मयोगाचा ओघ लागतो. तो असतो लहान परंतु प्रथम तो असावा लागतो. नंतर भक्तीच्या गंगेमध्यें तो मिसळतो आणि शेंवटीं आत्मज्ञानरूपी स्वानंदोदधीमधें विलीन होतो. एकपंचमौंश ज्ञानेश्वरी अठराव्या अध्यायावर खर्च झाली आहे व बाकीचा चारपंचमौंशांत बाकीचे सतरा अध्याय आले आहेत. अशी त्यांनीं सबंध कारागिरी केली आहे आणि एकेक शब्द समर्पक घातला आहे. आणि शेंवटीं अठराव्या अध्यायांत कर्म, योग, ध्यान, भक्ति इत्यादींचा विचार सुंदर सांगून शेंवटीं सांगोपांग मूर्ति तयार करून ग्रंथ समाप्त केला आहे. ज्ञानदेवांना वेरूळचीं लेणी पाहून

अद्वैताचें दर्शन झालें. ही दृष्टि आल्यावर मग तुम्ही आंता वाटेल तें पहा. या मुख्य दर्शनाच्या पोटांत या लेण्यांतील बाकीच्या सगळ्या गोष्टी आहेत.

## वेरूळ गांवांत आदर्श स्वच्छता हवी

माझ्या समोर या ज्या सगळ्या (मानव) मूर्ति बसल्या आहेत, हीं सगळीं परमेश्वरानें केलेलीं शिल्पें च आहेत. जें सौंदर्य लेण्यामध्यें दिसतें तें या वेरूळ गांवांत दिसलें नाहीं तर आमची फजिती च होईल. या ठिकाणीं अखिल भारतांतून आणि जगांतून हि प्रवासी येत असतात. माणसाला मनाची नाहीं तर जनाची तरी लज्जा असावी असें म्हणतात. आपल्या राष्ट्राची इभ्रत तुम्हा लोकांच्या हातांत आहे. हीं लेणीं बघून जाणारे लोक तुमच्याविषयीं काय म्हणतील याचा तुम्ही विचार करा. तेव्हां हें वेरूळ गांव अगदीं सौंदर्यनिधान असलें पाहिजे. इथला कानाकोपरा स्वच्छ दिसला पाहिजे. इथल्या लोकांचे कपडे हि स्वच्छ असले पाहिजेत. घाणेरडेपणाचा लव-लेश हि दिसतां कामा नये. नाहीं तर या लेण्याजवळ राहून आपण अगदीं विजोड दिसूं. हें एक अखिल भारतीय प्रदर्शन आहे हें तुम्ही लक्षांत ठेवा आणि येथें आदर्श स्वच्छता आणि सौंदर्य आणण्याचा प्रयत्न करा.

## वेरूळमध्यें ग्रामस्वराज्य स्थापन करा

माझ्या समोर मनुष्याकृतींत जीं शिल्पें बसलीं आहेत त्यांचें जीवन पाहून लोकांना त्यांच्यापासून कांहीं घ्यावें असें वाटलें पाहिजे. आमच्या पूर्वजांनीं ती कारागिरी केली तर आम्ही दुसरी कारागिरी केली आहे असें येथें दिसलें पाहिजे. आम्ही या गांवांत जमिनीची मालकी नाहींशी करून जमीन सर्वांची केली, गांवांत कोणी बेकार राहूं दिला नाहीं, सर्वांना उद्योग दिले, गांवांत कोणी दुःखी राहिला नाहीं, सगळे लोक एकमेकांच्या सुखदुःखांचा विचार करतात असें सर्व दर्शन इथें घडलें पाहिजे. आमचें जीवन धर्ममय बनलें पाहिजे. याप्रमाणें वेरूळ गांवांत ग्रामस्वराज्याचें शिल्प निर्माण झालें पाहिजे. पैठणला असतांना मीं म्हटलें होतें कीं पैठण हें धर्माचें स्थान आहे, तिथून सगळीकडे भाव पसरायचे असतात. तेव्हां अशीं स्थानें सजवावीं नटवावीं अशी हौस आम्हांला वाटली पाहिजे.

या वेरूळ गांवांत ग्रामस्वराज्य स्थापन झालें तर किती चांगलें होईल असें मला वाटतें. परंतु माझ्या मनांत येऊन काय होणार आहे ? तुमच्या मनांत तें आलें पाहिजे. पुष्कळदां " **अतिपरिचयात् अवज्ञा** " असें होतें. प्रयाग आणि काशीला राहणारे लोक गंगेवर स्नान न करतां घरांत बसून नळाच्या पाण्यानें अथवा विहरीच्या पाण्यानें स्नान करतात. मलय पर्वतावर राहणारी भिल्लीण चंदनाचीं लांकडें स्वयंपाकासाठीं जाळते असें म्हटलें जातें. परंतु एका कवीनें लिहिलें आहे कीं " **अतिपरिचयात् अवज्ञा** " हें खोटें आहे. कारण हा संसार आपल्याला अत्यंत परिचित असतो, त्यांतील नाना प्रकारच्या दुःखांनीं मनुष्य गांजला जातो परंतु अजून त्याविषयीं अवज्ञा वाटत नाहीं. आज जो ओंगळपणा दिसतो तो सुधारून जीवन पुण्यमय बनविलें तर तुमच्या वेरूळ गांवाची शोभा आहे. मग ज्याप्रमाणें लोक लेण्यांचें दर्शन करतात त्या प्रमाणें या गांवाचें हि दर्शन करतील.

## परदेशी लोक काय पहायला येतात

आमच्या यात्रेमध्यें अनेक परदेशी माणसें येतात ते काय दगडाचें सौंदर्य पहायला येतात ? ज्या जमिनीच्या प्रश्नाकरतां जगांत रक्तपात होतो तो प्रश्न येथें प्रेमानें सोडविला जात आहे तर यांत कोणती कारागिरी आहे, कोणती कला आहे तें पहायला हे लोक येत असतात. तेव्हां या गांवांत ग्रामदान झालें, निदान गांवांत कोणी भूमिहीन नाहीं राहिला, घरोघर सर्वोदय-पात्र ठेवलें गेलें आहे असें झालें तर किती सुंदर दर्शन होईल ? पण माझ्या हातीं केवळ वासना आणि भक्ति राखण्याशिवाय दुसरें कांहीं हि नाहीं. " **तुका म्हणे माझी पुरवी वासना। कोण नारायण तुजवीण।** " तुम्ही सगळे लोक माझे नारायण आहांत. तुमच्या समोर मीं माझी वासना मांडली आहे.

परमेश्वराची लीला अद्भुत असते. त्याच त्या ग्रंथाच्या आवृत्त्या तो काढीत नसतो, तर नवीन नवीन ग्रंथ तो लिहीत असतो. ज्या ठिकाणीं पूर्वीं कोणी सत्पुरुष निर्माण झाला असेल तर पुन्हां तिथें च दुसरा कोणी निर्माण होईल असें नाहीं. जिथें पूर्वींचा अहंकार नाहीं अशा ठिकाणीं ईश्वर नवीन

ज्योति निर्माण करतो. माझी अशी इच्छा आहे कीं तुम्ही या ठिकाणीं सौंदर्य, पावित्र्य, माधुर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करा, म्हणजे आपलें काम पूर्ण होईल.

वेरूळ, जि. औरंगाबाद ३-८-५८

## विश्वशांतीकरतां सैन्य-मुक्तीची हिंमत कोण करणार ?        : ६ :

### महाजनांची मति बदलायला हवी

आपल्या देशांत काय आणि जगांत काय सध्यां फार मोठा प्रश्न शांतीचा आहे आणि अशांतीच्या विरुद्ध जगांतल्या नितिमान् माणसांच्या मनांत क्षोभ उत्पन्न झालेला आहे. परंतु जरी सज्जनांच्या मनांत क्षोभ उत्पन्न झाला असला तरी महाजनांच्या चित्तांत क्षोभ निर्माण झाल्याशिवाय, शांतीची स्थापना होणार नाहीं. ज्यांच्या हातीं सरकार आहे अशा सत्ताधारी लोकांना महाजन म्हणतात. त्यांच्या हातीं लोक च मतदानाच्याद्वारें सत्ता देत असतात. आजचीं हीं सगळीं सरकारें लोक-सम्मत सरकारें आहेत. म्हणून आतां सज्जनांनीं जनतेचें लोकमत अशांतीच्या व अशांतीमय साधनांच्या विरुद्ध तयार केलें पाहिजे. आजची स्थिति उलटी च आहे. आजच्या सरकारांना लोकसंमति मिळाली आहे. अमेरिकेनें लेबेनॉनमध्यें आपली सेना पाठवली त्याला अमेरिकेच्या लोकांची संमति आहे असें मानलें जातें. कारण त्या लोकांनीं च तेथील सरकारला निवडून दिलें आहे.

आतां सर्वोदयपात्राच्याद्वारें आपल्याला शांततेकरतां लोकसंमति प्राप्त करायची आहे. जेवढीं सर्वोदय पात्रें होतील तेवढ्या घरांतील कोणी हि मनुष्य दगडफेक करणार नाहीं. आजकाल हिंदुस्थानांत लोकांनीं दगडफेक हें एक साधन च मानलें आहे. परंतु ज्या घरांतील लोक सर्वोदयपात्रांत मूठभर धान्य टाकतील त्या घरांतील लोक अशांतीच्या कामांत मदत करणार नाहींत अशी प्रतिज्ञा त्यांत आहे. साक्षात् शांतिस्थापनेच्या कामामध्यें भाग घेण्याची प्रतिज्ञा त्यांत

नाहीं, पण समजा हिंदुस्थानच्या सहा कोटि घरांमध्यें सर्वोदयपात्रें झालीं तर मला शांतिसेनेची गरज च पडणार नाहीं. कारण मग अशांति होणार च नाहीं. मग त्या शांतिसेनेला फक्त सेवा-सेनेचें च रूप राहील.

## सर्वोदय-पात्राचे तीन उद्देश

तुम्ही हें सर्व लक्षांत घ्या म्हणजे तुम्हाला हें कळेल, कीं सर्वोदय-पात्र म्हणजे जुना मुष्टीफंड नाहीं. सर्वोदय-पात्रांत मी लहान मुलाच्या हातची मूठ घेतों. मोठ्या माणसाच्या हातची घेतली असती तर मला दुप्पट धान्य मिळालें असतें. तेव्हां मीं आपल्या हातानें आपला फंड कमी कां करून घेतला आहे यावर तुम्ही विचार करा. तें धान्य गोळा करून मला त्याचा कांहीं च उपयोग करायचा नाहीं असें नाहीं. त्याचा उपयोग कार्यकर्त्यांकरतां केला जाईल. परंतु त्याचा मुख्य उद्देश असा आहे कीं लहान मुलांना शिक्षण मिळेल आणि आम्ही अशांतीच्या कामांत भाग घेणार नाहीं अशी प्रतीज्ञा सर्व घरांतून होईल. पूर्वीच्या मुष्टीफंडांत असें कांहीं च नव्हतें. तेव्हां ज्या घरांत सर्वोदय-पात्र स्थापन झालें त्या घरांत अशांतीच्या विरुद्ध आणि शांतीच्या बाजूनें सक्रिय मतदान झालें. याप्रमाणें अशांतींत भाग न घेण्याची निशेधात्मक प्रतिज्ञा, सर्वोदय विचाराकरतां सक्रिय मतदान आणि सबंध भारतांत लहान मुलांसाठीं शिक्षण-योजना करणें असे सर्वोदय-पात्राचे तीन उद्देश आहेत.

## पारतंत्र्याचा धोका पतकरून सैन्य नाहींसें करण्याची हिंमत करायला हवी

आज विश्वामध्यें अशांतीच्या शक्ति तीव्र झाल्या आहेत आणि त्या मरण्याच्या तयारीला लागल्या आहेत. लांकूड इतकें सुकून गेलें आहे कीं जरा ठिणगी लागली कीं जळून जाईल. सज्जनांना अशांतीविषयीं तीव्र विरोध वाटत आहे. तेव्हां आतां एखाद्या राष्ट्रामध्यें असें करण्याची हिम्मत आली पाहिजे कीं स्वातंत्र्य-हानि झाली तरी हरकत नाहीं, ती पतकरून हि आम्ही सैन्य नाहींसें करूं. परमेश्वरकृपेनें अशी हिम्मत कोणाला होईल तें मला माहीत नाहीं, परंतु मला वाटतें कीं हिंदुस्थानला अशी

हिम्मत कां न व्हावी ? या युगांत पारतंत्र्य राहूं च शकत नाहीं. पूर्वी रोमन साम्राज्य बाराशें वर्षें टिकलें तसें आतां इंग्रजाचें साम्राज्य टिकूं शकलें नाहीं. यापुढें एका देशाची सत्ता दुसऱ्या देशावर चालणें आणि टिकणें अगदीं अशक्य आहे. आज विश्वाची अशी स्थिति आहे कीं एका देशानें दुसऱ्या देशावर सत्ता चालवण्याचा प्रयत्न केला तर विश्वांत त्याबद्दल इतका क्षोभ उत्पन्न होइल कीं तो साऱ्या विश्वाला जाळून टाकूं शकेल. नुकता च इंग्लंडनें इजिप्तवर हल्ला केला होता, तर सर्व जगांत क्षोभ उत्पन्न झाला आणि इंग्लंडच्या जनतेंत हि उत्पन्न झाला. शेंवटीं त्याचा परिणाम होऊन इंग्लंडला आपलें पाऊल मागें घ्यावें लागलें. परंतु एका काळीं इंग्लंडनें सबंध हिंदुस्थान घशांत घातला होता, तरी तेव्हां सारें जग शांत होतें, फक्त एकटा बर्क च असा निघाला कीं ज्यानें इंपिचमेंटचें भाषण केलें. परंतु आतां काळ बदलला आहे. तिकडे हंगेरींत नाजीला फाशीं दिलें, त्यामुळें सबंध जगांत क्षोभ निर्माण झाला. कारण आतां विश्वाची विवेक-बुद्धि जाग्रत झाली आहे आणि विश्व इतकें संवेदनाक्षम झालें आहे कीं एकीकडे कांहीं खुट्ट झालें तर त्याचा परिणाम सबंध जगावर होतो. म्हणून पारतंत्र्य येण्याची धास्ती पतकरून हि एखाद्या राष्ट्रानें सैन्य नाहींसें करण्याची हिम्मत केली पाहिजे.

## कन्व्हेन्शनल वेपन्सवादी ॲटम बॉंबचे विरोधक

अलिकडे कांहीं लोक ॲटम बॉंब नको असें म्हणतात, ऋषिमुनींना तर ते नको च आहेत. पण ज्यांना दंड, सैन्य, फाशीची शिक्षा हें सर्व हवें आहे ते देखील म्हणतात कीं ॲटमबॉंब नको. ज्यांना वाटतें कीं नेहमींचीं शस्त्रें कन्व्हेन्शनल वेपन्स असावीं, त्यांचें च राज्य चालावें, ते लोक आतां ॲटम आणि हैड्रोजन बॉंबमुळें भयभीत झालेले आहेत. कारण त्यांना वाटतें कीं आतां दंडाची सत्ता राहणार नाहीं. तेव्हां आम्हांला हें ओळखलें पाहिजे कीं ज्या लोकांना नेहमींच्या शस्त्रांचें राज्य चालावें अशी तीव्र इच्छा आहे ते लोक ॲटमबॉंबच्या विरुद्ध आहेत. म्हणून मी नेहमीं म्हणतों कीं आपल्याला विचाराची सूक्ष्मता ध्यानांत घेतली पाहिजे. आज दोन्ही बाजूला ॲटम बॉम्ब आल्यानंतर तो वापरला जाण्याची शक्यता नाहीं.

ज्यांनीं अशी समजूत करून घेतली आहे कीं आतां अणुयुद्ध होणार त्यांना परमेश्वराकडून कांहीं बातमी कळली असेल तर गोष्ट वेगळी, परंतु मला वाटतें कीं परमेश्वराच्या मनांत सृष्टि-संहार करायचा नाहीं. जर त्याच्या मनांत सृष्टि-संहार करायचा असता तर त्यानें आमची अक्कल शिल्लक ठेवली नसती. जर त्याच्या मनांत संहार च असता तर त्याच्या इच्छेविरुद्ध माझ्यासारखा मनुष्य अहिंसेची भाषा कशी बोलूं शकला असता ? काय मजाल आहे माझी कीं त्याच्या इच्छेविरुद्ध माझें डोकें थंड राहिल ! त्याला जर संहार च हवा असेल तर तो माझ्या हि मनांत क्षोभ उपन्न करील आणि माझ्यासारख्यांच्या हि तोंडीं हिंसेची भाषा घालील. त्याच्या इच्छेविरुद्ध मी कांहीं हि करूं शकत नाहीं. तेव्हां ज्या क्षणीं त्याच्या मनांत विश्वसंहार करायची गोष्ट येईल तेव्हां तो तुमच्या आमच्या सगळ्यांच्या तोंडीं हिंसेची भाषा आणील, सगळ्यांना हिंसक बनवील व एकमेकांचे गळे कापायला लावील. कोणी किती हि मोठा महात्मा असला तरी तो परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध महात्मा राहूं शकत नाहीं. तिथें माझ्यासारख्या क्षुद्रात्म्याच्या तोंडीं अहिंसेची भाषा कशी शिल्लक राहिल ? परंतु परमेश्वराला संहार करायचा नाहीं, हें आतां स्पष्ट दिसत आहे. तुमची आमची बुद्धि कायम राखून त्याला संहार करायचा असेल तर त्याच्या जवळ अनेक साधनें आहेत. तो भूकंप करून सर्व पृथ्वी नाहींशीं करूं शकतो. मग सगळें च संपेल. भूदान ग्रामदान कांहीं हि उरणार नाहीं. परंतु आमची बुद्धि बिघडवून त्याला संहार करायचा नाहीं हें स्पष्ट दिसत आहे. तेव्हां मला विश्वयुद्धाची मुळीं च भीति वाटत नाहीं. मीं मागें १९४९ सालीं सेवाग्रामला झालेल्या जागतिक शांतता परिषदेला संदेश पाठविला होता कीं " हीं जीं भयानक शस्त्रें (अॅटम बॉम्ब) आहेत त्यांचें मला लेशमात्र हि भय वाटत नाहीं. कारण अहिंसेला त्यांच्यापासून मुळीं च भय नाहीं. परंतु अहिंसेला चाकू, सुऱ्या, लाठ्या, बंदुका यांचें भय आहे." हीं सर्व लहान शस्त्रें आतां डळमळलीं आहेत. कारण यापुढें त्यांचें राज्य चालणार नाहीं. ज्यांना दंडद्वारें राष्ट्राचा कारभार चालवायचा आहे ते आतां घाबरले असून अॅटम बॉम्ब वगैरे बंद करा असें म्हणूं लागले आहेत. परंतु हे अॅटम बॉम्बच्या विरुद्ध बोलणारे लोक फाशीची शिक्षा रद्द

करायला मात्र तयार नाहींत. या सर्वांचा भावार्थ असा कीं सामान्य शस्त्रांचें राज्य चालावें असें एक फार जोरदार मत जगांत आहे. आतां हिंसेच्या शक्तीचें धाबें दणाणलें आहे. यापुढें जबरदस्तीनें लोकांच्यावर राज्य चालवणें शक्य नाहीं. म्हणून आतां कोणत्या हि सरकारच्या अशांतीच्या कार्याला आमची संमति नाहीं असें लोकमत प्रकट झालें पाहिजे. असें लोकमत प्रगट झालें तर च जगांत शांति नांदेल. त्याच साठीं मला सर्वोदय-पात्र हें शांतीचें वाहन करायचें आहे.

## शांति-सैनिक शरीरपरिश्रम करतील च

कांहीं लोक विचारतात कीं तुम्ही सर्वोदय-पात्राच्या धान्याच्या आधारावर सेवकांना जगवणार आहांत तर मग शरीरपरिश्रम-निष्ठेचें काय होईल ? मी उत्तर देतों कीं माझ्या आयुष्याचीं ३० वर्षें शरीरपरिश्रमांत गेलीं आहेत आणि निदान सरासरी रोजचे चार तास तरी माझे त्यांत गेले आहेत. तेव्हां शरीरपरिश्रमाविषयीं मला चिंता नसेल का ? सर्वोदयपात्राच्या द्वारें मला जुन्या भिक्षूंसारखा भिक्षेवर जगणारा व विहारांत राहणारा असा एखादा वर्ग काढायचा नाहीं. तर रोज परिश्रम करून शरीर झिजविणारे आणि निरंतर कर्मयोग आचरणारे असे सेवक मला हवे आहेत. असे जे लोक-सेवक त्यांच्या च साठीं सर्वोदय-पात्राचें धान्य उपयोगाला येईल. असें जरी असलें तरी मला जें सर्वोदय-पात्र हवें आहे तें शांततेला मतदान म्हणून, त्याचें अधिष्ठान म्हणून हवें आहे. तेव्हां प्रत्येक सर्वोदय-पात्र विचार समजावून च स्थापन करायला हवें. ह्याला वेळ लागला तर लागू देत. या प्रमाणें सर्वोदयपात्राच्या मुळाशीं शरीरपरिश्रम टाळण्याचा विचार नाहीं तर शांतीची प्रतिज्ञा घेण्याचा विचार आहे.

## नुसती बौद्ध धर्माची दीक्षा घण्यानें शांतता होणार नाहीं

आज दुपारीं कांहीं मंडळी मला भेटायला आलीं होतीं. ते सारे नव बौद्ध होते. त्यांनीं मला सल्ला दिला कीं तुम्ही काम तर चांगलें करीत आहांत परंतु तुम्ही बौद्ध भिक्षु बनाल तर जगांतील सर्व दुःखें नाहींशीं होतील आणि जाति-भेद पण नाहींसा होईल. त्यांचा हा प्रेमाचा सल्ला मीं ऐकून

घेतला आणि मी विचार करूं लागलों कीं मी काय करूं ? हजामत तर माझी आधींची च झालेली आहे, लग्नीन कांहीं मी लावलें च नाहीं, गांवोगांव हिंडतों आहे, कांहीं-ना-कांहीं सेवेचें काम लोकांकडून करवून घेत आहे च, जाति भेदाचें पालन करीत नाहीं च, तेव्हां आतां फक्त पिवळा पोषाख करून काय होणार आहे ? बोद्ध धर्म स्विकारल्यावरोबर जगाचीं सारीं दुःखें दूर होणार तर दुःख दूर करणें इतकें सोपें आहे का ? बुद्ध हा आमचा च एक अवतार आहे, हिंदूंचें प्रत्येक धर्मकार्य " **वैवस्वते मन्वन्तरे बुद्धावतारे** " होतें. तेव्हां फक्त पिवळा पोषाख केल्यानें जगांत शांतता प्रस्थापित होणार असेल तर मी एका क्षणांत तो पोषाख घ्यायला तयार आहें. भगवंतांनीं जर पिवळा पीतांबर नेसला आहे तर मला हि पिवळा पोषाख करायला काय हरकत आहे ? परंतु आज जगांत भांडणामध्यें पांढऱ्यापेक्षां पिवळे लोक कांहीं कमी नाहींत. आज जगांत पांढरे आणि पिवळे हे दोन रंग खूप भांडत आहेत. बुद्धापेक्षां तसेंच ख्रिस्तापेक्षां अहिंसेचा श्रेष्ठ उपासक सापडणें कठिण आहे. तरी हि आजपर्यंत ख्रिस्ती लोकांनीं जितक्या कत्तली केल्या तितक्या दुसऱ्या कोणी हि केलेल्या नाहींत. मी मागें " जगांतल्या क्रांतिकारक लढाया " नांवाचें एक पुस्तक वाचलें होतें. त्यांत फक्त चार पांच लढाया आशियांतल्या होत्या आणि बाकी सर्व युरोपांतल्या होत्या. आणि अहिंसेची शिकवणहि ख्रिस्तानें पराकोटीला तेथें च पोंचविली होती. तसेच चीन व जपान मध्यें हि अनेक रक्तपात झाले. तेव्हां केवळ बौद्ध धर्माची दीक्षा घेतली कीं लगे च शांति होईल इतकें तें सोपें नाहीं.

## वर्णव्यवस्थेचीं तीन तत्त्वें

हिंदु धर्म हा बौद्ध धर्माचा विरोधी आहे अशी कल्पना केली तर आपण नवबौद्ध म्हणजे अशांतीचीं नवीन बीजें पेरणारे होऊं. म्हणून हिंदुधर्माला, त्याचा अंगाला चिकटलेला बांडगुळापासून दूर केलें पाहिजे. हिंदु धर्मांत जातिभेद नाहींत हें तुम्ही लक्षांत घ्या. हिंदु धर्मांत वर्ण आहेत आणि वर्णाचीं तीन तत्त्वें आहेत. (१) वर्णामध्यें उच्च नीचता नाहीं, सर्वांना समान मोक्षाचा अधिकार आहे. तुम्ही कोणतें हि कर्म करीत असा, तुम्ही जर तें निष्काम बुद्धीनें आणि परमेश्वराच्या भक्तीनें करीत असाल तर तुम्हाला त्याच कर्मानें

मोक्ष मिळेल. ब्राह्मणाला वेदाभ्यासानें जो मोक्ष मिळतो तो च मोक्ष इतर वर्णांना आपापलीं कामें करून मिळेल. म्हणजे सामाजिक आणि आध्यात्मिक प्रतिष्ठा सर्वांची समान आहे. (२) कोणत्या हि वर्णाला दुसऱ्या कोणत्या हि वर्णापेक्षां जास्त पैसा मिळणें ही गोष्ट वर्ण धर्मांत नाहीं. ही गोष्ट भांडवल-शाहींत आणि जातिभेदांत आहे. वर्णधर्मानुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णांपैकीं फक्त एका च वैश्य वर्णाला परिग्रहाचा अधिकार आहे आणि त्यांत हि चार आश्रमांपैकीं फक्त गृहस्थाश्रमाला च तो अधिकार आहे. म्हणजे सोळा अवस्थांपैकीं पंधरा अवस्थांकरितां अपरिग्रह आणि फक्त एका च अवस्थेला परिग्रहाचा अधिकार होता. त्यांत हि ग्रहस्थाला जरी परिग्रहाचा अधिकार असला तरी तो ट्रस्टी या नात्यानें, सर्वांच्या तर्फे सर्वांच्यासाठीं धन राखत असतो अशी कल्पना त्यामागें आहे म्हणून होतर. परंतु ही कल्पना सुद्धां जर कांहीं नुकसान करते असें वाटत असेल तर ती सोडायला कांहीं हरकत नाहीं. परंतु वर्णधर्मात सर्वांना समान जीवनाचा व मोक्षाचा अधिकार आहे. (३) वर्णधर्मानुसार कोणत्या हि वर्णाच्या व्यक्तीला दुसऱ्या कोणत्या हि वर्णाच्या व्यक्तीशीं लग्न लावायला कांहीं हि अडचण नाहीं. लग्नामध्यें अडचण ज्या कारणानें पुढें निर्माण झाली तें कारण तेव्हां हिंदु धर्माला गौरवास्पद होतें, परंतु आज नाहीं. पूर्वीं जेव्हां हिंदूमध्यें कांहीं लोकांनीं कारुण्यानें मांसाहार सोडला तेव्हां मांसाहार सोडलेला मनुष्य असा विचार करीत असे कीं मी माझी मुलगी मांसाहार करणाऱ्याच्या घरामध्यें कशी देऊं ? तेव्हां ती मांसाहार न करणाऱ्याच्या घरांत गेली तर ठीक होईल, असा तो विचार करी. आज मांसाहार-परित्याग आध्यात्मिक दृष्टीनें समाजानें मान्य केला आहे.

## जातिभेद हिंदुधर्मापासून वेगळा आहे

आतां आपण जातिभेदाला हिंदु धर्मापासून अलग पाडून मग त्याला तोडून टाकलें पाहिजे. अशी प्रक्रिया केली तर च जातिभेद नाहींसा होईल. नाहींतर जातिभेद हा हिंदु धर्माचें एक अंग आहे असें मानून त्याच्यावर प्रहार कराल तर तो मरणार नाहीं च तर उलट तो मजबूत होईल. '**इंद्राय तक्षकाय स्वाहा**' असें म्हणून इंद्र आणि तक्षक या दोघांना मारूं पहाल तर

इंद्रबलानें तक्षक च अमर होईल, तक्षक बलानें इंद्र मरणार नाही. म्हणून इंद्र आणि तक्षक या दोघांना अलग करून मग तक्षकाला मारलें पाहिजे. हिंदु धर्म हा कांहीं सनातन तत्त्वांवर उभा आहे. त्याला ब्रह्मविद्येचा जो मजबूत आधार आहे तो कोणी हि दूर करूं शकत नाहीं हें मी स्पष्टपणें सांगूं इच्छितों. मी सर्व धर्मांचें साहित्य अत्यंत प्रेमानें आणि भक्तीनें वाचलें आहे आणि तें सगळें वाचल्यानंतर मी सांगतों आहे कीं ब्रह्मविद्येचा जो आधार हिंदु धर्माला आहे त्या आधारावर तो धर्म नेहमीं मजबूत राहील. तेव्हां झाडावर आलेलीं बांडगुळें कापण्यासाठीं तुम्हीं जर झाड च कापूं पहाल तर झाड कापलें जाणार नाहीं आणि बांडगुळें हि कायम राहतील. म्हणून बांडगुळांना झाडापासून अलग करून त्यांना कापा. हिंदु धर्मापासून जातिभेदाला अलग करून मग जातिभेदावर प्रहार करा म्हणजे तो नाहींसा होईल. हिंदुस्थानांत जातिभेद मरण्याच्या तयारींत होता. राजा राममोहन राय पासून तों महात्मा गांधी पर्यंत अनेक सत्पुरुषांनीं त्याच्यावर प्रहार केल्यामुळें तो जात च होता, परंतु आजच्या निवडणुकांमुळें मरणाऱ्या जातिभेदांना नवजीवन मिळालें आहे. तेव्हां आजची निवडणुकीची पद्धति सुधारली च पाहिजे. राजकीय आणि आर्थिक दृष्टीनें च नव्हे तर जातिभेद नाहींसा करण्याच्या दृष्टीनें ती सुधारली पाहिजे. मला जातिभेद तोडायचा आहे. त्याकरितां मी वेद, गीता, कुराण, बायबल, धम्मपद या सर्वांची मदत घेतों. गीता विरुद्ध बायबल, वेद विरुद्ध धम्मपद, असला चावटपणा करूं नका. जे सद्भक्त हिंदु आहेत, जे सद्भक्त मुसलमान आहेत, जे सद्भक्त ख्रिस्ती, बौद्ध आहेत त्या सगळ्यांची मिळून एक जमात आहे. ही सगळी जमात एकवटून तिनें पाखंडी, दुर्जन यांच्या विरुद्ध मोरचा उभारला पाहिजे.

एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं दुर्जन म्हणून कोणी माणसें नसतात. दुर्जनता ही एक वृत्ति असते ती आपल्यामध्यें पण शिरूं पाहते. म्हणून दुर्जनांच्या विरुद्ध लढायचें याचा स्थूल अर्थ घेऊं नका, सूक्ष्म अर्थ घ्या. आपण सर्वांनीं एक होऊन दुर्जनतेवर हल्ला केला पाहिजे. पाखंड, ढोंग, जातिभेद इत्यादि सर्वांवर हल्ला केला पाहिजे.

कन्नड, जि. औरंगाबाद ५-८-५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५७८२० वि: निबंध
क्रमांक ........ नों. दि.

## आमचा उद्धार आम्ही च करूं

परवापासून चाळीसगांवला एक परिषद भरणार आहे. त्यांत सबंध हिंदुस्थानांतील खेड्यांची सेवा करणारे सर्वोदय सेवक एकत्र येऊन चर्चा करतील कीं हिंदुस्थानच्या खेड्यांची शक्ति कशी वाढेल, त्यांची एकजूट कशी होईल व स्वराज्याचें रूपांतर ग्रामस्वराज्यांत कसें होईल. त्यांच्या सगळ्या चर्चेचा आधार तुम्ही मंडळी आहांत. जोंपर्यंत ते सेवक तुमच्या सारखे बनत नाहींत, तोंपर्यंत ते फारसें कांहीं करूं शकतील असें नाहीं. आणि जोंपर्यंत तुही स्वतः प्रतिष्ठित होत नाहीं तोंपर्यंत दुसरे कोणी तुमचा उद्धार करतील, तुम्हांला उन्नत बनवतील अशी आशा करतां येत नाहीं. जेव्हां तुमच्या आत्म्यांत प्रतिष्ठा येईल तेव्हां च तुमच्या जीवनांत प्रतिष्ठा येईल. खेड्याखेड्यांतील लोकांनीं आपली ताकद काय आहे तें ओळखलें पाहिजे. आम्ही हीनदीन आहों, कोणी बाहेरचे लोक येऊन आमचा उद्धार करतील किंवा सरकारचे लोक अथवा सर्वोदयवाले येतील तेव्हां च आमचा उद्धार होईल असें जोंवर तुम्ही मानाल तोंवर तुमचा उद्धार होणार नाहीं असें आम्ही खेड्यांतल्या लोकांना सांगतों. आमचा उद्धार आम्ही च करूं असें तुम्ही मानाल तर च तुमचा उद्धार होईल. त्याकरतां खेड्यांतील लोकांनीं एकवटून आपल्या गांवाचे एक कुटुंब बनवून ग्रामस्वराज्याची एक योजना करावी. एवढें झालें म्हणजे मग संयोजनाच्या कामांत दुसरी मंडळी मदत देतील. पण आयोजन तुमचें तुम्हीं च करायचें आहे. "**तुझें आहे तुजपाशीं, परि तूं जागा चूकलासी**" आपली वस्तु आपल्या च पाशीं आहे याचें भान आपल्याला राहिलें नाहीं म्हणून दुसरीकडे ती वस्तु शोधतों आणि म्हणून च ती सांपडत हि नाहीं. त्याच प्रमाणें ग्रामराज्याचें साधन ग्रामांतच आहे हें तुम्ही लोकांनीं ओळखलें पाहिजे.

## खेड्यांतील लोकांना वेदांताची परिभाषा कळते

तुमच्या ठिकाणीं जागृति आली तर मी तुमच्या विषयीं ज्या आशा करतों त्या तुम्ही पूर्ण कराल असा मला विश्वास आहे. लोक शहरांचा इतिहास लिहितात पण खेड्यांचा इतिहास कोणी लिहिला नाहीं. हिंदुस्थानांतील कित्येक खेडीं हजारों वर्षांचीं जुनीं आहेत. हस्तिनापूर, काशी वगैरे सारखीं फारच थोडीं शहरें पुरातन आहेत. बाकीचीं सगळीं शहरें नवीन दोन-तीनशें वर्षांतलीं आहेत. मुंबई मद्रास हीं शहरें अगदीं च नवीन आहेत. म्हणून आपल्या भारताची जी संस्कृति आहे, आपला जो मूळचा स्वभाव आहे, तो खेड्यांत आहे आणि म्हणून च खेड्यांत गांभीर्य आहे. खेड्यांतील लोक व्याख्यानामध्यें कधीं गडबड करीत नाहींत. आमचें एक व्याख्यान कठिण झालें असें वाटून आमच्या एका सहयात्रीला असें वाटलें कीं खेड्यांतील लोकांना तें कांहीं समजलें नसावें. म्हणून त्यांनीं कांहीं श्रोत्यांना विचारलें तेव्हां लक्षांत आलें कीं त्यांनीं व्याख्यानाचें सार बिनचुक सांगितलें. याचें कारण असें कीं हे लोक अत्यंत एकाग्र चित्तानें प्रत्येक शब्द पीत असतात. त्यांना भाषणांतील विद्वत्ता समजली नाहीं तरी त्यांतलें सार, आत्मतत्त्व बरोबर कळतें. हे लोक आज जरी अशिक्षित असले, त्यांची कोणी विचारपूस करीत नसले, त्यांच्या जवळ ज्ञान पोंचवण्याची कांहीं सोय नसली तरी पूर्वीं अनेक साधुसंतांनीं देशभर हिंडून त्यांच्याकडे ज्ञान पोंचवलें आहे. म्हणून ज्ञानाची परिभाषा जरी कठिण असली तरी आमच्या खेड्यांतील लोकांना ती कळते. वेदांताच्या परिभाषेचे दहा हजार शब्द असतील तर खेड्यांतील लोकांना त्यांतले दोन हजार तरी शब्द माहीत असतात. हे मी अंदाजानें सांगत नाहीं, मी याचें गणित केलें आहे. तप करावें, जप करावा, भक्ति हवी, ध्यान लागलें पाहिजे, ज्ञानाशिवाय मुक्ति नाहीं, पुनर्जन्म आहे, मायेचा फार मोठा मोह आहे असें म्हटलें म्हणजे खेड्यांत कुणाला हि समजतें. आत्मा प्रत्येकाच्या ठिकाणीं राहतो. मनामध्यें दया, करुणा, निर्भयता राखावी, दान द्यायला पाहिजे इत्यादि सर्व त्यांना कळतें. मन, देह, इंद्रियें, बुद्धि इत्यादि सारे शब्द त्यांना माहीत आहेत. मात्र आधुनिक अर्थशास्त्राचे शब्द त्यांना समजत नाहींत. जमिनीचे ग्रामीकरण

म्हणजे काय हें त्यांना कळत नाहीं. आज सकाळीं आमच्या स्वागतार्थ आलेल्या मुलांना मोठ्या लोकांनीं शिकवलें होतें कीं "**सबका नारा जय जगत**" म्हणा. तर मुलांनीं म्हटलें "**सबका करना, जय जगत**" मुलांनीं गचाळ नाऱ्याचें किती सुंदर भाषांतर केलें ते पहा !

## खेड्यांतील लोकांना आमचीं भाषणें कां समजतात

आमचें व्याख्यान खेड्यांतील लोकांना सहज समजतें कारण खेड्यांतील लोक इतक्या एकाग्रतेनें व्याख्यान ऐकतात कीं त्या एकाग्रतेचा अंश सुद्धां शहरांत आढळत नाहीं. याचें कारण शहराच्या जीवनांत शांति, स्थैर्य नसतें. त्या लोकांचा आकाशाशीं संपर्क तुटलेला असतो. मनुष्याच्या जीवनाला पंच महाभूतांपैकीं सगळ्यांत अधिक कशाची आवश्यकता असेल तर ती आकाशाची होय. खेड्यामध्यें आकाश अगदीं मुबलक प्रमाणांत उपलब्ध असतें. उपनिषदामध्यें उपासना सांगितली आहे कीं बाहेरच्या विशाल आकाशासारखें आपलें हृदयाकाश विशाल बनवायचें. ही उपासना शहरांतल्या खोलींत कशी होऊं शकणार ? तिथल्या शाळेंतल्या खोलींत बसून ही उपासना केली तर त्या खोलीसारखें च हृदय हि संकुचित बनेल. उपनिषदांत म्हटलें आहे 'ब्रह्माचें आकाश हें शरीर आहे.' खेड्यांत विशाल आकाश मिळत असल्यामुळें तिथें हृदयाची विशालता असते आणि तेथील लोकांना शब्दाला बाजूला सारून अर्थ कसा ग्रहण करायचा तें समजतें. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी कशी वाचायची तें सांगतांना म्हटलें आहे कीं जसें सालपट काढून फळ खायचें असतें तसा शब्द बाजूला सारून अर्थ घ्यावा. या प्रक्रियेमुळें च खेड्यांतील लोकांना आमचीं भाषणें सबंध समजतात.

## झाडाप्रमाणें माणसाचीं मुळें जमिनींत रुजलेलीं हवींत

खेड्यांत सृष्टि उघडी असते, परमात्मा उघडा असतो, प्रेम करण्याचें साधन असतें; कारण सर्वांना एकमेकांची ओळख असते. शहरांत माणसांना एकमेकांची ओळख च नसते. खेड्यांत स्वाभाविक च एकमेकांशीं ओळख असल्यामुळें प्रेमाची उत्तम सोय असते. तेव्हां त्या ठिकाणीं ज्ञानाची व अन्न उत्पादनाची हि उत्तम सोय केली पाहिजे. आज खेड्यांत ज्ञान नाहीं, अन्न

उत्पादन कमी आहे, शहरांतून येणाऱ्या पैशामुळें तंटे, भांडणें, व्यसनें वाढत चाललेलीं आहेत, प्रेम सुकत चाललें आहे त्यामुळें खेड्यांची शक्ति बनत नाहीं. वर्तमानपत्रें शहरांतून निघतात आणि त्यांत शहरांतल्या गोष्टींची च चर्चा असते, त्यामुळें शहरांचा परिणाम खेड्यावर होतो. पण आतां आपल्याला तें सारें उलटवून टाकावयाचें आहे. यांत शहरवाल्यांशीं वैर नाहीं, उलट शहरवाल्यांनीं स्वतःवर खेड्यांचा परिणाम करून घेतला नाहीं आणि आजची स्थिति तशी च राहूं दिली तर शहर आणि खेडीं दोन्ही हि नाश पावतील. परंतु खेड्यांचा परिणाम शहरावर होऊं लागला, खेड्यांतील नैसर्गिक जीवन शहरवाल्यांनीं स्वीकारलें तर दोघे हि बचावतील. माझें तर असें मत आहे कीं प्रत्येकानें दुसरा कोणता हि धंदा करीत असतांना शेतांत थोडा वेळ काम केलें पाहिजे. शेती हा मानवाचा धर्म आहे; त्या धर्माची पुन्हां स्थापना केली पाहिजे. ज्या मानवाचा शेताशीं संबंध तुटला त्याची स्थिति जमीनींत खोलवर मुळें न रुजल्यामुळें उखडून पडलेल्या वृक्षासारखी होते. म्हणून खोलवर मुळें असलेल्या वृक्षाप्रमाणें माणसाचीं हि मुळें जमिनींत खोल रुजलेली असावींत.

## खेड्यांनीं शहरांचें अनुकरण करूं नये

भूदान-ग्रमदानाच्या द्वारें असा प्रयत्न चालला आहे कीं आज जसा खेड्यांतील लोकांचा ओघ शहराकडे जातो तसा तो जाऊं नये तर उलट शहरांतील लोकांनीं च खेड्यांत यावें, शहरें फोडलीं जाऊन खेडीं टवटवीत व्हावींत. शहरें फोडल्यानें शहरवाल्यांचें आरोग्य सुधारेल. आज शहरांत बजबजपुरी असते. शेणावर बसलेल्या माशांप्रमाणें तिथें लाखो लोक लहानशा जागेंत एकत्र झालेले असतात. तिथें त्यांना जागा पुरत नाहीं. मग ते अशा काहीं भलभलत्या गोष्टी करतात कीं ज्या तुम्ही खेड्यांतले लोक कधीं हि करणार नाहीं. शहरचे लोक करोडो रुपये समुद्रांत टाकून जमीन मिळवण्याचा प्रयत्न करतात. समुद्रांत माती टाकून कोट्यावधींच्या खर्चानें एखाद दोन एकर जमीन मिळवतात. त्या पेक्षां ती मुंबई सोडून ते खेड्यांत जातील तर !

## वेदांत व विज्ञानाच्या आधारें शांति व समृद्धीची स्थापना

पण आज खेड्यांना प्रतिष्ठा नाहीं. ती प्रतिष्ठा आपल्याला आणायची आहे. ग्रामीण जीवन शांतिमय आणि समृद्ध बनवायचें आहे. शांति आणि समृद्धि या दोन्ही गोष्टी आम्हांला खेड्यांत न्यायच्या आहेत. शांति आत्मज्ञानानें, वेदांतानें येणार आणि विज्ञानानें समृद्धि येणार. वेदान्त आणि विज्ञान या दोन गोष्टींची आम्हाला सांगड घालायची आहे. म्हणून च मी म्हणतों कीं खेडयामध्यें सगळ्यांनीं मिळून शेती केल्याशिवाय प्रगति होणार नाहीं. विज्ञान सांगत आहे कीं जमीन एक करून गांवाची योजना कराल तर च समृद्धि येईल. आणि वेदान्त सांगत आहे कीं जमीन एक करून एकमेकांवर प्रेम केल्याशिवाय, सहकार्यानें वागल्याशिवाय शांति येणार नाहीं. या दोन गोष्टी आणायच्या म्हणजे खेड्यांनीं प्रेमानें ग्रामदान करायचें. असा दुहेरी कार्यक्रम आम्हांला खेड्याखेड्यांत हातीं घ्यायचा आहे आणि शहरांकरतां हि तो च कार्यक्रम आहे. आज शहरांत समृद्धि असून हि शांति नाहीं. कांहीं लोक म्हणतात कीं हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें दारिद्र्याची समस्या आहे त्याप्रमाणें पश्चिमेकडे समृद्धीची समस्या आहे. समृद्धि कशी जिरवावी हें तेथील लोकांना कळत नाहीं त्यामुळें अशांति उत्पन्न होते. तिथें आत्मज्ञानाचा आधार नसल्यामुळें अशांति निर्माण होते आणि आपल्याकडे विज्ञान तर नाहीं च आणि शिवाय आपण आत्मज्ञान हि गमावलें आहे म्हणून समस्या च समस्या निर्माण झाल्या आहेत. पुष्कळांना असा भ्रम आहे कीं आमच्या जवळ आत्मज्ञान आहे पण ती गोष्ट खरी नाहीं. आपल्याजवळ फक्त त्याची श्रद्धा आहे. ती वस्तु मात्र अद्याप आपल्या जीवनांत आलेली नाहीं. तुमच्या खिशांत आगपेटी आहे एवढ्यानेंच उजेड पडेल का ? ती पेटवाल तर च उजेड पडेल. त्या च प्रमाणें आपल्या जवळ आत्मज्ञान आहे पण तें पेटवलें नाहीं, घरांत वीज येऊन हि बटन दाबलें नाहीं तर प्रकाश मिळणार कसा ? आपल्या देशांत आत्मज्ञानाविषयीं श्रद्धा असून हि आपण बटन दाबलें नसल्यामुळें प्रकाश असून हि आपण तो गमावला आहे आणि विज्ञान तर इथें आलें च नाहीं. तें सारें अजून इंग्रजींत च आहे.

तें मातृभाषेंत आलें म्हणजे खेडयाखेडयांत पसरेल. आपल्याला वेदांत आणि विज्ञान या दोहोंच्या आधारावर भारतांत आणि जगांत शांति व समृद्धि यांची स्थापना करायची आहे.

भांबुरवाडी (जि. औरंगाबाद) ता. ६-८-५८

## महाराष्ट्रानें विचार करावा :८:

[ भूमिका—विनोबाजींनीं चाळीसगांवमध्यें प्रवेश केल्यावर शेंकडो मुखांतून सतत ‘जय जगत्’ चा घोष ऐकूं येत होता. एका ठिकाणीं ‘संयुक्त महाराष्ट्र झाला च पाहिजे, या घोषणा करणारे कांहीं लोक फलक घेऊन उभे होते. गर्दी खूप झाली व घोषणा चालू च होत्या. विनोबांजींची पुढें जाण्याची वाट हि बंद झाली तेव्हां विनोबा थांबले व आपल्या बरोबरच्या सर्व मंडळींना त्यांनीं शांतपणें बसण्यास सांगितलें. त्यानंतर घोषणा करणाऱ्यांना ते म्हणाले ‘तुम्ही शांत होऊन मला वाट करून द्याल तर मी येथून पुढें जाईन. मला आतां शिवाजी महाराजांच्या पुतळयाला हार घालायला जायचें आहे.’ हें ऐकून कांहीं संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेते पुढें आले व विनोबाजींना म्हणाले ‘आम्ही शांत राहूं आपण पुढें जावें.’ तेव्हां विनोबाजी पुढें जायला निघाले. ५-७ पावलें जात नाहींत तों च दुसऱ्या कोपऱ्यांतून पुन्हां घोषणा सुरू झाल्या. तेव्हां विनोबाजी पुन्हां थांबले आणि कांहीं हि न बोलतां खालीं बसून त्यांनीं आपल्या बरोबरच्या सर्वांना शांत रहावयास सांगितलें. थोडया वेळानें लोक पूर्ण शांत झाले आणि नंतर विनोबाजी पुढें जाण्यास निघाले.

चाळीसगांवला अ. भा. सर्व-सेवा-संघ व भारतांतील प्रमुख विधायक कार्यकर्त्यांची बैठक असल्यामुळें भारताच्या कानाकोपऱ्यांतून बरेच प्रमुख कार्यकर्ते आले होते. विनोबाजी निवासस्थानीं पोंचल्यानंतर स्वागतार्थ जमलेल्या लोकांपुढें बोलतांना म्हणाले]

## महाराष्ट्राची इज्जत कमी करणारी घटना

मला येथें यायला फार उशीर झाला आहे. तसा शहरांत गर्दीमुळें नेंहमीं च उशीर होतो पण आज मला जास्त उशीर झाला व थकवा हि वाटला. वाटेमध्यें मध्यंतरी जी घटना झाली ती मला तरी त्रासदायी झाली नाहीं. कारण मी सर्व गोष्टींकडे प्रेमाच्या च दृष्टीनें पाहतों म्हणून मला त्यांत हि प्रेम च दिसलें. परंतु ती घटना महाराष्ट्राची इज्जत कमी करणारी झाली, वाढविणारी झाली नाहीं एवढें मात्र खास. आज मी येथें येत असतांना वाटेंत एका ठिकाणीं संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनीं खूप जोरानें घोषणा करायला सुरुवात केली. गर्दी खूप झाल्यामुळें मीं त्या लोकांना म्हटलें कीं 'मला पुढें पाऊल टाकणें अशक्य आहे. तेव्हां तुम्ही शांत होऊन वाट करून देईपर्यंत मी येथें च उभा आहें.' वास्तविक ते लोक जोरजोरानें ज्या घोषणा करीत होते त्याच्याशीं माझा कांहीं हि संबंध नव्हता. परंतु त्या लोकांना वाटलें कीं आमच्या या कृतीनें च संयुक्त महाराष्ट्राचा पक्ष हिंदुस्थानांत जोरदार होईल. पण संयुक्त महाराष्ट्र जो स्थापन व्हायचा तो सर्व भारताच्या सहानुभूतीनें च स्थापन व्हायचा आहे. कारण आम्हाला भारतांत च रहायचें आहे.

## भरत भूमीचें वैभव

आम्ही अगदीं प्राचीन काळापासून **'दुर्लभं भारते जन्म'** म्हणतों. 'दुर्लभं महराष्ट्रे जन्म' म्हणत नाहीं. तेव्हां जरी आम्ही महाराष्ट्रांत, गुजराथेंत किंवा कोणत्या हि प्रांतांत राहत असलों तरी आम्ही सगळे एका च भारत मातेची लेकरें आहोंत असें समजून आम्ही आजवर वागत आलों; म्हणून भारतापेक्षां पवित्र शब्द आमच्या कोशांत नाहीं. **'दुर्लभं भारते जन्म मानुष्य तत्र दुर्लभम्'** भारतांत जन्म मिळणें हें भाग्य आहे आणि त्यांत हि मनुष्याचा जन्म मिळणें तर आणखी च भाग्य आहे. म्हणजे या भारतांत किडामुंगीचा जन्म मिळाला तरी सुद्धां तें भाग्य आहे. इतका आदर आमच्या चित्तांत भारताविषयीं होता आणि आहे. याचें कारण एक च आहे. या भारतांत असंख्य सत्पुरुष पदयात्रा करीत हिंडले आहेत. प्राचीन काळापासून भारतांतील साधुसंतांनीं जातीय, प्रांतीय असा संकुचित भाव ठेवला नाहीं आणि सर्वांभूतीं भगवद्भाव ही एक च घोषणा सर्वत्र ऐकविली. मग ते तमिळनाडचे

रामानुज आणि नम्माळवार असोत किंवा मलबारचे शंकराचार्य असोत. अथवा कर्नाटकचें बसवेश्वर, मध्वाचार्य असोत कीं तेलगू संत वल्लभाचार्य किंवा पोतना असोत. नाहीं तर महाराष्ट्राचे ज्ञानदेव तुकाराम असोत वा गुजराथचे नरसी-मेहता, महात्मागांधी असोत. किंवा उत्तर हिंदुस्थानचे कबीर, तुलसीदास नानक, सूरदास, गोरखनाथ, मच्छींन्द्रनाथ असोत अथवा बिहारचे बुद्ध, महावीर असोत. किंवा बंगालचे चैतन्य आणि रामकृष्ण असोत कीं ओडीसाचे जगन्नाथदास आणि आसामचे शंकरदेव असोत. हीं मीं थोडीं च नांवें घेतलीं, पण असे असंख्य सत्पुरुष भारतांत झाले अणि त्यांनीं विश्वशांतीचा, विश्वप्रेमाचा, सर्वांभूतीं भगवद्भावाचा मंत्र भारताला व सबंध जगाला शिकविला. त्याचें च हें फळ आहे कीं आज भारतांत १२-१४ समर्थ भाषा एकत्र नांदत आहेत. असा देश जगांत दुसरा कोणता च नाहीं. चीन एक मोठा देश आहे पण तिथें एक च भाषा आहे. रशियांत अधिक भाषा आहेत पण त्यांत फक्त रशियन भाषा च समर्थ आहे व बाकीच्या गौण आहेत. युरोपांत अनेक समर्थ भाषा आहेत पण यूरोपचा अजून एक देश झालेला नाहीं. तिथें तर भाषेनुसार तुकडे पाडून अलग अलग राष्ट्रें बनविलीं आहेत. परंतु आम्ही भारतांत इतक्या समर्थ भाषा एकत्र नांदविल्या ही एक अद्वितीय घटना आहे.

## तुम्ही जाऊं द्याल तर च जाईन

अशा परिस्थितींत संयुक्त महाराष्ट्र करवून घ्यायचा असेल तर साऱ्या भारताची सहानुभूति आणि प्रेम संपादन करून च करवून घेतां येईल. इतकी साधी गोष्ट जर कोणी समजत नसतील तर त्यांच्या बुद्धिमत्तेची कींव च करावी लागेल. आज जेव्हां त्या लोकांनीं घोषणा करून मला वाटेंत थांबविलें तेव्हां मीं त्यांना म्हटलें, " मला येथून एका अखिल भारतीय सर्व सेवा संघाच्या परिषेदेकरतां जायचें आहे, पण तुम्ही घोषणा बंद करून वाट करून दिली तर च मी जाईन अन्यथा इथें च उभा राहीन किंवा थकवा आल्यास इथें च बसून जाईन. मला त्या परिषदेंत जायची कांहीं गरज नाहीं. ती परिषद माझ्याविना हि चालेल पण मी तुमच्या मर्जी विरुद्ध जाणार नाहीं". मी त्या वेळीं शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घालण्याकरतां

जात होतों. ते लोक हि त्यांच्या च नांवाचा घोष करीत होते. मी त्यांना म्हणालों "मला शिवाजी महाराजांविषयीं आदर आहे पण तो आदर हार घालून च व्यक्त केला पाहिजे असें नाहीं; म्हणून मीं तिथें गेलें च पाहिजे, त्या पुतळ्याला हार घातला च पाहिजे अशी कांहीं माझी इच्छा नाहीं. पण मंडळींनीं ठरविलें आहे म्हणून मी तेथें जात आहें. परंतु तुमची इच्छा असेल तर च मी जाईन. मी तुमच्या इच्छेला वश आहें" मग त्या लोकांच्या नेत्यानें मला वचन दिलें कीं आतां घोषणा होणार नाहींत म्हणून मी पुढें जायला निघालों. चार पावलें गेलों तों च पुन्हां उद्घोष सुरू झाला. आतां याला शिस्त म्हणायचें कीं अनुयायित्व म्हणायचें कीं नेतृत्व म्हणायचें! त्यानंतर मला तेथें उभे राहणें शक्य न झाल्यामुळें मी खालीं बसलों.

## कोल्हापूरची घटना

कोल्हापूरला याच प्रमाणें कांहीं लोकांनीं आमची सभा बंद पाडली होती. त्याला कारण कांहीं हि नव्हतें. ते लोक मला म्हणाले कीं तुम्हाला संयुक्त महाराष्ट्राविषयीं बोललें च पाहिजे. मी कांहीं त्या विषयावर बोलणार नव्हतों. माझा विषय भूदान ग्रामदान हा होता आणि १५-२० हजार लोक चित्रवत् शांततेनें माझें व्याख्यान ऐकत होते. पण त्या कांहीं लोकांनीं आग्रह धरला कीं तुम्हांला या च विषयावर बोललें पाहिजे. मीं त्यांना म्हणालों 'मी कोणत्या विषयावर बोलायचें तें तुम्ही ठरविणार का? हें शक्य नाहीं' असें म्हणून मी तेथून निघून गेलों. तेथें माझा दोन दिवस मुक्काम होता. मी तेथील लोकांना म्हटलें कीं दुसऱ्या दिवशीं माझें सार्वजनिक व्याख्यान होणार नाहीं. अहिंसेचा असा आग्रह नाहीं कीं जे ऐकूं इच्छीत नसतील त्यांना सांगावें. उलट गीतेंत म्हटलें आहे "**न कथीं हें कधीं त्यास तपोहीन अभक्त जो। श्रवणेच्छा नसे ज्यास माझा मत्सर जो करी**" मी त्या भगवत् आदेशाचा भक्त आहें. पण दुसरे दिवशीं त्यांचे नेते बागल भेटले व म्हणाले कीं आतां असें होणार नाहीं, तुम्ही भाषण द्या. तेव्हां मी गेलों पण त्या हि दिवशीं थोडी गडबड झाली च मात्र सभा बंद पडली नाहीं. तिथें मी १५–२० मिनिटें बोलून भाषण संपविलें.

## महाराष्ट्र आणि बुद्धिमत्ता

आतां तुम्ही च विचार करा कीं अशा गोष्टीमुळें महाराष्ट्राची इज्जत भारतांत वाढली का ? संयुक्त महाराष्ट्राची केस मजबूत झाली का ? लोक याचा यत्किंचित हि विचार करीत नाहींत याचें च मला आश्चर्य वाटतें. महाराष्ट्रांत गुण पुष्कळ आहेत पण जी बुद्धिमत्ता असायला पाहिजे ती मला येथें दिसत नाहीं. मी आज त्या लोकांना म्हटलें ' मी नम्रतेनें असा दावा करतों कीं महाराष्ट्राची इज्जत गेल्या ७॥ वर्षांत माझ्यामुळें व व या कार्यामुळें भारतांत जितकी वाढली आहे तितकी दुसऱ्या कोणत्या हि माणसाच्या कृतीमुळें वाढली नाहीं.' परंतु मी त्या सर्व लोकांना क्षमा करतों. कारण त्यांचें माझ्यावर प्रेम आहे. प्रेमामुळें च त्यांनीं हें सर्व केलें आहे. परंतु प्रेमाला अक्कल पाहिजे. त्यांनीं ओरडण्यापेक्षां मला एखादें निवेदन द्यायचें असतें. अशीं निवेदनें हि मला अनेक ठिकाणीं मिळालीं आहेत. बर ! ओरडायचें तें तरी किती वेळां याचा तरी कांहीं हिशोब असतो का ? अमुक इतक्या वेळां ओरडायचें ठरवाल तर मोजतां तरी येईल ! परंतु अशा प्रकारची कृति करणें हें मला अत्यंत बुद्धिहीनतेचें लक्षण वाटतें. महाराष्ट्रांत अशी बुद्धिहीनता आढळत आहे याचें मला दुःख होतें. भारत महाराष्ट्राकडून बुद्धीची अपेक्षा करतो. तुम्ही च विचार करा कीं जो मनुष्य ७॥ वर्षें भारतांत हिंडला आणि ज्याच्या मुळें भारतांत महाराष्ट्राची इज्जत वाढली त्याचें स्वागत करण्याची ही रीत आहे काय ? त्याचे कांहीं विचार जर पटत नसतील तर त्याच्या स्वागताला जाऊं नये घरीं बसावें !

## दुःख नव्हे, ईश्वराची कृपा

तुम्ही च विचार करा कीं मी पूर्वखानदेशाचा असें लोक म्हणतात. आणि आमच्या मंडळींत असें बोललें जातें कीं जसा गांधींचा बिहार तसा विनोबाचा खानदेश. इतका माझा प्रेमाचा संबंध ज्या खानदेशशीं आहे आणि जिथें मी १२ वर्षांनंतर येत आहे आणि जिथें पांच च दिवस माझी यात्रा होणार आहे त्या ठिकाणीं अशा प्रकारें माझा वेळ घेणें, मला अडथळा करणें हा

कोणता प्रकार आहे ? ही फार दुःखाची गोष्ट आहे. पण मला दुःख वाटत नाहीं. कारण मी परमेश्वराचा भक्त आहें. तो मला जें देतो तें मला गोड च वाटतें. आज वाटेंत मी खालीं बसलों तेव्हां सर्वांच्या चरणाकडे माझें लक्ष होतें. सर्वांची चरण-सेवा मला करायची आहे त्यांच्या प्रेमानें माझें हृदय भरलें आहे.

## करुणेशिवाय दुसरी प्रेरणा नाहीं

ज्या मनुष्याच्या हृदयांत प्रेम करुणा नसेल तो मनुष्य ७-८ वर्षें उन्हा-पावसांत हिवांत सतत हिंडेल का ? त्याच्यावर उन्हापावसांत हिंडायला कोणी जबरदस्ती केली आहे ? वांझोटीला पुत्र-वात्सल्याचें प्रेम काय कळणार ? ज्यांच्या हृदयाला करुणेचा स्पर्श च नाहीं त्यांना कुठून कळणार कीं हा माणूस सतत कसा हिंडतो तो ! शंकराचार्य तारुण्यांत हिंडले त्यांचें वर्णन 'करुणालयम्' असें केलें आहे. बुद्ध भगवान् सतत ४० वर्षें हिंडले. ते तर कारुण्यावतार च होते. अशा तऱ्हेनें कारुण्याच्या प्रेरणेशिवाय माणूस सतत हिंडूं शकत नाहीं. एखादा कोणी सिकंदर मुलुख जिंकायला निघाला तर गोष्ट वेगळी. पण हा एक सर्वांच्या सेवेकरतां निघालेला निःशस्त्र माणूस हिंडत आहे तो करुणेवाचून हिंडेल का ? शंकराचार्य तारुण्यांत हिंडेल. मी तर म्हातारपणीं हिंडतों आहे. मग त्यांत कारुण्यावाचून दुसरी कोणती प्रेरणा असणार ? आज तुम्ही वाटेंत माझा इतका वेळ घेतला. इथें अखिल भारतांतून लोक आलेले आहेत ते तुमच्याबद्दल काय मत घेऊन जातील ? 'विनोबांना लोकांनीं आडविलें, साऱ्या हिंदुस्थानांत न घडलेली घटना घडली.' ही गोष्ट आतां सबंध भारतांत जाईल. या जगांत कोठें हि जरा खुट्ट झालें तरी त्याचा परिणाम जगभर होतो. तेव्हां तुम्ही यावर विचार करा आणि पुन्हां कधीं अशी बुद्धिहीनता दाखवूं नका

मित्रांनो, मी नेहमीं सौम्य बोलतों पण आज कानउघाडणी करण्या-करतां चार कठोर शब्द बोलावे लागले या बद्दल मला क्षमा करा.

**चाळीसगांव** ( पूर्व खानदेश ) ता. ८-८-५८

# खानदेशाला आवाहन 

[ विनोबा-मित्र-मंडळ-संमेलनांत दिलेलें भाषण ]

## मैत्री सोडून इतर नातीं गौण

माझ्या जीवनामध्यें सर्व नात्यांपेक्षां मैत्री हें च नातें मीं श्रेष्ठ मानलेलें आहे. गुरु-शिष्याचें एक नातें असतें तें हि पवित्र नातें आहे परंतु मला कोणी गुरु लाभला नाहीं आणि माझा कोणी शिष्य नाहीं. पिता-पुत्र, स्वामी-सेवक इत्यादि नातीं सुद्धां जगामध्यें असतात आणि तीं हि उपयोगी नातीं आहेत, परंतु तीं एकांगी असूं शकत नाहींत; दोन्ही बाजूचीं असतात. म्हणजे सेवकानें स्वामि निष्ठा राखली पाहिजे, मुलांनीं आईबापांची आज्ञा पाळली पाहिजे, पत्नीनें पतीचें मानलें पाहिजे. अशीं एकांगी कथनें बहुधा धर्म-वचनें म्हणून सांगितली जातात परंतु तीं अपूरीं असतात. पत्नीनें पतीला देव मानावें तर पतीनें हि पत्नीला देवी च मानावें असें असलें पाहिजे. परंतु आज तसें मानलें जात नाहीं. पति ही देवता व पत्नि ही भक्त असें च मानले जातें. आईबापांची आज्ञा मुलांनीं पाळावी असें च म्हटलें जातें. त्याकरतां "**मातृदेवो भव, पितृदेवो भव**" अशीं वचनें सांगितलीं आहेत परंतु तीं एकांगी आहेत. बालकृष्णाविषयीं यशोदेला आणि रामचंद्राविषयीं कौसल्येला परमेश्वरभावना होती. तशी च प्रत्येक आईला आपल्या बालकाविषयीं भावना असली पाहिजे कीं आपल्या घरांत या मुलाच्या रूपानें परमेश्वरमूर्ति आली आहे. आणि त्या मुलालाहि मातापिता परमेश्वराच्या ठिकाणीं वाटेल पाहिजेत. आज समाजांत ज्या एकांगी आज्ञा सांगितल्या जातात त्या पूर्ण नीतिशास्त्र बनवूं शकत नाहींत. आज समाजांत चोरी हें पाप मानलें जातें. त्याकरतां धर्मशास्त्रकारांनीं अस्तेय हा एक शब्द काढला आहे, परंतु चोरी करणें जर अधर्म आहे तर संग्रह करणें देखील अधर्म च आहे. म्हणून शास्त्रकारांनीं दुसरा शब्द अपरिग्रह काढला आहे. परंतु आम्ही त्या दोन शब्दांपैकीं एक च शब्द शिल्लक ठेवून संग्रह चालेल असें म्हणूं लागलों तर तो अगदीं च एकांगी धर्म होईल आणि कांहीं परिस्थितींत तो अधर्म

हि ठरेल. म्हणून पुष्कळशीं नातीं सांगून जो धर्म सांगितला जातो तो एकांगी असल्यामुळें तो धर्म मी गौण समजतों.

## बंधनसूचक बंधुत्व

भाईचारा, बांधव्य हा एक फार मोठा धर्म आहे, परंतु तो सुद्धां मला गौण वाटतो. कारण बंधु जितके भांडतात तितके शत्रु च भांडूं शकतात. हिंदुस्थान-पाकिस्तानमध्यें तीव्र भांडणें चालतात कारण त्यांच्यामधें बंधुत्व आहे. आणि अमेरिका-रशिया यांच्यामध्यें तीव्र भांडणें चालतात कारण त्यांच्यामधें शत्रुत्व आहे. म्हणून बंधु हा धर्म सुद्धां गौण ठरतो. कारण त्यांत हक्काची कल्पना असते. मी जेव्हां गांवाचें एक कुटुंब करा असें म्हणूं लागलों तेव्हां आमचे एक स्नेही म्हणाले कीं गांवाचें एक कुटुंब बनवायचें काम सोपें आहे. कारण एक कुटुंब झालें म्हणजे आम्ही घरांत जसे भांडतों तसे आतां गांवांत सुद्धां भांडूं. कुटुंबें म्हणजे आज भांडणाचीं स्थानें झालीं आहेत. मीं म्हटलें कीं कुटुंबांत आज भांडणें चालतात याचें कारण असें कीं तिथें कायदा आणि मालकीहक्क दाखल झाला आहे. कुटुंबांत नुसता स्नेह च राहूं दिला असता तर कुटुंबें बिघडलीं नसतीं. परंतु त्यांत कायदा शिरल्यामुळें कुटुंब हें कांहीं स्नेहाचें उत्तम उदाहरण राहिलें नाहीं. म्हणून आम्ही जेव्हां गांवाचें कुटुंब करा असें म्हणतों तेव्हां त्यांतून मालकीहक्क काढण्याची गोष्ट असल्यामुळें भांडणें राहणार नाहींत. सारांश मालकीहक्कामुळें बंधु हि चांगले भांडूं शकतात, म्हणून बंधुत्व ही कल्पना पुरेशी नाहीं. बंधुत्व हें बंधनसूचक आहे, मोचनसूचक नाहीं. त्यांत स्नेहाचें सूचन असलें तरी हि बंधन आहे. त्यांत आम्ही स्नेहानें बांधले जातों मोकळे रहात नाहीं. एका बापाच्या पोटीं जन्माला आल्यामुळें ते स्नेह करायला बांधलेले असतात. म्हणून मीं म्हटलें होतें कीं बंधमुक्त बंधुमंडळ असायला हवें. बंधु या शब्दांत जो दोष आहे तो वेदांतल्या एका वचनांत स्पष्ट सांगितला आहे. आपण भावाभावासारखे वागावें असें म्हणून वेदानें म्हटलें आहे कीं "अज्येष्ठासः एकनिष्ठासः **येते संभ्रातरौ वावृधुः**" आम्ही असे भाऊ असूं कीं ज्यांच्यांत कोणी ज्येष्ठ भाऊ नसेल व कोणी कनिष्ठ भाऊ नसेल. कारण जेथें ज्येष्ठ आणि कनिष्ठ

हे भेद आले तेथें हक्क व भांडणें येतात. हें सगळें बंधुत्वांत येत असल्यामुळें सर्वोत्तम शब्द मित्र-मंडळ हा आहे. त्यामधें मोकळा स्नेह आहे. मित्र या शब्दांत अत्यंत पावित्र्य, मांगल्य, स्नेह आहे. म्हणून वेदांत म्हटलें आहे कीं "**मित्रस्य मा चक्षुणा सर्वाणि भूतानि समीक्षंताम्, मित्रस्याहं चक्षुणा सर्वाणि भूतानि समीक्षे**" मी मित्राच्या डोळयानें सर्व जगाकडे पाहीन आणि जगानें हि माझ्याकडे मित्राच्या डोळयानें पहावें. याप्रमाणें मित्र-भावने-विषयीं प्रार्थना केली आहे. यापूर्वीं हिंदुस्थानांत सर्वोदय-समाजाच्या, व इतर हि अनेक दलांच्या वगैरे वेगवेगळया सभा झाल्या परंतु विनोबा-मित्र-मंडळाची सभा ही हिंदुस्थानांतील पहिली च सभा आहे.

## खानदेशमध्यें त्रिवेणी संगम

ज्या ठिकाणीं संस्कृति-संगम होतो त्या ठिकाणीं निःसंशय पवित्र संस्कार आलेले असतात. म्हणून च आपण संगमस्थानें पवित्र मानलीं आहेत. गंगेवर व यमुनेवर अनेक तीर्थें आहेत परंतु त्यांचें संगमस्थान जें प्रयागराज हें परम पवित्र तीर्थ मानलें जातें. कारण नद्या अनेक प्रांतांतून वाहत येत असल्यामुळें अनेक प्रांतांतील संस्कृति संगमस्थानीं एकवटतात म्हणून तेथें संकोच राहत नाहीं. खानदेशांत हि एक संस्कृति-संगम आहे. एका बाजूला वऱ्हाड आहे, दुसऱ्या बाजूला माळव्याचा हिंदी प्रदेश आहे आणि एका बाजूला गुजराथ आहे. अशा प्रकारें इथें त्रिवेणी संगम झालेला आहे. जिथें संस्कृति-संगम असतो तिथें मैत्रीची भावना, प्रेम असतें.

## भाऊप्रेम ठेवा पण भाऊगर्दी करूं नका

इथें खानदेशमध्यें माणसाच्या नांवाला भाऊ लावतात. हा भाऊ शब्द जरी चांगला असला तरी मी इथल्या लोकांना म्हणेन कीं तुम्हीं भाऊ-गर्दी मात्र करूं नकाः भाऊगर्दी हा शब्द पानपतवरच्या घटनेंतून निर्माण झाला. पानपतावर मराठ्यांच्या सैन्यामधें इब्राहिमखान तोफखान्याचा प्रमुख होता. जेव्हां मराठ्यांची हार होणार हें निश्चित झालें तेव्हां मल्हारराव होळकरांनीं भाऊसाहेब पेशव्यांना असा सल्ला दिला कीं मराठ्यांचें बळ

पायांत तेव्हां आपण पळालों तर सुरक्षित राहूं. त्यावर भाऊसाहेब म्हणाले कीं तुमचें म्हणणें ठीक दिसतें. परंतु आपण घोडयावरून पळून जाऊं शकतों, मात्र आपल्याबरोबर निष्ठेनें राहिलेला मुसलमान इब्राहिमखान हा कांहीं पळून जाऊं शकत नाहीं. कारण तोफखाना घेऊन तो कसा पळणार ? म्हणून पळणें योग्य नाहीं. पानपतावर अहमदशहा अबदालीनें इब्राहिमखानाला फोडण्याचा खूप प्रयत्न केला. तो म्हणायचा कीं इब्राहिमखान हें रत्न जर माझ्या हातीं आलें तर कॉन्स्टँटिनोपलपासून दिल्लीपर्यंत मी राज्य करूं शकेन. इब्राहिमखान हा एक अप्रतिम शिपाई होता. त्याला तोफखान्याची कला उत्तम साधलेली होती. तो मुसलमान असल्यामुळें अहमदशहानें त्याला फोडण्याचा पुष्कळ प्रयत्न केला परंतु इब्राहिमखान म्हणाला, मीं मराठयांना वचन दिलें आहे म्हणून मी त्यांना सोडूं शकत नाहीं. भारतामध्यें हिंदु-मुस्लीम ऐक्याच्या ज्या कांहीं मधुर कथा आहेत त्यांतली ही एक कथा आहे. जेव्हां मराठयांची उपासमार होऊं लागली तेव्हां मल्हारराव होळकर पळाला आणि पळाल्यामुळें तो वाचला देखील. परंतु भाऊसाहेब म्हणाले कीं मी इब्राहिमखानाला दगा देऊं शकत नाहीं, त्यामुळें मला पळणें शक्य नाहीं; असें म्हणून आणि हें शेंवटचें धारातीर्थ आहे असें समजून भाऊसाहेब रणमैदानांत उतरले तेव्हां एक च गर्दी झाली. त्या गर्दीमधें कांहीं व्यवस्था नव्हती. कारण तो कांहीं सैन्य म्हणून केलेला हल्ला नव्हता तर आतां शेंवटचें लढायचें असेंम्हणून ते रणमैदानावर उतरले होते. ती जी गर्दी झाली त्याला भाऊगर्दी म्हणतात. खानदेशांत अव्यवस्था हा गुण असल्यामुळें तिथें भाऊगर्दी होते. तेव्हां तुम्ही भाऊप्रेम ठेवा पण भाऊगर्दी करूं नका. प्रत्येक भागामधें कांहीं गुण असतात. खानदेशमधें पारस्परिक अनुराग, प्रेम हा फार मोठा गुण आढळतो. कारण येथें एक संस्कृति-संगम झालेला आहे.

### लेवे देवे कधीं बनणार ?

आमचे जे लेवे पाटील मित्र आहेत त्यांना मी नेहमीं सांगतों कीं तुम्ही येथें येऊन फार प्रेमानें सेवा केली. इथली जमीन चांगली बनविण्याचें श्रेय तुम्हांला आहे. जरी तुमच्यांतील कांहीं लोक भांडवल घेऊन व्यापार करण्यासाठीं येथें आले असले तरी कांहींनीं इथली जमीन चांगली करण्याची

कामगिरी केलेली आहे. परंतु मी वाट बघतों आहे कीं लेवे आतां देवे केव्हां होणार! तसें झालें तर फार बरें होईल. तुम्ही इथें येऊन, आपल्या बुद्धीचा उपयोग करून प्रेम संपादन केलें, आतां तुम्ही देवे बना. येथें पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं जिथें अठराविश्वें दारिद्य असतें, जमीन खडकाळ असते तिथें च भूदान होतें, परंतु आमच्या खानदेशांत जमीन चांगली आहे तेव्हां इथें भूदान कसें होणार? परंतु हें खरें नाहीं. जिथें संस्कृतिसंगम असतो तिथें फार मोठीं त्यागाचीं कामें होतात. गंगायमुनेच्या संगमावर कितीतरी त्यागी ऋषीमुनींनीं आत्मसमर्पण केलें आहे. संगमस्थानीं सत्कृति केली तर ती चारी बाजूला पसरते. तेव्हां तुम्ही इथें सत्कृति केली तर ती साऱ्या महाराष्ट्रावर व गुजराथवर परिणाम करील.

## लोक-सेवा व लोक-क्रांति

कांहीं लोक म्हणतात कीं खानदेशची जमीन सुपीक आहे, म्हणून भूमिदान ग्रामदान कार्य इथें कठिण आहे. परंतु मी म्हणतों कीं इथली जमीन जशी रसरसलेली, पुष्टीनें भरलेली आहे तशी च इथलीं हृदयें पण भरलेलीं आहेत; त्यामुळें या ठिकाणीं भूदान ग्रामदानाचा विचार पुढें न गेला तर च मला आश्चर्य वाटेल. मी अपेक्षा करतों कीं इथें तुम्ही सर्वोदयाचा उत्तम नमुना उभा करूं शकाल. पण सर्वोदय म्हणजे काय हें आधीं नीट समजून घ्या. स्वराज्यापूर्वीं खादी, तेलघाणी, कागद इत्यादि ग्रामोद्योग चालविले तर त्यावेळीं त्यांचें फार मोठें कौतुक होत असे. लहानपणीं मुलगा बोलूं लागला म्हणजे त्याचें किती कौतुक होतें! परंतु पंधरावीस वर्षांचा झाल्या-नंतर हि जर तो तसा च बोलत राहिला, कांहीं करूं न लागला तर त्याचें कौतुक कसें होईल? लहानपणीं मुलाच्या ज्या गुणाचें कौतुक झालें त्या च गुणाचें मोठेपणीं हि कौतुक व्हावें असें म्हणाल तर तें कसें शक्य आहे? त्याप्रमाणें स्वराज्यापूर्वीं खादी, तेलघाणी इत्यादि कार्यांना लोकसेवेची च नव्हे तर लोकक्रांतीची किंमत होती तशी लोकसेवा–लोकांच्या गरजा पुरविण्याची लोकसेवा–व्यापारी लोक हि करतात, तशी स्वराज्यापूर्वीं खादी ग्रामोद्योग हीं केवळ सेवाकार्यें च नव्हतीं तर सरकारनें उभ्या केलेल्या-

शोषण यंत्राला मोडून पाडणारीं कार्यें होतीं. सरकारचा खादीच्या कपड्यावर रोष होता आणि त्यापायीं लोकांना जेलमध्यें जावें लागत असे. आतां स्थिति काय आहे ती तुम्हांला माहीत च आहे. पूर्वीं जो हंसाचा पोषाख होता तो आतां बगळ्याचा झाला आहे. तेव्हां त्या काळीं खादी वगैरे कार्याला लोकक्रांतीचें मूल्य होतें, परंतु आतां त्या कामांना सरकारची मदत मिळणार, तशी मदत देणें सरकारचें कर्तव्य आहे आणि ती घेणें आमचें कर्तव्य आहे. आतां तीं कामें लोकक्रांतीचीं राहिलीं नाहींत एवढें लक्षांत घ्या.

## वरवधूशिवाय मंगलदायकें काय कामाचीं ?

आतां तुम्ही अधिक तेलघाण्या काढून अधिक तेल विकलें तर व्यापारी ज्या वर्गांत आहेत त्या च वर्गांत तुमची गणना होईल. पूर्वीं खादी हें स्वराज्याचें साधन असल्यामुळें तिला किंमत होती. आतां तें ग्रामस्वराज्याचें साधन झालें तर च तिला लोकक्रांतीचें मूल्य येईल. इंग्रजांची मालकी काढून टाकून आम्हीं स्वराज्याची स्थापना केली. आतां खेड्याखेड्यांतून जमिनीची मालकी काढून टाकाल तर ग्रामस्वराज्याचा पाया घातला जाईल. मग त्याच्या जोडीला खादी, तेलघाणी इत्यादि सर्व साधनें जोडलीं गेलीं तर त्यांचें मूल्य राहील. तुकारामानें म्हटलें आहे " **कन्यापुत्रेंविण मंगलदायके ही माझी विटंबना** " वर आणि वधु हजर नाहीं आणि बाकीचीं मंगलकार्याला लागणारीं सगळीं साधनें गोळा केलीं तर ती उपयोगी पडतील काय ? तें हास्यास्पद च होईल. म्हणून लग्नाला लागणारे मुख्य तत्त्व, वर वधु, असतील तर च खादी ग्रामोद्योग वगैरे मंगलदायकें शोभतील. मालकी पक्की असतांना त्या सगळ्या साधनांची काय किंमत ? तेव्हां आपण लक्षांत हें घेतलें पाहिजे कीं आतां किरकोळ गोष्टी करून देशाचा आणि जगाचा बचाव होणार नाहीं. रामदासांनीं म्हटलें आहे " **सामर्थ्य आहे चळवळीचें** " सामर्थ्य चळवळीचें असतें वळवळीचें नव्हे. एके काळीं खादीग्रामोद्योग चळवळ होती, आतां ती वळवळ झाली आहे. म्हणून ज्या मुख्य गोष्टीसाठीं खादी वगैरे पाहिजे ती मुख्य गोष्ट नसली तर विटंबना होईल. म्हणून मुख्य गोष्टीकडे कानाडोळा करतां कामा नये. मुख्य गोष्ट जमिनीची मालकी प्रेमानें वाटून टाकणें ही आहे.

## बिहारचें महान् कार्य

बिहारच्या प्रांतीय काँग्रेस कमिटीनें बत्तीस लाख एकर जमीन भूमिदानांत मिळविण्याचा संकल्प एका ठरावाद्वारें केला ही एक फार मोठी घटना होती. इतर कोणत्या हि प्रांतांनीं अशा प्रकारचा ठराव केलेला नसतांना व बिहार काँग्रेसमध्यें आपापसांत दुफळी असतांना देखील बिहारच्या काँग्रेस कमिटीनें ३२ लाखाचा एवढा मोठा आंकडा मान्य केला ही लहान गोष्ट नाहीं. त्यांनीं " भूदान कार्यांत यथाशक्ति काम करूं " असा वुळबुळीत, गुळगुळीत ठराव केला नाहीं तर एक मोठा आंकडा मान्य करून इतर सर्व पक्षांना या कार्यांत सहकार्य करण्याचें आवाहन केलें, व लोकांनीं त्या कामाला मदत हि केली. पुष्कळांचा समज आहे कीं बिहारमध्यें मोठमोठे जमीनदार असल्यामुळें खूप जमीन मिळाली, परंतु तें खरें नाहीं. बिहारमध्यें ३२ लाख एकर जमीन तीन लाख लोकांनीं दिली आणि बाकीच्या सबंध हिंदुस्थानांत तीन लाख दानपत्रें मिळालीं. म्हणजे हिंदुस्थानांतल्या सहा लाख दानपत्रांपैकीं एकटया बिहारनें तीन लाख दानपत्रें दिलीं आहेत. बिहारच्या काँग्रेसनें व इतर हि पक्षांनीं मिळून हा निःसंशय फार मोठा पराक्रम केला व इतिहास बनविला. बिहारमधल्या ७५ हजार खेडयांमधील ३७ हजार खेडयांतून दान मिळालें आहे. म्हणजे तेथील कार्यकर्ते प्रत्येक खेडयांत गेले व अनेकवेळां त्यांनीं भूदानाचा विचार समजावून सांगितला तेव्हां इतकें दान मिळूं शकलें. इतक्या व्यापक प्रमाणांत पूर्वीं कधीं हि प्रचार झाला नव्हता. स्वराज्याच्या चळवळींत शहरांत अधिक काम झालें, अगदीं प्रत्येक खेडयांत संदेश पोंचवायला पाहिजे अशी निकड त्यावेळीं नव्हती.

## स्वराज्यानंतर आपण काय केलें

या खानदेशांत देखील तुम्ही अवश्य पराक्रम करूं शकता. या भूमींत सौहार्द्र आहे, मन उदार आहे. इथें संस्कृति-संगम आहे. अशा स्थितींत इथें भरपूर काम होऊं शकतें. शिवाय हें विज्ञानयुग आहे. या विज्ञानयुगांत दळणवळणाचीं इतकीं त्वरित साधनें निघालीं आहेत कीं आजचीं १० वर्षें पूर्वींच्या १०० वर्षांच्या बरोबरीचीं ठरतील. पूर्वीं बुद्ध भगवानासारखा महापुरुष सतत ५० वर्षें बिहार व उत्तरप्रदेशांत हिंडला पण त्या वेळेला

जगाला त्याची कांहीं बातमी नव्हती. ३०० वर्षांनंतर मग त्याचा संदेश बाहेर पसरला आणि आमची यात्रा फक्त ७॥ वर्षें झालीं तरी सर्व जगाला या कामाची माहिती कळली. अशा स्थितींत स्वराज्यप्राप्तीनंतरच्या दहा वर्षांच्या काळांत आम्हीं काय केलें ? हें च केलें कीं आपल्या देशांत आज सैन्यावर दरसाल तीनशें कोटि रुपयांचा खर्च होत आहे आणि तीनशें कोटींचें धान्य बाहेरून मागवावें लागत आहे. दारिद्र्य पूर्वी अठराविश्वें होतें, आतां कदाचित् एकोणवीस विश्वें देखील झालें असेल. या सर्व गोष्टींचा आपण सर्वांनीं स्वतःला च प्रश्न विचारावा.

जबाब हा च येईल कीं आम्ही निवडणुका केल्या. एक निवडणूक संपली कीं दुसरी तयार च असते. अशा प्रकारें निवडणुकीचें चक्र सतत चालू च असतें. आमच्या एका सहयात्रीचें भाषण ऐकून त्या खेड्यांतले लोक म्हणाले होते कीं 'तुमच्या सारखीं माणसें आलीं म्हणजे आम्हांला फार आनंद होतो. त्या पक्षांच्या माणसांचा आम्हांला अगदीं वीट आला आहे. तीं आमच्या खेड्यांत न आलीं तर बरें···.' अशी च सर्वत्र भावना आहे हें मला आढळलें. यावर मीं एक रामदासी मजेदार ओवी रचली आहे. "**जो संसार-दुःखें दुखवला । इलेक्शन तापें पोळला । तोचि एक अधिकारी झाला । सर्वोदयासी ।**" इलेक्शन तापानें पोळलेले असे कित्येक लोक आमच्याकडे आलेले आहेत.

या निवडणुकांत सुधारणा करण्याच्या दृष्टीनें मीं आजवर अनेक विचार मांडलेले आहेत. त्यांतला एक विचार असा कीं "फाइटिंग इलेक्शन" हा जो शब्दप्रयोग चालू आहे तो चुकीचा आहे. इंग्रजी राज्य गेलें मग आतां त्यांचा इंग्रजी शब्द कशाला हवा ? तेव्हां इलेक्शन लढण्याची कल्पना काढून टाका व इलेक्शन खेळायचें आहे असें म्हणा. ज्याप्रमाणें कुस्तींत जिंकलेल्याला इनाम मिळतें व हारलेल्याला नारळ मिळतो, कारण तो हारणारा नसता तर दुसरा जिंकला च कसा असता ? तशी इलेक्शनमधें वृत्ति असली पाहिजे. समजा इलेक्शनच्या सभा घ्यायच्या आहेत तर एका च व्यासपीठावर सर्व पक्षांच्या लोकांनीं एकत्र येऊन एकामागून एकानें आपला विचार समजावून सांगावा व लोकांनीं तो शांतपणें ऐकून

घ्यावा, व ज्याचा विचार पटला त्याला मत द्यावें. समजा निवडणुकीला माझा एक मित्र उभा आहे आणि मला त्याचे विचार पटत नाहींत तर मी लोकांना सांगेन कीं तुम्ही त्याला मत देऊं नका, कारण तो देशाला खड्ड्यांत टाकील. तो माझा मित्र आहे त्यामुळें मी त्याच्यासाठीं प्राण द्यायला तयार आहें परंतु त्याचे विचार चुकीचे आहेत म्हणून मी त्याला मत द्यायला तयार नाहीं. तो हि लोकांना माझ्याविषयीं असें च सांगेल. आणि आम्ही दोघे हि एका च आश्रमांत प्रेमानें राहूं व शेतांत एकत्र काम करूं. समाजाला ज्याचे विचार पटतील तो निवडणुकींत जिंकेल आणि सत्तेच्या द्वारें सेवा करील. त्यानें जनकाप्रमाणें अलिप्त राहून सेवा करण्याचें नाटक करायचें व जो हरेल त्यानें शुकदेवाप्रमाणें परम वैराग्यपूर्वक समाजांत जाऊन प्रत्यक्ष सेवा करायची "**शुकजनकयोः एकः पंथाः**" असें आपल्याला घडवून आणायचें आहे. पण तें सोपें नाहीं. आजकाल इलेक्शनमुळें जातिभेद वाढले आहेत. समाजांत जर असा जातिभेद राहिला, वाढत गेला तर समाजाचें भलें होईल काय ? तुम्ही जर म्हणाल कीं कोणत्या हि कार्यांत आम्ही सगळे एकवटूं शकत नाहीं तर मी तुम्हांला लिहून देतों कीं हिंदुस्थानचें स्वातंत्र्य दोन घटकांचें आहे, तें जायला तिसरी घटका हि लागणार नाहीं.

यांतून च आपल्याला मार्ग काढून एक पक्षमुक्त सेवकवर्ग निर्माण करायचा आहे. त्यासाठीं सर्वांनीं मिळून सर्वोदय-पात्राचें काम हातीं घ्यावें अशी माझी तुमच्यासमोर मागणी आहे. अशा प्रकारचा सेवकवर्ग सर्वांना, पक्षवाल्यांना सुद्धां हवा आहे. त्याच्याद्वारे भूदान ग्रामदान वगैरे पुढचीं कामें करतां येतील. माझी अपेक्षा आहे कीं या खानदेशांत अडीच लाख कुटुंबां-पैकीं निदान पन्नास हजार घरांमध्यें तरी सर्वोदय-पात्र स्थापन व्हायला हवें.

आतां येथून मी उत्तर हिंदुस्थानांत जाणार आहें. साऱ्या हिंदुस्थानांत इकडून तिकडे दहापांच फेऱ्या मारायची माझी इच्छा आहे परंतु तें माझ्या इच्छेवर अवलंबून नसून परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून आहे. तरी हि मी "**पुनरागमनाय पुनर्दर्शनाय च**" तुमची रजा घेतों.

उंबरखेडे, जि. पूर्व खानदेश, ता. १०-८-५८

## सत्य, प्रेम, करुणेच्या आचरणानें आजचें कोडें सुटेल : १० :

### भारताचें प्रथम मूल्य : सत्य

भारतांत हजारों वर्षांपासून आजपर्यंत विशाल मानवसमूह काम करीत आला आहे. जुन्या देशांत चीन, हिंदुस्थान हीं नांवें येतात. प्राचीन काला-पासून येथें मनुष्याची वस्ती होती. अमेरिकेचा शोध लागून तर केवळ चारशें च वर्षें झालीं, त्यानंतर तेथें मानव-समाज बनत गेला. आज अमेरिका फार समृद्ध देश आहे. यंत्रसामुग्री, विद्या वगैरेचा तेथें फार प्रसार झाला आहे. आज जगांत बलाढ्य राष्ट्र म्हणून अमेरिकेची ख्याति आहे पण तिथला समाज अगदीं अलिकडचा तीनशें वर्षांतला असल्यामुळें तो अनुभवी नाहीं. भारताचा समाज अनुभवी आहे. येथील लोकांनीं आपल्या अनुभवानें सगळ्यांत मोठा गुण सत्य आहे, असें ठरविलें. ज्या समाजांत सत्य राहणार नाहीं त्या समाजांत व्यवहाराला आधार राहणार नाहीं. एकमेकांचा विचार समजायला, व्यापार व्यवहाराला सत्य पाहिजे. आपल्या जुन्या कथा सत्याविषयीं च आहेत. हरिश्चंद्राची कथा ही सत्यनिष्ठेचा महिमा सांगणारी कथा आहे. सगळ्या हिंदुस्थानांत या कथा माहीत आहेत. कारण मानवसमाजामध्यें भारतांत जें विचार-मंथन झालें त्यांतून सत्य हा मोठा गुण आहे असें ठरलें. '**सत्यं वद, धर्मं चर**' ही धर्माची पहिली आज्ञा आहे. "**सत्यापरता नाहीं धर्म**" "**नास्ति सत्यात् परो धर्मः**" वगैरे वचनें आपल्याकडे आहेत. म्हणून जीवनांतलें पहिलें मूल्य सत्य हें आहे. परंतु कधीं हि असत्याचा उच्चार न करणारा माणूस विरळा असें आम्ही जीवनांत पाहतों. सत्याचा महिमा मान्य आहे पण माणूस व्यापारांत असत्य बोलतो, इतर व्यवहारांत हि असत्यानें वागतो. मुत्सद्यांच्या कामांत तर असत्य चालतें च. अशा प्रकारें सर्वत्र ह्या असत्याचा बोलबाला आहे. सत्याचें परममूल्य आपण मान्य केलें आहे पण असत्याचा मात्र आपण सरसहा उपयोग करतों.

### पैशामुळें सत्य उरलें नाहीं

मग काय लोकांची नितिमत्ता बिघडली आहे ? नाहीं. त्याचें कारण असें कीं समाज-व्यवस्था पैशावर उभारली गेली. पैसा आला तेव्हांपासून लबाडी आली. पैशाऐवजीं जोंपर्यंत परिश्रममूल्य होतें तोंपर्यंत सचोटी होती. हा पैसा लबाड च आहे. तो एका रुपयास एका वेळीं चार पायली ज्वारी सांगेल, दुसऱ्या वेळीं दोन पायल्या सांगेल तर तिसऱ्या वेळीं सहा पायल्या सांगेल. म्हणजे रुपयाला स्थिर मूल्य नाहीं. तो रुपया लफंगा च झाला. म्हणून पैशामार्फत व्यवहार करायचा म्हणजे एकूण सर्व च व्यवहार लबाडीचा होतो. हा पैसा मानव-समाजांत आला आणि आपण पैशानें मूल्य ठरवूं लागलों. मग कृत्रिम रीतीनें—उत्पादनाचा विचार न करतां पैसा काढूं लागलों (नोटा छापूं लागलों) अशा प्रकारें हें चुकीचें अर्थशास्त्र पैशावर उभारलें गेलें आणि त्यामुळें सत्य हें मूल्य उरलें नाहीं. खरें पाहतां सत्य आचरायला सोपें आहे आणि लबाडी च कठिण आहे. सत्याला मनाचा सरळपणा हवा. लहान मुलाला हि सरळपणा उपलब्ध आहे. परंतु सोपी आणि सर्वांना गरजेची असणारी सत्य-निष्ठा, ती आज कठिण झाली आहे. पण ती आचरणांत आणली पाहिजे त्याशिवाय देशाची व धर्माची उन्नति होणार नाहीं.

### कोडें कसें सुटणार ?

त्याकरितां अर्थव्यवस्था बदलावी लागेल. समाजाची घडी पैशावर न बनवितां श्रमावर बनविली पाहिजे. म्हणजे गांवांत चोरानें चोरी केली तर त्याला पैसा न मिळतां धान्य, दूध, भाज्या, फळें हें च मिळालें असें व्हायला हवें. गांवांत लक्ष्मी भरपूर पाहिजे परंतु पैसा कमी असावा. गांवांत सहयोगीसमाज असावा. वस्तु सगळ्यांच्या उपयोगी याव्यात. जमीन, घर उत्पादनाचीं साधनें हीं सगळ्यांची असावींत.

आज सकाळीं माझ्या स्वागतासाठीं येणारे लोक भजन म्हणत होते "**आजि सुटलें माझें कोडें**" पण हें कोडें कशानें सुटणार ? आपल्या-जवळ जें आहे तें गांवाला अर्पण केलें, सुखदुःखांत एकमेकांना भागीदार

केलें तर हें कोडें सुटणार. दुसऱ्या कोणत्या च रीतीनें हें कोडें सुटण्याची शक्यता नाहीं. सरकारच्या प्लॅनिंग कमिशनमध्यें योजना करणारीं कांहीं माणसें आहेत पण त्यांचें कोडें कांहीं सुटत नाहीं. गुंत कोठें झाली आहे तें कळलें पाहिजे. नाहींतर खेचाताणी करून गुंत जास्त अडकते आणि मग तोडावें लागतें. म्हणजे सशस्त्र क्रांति होते. पण आजकाल ॲटम बॉम्बसारखीं शस्त्रें निघालीं असल्यामुळें सशस्त्र क्रांति महाग पडेल. मग हें कोडें कसें सुटणार?

गुंत मालकीमुळें होते. मालकीमुळें पैशाला महत्त्व आलें आहे. शहरांत राहणारा मनुष्य गांवांतल्या शंभर एकरांचा मालक असतो. तो वसूल काय करतो? तो पैसे वसूल करतो. म्हणजे धान्याची पैशांत किंमत करतो मग हें कोडें सुटायचें कसें? तर गांव हें कुटुंब समजून मालकी सोडाल, साऱ्या गांवाची एक बँक कराल, उत्पादनाचीं साधनें गांवच्या मालकीचीं कराल तर च कोडें सुटेल.

## जगांत असत्यप्रिय माणूस नाहीं

आज पैशाला महत्त्व दिलें गेलें म्हणून च सत्याची प्रतिष्ठा नाहीं. पण व्यवहारांत लबाडी करणाऱ्या शेटजींच्या मुलांना शाळेंत शिक्षक जर लबाडीचा महिमा शिकवूं लागले तर ते शेटजी म्हणतील हें काय भलतें शिकविता? म्हणजे आपल्या मुलांना सत्याचें च शिक्षण मिळावें असें लबाड लोकांना सुद्धां वाटतें. "**मना सत्य तें सत्य वाचें वदावें। मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें**" हें शिकवावें असें वाटतें. आज मनाचे श्लोक लहान मुलांसाठीं च आहेत. मोठेपणीं त्यांचा वापर नाहीं.

पण कोणी प्रामाणिकपणें लबाड असतात काय? नाहीं. कोणाला हि लबाडीची प्रीति, हौस असत नाहीं. ती असती तर आपल्या मुलांना शाळेंत लबाडीचे धडे मिळावे असें त्यांना वाटलें असतें. पण ही लबाडी लादलेली असते. समाजाला असत्य प्रिय नाहीं. असत्यप्रिय माणूस मीं अद्याप पाहिला नाहीं. असत्यप्रिय माणसाचें लक्षण काय? त्यांना वचन देऊन जर दुसऱ्यानें फसविलें आणि त्या फसविणाऱ्याबद्दल आदर वाटला तर तो असत्यप्रिय माणूस म्हटला जाईल. पण असा माणूस कोणी पाहिला नाहीं. तेव्हां निदान भारतांत तरी माणसाला सत्य प्रिय आहे.

## इंग्लंडची करामत

परदेशांत तर सत्याची प्रतिष्ठा जास्त च आहे. महायुद्धाच्या काळांत सर्व देशांत चलनाचा फुगवटा झाला. शंभर रुपयांचा माल अडीचशें, तीनशें, चारशें रुपयांपर्यंत, अशा किमती वाढल्या. अशा वाढी जगभर झाल्या पण इंग्लंडमध्यें शेंकडा दहा टक्के च वाढ झाली. इंग्लंडच्या लोकांनीं आपला पैसा लबाड होऊं दिला नाहीं. ज्या देशांत पैशाचें स्थिर मूल्य राखलें जाईल त्या देशांतील लोक लबाडी करणार नाहींत. पैशाचें स्थिर मूल्य राखणें सोपें नाही. त्यासाठीं आपल्याला राष्ट्रीय योजनेऐवजीं गांवोगांव योजना करावी लागेल. कपडा, धान्य, तेल, गूळ गांवांतल्या गांवांत करून ग्रामस्वराज्याची योजना करावी लागेल. ती दिल्लींतून होणार नाहीं, गांवांनीं च करायला हवी.

त्यासाठीं खेडेगांवचे लोक ठरवितील तर वस्तूचे भाव गांवापुरते स्थिर राखतां येतील. मी ही खादी वापरतों. कापसाचा भाव वर गेला खालीं आला पण या खादीचा भाव बदलला नाहीं. कारण आम्ही कापूस पेरण्यापासून खादी विणण्यापर्यंतचें सर्व काम आमच्या आश्रमांत च करतों व ती च खादी वापरतों. हल्लीं इथल्या खेडयांच्या कापसाचा भाव अमेरिकेंत ठरतो. मग शेतकरी म्हणतात भाव घसरला. कां घसरला? कारण तो धरला म्हणून घसरला. तुमचा लाख मोलाचा मुलगा जर तुम्हीं बाजारांत आणला आणि लोक त्याचे दात पाहून त्याची किंमत८० रुपये करूं लागले तर तुम्ही म्हणाल कीं आमचा लाख मोलाचा मुलगा याची इतकी कमी किंमत? म्हणून मी सांगत असतों कीं तुम्ही तुमचा माल बाजारांत नेऊन आपली शेंडी दुसऱ्याच्या हातांत देऊं नका. कारण बाजार कोणाच्या हातांत नाहीं.

## मथुरेंत पैसा आहे तर कंस हि आहे

आमच्या अनुभवी पूर्वजांनीं सत्याला सर्व श्रेष्ठ मूल्य दिलें आणि राम हा त्याचा अवतार मानला. सत्यानंतर प्रेमाला मूल्य दिलें व त्याचा अवतार कृष्ण झाला. कृष्णावतारांत प्रेम प्रकट झालें. आज पार्टी, जाति, धर्म, पंथ

इत्यादि भेदांमुळें आमचें प्रेम होत नाहीं. दहा तोंडाच्या रावणाच्या गोष्टी आपण ऐकतों परंतु हा भेदासुर तर सहस्र तोंडाचा आहे, त्याला नाहींसें केलें पाहिजे. गोकुळांत प्रेम प्रकट झालें आणि आजपर्यंत हिंदुस्थानांत गोपालकृष्णाच्या लीला गाइल्या जातात व भागवतासारखा ग्रंथ नाहीं असें मानलें जातें. कृष्णानें सगळ्या घरांतलें दही, लोणी, भाकऱ्या वगैरे एकत्र करून सर्व बालगोपालांना वांटून खाल्लें. कृष्ण नवनीत खात होता व सर्वांना खायला घालीत होता. "नवनीताहारं कैवल्यंभुवनाहारं "असें त्याचें वर्णन केलें आहे. नवनीत म्हणजे आजचें ताजें लोणी, बटर नव्हे. आधुनिक विज्ञान सांगतें कीं तुम्ही लोणी जितक्या लवकर खाऊन टाकाल तितकें चांगलें. खाण्याला जितका उशीर होईल तितकीं त्यांतील जीवनतत्त्वें नाहींशीं होतील. लोणी कांहीं शहरांतल्या चौथ्या मजल्याच्या गच्चीवर तयार होत नाहीं, तें खेड्यांत तयार होतें. पण खेड्यांतले लोक तें लोणी न खातां पैशाच्या लोभामुळें शहरांत जाऊन विकतात. पैशाला महत्त्व दिल्यामुळें गांवांतून प्रेम गेलें आहे. यशोदा आणि कृष्णाचा नेहमीं हा च वाद चालायचा. यशोदा म्हणायची लोणी मथुरेंत नेऊन विकलें पाहिजे. कृष्ण म्हणायचा कीं आधुनिक अर्थशास्त्र सांगतें लोणी हें गांवांतल्या गांवांत च खाल्लें पाहिजे, तदनुसार आम्ही खाणार. मथुरेंत लोणी विकल्यानें पैसा मिळेल असें यशोदा म्हणायची तर कृष्ण म्हणायचा कीं मथुरेंत पैसा आहे तसा तिथें कंस हि आहे. तुला कंस मामा हवा का ? मथुरेच्या पैशाचा लोभ राखाल तर कंसाचें राज्य पतकरावें लागेल. हिंदुस्थानांत प्रेमाला टिकवायचें असेल तर पैशापासून मुक्त होऊन खेड्याखेड्यांत ग्रामस्वराज्य स्थापलें पाहिजे.

## करुणा कृतींत नाहीं

आमच्या अनुभवावरून आम्हीं तिसरें मूल्य करुणा हें ठरविलें आहे. करुणेचा अवतार म्हणजे बुद्ध भगवानाचा अवतार होय. याप्रमाणें एकामागून एक अवतार झाले. भारतांत निष्ठुर लोक फार थोडे सांपडतील परंतु निष्ठुरपणाची कृति मात्र सर्वत्र चालली आहे. हृदयांत निष्ठुरता नाहीं पण कृतींत आहे याचें कारण आम्हीं श्रमाला महत्त्व न देतां पैशाला दिलें आहे, त्यामुळें करुणा आटत चालली आहे. दया करुणा कृतींत आणण्याकरतां मालकी

सोडली पाहिजे. इंग्रजांची व राजे महाराजे यांची मालकी टिकूं शकली नाहीं; तर इतरांची मालकी आतां टिकणार आहे का? मालकीला खरोखर च कांहीं नीतीचा आधार असता तर टिकली असती.

सत्य प्रेम करुणा हीं आपल्या देशाचीं तीन अमूल्य रत्नें आहेत. त्यांचें मूल्य सांगण्याकरतां आम्हीं एकामागून एक असे तीन अवतार रचले आहेत. तीं मूल्यें टिकवायचीं असतील तर ग्रामस्वराज्याशिवाय गति नाहीं. मला तरी या तीन मूल्यांइतकी दुसरी कोणती हि गोष्ट महत्त्वाची वाटत नाहीं. त्यासाठीं ग्रामस्वराज्याशिवाय दुसरा कोणता हि विचार मला दिसत नाहीं. हिंदुस्थानांत वेदान्त चर्चा इतकी चालते कीं त्याला कांहीं अंत नाहीं. आतां त्या वेदांताचा अंत करायला हवा. तुकाराम महाराज म्हणतात **"अवघें झालें ब्रह्मज्ञान परी मेळवण बहु माजीं "** ब्रह्मज्ञानामध्यें इतकी भेसळ झाली आहे कीं स्वच्छ निर्मळ असें कांहीं उरलें च नाहीं अशी तक्रार तुकाराम महाराज करतात. माझ्या मतें समाजामध्यें सत्य, प्रेम आणि करुणा यांची प्रतिष्ठा झाल्याशिवाय समाजाची पारमार्थिक उन्नति तर होणार नाहीं च पण ऐहिक उन्नति देखील होणार नाहीं. म्हणून सात वर्षांपासून मी सतत हिंडतों आहें. हृदय करुणेनें भरल्याशिवाय हा आटापिटा होऊं शकत नाहीं. ग्रामस्वराज्य झाल्याशिवाय समाज सुखी होणार नाहीं हें मला स्पष्ट दिसत आहे म्हणून माझें हृदय तळमळतें आहे.

उंबरखेडें, (पूर्व-खानदेश) ता. १०-८-५८

## गीता-प्रवचनाच्या जन्मस्थानीं : ११ :

[धुळें जेलमधील कैद्यांसमोरील भाषण]

माणसाच्या जीवनामध्यें अनेक कामें होतात आणि अनुभव अनेक येतात. परंतु सगळीं च कामें आणि सगळे च अनुभव माणूस लक्षांत ठेवीत नाहीं, ते त्याच्या लक्षांत रहात हि नाहींत. परंतु कांहीं कामें आणि कांहीं अनुभव असे असतात कीं माणसानें ते विसरायचें म्हटलें तरी त्याला विसरणें शक्य नसते.

१९३२ सालीं आम्ही या जेलमध्यें होतों. त्या वेळीं येथें सुमारे ३०० स्वराज्याचे कैदी होते. त्या प्रत्येकाशीं माझा अगदीं व्यक्तिगत परिचय झाला होता. म्हणजे माझ्या स्वभावांत जी गोष्ट नाहीं असें सगळ्यांना माहीत होतें त्याच्या अगदीं उलटी गोष्ट तेथें झाली. जेलमधील प्रत्येकानें आपल्या जीवनांतल्या अगदीं लहानसहान गोष्टी सुद्धां मला ऐकविल्या व मीं त्या ऐकल्या.

### रणांगणावर सांगितलेलीं गीता-प्रवचनें

साने गुरुजींनीं गीताप्रवचनें लिहून घेतलीं हा त्यांचा जगावर फार मोठा उपकार आहे. त्यावेळीं कोणाला हि कल्पना नव्हती कीं हीं जेल-मधें दिलीं जात असलेलीं प्रवचनें सबंध देशांत सगळ्या भाषेंत पसरतील. परंतु जी गोष्ट ईश्वराला करायची असते ती च होत असते. नाहींतर जेलच्या जीवनांत निश्चितता कांहीं च नसते. कोणाला हि केव्हां हि कोठें हि पाठविलें जाते. सरकार मला कोठें हि पाठवूं शकत होते व साने गुरुजींना हि पाठवूं शकत होते. मधून मधून याप्रमाणें माणसांना हलविले हि गेले. परंतु मला किंवा साने गुरुजींना हलविले गेले नाहीं आणि या ठिकाणीं सबंध गीताप्रवचनें झालीं. भगवद्‌गीता कुरुक्षेत्राच्या रणांगणावर सांगितली गेली म्हणून त्या गीतेला एक विशेष स्वरूप आलें तें दुसऱ्या कोणत्या हि ग्रंथाला आलें नाहीं. भगवंतानीं च पुन्हां दुसऱ्यांदा गीता सांगितली ती

अनुगीता या नांवानें प्रसिद्ध आहे परंतु भगवद्गीतेमधें जी जादू आहे ती त्यामध्यें नाहीं. त्या च प्रमाणें मीं जर स्वतंत्र रीतीनें गीतेवर व्याख्यानें दिलीं असतीं किंवा कांहीं लिहिलें असतें तर आजच्या गीता-प्रवचनामधें जी जादू दिसते ती त्यांत दिसली नसती. अगदीं कुरुक्षेत्राचें रणांगण आहे आणि त्यांत आम्ही सगळे सैनिक आहोंत अशी आमची भावना होती. आम्ही एका युद्धांत येथें आलों होतों आणि गीताप्रवचनें युद्धांतील सैनिकांच्या समोर सांगितलीं गेलीं आहेत. ज्यांनीं तीं प्रवचनें ऐकलीं ते त्याची कधीं हि आठवण विसरूं शकणार नाहींत.

## जेलच्या गोड आठवणी

त्यावेळीं सबंध जेल माझ्या हातांत होता. जेलमधील सगळी शिस्त जर मीं माझ्या हातांत घेतलीं नसती तर तिथें कांहीं हि शिस्त राहिली नसती. लोक बंडखोर होते व हट्टाला पेटले होते त्यामुळें कोणी कोणाचें ऐकत नव्हते. परंतु स्वराज्याच्या शिपायांकडून स्वराज्याची शिस्त म्हणून मी २१ पौंड पीठ रोज दळून घेत असे. त्या वेळीं ३५ पौंडाचा टास्क होता. परंतु मी जेलच्या अधिकाऱ्यांना म्हणालों कीं हे लोक एवढा टास्क करणार नाहींत. तुम्ही दंडाबेडी घातली तरी हि कोणी ऐकणार नाहीं परंतु जेलच्या अधिकाऱ्यांनीं तें मान्य केलें आणि ज्या कैद्यांना साधी सजा झाली होती त्यांच्याकडून सुद्धां मीं २१ पौंड दळून घेतलें. त्यावेळीं जेलची रसोई पण माझ्या हातांत होती आणि उत्तम उत्तम माणसें त्या कामाला लागलीं होतीं. डाळ शिजवितांना आम्ही घोटत असूं. जितका वेळ ती शिजायची तितका वेळ ती घोटली जायची त्यामुळें सर्वांना त्या डाळीची आठवण राहिली. ती डाळ इतकी सुंदर बनायची कीं या जेलमधील लोक म्हणत कीं येथें जशीं गीतेवरचीं प्रवचनें झालीं तशीं दुसरीकडे ऐकायला मिळालीं नाहींत आणि येथें जशी डाळ खाल्ली तशी दुसरीकडे खायला मिळाली नाहीं. त्यावेळीं आमच्यांतले फक्त १०-१२ लोक 'फिके' म्हणजे मिर्ची न खाणारे होते व बाकी सगळे 'तिखे' होते. परंतु हळूं हळूं परिणाम असा झाला कीं जितके स्वराज्याचे शिपाई होते ते सगळे फिके बनले आणि आमची ३०० लोकांची एक च पंगत बसूं लागली. नंतर दुसरे कैदी म्हणाले कीं आम्हांला पण

जेवण पाहिजे तेव्हां त्यांच्यातले हि ५-५० लोक आमच्या पंगतींत येऊन बसूं लागले. परंतु पुढें जेलरनें मला सांगितलें कीं या कैद्यांचें आरोग्य राखण्यची जबाबदारी आमच्यावर असते. त्यांना किती रेशन द्यायचें तें ठरलेलें असतें. त्यांत अमुक अमुक इतकी मिर्ची द्यायची असते, तेव्हां तुम्ही हें काम घेऊं नका. त्यामुळें मी त्या दुसऱ्या कैद्यांना म्हणालों कीं घरीं गेल्यावर तुम्ही फिके व्हा, इथें तुमचें तिखेपण चालूं द्या.

## धाडशी जेलर

गीता-प्रवचनें पुरुष कैद्यांसमोर होत होतीं तेव्हां स्त्री कैद्यांनीं मागणी केली कीं आम्हांला हि प्रवचनें ऐकण्याची संधि मिळावी. पुरुष कैद्याला स्त्री कैद्यांमध्यें जाण्याची परवानगी कधीं हि मिळत नसते. परंतु त्या वेळचे वैष्णव नांवाचे जेलर म्हणाले कीं विनोबांची गणना पुरुषांप्रमाणें स्त्रियांत हि करायला हरकत नाहीं. असें म्हणून त्या धाडशी जेलरनें मला स्त्री कैद्यांसमोर प्रवचनें देण्याची परवानगी दिली. मी त्यांना म्हटलें तुम्ही स्वतः त्या वेळीं हजर रहा. त्या प्रमाणें ते स्वतः यायचे आणि बरोबर आपल्या पत्नीला हि आणायचे. अशा रीतीनें स्त्रियांमध्यें आठवड्यांतून एकदां प्रवचनें सुरू झालीं. मग दुसऱ्या सामान्य कैद्यांनीं पण मागणी केली कीं आम्हांला हि विनोबांचीं प्रवचनें ऐकायला मिळावीं. जेलरनें मला विचारलें कीं तुम्ही तयार आहांत का? मी म्हणालों, रविवारचा दिवस सोडून दुसऱ्या कोणत्या हि दिवशीं तुम्ही त्या कैद्यांना एक तास सुटी द्याल तर मी त्यांना कांहीं सांगेन. त्या चळवळीच्या काळांत हि त्या बहादुर जेलरनें बुधवारीं एका तासाची सुट्टी देऊन माझीं प्रवचनें करविलीं. त्यांतले कांहीं कैदी बगीच्यांत काम करीत असत. ते प्रेमानें फुलांच्या माळा करून आणीत व मला देत. त्यांत कांहीं फाशीचे हि कैदी होते त्यांना पण जेलरनें प्रवचनें ऐकायला येऊं दिलें.

## चोर कैद्यांकडून दक्षिणा

त्या वेळीं जेलमधील सगळे वातावरण नुसत्या आध्यात्मिक भावनेनें भरून गेलें होतें. त्याच वेळीं गीताई इथें धुळ्याला छापली जात असल्यामुळें मी येथें प्रुफें तपाशीत असे. ज्यावेळीं मी सुटणार असें जाहीर झालें तेव्हां कैद्यांनीं सुपरिन्टेन्डेंन्टपाशीं मागणी केली कीं आम्ही श्रमानें मिळविलेल्या

पैशांतून आम्हांला दोन आणे द्या. त्यांनीं विचारलें कीं तुम्हांला पैसे कशाला हवेत ? कैदी म्हणाले कीं आम्हांला गीताई विकत घ्यायची आहे. सुपरिन्टेंन्डेन्ट म्हणाले की गीताईची किंमत तर एक च आणा आहे, मग दोन आणे कशाला ? त्यावर कैदी म्हणाले कीं आम्हांला ते माहीत आहे परंतु आम्हांला एका आण्याची गीताई घ्यायची आहे व एक आणा विनोबांना दक्षिणा द्यायची आहे. या प्रमाणें या जेलमधील चोर म्हणविलें गेलेल्या कैद्यांकडून मला एक एक आणा दक्षिणा हि मिळाली आहे.

चोर आणि इतर लोक असा फरक मी कधीं हि करीत नाहीं. मी असें मानतों कीं जगांत चोर कोणी च नसतो. विनाकारण कांहीं लोकांना चोर म्हणून कैदेंत टाकले जाते आणि कांहीं चोर बाहेर हि असतात पण त्यांची सावांत गणना होते. म्हणजे ते कायदेशीर चोर नसतात. मला असा अनुभव आला आहे कीं कैद्यांच्या हृदयांत खूप भक्तिभाव असतो.

## पवित्र स्थानाचें दर्शन

इतकें सगळें पवित्र अनुभव मी कधीं च विसरणें शक्य नाहीं. म्हणून च मीं येथें येण्याचें पतकरलें. नाहींतर आज मी १० मैल चालून आलों आहे. आणि येथें आलों त्यामुळें आणखी तीन मैल चालावें लागलें. पण हें सर्व मी गीता-प्रवचनाच्या स्थानाच्या दर्शनासाठीं कष्ट घेतले. गीता-प्रवचनें सांगतांना माझी काय वृत्ति होती तें मी तुम्हाला सांगूं शकत नाहीं. परंतु कांहीं शब्द परमेश्वर मनुष्याकडून बोलवून घेत असेल तर असें मानलें जाईल कीं ते सगळे शब्द परमेश्वरानें बोलविले. त्या वेळीं श्रोत्यांमध्यें जमनालालजी आणि आपटे गुरुजी होते. ते दोघे हि आतां या लोकांत नाहींत. तसेच प्यारेलालजी आणि खानदेशचीं पुष्कळ मंडळीं होतीं. हीं प्रवचनें देतांना मला असा भास होत नव्हता कीं मी बोलत आहें व ऐकणाऱ्यांना हि असा भास होत नव्हता कीं विनोबा बोलत आहे. अशा रीतीनें हें पवित्र स्थान आहे आणि म्हणून त्याच्या दर्शनाकरतां मी येथें आलों आहे. माझ्या व्याख्यानाचा लाभ मिळेल अशी तुम्ही कधींच अपेक्षा केली नव्हती. कारण तुम्ही कैदी आहात. त्याच प्रमाणें मला हि कल्पना नव्हती कीं मला येथें येऊन बोलण्याला मिळेल.

गीता-प्रवचनामुळें या जेलची आठवण सबंध भारताला होते. नुकताच मी भूदान यात्रेंत बेंगलोरला गेलों होतों. गीताप्रवचनें चालू असतांना या जेलचे सुपरिन्टेन्डेन्ट कॉन्ट्रॅक्टर नांवाचे एक पारशी गृहस्थ होते. ते आतां बेंगलोरला राहतात. ते मला भेटले आणि मोठ्या अभिमानानें म्हणाले कीं मी जर प्रवचनांना परवानगी दिली नसती तर गीता-प्रवचनें झालीं नसतीं. म्हणून गीता-प्रवचनावर माझा हक्क आहे आणि म्हणून त्यावर मला तुमचें हस्ताक्षर हवें आहे. या गीता-प्रवचनावर 'माझा हि अधिकार आहे' असें म्हणण्यांत त्यांना धन्यता वाटली आणि आपण परवानगी दिली यांत आपल्या हातून देशाची फार मोठी सेवा घडली असें त्यांना वाटलें.

मी तुम्हांला अधिक काय उपदेश करणार? तुम्ही आपलें एक वेळचें खाणें सर्वोदय-पात्रासाठीं देत आहांत. जेलमध्यें किती कठिण काम करावें लागतें तें मला माहीत आहे. आणि अशा स्थितींत तुम्ही एक वेळचें खाणें देतां यांत तुम्ही फार मोठें प्रेम प्रकट केलें आहे. मी अशी आशा करतों कीं त्यामुळें तुमच्या चित्ताची शुद्धि होईल आणि तुम्ही जेव्हां जेलमधून मुक्त होऊन बाहेर जाल त्यावेळीं अत्यंत शुद्ध व निर्मल बनून बाहेर ज़ाल आणि उत्तम नागरिकाचें कर्तव्य कराल.

धुळें (पश्चिम खानदेश) ता. १४-८-५८

# नव्या युगाचें नवें चिंतन : १२ :

[ हरिजन सेवक संघाच्या कार्यकर्त्यांसमोरील भाषण ]

## हरिजन-सेवा परमेश्वराची सेवा व्हावी

हरिजन सेवकांच्या समोर बोलण्याचा मला जेव्हां जेव्हां अवसर मिळतो तेव्हां तेव्हां माझें मन जास्त खोलांत जाऊन विचार करूं लागतें. हरिजन-सेवा अथवा जनसेवा, समाजसेवा, राष्ट्रसेवा इत्यादि नांवें आपण घेत असतों परंतु परमेश्वरसेवा हा च खरा शब्द आहे. सेवा जी करायची ती परमेश्वराची च करायची आहे आणि तशी च भावना आपल्यामधें सतत जाग्रत असायला पाहिजे. आपण जशी एखाद्या शालिग्रामची पूजा करतों म्हणजे दगडाची पूजा करीत नाहीं तर अंतर्यामी परमेश्वर त्या दगडांत आहे अशा श्रद्धेनें आणि शास्त्रानें तसें मानलें आहे म्हणून पूजा करतों, तशी च आपण जेव्हां मानवसेवा करूं तेव्हां तद्वारा आपण समाजसेवा करीत आहोंत एवढी च जाणीव न राहतां परमेश्वरसेवा करीत आहोंत अशी जाणीव निर्माण होईल. तसें नसेल तर निरनिराळ्या सेवेंतून झगडे उत्पन्न होतात, मानसिक संकोच होतो, गट पडतात, हृदय प्रवेशाची प्रक्रिया थांबते आणि मग कांहीं तरी बाहेरून घडवून आणायचें आहे इतकें च उरतें. हें माझें बोलणें हरिजन-सेवेपुरतें च नाहीं तर इतर हि सेवेबाबत आहे. माझ्या मनांत असा विचार येतो कीं दुःखी, पीडित, परित्यक्त असे जे लोक आहेत आणि त्यांची जी सेवा आम्ही करीत आहोंत ती करतांना आमची दृष्टि जर व्यापक नसली तर आम्ही दुसऱ्या प्रकारचा जातीभेद निर्माण करूं. मुलाच्या नाकाला शेंबूड पाहून आई त्याचें नाक धुते तेव्हां ती असें नाहीं समजत कीं मी फक्त त्या नाकाची सेवा करीत आहें तर ती असें समजते कीं मी मुलाची सेवा करतें आहे, आणि या मुलाचा एक अंश जें नाक तें बिघडलेलें आहे म्हणून त्याची सेवा करतें आहे. त्याच प्रमाणें हरिजनसेवा ही सबंध समष्टीची सेवा आहे, त्यांतला हरिजन हा भाग पीडित आहे म्हणून आपण त्याची सेवा

हातीं घेतली बाकी आपण विश्वाचे व विश्वेश्वराचे सेवक आहोंत अशी च आपली भूमिका असली पाहिजे.

## वैज्ञानिक दृष्टीनें प्रश्न सोडवा

मी अलिकडे सतत सांगत असतों कीं या विज्ञानयुगांत मन काम करणार नाहीं. मनाच्या भूमिकेवर राहून आजवर ज्या समस्या उत्पन्न झाल्या आणि मनाच्या भूमिकेवर राहून च त्या सोडविण्याच्या ज्या युक्त्या आपण केल्या त्या युक्त्या आतां कामाच्या नाहींत. त्यानें समस्या सुटणार नाहींत हे ध्यानांत घेऊन हि जर आपलें मन जुन्या काळांत च रेंगाळत राहिलें तर आपला टिकाव लागणार नाहीं. मध्ययुगांतील जुन्या, इतिहासानें बांधलेल्या मनानें आपण प्रश्नाकडे बघतों त्यामुळें एक लहानसा संकुचित तुकडा समोर उभा राहतो आणि मग आपण त्या तुकड्याचे, एका खंडाचे पूजक बनतों, अखंडाचे पूजक बनत नाहीं. मग समस्या सुटण्याऐवजीं समस्यांचा घोटाळा होतो असे मीं अनेक ठिकाणीं पाहिलें आहे. उदाहरणार्थ भाषावर प्रांतरचनेचा प्रश्न घ्या. तो विचार चांगला आहे परंतु आपण त्या प्रश्नाकडे ऐतिहासिक मनाच्या भूमिकेंतून च पाहतों आणि म्हणून विज्ञानयुगाला न शोभणारी प्रक्रिया आपण त्या समस्या सोडविण्याकडे लावतों. त्यामुळें मार खाण्यापलीकडे त्यांत कांहीं हि उरत नाहीं. हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे हें अगदीं योग्य च आहे परंतु त्याचा विरोध करणारे ज्या बुद्धीनें विरोध करतात आणि त्याचा पुरस्कार करणारे ज्या बुद्धीनें पुरस्कार करतात त्या दोन्ही बुद्धि अवैज्ञानिक आहेत. व्यापक बुद्धीनें विचार केला तर सबंध मानवता एक च आहे आणि मानवतेच्या विकासाची दृष्टि ठेवून च आपण हिंदीकडे व प्रांतरचनेकडे पाहिलें पाहिजे.

## जुन्या व नव्या मतांच्या भिन्न भूमिका

एकानें मला विचारलें, स्वराज्य आलें आणि अजून हि ईसवीसन चालला आहे मग त्या स्वराज्याचा अर्थ काय ? मीं उत्तर दिलें कीं नुकताच आपल्या सरकारनें शक सुरू केला आहे पण तो कांहीं चालत नाहीं, पण एक सुधारणा म्हणून सरकारनें तो मान्य केला आहे. सूर्याला अनुसरून ज्योतिषशास्त्राप्रमाणें त्यांनीं तो बनविला आहे. परंतु मी विचार करतों तेव्हां लक्षांत यतें कीं

90269

ईसवीसन हा एक च असा सन आहे कीं जो संतपुरुषाच्या नांवान चालला आहे. बाकीचे सगळे सन आणि शक जरी आदरणीय कारणांमुळें निघालेले असले तरी ते संत पुरुषाच्या नांवानें निघालेले नाहींत ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. शिवाय ईसवीसन सबंध जगांत चालतो तर मग तो भारतांत च कां नसावा ? मी हिंदु असून हि ख्रिस्तासारख्या एका पूजनीय संताच्या नांवानें चाललेला आणि साऱ्या जगांत प्रचलित असलेला सन काढून टाकायला माझें मन तयार नाहीं. शालिवाहन, विक्रमादित्य यांचीं नांवें जरी मला आदरणीय असलीं तरी त्यांच्या नांवानें चालणारे शक आज जगांत चालत नाहींत. शिवाय ते राजे होते संतपुरुष नव्हते. इत्यादि माझे विचार मी त्या माणसाला पटवूं शकलों नांहीं. मी त्याच्यापुढें हार खाल्ली व त्याला म्हटलें कीं हा तुझ्या व माझ्या मनांतला फरक आहे तो फरक जोंवर कायम आहे तोंवर तूं आपला विचार मला समजावून सांगूं शकत नाहींस व मी हि आपला विचार तुला पटवूं शकत नांहीं. तूं तुझा विचार मला आज समजावून सांगूं शकत नाहींस च पण उद्यां हि समजावून सांगूं शकणार नाहींस उलट माझी खात्री आहे कीं मी माझा विचार जरी तुला आज पटवूं शकत नसलों तरी उद्यां जरूर पटवूं शकेन.

## चांगलेपणा हि संकुचित झाल्यास मारक बनतो

विचाराची ही जी दृष्टि असते, जिला मी उपाधीरहित दृष्टि म्हणतों. ती दृष्टि आली म्हणजे चिंतन वेगळ्या प्रकारानें होतें आणि लहानशा उपाधीमध्यें जो विचार करतो त्याचें चिंतन वेगळ्या प्रकारानें चालतें. उदा० मराठी भाषेंत राष्ट्रगीतें रचलीं म्हणजे त्यांत अशोकाचें व बुद्धाचें नांव घालीत नाहींत तर ज्ञानदेव-तुकारामादि महाराष्ट्रीय संतांचीं नांवे घालतात. परंतु आपलें मन असें असलें पाहिजे कीं ज्ञानदेव, तुकाराम, अशोक, बुद्ध, ख्रिस्त, सॉक्रेटिस हे सगळे आमचे च आहेत. परंतु जुनें मन सांगूं लागतें कीं हें कांहीं आमचे नाहींत. आमच्या प्रांतातलें चांगले लोक तेवढे च आमचे आहेत. एवढें खरें कीं आपल्या प्रांतांतले च कां होईनात पण चांगल्या लोकांचीं नांवें घेतात, द्वाड लोकांची घेत नाहींत. माझ्या मानसिक विकासाला ज्ञानेश्वरी पुरेशी आहे असें जर कोणी म्हणेल तर मी तें समजूं शकतों पण राष्ट्रगीत

रचतांना आपल्या च प्रांतातलीं चांगलीं माणसें निवडून त्यांच्यावर राष्ट्रगीत रचीन तर दुसऱ्या प्रांतांत व देशांत झालेलीं चांगलीं माणसें आपलीं नव्हेत असा त्याचा अर्थ होता. असें जें मन विचार करूं लागतें तें प्रथम चांगलेपणाचा विचार करते पण मागून वांकडें बनतें. संकुचित चांगलेपणा वाकडा बनतो, वाईटपणा होतो. चांगलेपणा ही गोष्ट जरी जीवनदायी असली तरी संकुचित-पणामुळें ती मारक होते. ज्या प्रमाणें पाणी जीवनदायी आहे तरी पण तें सांचलें तर विषारी, मारक बनतें, जीवनदायी राहत नाहीं त्यांतून अनेक प्रकारचे रोग उत्पन्न होतात त्याप्रमाणें चांगलेपणा जरसंकुचित असेल तर तो मारक होतो. म्हणून सबंध विश्वांतला चांगुलपणा घ्यायचा अशी दृष्टि असावी.

## हरिजनांची उन्नति आजच्या पद्धतीनें होणार नाहीं

हें मी हरिजनसेवकांसमोर सांगतों याचें कारण हरिजनसेवकांनीं पूर्वींच्या संतांची दृष्टि घेतली नाहीं. त्यांनीं कांहीं हरिजनांना शिष्यवृत्त्या मिळवून दिल्या, कांहींना चांगल्या नोकऱ्या मिळवून दिल्या आणि कांहीं हरिजन माणसें पार्लमेंटांत पाठविलीं एवढ्यानेंच हरिजनांची खरोखर उन्नति होईल का ? तुकाराम महाराज म्हणत असत कीं जो पंढरपूरला गेला तो पुन्हां परत येत नसतो. "**तुका पंढरीसी गेला पुन्हां जन्मा नाहीं आला। तेथें जाऊं नका कोणी गेले नाहीं आले परतोनी**" तसेंच मी विनोदानें म्हणत असतों कीं दिल्लीला कोणी जाऊं नका. कारण एकदां माणूस तेथें गेला कीं तो परतून कांहीं येत नाहीं. तिथें एकदां तो जाऊन बसला कीं तो मोठ्या लोकांत गेला. मग त्याचा इतर हरिजनांशीं काय सबंध राहिला ? ज्या प्रमाणें श्रीकृष्ण मोठा असून हि गवळ्यांच्या बरोबर राहून शेणांत हात घालीत असे, द्वारकेला गेल्यानंतर हि तो जेव्हां मधून मधून गोकुळांत यायचा तेव्हां पुन्हां शेणांत हात घालण्याचें आपलें काम करायचा; त्यामुळें तो गवळ्यांचा उद्धार करूं शकला. असा कोणी असेल तर च तो हरिजनांचा उद्धार करूं शकेल. भावार्थ असा कीं हरिजनांना नुसत्या शिष्यवृत्त्या, नोकऱ्या मिळवून देऊन, त्यांच्याकरतां हॉटेलें उघडीं करवून काम होणार नाहीं. यापेक्षां वेगळ्या च भूमिकेरून हें काम व्हायला हवें. आपल्यांतल्या च कांहीं लोकांना दूर सारणें म्हणजे समाजाची फार मोठी हानि आहे असें समाजाला भासलें पाहिजे.

## आतां काळ बदलला आहे

पंढरपूरला मी असें म्हणालों असतों कीं मी एकटा च देवळांत जाणार, तर तें शोभलें असतें का ? माझ्या बरोबरच्या दुसऱ्या धर्माच्या लोकांना म्हणालों असतों कीं आपण भजनांत एक होऊं या पण देवळांत मात्र एकत्र जाऊं शकत नाहीं तर तें योग्य झालें असतें का ? शेंवटीं पंढरपूरचें मंदिर सर्वांकरतां उघडलें आणि तेथें फार मोठा आनंद झाला ही गोष्ट वेगळी पण कांहीं लोकांनीं त्या बाबत हि माझ्यावर टीका केली आहे. आश्चर्याची गोष्ट अशी कीं कांहीं जुन्या गांधीवाद्यांनीं पण टीका केली. ते म्हणाले कीं गांधीजी फक्त हरिजनांना मंदिरप्रवेश असावा याबाबत आग्रह धरीत असत, इतर धर्मियांच्या प्रवेशाबाबत ते कांहीं म्हणत नसत. मी उत्तर दिलें कीं गांधीजी काय करीत असत व काय करीत नसत याबाबत जसे हे लोक सांगतात तसे मी पण सांगूं शकतों पण मी तें सांगणार नाहीं, मला तें योग्य वाटत नाहीं. मी जें कांहीं करतों त्या सर्वांच्या पापपुण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. जगन्नाथपुरीला जेव्हां मी माझ्या सोबतच्या फ्रेंच महिलेला मंदिरांत प्रवेश मिळत नाहीं म्हणून मीं हि मंदिरांत जायचें नाकारलें तेव्हां कांहीं लोक म्हणाले कीं गांधींजी जे करीत होते त्यापेक्षां हें जास्त झालें. मी त्यांना म्हटलें कीं गांधींजींपेक्षां हें करणें जास्त झालें कीं कमी असा विचार का करता ? तुम्ही एवढें च लक्षांत घ्या कीं स्वराज्यापूर्वीं आपण हिंदुस्थानांत होतों आणि आतां आपण जगामध्यें आहोंत. पूर्वीं विश्वाच्या नकाशांत हिंदुस्थानचा लाल रंग असे कारण इंग्लंडचा तो रंग होता, आम्हांला स्वतःचा रंग नव्हता. तेव्हां हिंदुस्थान विश्वाच्या नकाशांत गैरहजर होता. त्यामुळें आम्ही त्यावेळीं जें कांहीं करीत होतों त्याला एक मर्यादा होती, परंतु आतां आम्ही विश्वामध्यें आलों आहोंत म्हणून आतां दुसरी भूमिका घेतली पाहिजे.

## समाजरक्षण व समाजसुधारणेची रीत बदलायला पाहिजे

२५ वर्षांपूर्वीं हरिजन-सेवेच्या कार्याला ज्या रीतीनें आरंभ झाला ती रीत आतां मुळींच लागू पडणार नाहीं. आपल्याला यापुढें दोन गोष्टी ध्यानांत घ्यायला हव्यात. (१) देश स्वतंत्र झाल्यानंतर भारताची गणना विश्वामध्यें झाली आहे आणि (२) अणु शस्त्रांचा शोध लागला आहे. माझें हें

दुसरें विधान ऐकून तुम्हांला आश्चर्य वाटेल कीं हरिजनसेवेचा, अस्पृश्यता निवारणाचा अणु शस्त्रांशीं संबंध काय? परंतु आपण हें लक्षांत घ्यायला पाहिजे कीं अणु शस्त्रें दुसऱ्या सर्व छोटया शस्त्रांना बेकार बनवितात. शिवाजीनें किल्ले बांधले तसे किल्ले आतां तुम्ही बांधाल तर बॉम्ब खालीं पडायला अधिक सोपें जाईल. या अणु युगांत जुनीं सगळीं अवजारें बेकार झालीं आहेत. म्हणून आतां आपलें शस्त्रास्त्राविषयींचें चिंतन बदललें पाहिजे. आतां समाजरक्षणाची पूर्वींची योजना चालणार नाहीं. पूर्वीं अनियंत्रित हिंसेला आळा घालण्याकरतां नियंत्रित दंडशक्ति हा उपाय समाजानें योजला होता. आतां नियंत्रित दंडशक्ति राक्षसी बनली आहे, तिनें संहारक रूप धारण केलें आहे. त्यामुळें समाजाची रक्षणशक्ति वाढविण्याची गरज भासूं लागली आहे. त्या च प्रमाणें समाजसुधारणेची पण रीत बदलली पाहिजे. हा हरिजन आहे याला मंदिरांत प्रवेश द्या असें म्हणणें आतां चालणारें नाहीं. तर हा मनुष्य आहे म्हणून याला मंदिरांत प्रवेश द्या असें म्हटलें पाहिजे. घोडयाकडे पाहून आम्ही त्याला जात विचारीत नाहीं. तो घोडा आहे हें पाहून च कळतें. त्याप्रमाणें आतां जाति नाहींत च असें समजून वागावें. मनुष्याला मनुष्य या नात्यानेंच ओळखावें.

## हरिजन म्हणून नव्हे मानव म्हणून देवळांत जावें

हरिजनांच्या प्रश्नाकडे आतां आपण जास्त व्यापक दृष्टीनें पाहिलें पाहिजे. किरकोळ हक्कांपेक्षां आपण सारे मानव आहोंत आणि बाकीचे भेद नाहींत च असें समजून वागायला हवें; आणि असें वागतांना जें सहन करावें लागेल तें सहन करायला हवें. समजा एखाद्या मंदिरांत हरिजनांना प्रवेश नाहीं तरी हरिजनांनीं खुशाल तेथें जावें, मात्र हरिजन म्हणून नव्हे तर मानव म्हणून जावें. मी हरिजन आहें आणि म्हणून मी मंदिरांत येतों असें म्हणणें म्हणजे माझा हक्क प्रस्थापित करण्याकरतां येतों, असा त्याचा अर्थ झाला. परंतु तसें न करतां सरळ मानव म्हणून मंदिरांत जावें. समजा एखाद्यानें ओळखलें कीं हा महार आहे आणि त्यानें डोकें फोडण्याकरतां काठी हातांत घेतली तर आपण डोकें फोडून घ्यायला तयार व्हावें. महार म्हणून डोकें फोडून घ्यायला तयार न होता मानव म्हणून

डोकें फोडून घ्यायला तयार व्हावें. अशा रीतीनें तुम्ही अगदीं प्रलयंकारी हलकल्लोळ सुरू करा आणि जातिभेद तोडून टाका.

## हरि-सेवक व्हा

यापुढें हरिजनसेवेचें क्षेत्र व्यापक करा आणि जुन्या संतांची भूमिका घ्या, म्हणजे त्यामधें किरकोळ हक्क मिळविणें आपोआप च साधेल. आजच्या युगांत संकुचितपणा मुळीं च टिकणार नाहीं. म्हणून व्यापक बुद्धि घ्या व आम्ही हरिजन-सेवा करतों असें न म्हणता आम्ही दु:खितांची सेवा करतों असें म्हणा. दु:खितांमधें हरिजन असतील तर त्यांची हि सेवा होऊन जाईल, परंतु आम्ही जी सेवा करतों ती ज्यांना सेवेची गरज आहे अशांची करतों अशी आमची भूमिका असली पाहिजे. अलिकडे भूदान कार्यकर्ते सुद्धां संकुचित बनत चालले आहेत. ते भूदान आणि ग्रामदानाशिवाय दुसरें कांहीं बोलत च नाहींत. मी अनेकदां सांगितलें आहे कीं आपण खेड्यांत गेल्यावर कोठें घाण दिसली तर ती साफ करावी, कोणी रोगी दिसला तर त्याची सेवा करावी. हें सारें केलें नाहीं तर 'हा ग्रामदानी आला, हा काय बोलणार तें आम्हांला माहीत आहे' असें लोक म्हणतील. अशा रीतीनें आमच्या ज्ञानाचा ठाव लोकांना लागतां कामा नये. महाभारतांतलें मुख्य पात्र कोणतें हें सांगणें कठिण आहे. त्यांतलें मुख्य पात्र कोणतें असें विचारलें तर कोणी अर्जुनाचें नांव घेईल तर कोणी कृष्णाचें, धर्मराजाचें नांव घेईल. कोणी भीष्माचें तर कोणी द्रौपदीचें नांव घेईल. या प्रमाणें अनेकांचीं अनेक मतें होणार आणि प्रत्येक मतवाल्याला आपल्या मताच्या समर्थनार्थ महाभारतांत भरपूर मसाला मिळणार. म्हणून च त्या ग्रंथांतून अनेकांना बोध मिळतो. परंतु समजा अमुक एक निश्चित बोध असेल तर तशा ग्रंथांतून अनेकांना बोध मिळणार नाहीं. म्हणून तुम्ही हरिजन-सेवक या नात्यानें जाल तर लोक म्हणतील कीं हा भंगी आला, याच्या बोलण्याचा विषय एक च असणार. म्हणजे तुमचें पाणी लोकांनीं ओळखलें. त्यामुळें तुम्ही कुंठित व्हाल. म्हणून आम्ही हरि-सेवक आहोंत अशी आपली भूमिका ठेवा. आम्ही तऱ्हेतऱ्हेचीं व्याख्यानें देणार व तऱ्हेतऱ्हेची सेवा करणार अशी आमची व्यापक बुद्धि असली पाहिजे.

धुळें, पश्चिम खानदेश ता. १४-८-५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ३५८७२०..... वि: ....
नों. दि. २०।१२।४३

# स्वातंत्र्यदिनाचें चिंतन



## भारतीय शरिरांत तणाव आहे

आज १५ ऑगस्ट म्हणजे स्वातंत्र्य दिन आहे. ११ वर्षांपूर्वी आपल्याला स्वातंत्र्य मिळालें. तसा हा देश फार जुना आहे. वेदापासून आतांपर्यंत कमींतकमी दहाहजार वर्षांची संस्कृति येथें आहे. तेव्हां आमच्या स्वातंत्र्याला ११ च वर्षें झालीं म्हणून कांहीं आम्ही अनुभवानें लहान आहोंत असा त्याचा अर्थ नाहीं. येथें अनेक साम्राज्यें आलीं आणि गेलीं. इतकें असून हि येथील संस्कृति अशी कांहीं चिवट आणि चिकट आहे कीं ज्यामुळें ती टिकून राहणार, दिवसेंदिवस तिचा जोर वाढणार. कवीनें म्हटलें आहे: "**यूनानो मिस्रो रूमा, सब मिट गये जहांसे। अवतक मगर है बाकी नामो निशाँ हमारा**" इजिप्त, ग्रीस, रोम हीं साम्राज्यें जगांतून नाहींशीं झालीं पण भारताची जी विशालता प्राचीन काळांत होती ती आज हि कायम आहे कारण ह्या भारत शरिरांत कांहीं तरी तणाव, चिवटपणा आहे. तो कोणता आहे हें ओळखलें पाहिजे.

## स्वातंत्र्यदिनाशीं निगडित पवित्र स्मरणें

आज श्री अरविंदांचा जन्मदिन आणि महादेवभाईंचा मृत्युदिन आहे. महादेवभाईंचें बलिदान स्वराज्याच्या कार्यांत झालें तें सर्वांना माहीतच आहे. या धुळें शहरांत त्यांचें स्मारक हि आहे. धुळेकरांनीं हौस बाळगली तर स्वराज्याची व सर्वोदयाची साधना कशी करायची याचें शिक्षण मिळण्याची एक सुंदर योजना महादेवभाई स्मारक भवनांत होऊं शकतें. दुसरें स्मरण अरविंदांचें. आज श्री अरविंदांचा जन्मदिन आहे. ही कांहीं आकस्मिक घटना नाहीं असें त्यांच्या आश्रमचे लोक समजतात. श्री अरविंदांनीं स्वराज्यासाठीं तळमळीनें काम केलें आणि नंतर जेव्हां त्यांना खात्री पटली कीं स्वराज्य होणार च आहे तेव्हां स्वराज्यानंतर काय साधना करायची याकडे त्यांचें लक्ष वेधलें आणि पांडीचेरीला त्यांनीं ४० वर्षें तपस्या करून नवीन योगशास्त्र रचलें. ही हिंदुस्थानच्या गौरवाची गाथा अर्वाचीन

इतिहासांत एक संस्मरणीय वस्तु आहे. अशीं पवित्र स्मरणें या स्वातंत्र्य-दिनाशीं जोडलीं गेलीं आहेत.

## भारतीय अग्रणींचा न्यारा पंथ

भारताच्या स्वराज्यप्राप्तीचा हा जो इतिहास आहे त्याचें चिंतन, मनन, आकलन जसें व्हायला पाहिजे होतें तसें अनेक कारणामुळें झालें नाहीं. त्यांतलें एक कारण मी आज तुमच्यासमोर मांडतों. जेव्हां एखाद्या देशावर दुसऱ्या देशाची सत्ता येते तेव्हां त्या परतंत्र देशांतले लोक एकतर नामोहरम होऊन जातात, शिथिल मंद सुस्त होतात, निदान कांहीं वर्षें दबून तरी जातात. अथवा दुसरा मार्ग म्हणजे बंडखोर बनून उभे राहतात व राजकीय परिवर्तनाकरतां कंबर कसून लढाई बंडाळीं सुरू करतात. इंग्रजांची या ठिकाणीं जी सत्ता स्थापन झाली ती अगदीं परिपूर्ण होती. त्यांनीं या देशाचा पूर्ण कबजा घेतला, त्यांच्या संस्कृतीची छाया येथें पडूं लागली, त्यांच्या विद्येची प्रभा येथें फाकूं लागली आणि येथील लोक त्यांना पूर्णपणें वश झाले. परंतु त्या स्थितींत हि हिंदुस्थानचे लोक दबले नाहींत किंवा त्यांनीं राजकीय बंडाचा उठाव हि केला नाहीं; तर त्यांनीं कांहीं तिसरी च गोष्ट केली, जी जगाच्या इतिहासांत एक अद्वितीय घटना आहे. परंतु तिचें चिंतन मनन होत नाहीं म्हणून तिचें आकलन हि होत नाहीं. ती घटना अशी कीं पारतंत्र्य आल्यावर आमच्या देशाच्या धुरीणांचें, बुद्धिमंतांचें, नेत्यांचें लक्ष आध्यात्मिक सुधारणेकडे आणि समाज-सुधारणेकडे लागलें. राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन, देवेन्द्रनाथ टागोर, स्वामी दयानंद, न्या. रानडे हीं माणसें हिंदुस्थानांत निघालीं आणि त्यांना वाटलें कीं आपल्या समाजांत कांहीं दोष आहेत आणि तत्परिणामी पारतंत्र्य आलें आहे म्हणून प्रथम दोषनिवारण झालें पाहिजे. ते दोष नुसते सामाजिक च नव्हे तर आध्यात्मिक हि वाटले. आपली उपासना, धर्मविचार, तत्त्वज्ञान यांत च कांहीं दोष असेल म्हणून त्या सर्वांचें संशोधन करण्याच्या उद्देशानें ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज इ. चळवळी सुरू झाल्या. म्हणजे इंग्रजाची सत्ता हिंदुस्थानांत कायम झाल्यानंतर ज्या पहिल्या चळवळी झाल्या त्या आध्यात्मिक विचार करणाऱ्या होत्या ही एक

अद्वितीय घटना आहे. माझ्या माहिती प्रमाणें अशी घटना जगाच्या अन्य कोणत्या हि देशांत झालेली नाहीं. जित राष्ट्रें, दबून जाणें अथवा राजकीय बंडाळी करणें, या दोन च गोष्टी करीत असतात. परंतु इथें पारतंत्र्य आल्याबरोबर इथल्या नेत्यांना धर्मसुधारणेची, आध्यात्मिक सुधारणेची हौस वाटली आणि येथें एक आध्यात्मिक बळ संचरलें. रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, डॉ. ॲनी बेझंट, स्वामी रामतीर्थ, पं. मालवीय इत्यादि सारीं माणसें आध्यात्मिक विचारानें भारलेलीं होतीं. पुढें जरी राजकीय चळवळी झाल्या तरी त्या चळवळींत पडलेलीं जीं माणसें होतीं त्यांच्यांत आध्यात्मिक विचाराचीं अनेक माणसें होतीं. या घटना पाहिल्यावर आपल्या देशांत कोणता चिवटपणा आहे, कोणती शक्ति आहे त्याचें दर्शन घडतें. म्हणून मी हिंदुस्थानच्या १९ व्या शतकांतल्या इतिहासाकडे फार आदरानें पाहतों.

## विवेकानंदांचें अद्भुत कार्य

विवेकानंदांसारखा एक ३० वर्षांचा तरुण शिकागोला जाऊन एखाद्या मल्लाप्रमाणें दंड थोपटून उभा रहातो आणि परकीय भाषेंत एक व्याख्यान देऊन सबंध जगावर अशी छाप पाडतो कीं हिंदुस्थानांत कोणतातरी जिवंत धर्म आहे. त्या एका व्याख्यानामुळें हिंदुस्थानची इज्जत सबंध जगांत रूढ होते ही एक असामान्य घटना आहे. एका परतंत्र देशाचा एक तरुण परकीय भाषा शिकून, त्यांत प्राविण्य मिळवून, आपल्या देशाचा आणि धर्माचा विचार त्या भाषेंत मांडून, अद्वितीय यश संपादन करतो आणि वेदान्त हा सगळ्या जगाचा धर्म होणार असें जाहीर करतो यांत केवढी आध्यात्मिक निष्ठा आणि सामर्थ्य आहे याचें भान आम्हांला व्हायला पाहिजे.

## आपली दौलत ओळखा

तो आध्यात्मिक चिवटपणा ही च आमची मुख्य दौलत आहे हें आम्हीं ओळखलें पाहिजे. ही शक्ति नसती तर एक माणूस सात वर्षें भूदान मागत फिरला नसता आणि ज्याच्यामागें संस्थेचें, सत्तेचें किंवा अन्य कोणतें च पाठबळ नाहीं अशी एक व्यक्ति देशभर हिंडून तिला लाखों एकर

जमीन व हजारों ग्रामदानें मिळतात अशी घटना शक्य झाली नसती. तेव्हां हा आध्यात्मिक चिवटपणा हें आपल्या देशाचें बळ आहे, भांडवल आहे हें ओळखा. रेव्हरँड टिळकांनीं एका कवितेंत हिंदुस्थानच्या सारस्वताचा महिमा सांगितला आहे. म्हणजे हिंदुस्थानच्या १४ भाषांत जें आध्यात्मिक साहित्य प्रकट झालें आहे त्याचा महिमा सांगतांना म्हटलें आहे "**तूझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी। झालों, तरी गे तृषा मन्मनाची कधीं ही कधीं ही न होणें कमी। माते गुरुस्थान अंतीं जगाचें ...**" रेव्हरंड टिळक ख्रिस्ती झाले होते तरी हि त्यांना हिंदुस्थानविषयीं जी प्रीति होती ती त्यांच्या ख्रिस्ती धर्मामुळें कमी झाली नाहीं तर उलट वाढली च. पुष्कळांना ही गोष्ट माहीत नाहीं कीं ख्रिस्तीधर्मावर युरोपचा जितका हक्क आहे त्यापेक्षां हिंदुस्थानचा हक्क जास्त आहे. ख्रिस्तीधर्म हिंदुस्थानमध्यें येशू ख्रिस्तानंतर ५० वर्षांनीं मलबारच्या किनाऱ्यावर आला आणि तेव्हां-पासून आजपर्यंत १९ शें वर्षें तो हिंदुस्थानांत शिल्लक आहे. युरोपांत तो इ. सनाच्या ४ थ्या शतकांत म्हणजे हिंदुस्थानचा ४ शतकें उशीरा गेला. म्हणून ख्रिस्तीधर्म हा सुद्धां आपल्या देशाचा एक विचार आहे आणि या देशाच्या विचाराशीं ख्रिस्ताची अहिंसेची शिकवण जुळणारी आहे. मला सांगायचें हें होतें कीं रे. टिळक जरी ख्रिस्ती झाले तरी हिंदुस्थानविषयीचें प्रेम त्यांच्या हृदयांत भरलेलें होतें आणि म्हणून च ते म्हणाले कीं हिंदुस्थानच्या सारस्वतांत जो अद्भुत विचार प्रगट झाला त्याचें मला इतकें अकर्षण वाटतें. आणि त्या मुळें ते म्हणाले "**माते गुरुस्थान अंतीं जगाचें**" 'हें भारतमाते शेंवटीं साऱ्या जगाचें गुरुस्थान तुझें आहे.' आपण आपल्या नालायक-पणामुळें आपल्या इस्टेटीची किंमत ओळखणार नाहीं तर मात्र ही उक्ति केवळ आपल्या अभिमानाचीच ठरेल. आपली इस्टेट, दौलत, धन, बळ, ऐश्वर्य काय आहे हें जर आपण ओळखलें नाहीं तर आपण नालायक सिद्ध होऊं.

## केवळ विरोधी पक्ष असल्यानें लोकशाही नीट चालणार नाहीं

आतां आपल्या देशाच्या स्वराज्याला ११ वर्षें झालीं आहेत आणि आपण लोकशाहीची पद्धत स्वीकारलेली आहे. ही लोकशाहीची पद्धत आपण युरोपपासून घेतली. परंतु त्या पद्धतींत संशोधन करून, तिला भारतीय

रूप देऊन तिच्यांत सुधारणा करून ती दोषनिवृत्त होईल असा प्रयत्न केला पाहिजे. सरकारी पक्ष हा सत्ताधारी पक्ष असतो आणि विरोधी पक्ष हा सत्ताभिलाशी पक्ष असतो. म्हणजे दोघांची हि क्रीडा सत्तेच्या अवतीभवती चालते. याचा परिणाम असा होतो कीं सत्ताधारी पक्षाची शुद्धि करण्यास केवळ विरोधी सत्ताभिलाशी पक्ष समर्थ होऊं शकत नाहीं. सत्ताभिलाशी पक्ष हा सत्ताधारी पक्षाचें प्रतिबिंब असतो. टीपकागदाप्रमाणें तो सत्ताधारी पक्षाचे दोष टिपून घेतो. म्हणून केकळ विरोधी पक्ष असण्यानें सत्ताधारी पक्षाची शुद्धि होऊं शकत नाहीं. त्याकरतां पक्षमुक्त समाजाच्या स्थापनेची गरज लक्षांत येते. ज्याप्रमाणें कांहीं लोक पक्षयुक्त असतात तसे च कांहीं लोक पक्षमुक्त असणें आणि त्यांच्या नैतिक शक्तीचें वजन दोन्ही पक्षावर पडणें व त्यामुळें दोघांचें हि नैतिक दृष्टीनें नियमन होणें हें सर्व आवश्यक आहे. असें झालें तर च लोकशाहीची शुद्धि होईल अन्यथा शुद्धि होणार नाहीं आणि लोकशाही केवळ नाममात्र राहील.

## आजची फॉर्मल डेमॉक्रसी

मी याकरितां अनेक उदाहरणें नेहमीं देत असतों. या तुमच्या मुंबई राज्यांत मागचे मंत्रीमंडळ असतांना संतति नियमन चालूं शकत नव्हतें आणि आतां सरकारतर्फे त्याचें जोरजार कार्य सुरू झालें आहे. परवा माझा मुक्काम पू. खानदेशांतल्या एका खेड्यांतल्या प्राथमिक शाळेंत होता. तिथें कुटुंबनियोजनाचीं चित्रें लावलीं होतीं व त्यांत मोठया अक्षरांत मजकूर लिहिला होता. मला त्यांत अक्कल दिसली नाहीं बाकी सगळें होतें. प्राथमिक शाळेंतल्या मुलांचा कुटुंबनियोजनाशीं काय संबंध आहे हें मला तरी कळलें नाहीं. आपल्याकडे अ, आ, इ, ई नंतर मुलें 'श्रीगणेशायनमः' ऐवजीं आतां कुटुंबनियोजनायनमः असें शिकतील का? मागच्या मंत्रीमंडळाच्या वेळीं लोकमत कुटुंबनियोजनाला अनुकूल नव्हतें व आतां अनुकूल झालें असें कांहीं आहे का ? येथें लोकमताचा कांहीं प्रश्न च नाहीं मंत्र्याच्या आणि तंत्र्याच्या डोक्यांत जें येणार तें च होणार !

दुसरें उदारण : मुंबई राज्यांतील प्रमुखांना दारूबंदीची लहर आली आणि बिहारला तशी हुक्की आली नाहीं म्हणून तिथें गंगेच्या पाण्यावरोवर दारू पिण्याची पण सोय आहे. या उलट बिहार सरकारला गोवधबंदी करण्याची अक्कल सुचली आणि मुंबई सरकारला ती सुचली नाहीं याचा अर्थ बिहारचें लोकमत गोवधबंदीला अनुकूल आणि दारूबंदीला प्रतिकूल आहे आणि मुंबईचें लोकमत दारूबंदीला अनकूल व गोवधबंदीला प्रतिकूल असें आहे का ? दोन प्रांतांच्या लोकमतांत इतका फरक का ? यावरून तुमच्या लक्षांत येईल कीं ही एक निर्जीव लोकशाही, नुसती फॉर्मल डेमॉक्रसी आहे. अशा स्थितींत डेमॉक्रसीचें संशोधन आणि शुद्धि नुसत्या विरोधी पक्षामुळें होईल हा एक केवळ भ्रम आहे. आज देशांत विरोधी पक्ष आहेत आणि ते असून हि दोष वाढत च चालले आहेत. याचें कारण शोधूं तेव्हां लक्षांत येईल कीं शक्तीचें स्वतंत्र अधिष्ठान निर्माण झाल्याशिवाय, पक्षमुक्तसमाज निर्माण झाल्याशिवाय केवळ दोन पक्ष असण्यानें डेमॉक्रसी टिकणार नाहीं. तिचें बघतां बघतां रूपांतर फॅसीझम्मधें होईल

तसें च शिक्षणावर सरकारचा अंकुश असला म्हणजे काय होतें तें केरळमधें दिसलेंच. कम्युनिस्ट सरकार असेल तर मूलांना शाळेंत कम्युनिझम शिकविला जातो, फॅसिस्ट सरकार असेल तर फॅसीझम् शिकविला जातो व वेल्फेयर स्टेट असेल तर पंचवार्षिक योजनेचीं गाणीं गायला लावतात आणि कुटुंबनियोजनाचीं चित्रें शाळेंत लावतात. म्हणून मी सतत सांगत असतों कीं शिक्षण सरकारच्या हातांत राहणें याहून मोठी गुलामगिरी दुसरी कोणती हि नाहीं. इंग्लडमधें ९० टके शिक्षण लोकांच्या हातांत असल्यामुळें तेथें लोकशाही जिवंत आहे. गेल्यावर्षी तेथील अधिकारारूढ पक्षानें इजिप्तवर हल्ला केला तेव्हां जसा सबंध जगाकडून तीव्र निशेध झाला तसा इंग्लंड मधें हि झाला. इंग्लंडची सबंध डेमॉक्रसी खळबळून उठली आणि एक भयंकर गोष्ट होत आहे असें सर्व लोक बोलूं लागले. तिथें जर लोकांच्या हातीं शिक्षण नसतें तर हें झालें नसतें. आज सबंध जगभर एक कट चाललेला आहे. सरकारच्या हातीं शिक्षण देऊन तरुणांचीं मनें एका विशिष्ट साच्यांत घालून साचेबंद अकला निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. हें बंद होण्याकरतां शिक्षण सरकारी सत्तेच्या बाहेर काढलें पाहिजे.

## मुलांना सर्वांत अधिक स्वातंत्र्य हवें

इथें बसलेल्या मुलांना मी सांगूं इच्छितों कीं जगांत कुणाला जास्तींत जास्त स्वातंत्र्याचा अधिकार असेल तर तो मुलांना आहे. कारण त्यांना ज्ञान संपादन करायचें असतें, आणि ज्ञानांत जबरदस्ती तर असूं च शकत नाहीं. म्हणून विद्यार्थ्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं त्यांचें मन एका साच्यांत घालण्याचा घाट ज्यांनीं घातला आहे त्यांनीं डेमॉक्रसीचा घात करण्याचें ठरविलें आहे. आज कॉंग्रेस-सेवादलाचीं मुलें मला भेटलीं. मागें एकदा राष्ट्रसेवादलाचे लोक भेटले होते. मी नेहमीं म्हणतों कीं हे दल ते दल अशी दलदल देशांत निर्माण झाली आणि त्या दलदलींत आपल्या देशाचीं मुलें रुतलीं गेलीं तर त्यासारखी भयंकर गोष्ट दुसरी कोणती च नाहीं. म्हणून पक्षीय संघटन मुलांमध्यें करणें अगदीं अशास्त्रीय व लोकशाहीला घातक आहे. म्हणून मुलांनो, तुम्ही पक्षमुक्त असले पाहिजे.

## शांतिस्थापनेसाठीं पक्षमुक्त समाज च हवा

जे लोक पक्षांत आहेत ते हि कबूल करतात कीं राष्ट्रपति पक्षातीत असावा, न्यायाधीश, सरकारी अधिकारी, मिलिटरी, तज्ञांच्या कमेटया पक्षमुक्त असाव्यात. शिक्षक राजकीय पक्षांशीं बांधलेले नसावेत. या सगळयाचा अर्थ असा कीं जितकीं देशाच्या दृष्टीनें महत्त्वाची कामें आहेत तीं सगळीं पक्षमुक्त असावींत असे सगळे कबूल करतात. सरकारी पक्ष व त्याला दुसरा विरोधी पक्ष नसावा, सारे पक्ष तुटून पडावेत; अशी जरी माझी इच्छा असली तरी आज मला तसें म्हणायचें नाहीं. मला फक्त एवढें च म्हणायचें आहे कीं लोकशाहीला जशी पक्षांची आवश्यकता असते त्यापेक्षां पक्षमुक्त समाजाची जास्त आवश्यकता असते. जयप्रकाश नारायण, केरळचे केलप्पन, ओरिसाचे नवकृष्णबाबू चौधरी (माजी मुख्य मंत्री), बंगाल असेंब्लींतील विरोधी पक्षाचे नेते चारुबाबू हे सगळे या च कारणामुळें पक्षमुक्त झाले. नुकता च केरळमधें विद्यार्थ्यांचा संप चालला होता व सर्वत्र असंतोष पसरला होता तेव्हां केलप्पनांनीं मध्यस्थी केल्यामुळें संप बंद झाला. कारण केलप्पन पक्षमुक्त होते. त्यामुळें त्यांच्याविषयीं लोकांमधें नैतिक

प्रतिष्ठा उत्पन्न झाली आणि केरळ राज्यांतील एक प्रश्न त्यांच्यामुळें सुटला. म्हणून देशांत शांतीची स्थापना करावयाची असेल तर पक्षमुक्त समाज निर्माण झाल्याशिवाय गति नाहीं.

## धुळ्याकडून अपेक्षा

धुळ्यामध्यें पक्षमुक्त समाज स्थापन होऊं शकतो आणि सर्वोदयाची फार मोठी प्रचंड शक्ति प. खानदेशांत निर्माण होऊं शकते. धुळ्याला नानासाहेब देवांनीं, सर्वांचें परस्पर सामंजस्य रहावें, लोकांनीं खेळीमेळीनें काम करावें अशी शक्ति निर्माण केली होती, अशी संवय त्यांनीं येथें लावली होती. शिवाय दुसऱ्या हि एका कारणानें मला धुळ्याचा अभिमान आहे. मी इथल्या जेलमध्यें गीता-प्रवचनें सांगितलीं आणि येथें च मला सानेगुरुजींचा सहवास लाभला. इथें अनेकांशीं माझा परिचय आहे. त्यामुळें मला असें वाटतें कीं प. खानदेशांत पक्षमुक्त समाजाची उत्तम योजना होऊं शकते आणि तिच्या आधारावर फार मोठी लोक-सेवक सेना उभी राहूं शकते. मी व्यापाऱ्यांना सांगितलें कीं व्यापारी विशिष्ठ पक्षांशीं जोडले जातां कामा नयेत. ते जर पक्षांशीं जोडले गेले तर तो 'अव्यापारेषु व्यापार' झाला. म्हणून व्यापाऱ्यांनीं म्हणावें कीं आम्ही महाजन आहोंत, लोक-सेवा हा आमचा धर्म आहे, म्हणून आम्ही कोणत्या हि पक्षामध्यें राहूं शकत नाहीं. हिंदुस्थानमध्यें शांतीची शक्ति निर्माण करण्याच्या कामीं व्यापाऱ्यांनीं पुढें आलें पाहिजे असें मी त्यांना आवाहन केलें आहे. तें च आवाहन आतां शिक्षक, विद्यार्थी, नागरिक या सर्वांना करीत आहें. आजच्या स्वातंत्र्यदिनीं तुम्ही हा संकल्प करावा.

धुळें (जि. प. खा.) ता. १५-८-५८

## बालकांशीं गुजगोष्टी  : १४ :

साक्री येथें विनोबाजी आल्यानंतर सकाळीं च तेथील बालकांचा मेळावा झाला. विनोबाजी मुलांना म्हणाले :

लहान मुलें पाहिलीं कीं मला माझ्या लहानपणची आठवण येते. लहानपणीं मी कोकणातील ७०-८० घरें असलेल्या एका लहानशा गांवांत रहात असे. वयाच्या १० व्या वर्षापर्यंत मी त्या च गांवांत रहात होतों. घरच्या घरींच काकांनीं मला शिकविलें. परंतु एका तासापेक्षां ते मला जास्त शिकवायचे नाहींत. त्यावरून च एकताशी शाळेची कल्पना मला सुचली. बाकीचा राहिलेला दिवसाचा ५-६ तासांचा वेळ डोंगरांत भटकण्यांत जाई. गाई चारायला मुलें जायचीं त्यांच्या सोबत मी पण फिरायला जायचा. ती च संवय मी बडोद्याला गेलों तरी कायम राहिली. तिथें हि माझे रोज ८-१० मैल फिरणें चालू च राहिले. आणि आतां भूदान ग्रामदानासाठीं उन्हापावसांत हिंडावें लागतें तरी त्याचा मला कांहीं सुद्धां त्रास होत नाहीं. त्याचें कारण लहानपणापासून च फिरण्याची संवय होती. पक्षी, डोंगर, नद्या यामध्यें परमेश्वराची मूर्ति पाहण्याची संवय तेव्हांपासून मला लागली आहे. म्हणून माझें तुम्हा मुलांना सांगणें आहे कीं तुम्ही खूप फिरत जा.

माझी दुसरी संवय अशी होती कीं आमचे आजोबा पूजा करायचे आणि पूजेसाठी आम्हांला फुलें आणायला सांगायचे. प्राजक्ताचीं पडलेलीं फुलें आम्ही गोळा करीत असूं. चाफ्याचें झाड हलवून पडलेलीं फुलें आम्ही गोळा करायचों. तशींच बकुळीचीं फुलें सुद्धां. अशा रीतीनें तऱ्हेतऱ्हेचीं फुलें आम्ही गोळा करून आणीत असूं. आम्हांला आजोबा चंदन हि उगाळायला सांगायचे. त्या चंदनाची ते मूर्ति करीत, त्यामुळें पुष्कळ च चंदन उगाळावें लागे. आतां हि तो च नाद आहे. आतां पमेश्वराचें दर्शन सर्वत्र होत आहे. म्हणून माझें तुम्हांला दुसरें सांगणें आहे कीं देवाची भक्ति, देवाची पूजा करायची संवय आतांपासून च करायला हवी

आम्ही कोकणांत होतों तेव्हां वडील बडोद्याला होते . ते मधून मधून घरीं यायचे. त्याप्रमाणें ते दिवाळीला यायचे होते. आई म्हणाली, तुझे बाबा येणार आहेत तेव्हां तुझ्यासाठीं ते खाऊ पण आणतील . बाबा आले. थोडया वेळानें त्यांनीं मला हाक मारली, मला जवळ बोलावले. त्यांच्या हातांत चौकोनी पुडा होता . मला वाटलें आई म्हणाली होती त्याप्रमाणें बाबांनीं खाऊ आणलेला दिसतो. चौकोनी आकार आहे त्या अर्थीं बहुधा बर्फी असावी . मग त्यांनीं तो कागदाचा पुडा उलगडला आणि म्हणाले हा घे खाऊ. रामायण, महाभारत आणि भागवत अशीं तीं तीन पुस्तकें होतीं. मी आईकडे धावतच गेलों व म्हणालों हा बघ बाबांनीं खाऊ दिला . तो खाऊ पाहून माझ्या आईच्या डोळयांना धार लागली . ती म्हणाली या पेक्षां गोड खाऊ दुसरा असत च नाहीं . तेव्हांपासून धार्मिक पुस्तकें वाचण्याची मला संवय लागली आणि अजून हि मी तशीं पुस्तकें वाचीत असतों .

माझ्या बालमित्रांनो, मी आज तुम्हांला तीन गोष्टी सांगितल्या– (१) खूप भटकण्यची संवय ठेवा; (२) देवाची भक्ति, पूजा करा आणि (३) धार्मिक पुस्तकें वाचा.

**साक्री**, जि. प. खानदेश, ता. २१-८-५८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत,
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... नों. दि: .....

## ग्रामस्वराज्य कसें येईल ?

### ग्रामस्वराज्याचें लक्षण

आपल्या देशांत स्वराज्य आलें पण अजून ग्रामस्वराज्य व्हायचें आहे. देशाच्या स्वराज्याचें लक्षण काय ? समजा एखादें भांडण धुळयाला लागलें आणि तें आपसांत मिटलें नाहीं तर तें धुळयाच्या कोर्टांत जातें. धुळयाच्या कोर्टांत निकाल अनुकूल लागला नाहीं तर तें मुंबईच्या कोर्टांत जातें. मुबईच्या कोर्टांत निकाल मनाजोगता न लागला तर दिल्लीच्या फेडरल कोर्टाकडे तें जाईल आणि तिथें हि निकाल लागला नाहीं तर मग तें भांडण लंडनच्या प्रिव्ही कौन्सीलकडे जाईल. तिथें जाऊन हि जर निकाल मनाजोगता लागला नाहीं तर मात्र चुप बसायचें. लंडनच्या प्रिव्ही कौन्सीलांत जाऊन तिथें जो निकाल लागेल तो निमुटपणें ऐकायचा. मग तें भांडण शंकराचार्यांच्या पीठांचे असो कीं जैनांच्या मंदिरांचे असो लंडनच्या प्रिव्ही कौन्सीलांत जाऊन मिटायचें. आतां स्वराज्य आलें आहे त्यामुळें देशांतील कुठल्या हि झगडयाचा निकाल दिल्लींत होईल लंडनमधें होणार नाहीं. देशांतलें भांडण आतां दिल्लीपलिकडे जाणार नाहीं. यांचें नांव स्वराज्य. जसें हिंदुस्थानचें भांडण हिंदुस्थानबाहेर जात होतें तोंपर्यंत स्वराज्य नव्हतें त्याच प्रमाणें गांवांतलें भांडण जोंपर्यंत गांवांत तुटत नाहीं तोंपर्यंत ग्रामस्वराज्य आलें नाहीं. भांडणें करण्यांत आम्ही स्वावलंबी आहोंत परंतु भांडनें तोडण्यांत मात्र परावलंबी ! म्हणून आतां दोन कामें केलीं पाहिजेत. (१) गांवांत भांडणें होणार नाहींत अशी योजना करायची आणि (२) भांडणें झालीं च तर तीं गांवाबाहेर जाऊ द्यायचीं नाहींत असा सर्वांनीं मिळून ग्रामसंकल्प करायचा. भांडणें कमी होतील अशी योजना करण्याकरता दुःखी, भूमिहीन, अडचणींत सापडलेले जे कोणी असतील त्यांची दुःखें व त्यांच्या अडचणी दूर करण्याची प्रतिज्ञा सर्वांनीं घ्यायची. यासाठीं शांतीची आणि समृद्धीची अशी दुहेरी योजना करायची. उत्पन्न वाढवायचें व तें सर्वांना मिळेल असें करायचें.

## आपापल्या शक्ति गांवाला समर्पण करणें म्हणजे ग्रामदान

आपल्याजवळ ज्या ज्या शक्ति असतील त्या सगळ्या शक्ति गांवाला समर्पण करायच्या. आज धनवंतांची धनशक्ति गांवासाठीं नाहीं ती घरासाठीं आहे, बुद्धिमंतांची बुद्धिशक्ति घरासाठीं च वापरली जाते आणि नाइलाजानें वापरावी लागेल तेवढीच समाजासाठीं वापरली जाते. तसें च श्रमिकांचे श्रम हि घरासाठीं आहेत ते गांवाला अर्पण केलेले नाहींत. भूमिवंतांनीं भूमिदान देणें, संपत्तिवाल्यांनी संपत्तिदान देणें हा धर्म आहे पण भूमिहीनांनीं केवळ घ्यायचें च आहे काय? नाहीं. घेणें हा कोणाचाच धर्म असूं शकत नाहीं. जो सर्वांना लागू पडतो तो धर्म . खरें बोलणें हा धर्म सर्वांसाठीं आहे. तसेंच प्रेम करणें दान करणें हा धर्म सगळ्यांना लागू आहे. भूमिहीनांनीं केवळ घ्यायचें आहे, द्यायचें नाहीं हें खोटें आहे. त्यांच्याजवळ श्रमशक्ति आहे. संपत्ति निर्मितांना पैशाबरोबर श्रम हि लागतात. म्हणून श्रमिकांनीं श्रमदान द्यायचें. अशा रीतींनें संपत्तिवाल्यांनीं संपत्ति द्यायची, बुद्धिवंतांनीं बुद्धि, जमीन मालकांनीं भूमि आणि श्रमिकांनीं श्रम गांवाला समर्पण करायचे व जो प्रसाद मिळेल त्यावर निर्वाह चालवायचा. गांव भरलें कीं घर भरतें. परंतु केवळ घर भरून गांव कांहीं भरत नाहीं. जमीन, धन, बुद्धि, श्रम आणि प्रेम या पांच देणग्या ज्यावेळीं आपण गांवाला अर्पण करूं त्यावेळीं ग्रामस्वराज्य झालें असें म्हटलें जाईल.

साक्री, जि. प. खानदेश २१-८-५८

## अणुयुगाला अनुकूल चिंतन : १६ :

### नागरिकांची जबाबदारी

'नगरांतरीं वसिजे । तरी नागरचि होइजे' नगरांत जे राहतात ते नागर बनतात. नागर म्हणजे चतुर्विचार संपन्न. नगरवासियांकडून ही अशी अपेक्षा ज्ञानदेवांनीं केली आहे. जगाचा व्यवहार कसा चालला आहे, आपला देश कोठें चालला आहे, आपल्या देशाला कोठें गेलें पाहिजे आणि त्याला कोणत्या दिशेला वळवायला पाहिजे असा चतुर्विध विचार नागरिकांनीं केला पाहिजे. खेड्यांतले लोक जगाची काय माहिती राखणार ? ते शेतीची सेवा करतात व जगाचें पोषण करतात. ते जगाला आधार देणारे पायाचे दगड आहेत. पायावर च सबंध इमारत उभी असते. खेड्यांतले लोक सेवापरायण असल्यानें सेवेंत मग्न असतात. म्हणून त्यांना जगाची माहिती हि कमी असते. त्यामुळें विचार करण्याची जबाबदारी ओघानें च शहरवाल्यांकडे येते, ती त्यांना नाकारतां येत नाहीं. म्हणून नंदुरबारच्या या नागरिकांपुढें मी एक नवा विचार मांडणार आहें.

### भारतांत विचारस्वातंत्र्याची परंपरा

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ११ वर्षें झालीं . या देशाचें स्वातंत्र्य बालक अकरा वर्षांचें म्हणजे अगदीं लहान आहे असें कांहीं लोक मानतात. पण असें मानणें खरें नाहीं. आपलें स्वातंत्र्य अकरा वर्षांचें बालक नसून दहा हजार वर्षांचें आहे. या देशांत राजकीय स्वातंत्र्याला आम्हीं अगदीं कमी महत्त्व दिलें आहे. आम्ही राजकीय स्वातंत्र्याला प्राथमिक स्वातंत्र्य असें मानीत आलों आणि विचारस्वातंत्र्याला महत्त्व देत आलों. या विचारस्वातंत्र्याचा महिमा आम्हांला पूर्वजांकडून शिकायला मिळाला आहे. संस्कृतांत परस्पर विरोधी सहा दर्शनें आहेत. हीं सगळीं दर्शनें हिंदुधर्माच्या पोटांत आहेत. ईश्वराच्या आस्तित्वाचा वाद आणि ईश्वराचें अस्तित्व नाकारणारा वाद हिंदुधर्मांत आहे. जग मिथ्या मानणारें दर्शन आणि जग अगदीं सत्य आहे असें

हि एक दर्शन हिंदुधर्मांत आहे. या सर्व वादांना अगदीं परिपूर्ण स्वातंत्र्य हिंदुस्थानांत होतें. विचारस्वातंत्र्य हें च पूर्ण स्वातंत्र्य. माझें सगळें जावो पण बुद्धि न जावो अशी प्रार्थना चाणक्यांनीं केली आहे. '**बुद्धिस्तु मा गान् मम**' आणि गायत्री मंत्रात सांगितलें आहे '**धियो योनः प्रचोदयात्**' आमच्या बुद्धीला तूं प्रेरणा दे. या प्रमाणें येथें विचारस्वातंत्र्याला सर्वांत अधिक महत्त्व दीलें आहे .

## ख्रिस्ती व इस्लाम धर्माप्रमाणें हिंदुधर्म एकाभोवतीं उभा नाहीं

येथें असंख्य विचार झाले. अनेक रीतिरिवाज अनेक सत्पुरुष भारतीय संस्कृतीनें जिरविले आहेत. भारतीय संस्कृति कुठल्या हि एका माणसावर अवलंबून नाहीं. ख्रिस्तीधर्मांत ख्रिस्त हा मध्यबिंदु झाला. ख्रिस्त निःसंशय महापुरुष होते. त्यांनीं जगाला अप्रतिम शिकवण दिली. त्यांचा उपदेश, ब्रह्मचर्य, प्रेम, सेवावृत्ति अत्यंत आकर्षक होती या बद्दल वाद नाहीं. पण संबंध ख्रिश्चॲनिटी एका माणसाभोवतीं उभी असल्यामुळें तिला एकप्रकारची मर्यादा येते. ख्रिस्तीधर्म म्हणजे बायबल. इस्लामधर्म म्हणजे कुराण असें आहे. परंतु भारतीय संस्कृतींत मात्र अनेक ग्रंथ आहेत आणि उपासनेचे अनेक प्रकार हि आहेत. लोकमान्यांनीं तर असे सांगितलें आहे कीं "**साधनानाम् अनेकता उपास्यानाम् अनियमः च.**" ही आपल्या संस्कृतीची खूण आहे. अमुक च साधन केलें तर मोक्षाला जातो असा आग्रह आपल्याकडे नाहीं.

## पारतंत्र्यांत हि भारतीय बुद्धि स्वतंत्र होती

इंग्रजांचें राज्य ज्या वेळीं देशांत होतें त्यावेळीं हि देशाला स्वातंत्र्य होतें. हें मी विलक्षण बोलून राहिलों आहे. इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत सुरू झालें, त्यांनीं त्यांची इंग्रजी भाषा आम्हांला शिकविली व मुरब्बा जसा साखरेंत मुरतो तसे आम्ही इंग्रजी भाषेंत मुरलों, इंग्रजांनीं आमच्यासाठीं नोकऱ्या उभ्या केल्या, यांनीं या ठिकाणीं कांहीं सुधारणा आणल्या त्याचा लाभ पण आम्हांला झाला, त्यांच्या अनेक गुणांचें आम्ही ग्रहण केलें, आमच्या संस्कृतीवर आम्ही त्यांचा परिणाम होऊं दिला, तरी भारताचें

मस्तक मात्र त्यांच्या संस्कृतीसमोर कधीं नमलें नाहीं. आम्ही पाश्चात्य संस्कृतीपासून जें घ्यायचें तें घ्यायला तयार झालों पण त्यांच्यापुढें नमलों नाहीं. त्या काळांत सुद्धां स्वामीं विवेकानंदांकडे अमेरिकेंतून सिस्टर निवेदिता आली व तिनें विवेकानंदांकचें शिष्यत्व पत्करलें. महात्मा गांधींच्याकडे अनेक पश्चिमेंतील लोक शिकण्यासाठीं आले व अरविंदांकडे अनेक पाश्चिमात्य शिष्यभावनेनें आले. भारताच्या बुद्धीला पश्चिमची हवा ग्रासूं शकली नाहीं. ती क्षणकाल स्तीमित झाली पण लगेच आपल्या तेजानें चमकूं लागली.

## परतंत्र भारताचे तीन महान् शोध

त्या च वेळीं कांहीं नवे विचार निर्माण झाले. सर्व धर्मांच्या समन्वयाचा विचार युरोपमधून निघाला नाहीं तर उलट ज्या वेळीं येथें परकीयांचें राज्य होतें तेव्हां रामकृष्ण परमहंसांनीं तो विचार जगाला दिला. तसेच जगापेक्षां दुसरी एक वरची सत्ता आहे त्या वरच्या सत्तेचा अनुभव घेऊन नंतर खालीं उतरून सेवा करतां येते म्हणून मनाच्या भूमिकेच्यावर जाऊन सेवा केल्यावाचून जगाचा उद्धार होणार नाहीं हा नवा विचार अरविंदांनीं जगाला दिला. त्याच प्रमाणें जगांतील अशांति झगडे आदि जुन्या शस्त्रांनीं नाहींसे होऊं शकणार नाहींत ते नाहींसे करण्यासाठीं सत्याग्रहाचें नवें तत्त्वज्ञान गांधीजींनीं जगाला दिलें. या प्रमाणें (१) सर्वधर्मसमन्वयानें जगाचा उद्धार होईल (२) अतिमानस भूमिकेवर गेल्यावर च जगाचा उद्धार होईल आणि (३) अहिंसक सत्याग्रही शक्ति प्रकट झाल्यानें जगाचा उद्धार होईल अशा तीन महान् गोष्टी भारतानें पारतंत्र्याच्या काळांत जगाला दिल्या. जसे विज्ञानाचे शोध असतात तसे च मानवी जीवनाचे हे आध्यात्मिक शोध आहेत. प्राचीन काळापासून असे अनेक आध्यात्मिक विचारप्रवाह भारतांतून निघाले आहेत इंग्रजी अमलाखालीं आम्ही दबलों नाहीं आणि आमची बुद्धि हि दबली नाहीं. जीवनाच्या बाबतींत सामाजिक आध्यात्मिक क्षेत्रांत आम्ही शोध केले याचीं तीन उदाहरणें मीं दिलीं. इतर हि असे शोध आहेत पण या तीन शोधांनीं जगाचें चित्त वेधून घेतलें आहे. म्हणून च मी म्हणतों कीं हिंदुस्थानचें स्वातंत्र्य प्राचीन आहे आणि या बुद्धिस्वातंत्र्याला विज्ञानाची फार मोठी मदत होणार आहे.

## बुद्धिस्वातंत्र्याला विज्ञानाची मदत

मध्यकाळांत भारतांत विज्ञान फार मागासलेलें होतें. या बाबतींत पाश्चात्यांनीं फार प्रगति केली आहे. विज्ञान बुद्धिस्वातंत्र्याच्या विचाराला फार पोषक आहे. विज्ञान मानवाची दृष्टि मोकळी करणारें आहे, बांधणारें नाहीं. म्हणून आतां हा सर्वोदय-विचार पक्का मजबूत उभारतां येईल अशी मला विज्ञानामुळें फार मोठी उमेद आहे. विज्ञान आणि आत्मज्ञान एकत्र झालें तर जगावर स्वर्ग आणतां येईल. पण विज्ञानाचें लग्न जर हिंसेशीं लागलें तर त्यांतून जी राक्षसी शक्ति निर्माण होईल तिच्यामुळें विश्वाचा संहार होईल, मानवजात अजिबात मुळासकट उखडली जाईल. म्हणून मी म्हणतों कीं विज्ञानाला हिंसा पचणार नाहीं.

## विज्ञानाच्या साह्यानें नवीन ग्रामरचना

गेलीं सात वर्षें आत्मज्ञान आणि विज्ञान जोडलें जावें यासाठीं माझा सतत जप चालला आहे. तें जर जोडलें गेलें तर च जगांत समृद्धि नांदणार आहे. पण कांहीं लोक विचारतात च कीं ग्रामदानें झाल्यानंतर या विज्ञानाच्या युगांत ते मागासलेले ग्रामोद्योग आले तर लोकांचें जीवन खालच्या पातळीवर जाणार नाहीं का ? मी विचार करतों कीं या प्रश्न विचारणारांना हें कसें कळत नाहीं कीं ग्रामदान ही विज्ञानाला अनुकूल अशी गोष्ट आहे म्हणून ! सबंध गांवाची एक जमात बनली तर मग गांवाच्या विकासासाठीं विज्ञानाची मदत घेतां येईल. जोंपर्यंत जमिनीचे अलग अलग मालक शिल्लक आहेत तोंपर्यंत आधुनिक विज्ञानाचा उपयोग गांवाला करतां येणार नाहीं. मालकी सोडली तर शेती आणि उद्योग विज्ञानाच्या मदतीनें उन्नत करतां येतील. सर्वोदयाचा विज्ञानाशीं विरोध आहे याहून विपरीत समजूत दुसरी असूं च शकत नाहीं. विज्ञानाच्या मदतीनें प्रत्येक खेडें परिपूर्ण करायचें, तें आनंदाचें स्थान बनवायचें, प्रत्येक खेड्यांत समृद्धि आणायची, निसर्गाशीं एकरूप होऊन तेथील जीवन समृद्ध करायचें ही च ग्रामदानाची योजना आहे. ह्यापुढें जें विज्ञान येईल तें साधें विज्ञान असणार नाहीं. ॲटमची शक्ति येत आहे. तिच्या मदतीनें खेड्यांत विकेन्द्रित शक्ति निर्माण करतां येईल. आज कोळशाची शक्ति, तेलाची शक्ति, पेट्रोलची शक्ति केन्द्रित आहे

परंतु ॲटमची शक्ति केन्द्रित राहूं शकणार नाहीं. चांगल्या रीतीनें गांवा-गांवांत उद्योग देतां येतील असें युग आतां येणार आहे. या अणुयुगांत प्रत्येक गांव वैज्ञानिक रीतीनें परिपूर्ण बनवितां येईल. यासाठीं सर्वोदय-विचाराला विज्ञानाची जितकी मदत होईल तितकी दुसऱ्या कोणाला होणार नाहीं. हिंसेच्या हातीं विज्ञान देणें म्हणजे माकडाच्या हातीं कोलीत देण्यासारखें आहे. आणि सर्वोदयाच्या हातीं विज्ञान असणें म्हणजे होमकुंडांतील अग्नीच्या उपासकांच्या हातीं अग्नि देणें, असें आहे.

## ॲटम बॉम्ब आणि अहिंसा यांत विरोध नाहीं

ॲटम बॉम्ब आणि अहिंसा यांत भेद नाहीं. मी एक विलक्षण विचार मांडीत आहें. असा विचार ऐकायला मिळणार नाहीं. कारण असा विचार अनेक मुखांतून निघत नसतो. अहिंसा आणि ॲटम बॉम्ब यांत भेद नाहीं. तो कसा ? "**हरिहरा नाहीं भेद.**" पालन करणारा विष्णु म्हणजे अहिंसा व संहारक हर म्हणजे ॲटम बॉम्ब यांत भेद नाहीं. संहारक शक्ति ही Non-moral आहे Immoral (नीति विरोधी) नाहीं. मॉरल (नैतिक) हि नाहीं ती एक शक्ति आहे. अग्नीच्या मदतीनें बाया पतीला व मुलांना स्वयंपाक करून खाऊं घालतात आणि घरांत प्रेम वाढवितात. त्याच अग्नीचा उपयोग करून अहमदाबादला खादी भांडार जाळलें. अग्नि नैतिक शक्ति नाहीं, नीति विरोधी शक्ति नाहीं, ती फक्त स्वयंभू शक्ति आहे, Non-moral आहे. तसेंच ॲटम ही नैतिक शक्ति नाहीं, नीति विरोधी शक्ति नाहीं, ती एक स्वयंभू शक्ति आहे. संहारक शक्ति वेगळी घातक शक्ति वेगळी. पिस्तूल घातक आहे संहारक नाहीं. लाठी घातक आहे संहारक नाहीं. ॲटम संहारक आहे घातक नाहीं. ॲटम बॉम्बनें लाखों क्रोडों लोक मरतात तसे भूकंपानें हि हजारो लोक मरतात. परंतु भूकंप घातक नाहीं संहारक आहे.

## हराचें हरींत रूपांतर

ख्रिसमस टापूवर जो ॲटमचा प्रयोग झाला त्यानें काश्मीरच्या तळयांतील मासे मेले. म्हणजे कोठें हि ॲटमचा प्रयोग झाला तरी सबंध

जगाची हवा बिघडते. ती संहारक शक्ति आहे. संहारक शक्तीला भिणें योग्य नाहीं. संहार शक्तीचें निर्माण कार्यांत रूपांतर होऊं शकतें. अॅटमनें संहार होऊं शकतो, अॅटमनें निर्माणाचें हि काम होऊं शकतें. हरीचा हर बनूं शकतो हराचा हरि बनूं शकतो. संहारक शक्ति क्षणांत बदलून ती उद्धारक शक्ति होऊं शकते. त्यांत भिण्यासारखें कांहीं नाहीं. भ्यायला पाहिजे कन्व्हेन्शनल वेपन्सला. कारण तीं अहिंसाविरोधी आहेत. अॅटम बॉम्ब अहिंसेला विरोधी नाहीं.

नंदुरबार, पश्चिम खानदेश ता. ३०-८-२८

## विज्ञान युगांत शक्तीचा स्रोत : १७ :

### सारें च गोड

'शेंवट तो झाला गोड तुझ्यानें विठ्ठला' विठ्ठलाच्या भेटीनें शेंवट गोड झाला. इतर प्रांतांप्रमाणें इथें हि माझा अनेकांशीं परिचय झाला, इथें हि तशा च प्रेमाचा अनुभव आला. माझ्या चित्तावर असा ठसा उमटला कीं शक्ति व योग्यता पाहतां इथल्या कार्यकर्त्यांचें चारित्र्य दुसऱ्या कोणत्या हि प्रांतांतील कार्यकर्त्यांपेक्षां कमी नाहीं. या भूमींत भरपूर च पीक येऊं शकतें. शेंवटीं शेंवटीं अक्राणी महालांत जरा कठिण च अनुभव आला पण मला तो कठिण वाटला नाहीं. जीवनांतील एक फार मधुर स्मृति असें च त्या अनुभवाचें स्वरूप आहे आणि माझ्या चित्तांत तो नेहमींसाठीं च राहून जाईल.

या जिल्ह्यांत शेंवट गोड होईल अशी माझी अपेक्षा होती, परंतु माझ्या कल्पनेपेक्षां तो जास्त च गोड झाला. गोंदीया ते गोवा पसरलेल्या महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांनीं फार मेहनत घेतली, अगदीं मिळून मिसळून काम केलें आणि इतर प्रांतांपेक्षां त्यांना परिस्थिति थोडी कमी अनुकूल होती तरी त्यांनीं आपलें सर्वस्व पणाला लावलें म्हणून शेंवट गोड झाला. जसा रत्नागिरींत आरंभ गोड झाला होता, पंढरपुरला मधला भाग आणि मराठवा-

ड्यांत उपान्त्य गोड झाला होता तसा च पश्चिम खानदेशांत शेवट हि गोड झाला. सर्वत्र मीं अपार प्रेमाचा अनुभव घेतला.

## खोल काम झालें

या प्रदेशांत जें कांहीं काम झालें आहे तें इतकें खोल आहे कीं त्याचें माप आतां च कोणी घेऊं पाहील तर त्याचें पुरतेसें आकलन होणार नाहीं. प्रत्येक प्रांतांत जी शक्ति आहे त्या मानानें तेथील काम चांगलें झालें. परंतु येथें खोल काम झालें. त्याचा परिणाम प्रकट व्हायला, त्यांतील शक्तीचा अविर्भाव व्हायला कांहीं वेळ लागेल. अनेक प्रश्न आपल्या समोर आहेत. इतक्या सगळ्या प्रश्नांचें काय करायचें हा हि एक प्रश्न आहे. अनेकविध प्रश्न उत्पन्न नाहीं झाले तर आम्ही सर्वोदयाचें काम करीत च नाहीं असें खुशाल समजा. हें क्षेत्र इतकें विशाल आणि व्यापक आहे कीं त्यांत अनेक प्रश्न उत्पन्न होणार च. त्याच्या अनेक बाजू असणार म्हणून त्यावर चर्चा हि होत राहणार. तेव्हां अगदीं निकरावर येऊन निर्णय करण्याची गरज नाहीं. सावकाश निर्णय करायला हवा.

## अणुयुगांत मार्क्स बदलला असता

सत्याग्रहासंबंधीं विचार करतांना पारतंत्र्यांतला सत्याग्रह आणि स्वातंत्र्यांतला सत्याग्रह असा भेद करायला पाहिजे. या शिवाय स्वातंत्र्यांत सुध्दां लोकशाहींतला सत्याग्रह आणि इतर शाह्यांमधला सत्याग्रह यांत हि फरक करायला पाहिजे याकडे मीं सर्वांचें ध्यान खेचलें होतें. या दोहोंपेक्षां हि फार मोठी अशी तिसरी वस्तु आज जगापुढें उभी आहे. ती म्हणजे विज्ञानयुगांतला सत्याग्रह. तसें पाहिलें तर अनादि काळापासून मानव हा विज्ञान विकसित करीत आला आहे. आज च तें विकसित झालें असें नाहीं. परंतु भाषा सापेक्ष असते म्हणून हें लक्षांत घ्यायला पाहिजे कीं गेल्या दीडशें वर्षांत विज्ञानाची जी प्रगति झाली ती स्थूल रूपानें पाहतां विलक्षण च झाली. त्यांत हि गेल्या दहा वर्षांत विज्ञानाची जी प्रगति झाली ती गेल्या दीडशें वर्षांच्या मानानें फार च झाली. कार्ल मार्क्स जर आज असता आणि त्याच्या समोर अणुशक्तीचें दर्शन असतें तर मला लेश हि शंका नाहीं कीं

त्या ऋषीचा सबंध ग्रंथ पालटला असता. तो ग्रंथ मी पहिल्यापासून अखेरच्या पानापर्यंत चांगला काळजीपूर्वक वाचला आहे. माझी अशी खात्री आहे कीं त्याला जर अणुशक्तीचें दर्शन असतें तर जीवनाचें व जीवनांतल्या समस्यांचें अगदीं वेगळें आकलन त्याला झालें असतें या बाबतींत मी अगदीं निःशंक आहें. मी म्हणतों तसा मार्क्सच्या अनुयायांना हळू हळू भास होऊं लागला आहे. त्यांना नुसता भास च होतो आहे पण मला स्पष्ट दर्शन आहे. अणुशक्तीचें स्वरूप एका बाजूनें परम कल्याणकारी, परम शिव आणि दुसऱ्या बाजूनें अत्यंत भयानक, परम रुद्र आहे. परम शिव आणि परम रुद्र अशीं दोन रूपें त्या परम तत्त्वांत डाळिंबामधें दाण्याला दाणा चिकटावा तशी चिकटलीं आहेत आतां तीं प्रकट झालीं आहे म्हणून पूर्वीचें अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राजकारण च नव्हे तर पूर्वीचें अध्यात्मतत्त्व हि एकांगी होतें हें त्याच्या सारख्या विचक्षण पुरुषाला कळलें नसतें असें मानायचें कांहीं कारण नाहीं. त्याची जी स्वच्छ विवेचक बुद्धि दिसते, त्याला जें विश्वव्यापक आकलन दिसतें आणि मुळांत प्रवेश करण्याची जी बुद्धि दिसते ती पाहतां त्याला हें दर्शन झालें असतें हें निःसंशय आहे.

## मनु हि बदलला असता

मनु तर नेहमीं च बदलत असतो असें मानलें जातें. शास्त्रांत म्हटलें आहे कीं चौदा मनूंपैकीं सात झाले व सात व्हायचे आहेत. या सर्वांचा भावार्थ असा कीं मनु हा समाजशास्त्रज्ञ आणि धर्मसंस्थापक असल्यामुळें तो नेहमीं च बदलत असतो. तेव्हां तो जर आजच्या युगांत असता तर त्याच्या ध्यानांत आलें असतें कीं जरी धर्मस्थापनेचे प्रामाणिक व कसोशीनें प्रयत्न झाले आहेत तरी अजून धर्मस्थापना झालेली नाहीं. याचें स्पष्ट दर्शन गेल्या ७-८ महिन्यापासून माझ्या डोळ्यासमोर आहे. तेव्हां मनु जर आज असता तर त्याला आपली मनुस्मृति बाजूला सारून दुसरी च मनुस्मृति लिहावी लागली असती. त्या जुन्या मनुस्मृतींत घेण्यासारखा अंश अजिबात नाहीं असें नाहीं. त्यांत जो सनातन अंश आहे तेवढा च सांगण्याकरतां मनु नसतो. त्याच्या आधारावर जीवनाला आकार कसा द्यावा हें सांगणारा मनु म्हणविला जातो. तेव्हां जुनें सबंध शास्त्र चुकलेलें आहे हें

त्याच्या लक्षांत आलें असतें. तें जाणून बुजून चुकलेलें नाहीं नेणून चुकलेलें आहे. त्या काळीं विज्ञानाचें दर्शन च नव्हतें म्हणून चुकलेलें आहे.

## आज गांधी देखील जसेच्या तसे चालायचे नाहींत

तेव्हां आज मार्क्स टिकूं शकत नाहीं मनु टिकूं शकत नाहीं आणि मला अत्यंत नम्रपणानें हें सांगायचें आहे कीं गांधी देखील जशाच्या तसा आज चालायचा नाहीं. या दहा वर्षांत विश्वसमाजाचा पार कायापालट झाला आहे. पूर्वींच्या राजकारणाच्या पद्धति आतां अगदीं च मागासलेल्या ठरत आहेत. लोकहितवादींनीं नाना फडणविसांसंबंधीं लिहिलें होतें कीं 'तो जर आज आला असता तर वेडा झाला असता' म्हणजे लोकहितवादींच्या काळीं च जग इतकें बदललें होतें. तेव्हां आजच्या ज्या समस्या आहेत त्या कोणत्या हि राजकारणी मनुष्याच्या विचार पद्धतीच्या अगदीं पार पलिकडच्या आहेत. लोकशाहींत लोकांनीं निवडून दिलेला एक सामान्य मुत्सद्दी असतो आणि त्याच्या डोक्यावर आज सबंध विश्वाचा विचार करण्याची जबाबदारी येऊन पडलेली असते. आज निर्माण होणारे प्रश्न विश्वव्यापक असतात आणि त्यांचीं त्वरीत उत्तरें देण्याची जबाबदारी आलेली असते. पूर्वींच्या काळीं असे विश्वव्यापक प्रश्न येत नव्हते आणि आल्यास दहा पंधरा दिवस शांतपणें विचार करून उत्तर देतां येईल अशी सोय होती. पण आतां विज्ञानामुळें, घाईचा काळ आल्यामुळें त्वरित उत्तरें द्यावीं लागतात आणि प्रश्न तर इतके व्यापक असतात कीं सामान्य मुत्सद्यांना त्या प्रश्नांचें नीट आकलन हि होऊं शकत नाहीं. शहाण्यांना जरी त्यांचें आकलन झालें तरी लोकांनीं मुत्सद्यांवर जबाबदारी टाकलेली असल्यामुळें त्याला कांहीं तरी करणें भाग आहे म्हणून कांहीं तरी करीत असतो. जसा हिंदुस्थानचा शेतकरी लाचार असतो आणि कांहींतरी करायचें म्हणून करीत असतो तसा च आजचा मुत्सद्दी कांहीं हि सुचत नसतांना देखील कांहीतरी करायला पाहिजे म्हणून करीत च राहतो. त्यामुळें आज गांधी जरी आले असते तरी त्यांना अगदीं पूर्वींच्या सारखें बोलतां आलें नसतें. सत्य अहिंसा ही त्यांचीं प्रमेयें सनातन आहेत. तीं कांहीं त्यांनीं शोधून काढलीं नाहींत. मनुष्याला तीं पूर्वींची च माहीत

आहेत अशा स्थितींत दहा वर्षांनंतर आतां त्यांच्या वेळच्या जुन्या पद्धतीच्या सत्याग्रहाची कल्पना आज केली तर अगदीं अन्याय होईल. म्हणून या वैज्ञानिक युगांत सत्याग्रह कसा करायचा याचा शोध केला पाहिजे. आणि तो शोध करण्याची जबाबदारी परमेश्वरानें तुम्हा आम्हावर टाकलेली आहे.

## मनाला वापरतां आलें पाहिजे

या युगांत विचार करतांना कोणतीं यंत्रें वापरायचीं कोणतीं नाहीं वापरायचीं इत्यादि सर्व गोष्टींविषयीं आपली घडी जरी बसून गेली असली तरी आपण आपल्या मनाला असें शिक्षण द्यायला पाहिजे कीं आपल्या प्रियतम कल्पना सोडून द्यायची जरी वेळ आली तरी त्या सोडून द्यायला आपण तयार असावें, त्यांना चिकटून बसतां कामा नये. कल्पनांची चांगली तपासणी केल्याशिवाय नवीन कल्पना घ्याव्या असें मला म्हणायचें नाहीं. किंवा पूर्वींच्या कल्पनेमधें डळमळ असावी असें हि म्हणायचें नाहीं. परंतु मला हें सांगायचें आहे कीं जसें आपण हें समोरचें घड्याळ पाहतों तसें आपलें मन स्वतःहून अलग पाहतां आलें पाहिजे. माझें हें घड्याळ दोन मिनिटें मागें राहतें हें मला कळलें म्हणजे मी त्याला रोज दोन मिनिटें पुढें करतों. जसा घड्याळाचा स्वभाव कळून मी त्याला वापरतों तसें आपल्याला या द्वाड मनाला वापरतां आलें पाहिजे, मन गुंडाळून ठेवतां आलें पाहिजे. मुत्सद्दी हें करूं शकत नाहींत. म्हणून त्यांनीं जें राजकारणशास्त्र बनविलें आहे तें शास्त्र नाहीं आणि त्यांनीं जे आडाखे बसविले आहेत ते डळमळित आहेत.

## शहाणपणाची विचित्र सूचना

एक साधी गोष्ट पहा. आज सबंध जगांत प्रत्येक राष्ट्र परस्परांच्या भीतीनें सैन्यावर करोडो रुपयांचा खर्च करीत आहे. हा खर्च अगदीं विनाकारण केला जात आहे हें स्पष्ट आहे. तो करणाऱ्यांना हि वाटतें कीं हा विनाकारण खर्च चालला आहे तरी हि ते करीत असतात. यावर मी विचार करतों कीं आम्ही भय खातें हा जो खर्च करतों तो जर प्रेम खातें केला तर किती बरें होईल ! एवीतेवी तो खर्च राष्ट्राच्या कामीं येत च नाहीं तेव्हां प्रेमखातें एवढा खर्च करा असें म्हणणाऱ्याला आज लोक

वेडयांत काढतील. पूर्वीच्या चिंतनपद्धतीनें हा वेडगळपणा ठरला असता, पण आतां तें पूर्वीचें चिंतन इतकें मागासलेलें आहे कीं त्यावर जर मीं आपले अंदाज बसविले तर योग्य होणार नाहीं. राष्ट्ररक्षणाकरतां जैयत सेना पाहिजे हें एक पूर्वीचें निर्विवाद प्रमेय मानलें जात असे. परंतु आतां तें निर्विवाद राहिलें नाहीं, त्याहून भिन्न प्रमेय असूं शकतें. मी तर एक पाऊल पुढें जाऊन असें म्हणतों—लोकांना तें म्हणणें अगदीं खतरनाक वाटेल. एखाद्या कवीनें च तसें बोलावें, गणितज्ञानें नव्हे असें वाटेल—कीं पारतंत्र्याचें भय पतकरून हि सैन्य कमी करावें. इतक्या प्रयासानंतर नुकतेंच आपण स्वराज्य मिळविलें असतांना माझें हें अशा तऱ्हेचें बोलणें लोकांना अगदीं विचित्र वाटेल. परंतु तें जरी विचित्र असलें तरी फार शहाणपणाचें आहे. या विज्ञानयुगांत स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य या शब्दांना अर्थ तरी काय उरला आहे? त्या संज्ञा इतक्या मागासलेल्या झाल्या आहेत कीं आतां त्यांचा अर्थ हि कळायचा नाहीं. नुकतेच आम्ही अक्राणी महालांत यात्रा करून आलों. तिथें रस्ता असा बिकट असे कीं दोन माणसांना हातांत हात घालून चालावें लागायचें. आतां याला स्वातंत्र्य म्हणायचें कीं पारतंत्र्य! आम्हीं जर विचार केला असता कीं आम्हांला स्वतंत्रपणें एकएकटें च चालायचें आहे तर तसें आम्ही करूं शकत होतों. पण मीं म्हटलें कीं पडायचें असलें तरी एकेकटें न पडतां मिळून पडूं या. तेव्हां अक्राणी महालानें आम्हांला शिकविलें कीं आपापल्या पायावर पण एकमेकांवर भार टाकून चालावें. या विज्ञानयुगांत स्वातंत्र्य या शब्दाला अर्थ तरी काय राहणार? 'स्व' चाच अर्थ आतां वेगळा होणार आहे. 'स्व' व्यापक बनणार आहे आणि 'तंत्र' विरून जाणार आहे. अशा स्थितींत मनाच्या भूमिकेंत राहून चालणार नाहीं. काम जरी आपण एका खेडयांत करीत असलों तरी भूमिका मनाच्या वरची पाहिजे.

अलिकडे आपल्या देशांत जे सत्याग्रह चालले आहेत ते स्वतःला कुंठित च करीत आहेत. कारण 'मागील अंकावरून पुढें चालू' अशा प्रकारचे ते आहेत. म्हणून आतां आमच्यामध्यें भ्रम राहूं नये आणि आम्ही परमव्यापक बनून खोलांत जायला हवें हें आम्हांला ओळखायला पाहिजे. आज हिंदुस्थानांत जी परिस्थिति आहे ती पाहून माणूस अगदीं घाबरून जाईल. अनेक प्रश्न,

अडचणी, विरोध वगैरे सर्व दिसत असतांना आपण आपलें डोके शाबूत राखायला हवें. आणि या बदलल्या विज्ञानयुगांत सत्याग्रहाचें स्वरूप काय राहील यावर सर्वांनीं विचार करायला हवा.

## गुण-दोषवान् म्हणजे रूपवान्

अलिकडे मी सतत सांगत असतों कीं जगांत तीन शक्ति काम करतात; आत्मज्ञान शक्ति, विज्ञान शक्ति आणि विश्वास शक्ति. तेव्हां विश्वास नांवाची एक शक्ति आहे याचें दर्शन आम्हांला झालें पाहिजे. आपण सावधान असावें, संशय सुद्धां राखावा हें जगामधें शहाणपण मानलें जातें. राजकारणाच्या क्षेत्रांत तर एकमेकांविषयीं संशय राखणें ही नेहमींची च गोष्ट मानली जाते. पण आतां जर आम्ही एकमेकांविषयीं संशय राखत गेलों तर सबंध जगांत परस्परांच्या शक्तीची एकमेकांशीं टक्कर होईल आणि दोघे हि एकमेकांना विनाशाकडे नेतील. म्हणून जें जगाकरतां मी सांगत आलों आहे तें च आपल्या कार्यकर्त्यांना हि लागू करूं इच्छितों. सबंध विश्वाच्या राजकारणाला हि हा विचार लागू करायचा आहे. आपण काम करतों तेव्हां आपल्या बरोबर अनेक साथी असतात. ते अनेक गुणदोषांनीं युक्त असतात. आणि असें असणें योग्य च आहे. केवळ गुणसंपन्न अशी दुनिया झाली तर तिला रूप च राहणार नाहीं, ती अरूप होईल. नुसत्या पांढऱ्या कागदावर चित्र उमटणार नाहीं त्याकरतां छाया पाहिजे. तशीच गुणाला दोष छाया लागते. दोषाशिवाय गुण अव्यक्त, अरूप राहतील. म्हणून एकेका गुणासोबत एकेक दोष येतो आणि त्याचें येणें आवश्यक हि असतें. परंतु कधीं कधीं तो दोष नडतो, त्रास देतो. कारण तो मर्यादेंत रहात नाहीं. तो जर मर्यादेंत राहील, छायारूप राहील तर त्याच्यामुळें गुण खुलुन दिसेल. सात्त्विक माणसाजवळ जी निष्ठा असते त्याचबरोबर त्याच्याजवळ पुण्यप्रकोप हि असतो. कुठें पाप झालें तर त्याला अगदीं चीड येते. सात्त्विक माणसाची ती चीड छायारूप असते. पण ती मर्यादित राहिली पाहिजे म्हणजे तिच्यामुळें गुण खुलून दिसतील. पण ती मर्यादा राहिली नाहीं तर दोष गुणाला झाकून टाकतील. तेव्हां गुणदोषवान् असणें म्हणजे रूपवान् असणें होय. परंतु अनवधानामुळें तशी परिस्थिति निर्माण

होऊन दोष गुणाला झाकून टाकण्याइतके झाले म्हणजे जगांत अडचणी निर्माण होतात.

अशा स्थितींत आपण दुसऱ्याचे दोष पाहूं तर फार च मोठी चूक करूं. कारण गुणदोष पहायला आमच्याजवळ साधन च नसतें. समोरचा माणूस स्वतः आपल्याला जो दोष सांगेल तो मानावा आणि तो जो सांगणार नाहीं तो मानूं नये. त्यानें स्वमुखानें आपला जो दोष प्रकट केला त्यावर विश्वास ठेवावा आणि त्यानें जो स्वमुखानें सांगितला नाहीं त्यावर विश्वास ठेवूं नये. आपण म्हणतों, आमक्यांत अमुक दोष आहे, तो आम्हीं आमच्या डोळ्यांनीं पाहिला, कानांनीं ऐकला मग त्यावर विश्वास कसा ठेवायचा नाहीं ? हा जो आपल्या डोळ्यावर व कानावर विश्वास आहे तो खोटा आहे. कारण मनुष्याच्या गुणदोषांचें मापन करणें हें डोळे व कान यांच्या शक्तीच्या पलिकडचें काम आहे.

## तूं पापी नाहींस तूं ब्रह्म आहेस

एखाद्यानें स्वमुखानें स्वतःचा दोष सांगितला तर तो न मानण्याइतका जर मी विश्वासी बनेन तर माझी शक्ति वाढेल. तो स्वतः सांगत आहे म्हणून त्यावर विश्वास ठेवायला हरकत नाहीं. त्यामुळें त्याची दोषनिवृत्ति व्हायला आपल्याकडून मदत हि मिळूं शकते. परंतु व्हायला असें पाहिजे कीं तो जरी स्वतः सांगेल कीं माझ्यांत अमुक दोष आहे तरी तुझ्यांत तो दोष नाहीं च असें मला म्हणतां आलें पाहिजे. या वैज्ञानिक युगांत कसें वागायचें या बाबतींत उपनिषदांकडून फार मदत मिळते. आम्ही उपनिषदांच्या जवळ जाऊन म्हणतों कीं 'आम्ही पापी आहोंत, आमच्यांत भरपूर दोष आहेत; ते दूर व्हावेत म्हणून आमचा आत्मा तळमळतो आहे, तेव्हां हे माते, कांहीं मार्ग दाखव; जेणेंकरून यांतून माझी सूटका होईल.' त्यावर उपनिषदें म्हणतात कीं तूं पापी आहेस हा जो तुला भास झाला आहे तो खोटा आहे. दुसरे धर्मग्रंथ, तूं पापी आहेस आणि अमुक पुण्याचरन केल्यानें, तपस्या केल्यानें शुद्ध होशील असें सांगतात पण उपनिषदें मात्र तसें सांगत नाहींत. उलट तीं म्हणतात कीं, तुझी तुझ्याविषयींची कल्पना फार चुकीची आहे, तूं पापी नाहींत. तूं ब्रह्म आहेस. ही इतकी विलक्षण कल्पना आहे कीं तिच्यामुळें

माणसाला उन्नत व्हायला मदत मिळते. तसे च कोणी आपल्याजवळ येऊन म्हणेल कीं मी पापी आहें, तर आपण त्याला म्हणावें कीं तुझी स्वतः विषयींची कल्पना चुकीची आहे; 'अतिपरिचयात् अवज्ञा' तुला स्वतःविषयीं अतिपरिचय असल्यामुळें तूं स्वतःची अवज्ञा करीत आहेस.

## निवाडा करायला मनाच्या वरची भूमिका आवश्यक

हें लक्षांत घेऊन आपल्या सर्व मंडळींत परस्पर विश्वास आला पाहिजे. ही एवढी गोष्ट साधली तर फार मोठें काम होईल. या गोष्ठीच्या आधारावर मी प्रथम सांगितलेला तत्त्वविचार अनुकूल भासेल. आपले सर्व साथी तळमळीचे आहेत अशा स्थितींत अविश्वासाचें प्रयोजन च नाहीं. यावर एका कार्यकर्त्यानें मला विचारलें, प्रत्येकाच्या हृदयांत भलेपणा आहे असें आम्हीं श्रद्धेन मानावें काय ? त्याला मीं उत्तर दिलें, मला असें म्हणायचें नाहीं. ती अगदीं वेगळी गोष्ट आहे, तो भक्तिभाव आहे. या वेळीं मी तुम्हांला भक्तिभाव सांगत नसून विज्ञान सांगत आहें. मनुष्याच्या मूळ स्वरूपांत दोष नाहीं ही खरी गोष्ट आहे. पण येथें मी ती गोष्ट सांगत नाहीं. मला इथे हें सांगायचें आहे कीं मयुष्याच्या बाह्य आकारांत कांही गुण आणि कांहीं दोष दोन्ही असतात. त्याची पारख मनाच्या वरच्या भूमिकेवर गेल्याशिवाय होणार नाहीं. ज्या मनानें आपलीं सगळीं कामें होत असतात त्या मनानें गुणदोषाची पारख होऊं शकत नाहीं, म्हणून विश्वास राखावा. ती शक्ति आल्यावर आपण पृथक्करण करूं शकतो आणि एखाद्याला सांगूं शकतों कीं तुझ्यांत अमुक दोश आहेत तेव्हां तूं सावध रहा. अशा तऱ्हेचें जजमेंट (निवाडा) मनाच्या वरच्या भूमिकेवर जाऊन च करतां येतें.

मला सांगायचें हें आहे कीं आपण विज्ञानयुगांत राहत आहोंत हें ओळखा. व्यवहार करतांना, कामें करतांना निरनिराळचा व्यक्तींशीं सबंध येतो त्यावेळीं त्यांचे दोष टाळून गुण वाढविण्याची योजना करावी. गुणदोषांच्या बाबतींत जजमेंट करणें फार आवश्यक असलें तरी तसें जजमेंट करण्याची शक्ति मनाच्या वर उठल्याशिवाय येऊं शकत नाहीं. म्हणून ती शक्ति येईपर्यंत आपण श्रद्धा, विश्वास ठेवावा. मनाच्या वरच्या अवस्थेंत गल्यानंतर मग आपण गुणदोषांची योग्य पारख करूं शकूं व स्वतःच्या आणि

दुसऱ्यांच्या बाह्य रूपांतील गुणदोष आपण दाखवूं. असे जर आपण एखाद्याचे दोष दाखविले तर, ज्या प्रमाणें डॉक्टर मला सांगतो कीं तुझ्या पोटांत अल्सर आहे तेव्हां मला आनंद होतो व त्यानें मला मदत केली तो माझ्या सखा आहे असें वाटतें त्या च प्रमाणें आपले दोषदर्शन करविणाऱ्या माणसाविषयीं वाटेल.

## महाराष्ट्रांत विश्वक्रांतीचीं बीजें

महाराष्ट्रांत शक्ति अद्भुत आहे. विचक्षणपणा, बारीक विचार करण्याची संवय आहे आणि त्याग इतका असामान्य आहे कीं त्याची कुणाला तमा नाहीं. अशा स्थितींत परस्पर विश्वास आला तर येथून विश्वक्रांति होईल एवढी शक्ति आहे. महाराष्ट्राच्या हाडांत च त्याग तपस्या काटकपणा आहे हें मला माहीतच होतें; पण दुसरी जी गोष्ट मीं येथें पाहिली तिची मला कल्पना हि नव्हती. ती अशी कीं येथील आमच्या कार्यकर्त्यांच्या मनांत प्रांतभेद, भाषाभेद, जातिभेद, धर्मभेद इत्यादि भेदांचा लेश हि नाहीं असें मला आढळून आलें. हे कार्यकर्ते हिंदुस्थानांतील कुठल्या हि टोकाला जाऊन सेवा करतील. येथील कार्यकर्त्यांना भाषा, प्रांत, धर्म इत्यादि कुठलीच स्थूल उपाधि नाहीं. निष्ठा हा एक त्यांचा अद्भुत गण आहे. येथील कार्यकर्त्यांमधें असामान्य व्यापकपणा आहे. फक्त त्याच्या जोडीला परस्पर विश्वास असला म्हणजे झालें, पण त्याचा मात्र अभाव आहे. आणि तो आज जगांत सर्वत्र च दिसतो. तेव्हां त्याग व व्यापकता या दोन गुणांच्या जोडीला विश्वास आल्यास साऱ्या विश्वाला क्रांतीचें दर्शन घडवून देण्याचें काम महाराष्ट्र करूं शकेल.

## आजवर ज्ञानयोगाची प्रक्रिया झाली आतां कर्मयोग सुरू

लोक म्हणतात कीं एका बाजूनें सामान्य भूदानापासून आरंभ करून मग पुढें सहाव्या हिश्याचें दान, ग्रामदान, मालकी विसर्जन, ग्रामस्वराज्य असे हा मनुष्य उंच उंच बोलत गेला आणि आतां सर्वोदयपात्रावर येऊन बसला. म्हणजे अगदीं एम्. ए. ची परीक्षा दिल्यानंतर यानें आतां क का कि की काय सुरू केली आहे! मी त्यांना म्हणतों कीं आजपर्यंत आम्ही दान घेत गेलों पण ती खरोखर कर्मयोगाची प्रक्रिया नव्हती, ज्ञानयोगाची

प्रक्रिया होती. आणि आतां जी प्रक्रिया सूरू होत आहे ती कर्मयोगाची आहे. मालकी सोडा असा च जर आम्ही नुसता ज्ञानप्रचार करीत गेलों असतों तर ती गोष्ट हवेंत च राहिली असती. म्हणून आम्ही ज्ञान पोंचल्याची साक्षात् पावती घेत होतों. तो कर्मयोग नव्हता. कोणी जर खरोखर असें मानलें असेल कीं १९५७ पर्यंत साऱ्या हिंदुस्थानांत जमिनीची मालकी नाहींशी होणार आहे तर त्या भोळया शंकराला मी परम श्रद्धेनें प्रणाम करीन. परंतु मीं मात्र तसें कधींच मानलें नव्हतें. इंग्रजाचें राज्य नाहींसें करण्याची एक सामान्य गोष्ट करायची होती, त्यांत करायचें असें कांहीं नव्हतें च, त्याचें राज्य आम्ही च चालवीत होतों, तेवढें सोडलें असतें की काम झालें असतें असें असून हि त्या कामाला जर इतकीं वर्षें लांगलीं तर मालकी नाहींशी करायचें एवढें मोठें काम इतक्या थोडचा वेळांत कसें होणार? परंतु या अवधींत विचारक्रांति झालेली आहे. एलवालला सर्व नेत्यांनीं मला विचारक्रांति झाल्याची पावती लिहून दिली आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं आतां तो विचार गांवोगांव पोचवायची गरज नाहीं. हिंदुस्थान हा फार मोठा देश आहे म्हणून गांवोगांव ज्ञान पोंचविण्याची गरज राहणार च. आजवर केवळ ज्ञानयोगाची जी प्रक्रिया झाली, जिच्या आधारानें आपण ज्ञान पोंचल्याची पावती लिहून घेतली तिच्या उलट आतां कर्मयोगाची प्रक्रिया करायची आहे.

## अहिंसक समाजक्रांतीला लोकसंमतीची गरज

यावर गेल्या सात आठ महिन्यापासून माझा विचार चालू आहे आणि त्यांत माझ्या लक्षांत आलें आहे कीं आम्ही केवळ समाज-सेवाच करूं इच्छीत नाहीं तर समाज रचना बदलूं इच्छितों. नुसत्या समाज सेवेला लोकसंमतीची गरज नाहीं. समजा मी डॉक्टर आहे आणि लोकांची सेवा करतों आहे तर त्यामधें समाजरचनेला कांहीं तकलीफ न होता सेवा होते. म्हणून ज्याला स्वतःची तकलीफ दूर करायची इच्छा असेल तो माझ्याकडून सेवा घेईल. तेव्हां अशा सेवेला लोकसंमतीची गरज नाहीं. उलट त्या कार्याला लोकांची संमति मिळते च, कारण लोक प्रत्यक्ष सेवा घेत असतात. परंतु आम्हांला समाजरचना बदलायची आहे. त्यांत समाजाला कांहीं तरी त्रास हा होणार च.

त्यामुळें त्या त्रासाला लोकांची संमति न घेतां समाजावर तकलीफ लादणें ही अहिंसेची प्रक्रिया नाहीं. म्हणून आपल्या कामाला लोकसंमति पाहिजे. त्या च करतां सर्वोदयपात्राची योजना आहे. तेव्हां आतां हें जें काम आपण घेतलें आहे तें ओनामा आहे हें खरें परंतु एम्. ए. च्या परिक्षेनंतरचा तो ओनामा आहे.

## कृतीचा मुख्य आणि गौण परिणाम

'आम्ले फलार्थे निर्मिते छाया गंधौ अनुपद्यते, आंबे खायला मिळावेत म्हणून झाड लावलें तर छाया, गंध लाकडें हे तर मिळतात च, पण त्याच आंब्याच्या झाडवर माकडें आलीं आणि त्यांनीं घराचीं कौलें फोडलीं तर ते हि त्या आंब्याच्या झाडामुळें च होतें. कौलें फोडलीं जावींत म्हणून कांहीं आम्हीं झाड लावलें नव्हतें. तेव्हां झाडापासून फळें, छाया, लाकडें वगैरे मिळावीं आणि वानरें न यावीं असा बंदोबस्त करायचा असतो. गीतेमध्यें 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' यामध्यें कर्मणि हा एकवचनी शब्द असून फलेषु मधें बहुवचन आहे. त्याचा अर्थ असा कीं तुझा कर्मांत च अधिकार आहे, परंतु त्या कर्माचीं जीं विविध फळें येतात त्यावर अधिकार नाहीं. म्हणजे एका कर्माचीं विविध फळें येतात असें फलेषु शब्दानें सुचविलें आहे. तेव्हां सर्वोदयपात्राचा मुख्य उद्देश लोक-संमति हा असला तरी सैनिकांचा निर्भर हें त्याचें अनुषंगिक फळ आहे. सैनिकांचा निर्भर सर्वोदयपात्रापेक्षां अन्य कोणत्या हि मार्गानें करणें कमी शोभास्पद आहे आणि सर्वोदयपात्रानें करणें जास्त शोभास्पद आहे. नीतिशास्त्र सांगतें कीं, एका क्रियेच्या मुख्य हेतु बरोबर अनुषंगिक हेतु हि मानले जातात आणि ते हि पतकरावे लागतात.

मला सांगायचें हें आहे कीं आपल्या या क्रियेमधें लोकसंमति बरोबर कार्य-कर्त्यांचा निर्भर होतो ही त्यांतली उणीव नाहीं, तर उलट ती गोष्ट त्याची गोडी वाढणारी आहे. कार्यकर्त्यांनीं लोकसंमतीवर जगावें हें चांगलें आहे.

## सर्वोदयपात्रावरील आक्षेपांना उत्तरें

यावर एक आक्षेप असा घेतला जातो कीं सर्वोदयपात्रावर जगणें हें इतकें चागलें आहे कीं ते फक्त भिक्षूंना च साधेल, सामान्य कार्यकर्त्यांना तसें

जगणें शक्य होणार नाहीं. एका कार्यकर्त्यानें मला लिहिलें आहे कीं 'सर्वोदय-पात्रावर एकतर फार मोठे लोक जगूं शकतात किंवा ज्यांना दुसरा आधार च नाहीं असे अगदीं लहान लोक जगूं शकतात. म्हणजे हें काम एकतर अत्यंत उंच आहे किंवा अत्यंत लाजिरवाणें आहे.' यावर मी म्हणतों कीं आपल्या कार्यकर्त्यांनीं इतके सेन्सेटिव्ह होऊं नये. त्यांनीं लोकसंमतीचा च आधार घेणें चांगलें. मित्रांची मदत सगळ्यांना च उपलब्ध होऊं शकत नाहीं. शिवाय विशिष्ट माणसांचें अन्न खाण्यांत त्यांच्या गुणाबरोबर त्यांचे दोष हि लागू होतात. म्हणून सर्वसामान्यांचें अन्न खाणें कार्यकर्त्यांच्या दृष्टीनें इष्ट आहे.

## शरीर-परिश्रमाचा नियम

यावर आणखी एक असा आक्षेप आहे कीं सर्वोदयपात्रावर रहायचें म्हणजे पूर्वींच्या भिक्षुसंघासारखे रहायचें, मग शरीरपरिश्रमाच्या व्रताचें काय होणार? हा एक गंभीर प्रश्न आहे. याविषयीं आपण सावधान राहिलों नाहीं तर हा आक्षेप खरा होईल. आपले कार्यकर्ते शरीरश्रम करतील च. आजाऱ्यांची सेवा, सफाई इत्यादि कामांची गणना शरीरपरिश्रमांत च होईल. परंतु या बाबतींत कांहीं निरपवाद असे कायदे ठरविणें इष्ट नाहीं. नुकती च अक्राणी महालांत आमची यात्रा चालू असतांना आम्ही अनेक वेळां नद्या डोंगर ओलांडून कधीं कधीं दुपारीं ११-१२ वाजतां मुक्कामीं पोहोंचत असूं. अशा वेळीं जर कार्यकर्त्यांना तीन तास कुदळ घेऊन खणायला सांगितलें असतें तर आपल्या स्वतःसाठीं च तो खड्डा खणला असा त्याचा अर्थ होईल. म्हणून नियम च घालायचे तर ते सत्य अहिंसा इत्यादींचे च घालावेत.

## लोक स्वरक्षित नाहींत तोंवर शांतिसेनेची गरज

सर्वोदयपात्रावर आणखी एक गंभीर आक्षेप असा आहे कीं शांति-सेना, सेवकवर्ग उभा करायचा म्हणजे लोकांनीं पुन्हां दुसऱ्याच्या च आधारावर रहायचें का? शस्त्रधारी सैन्यावर अवलंबून राहण्याऐवजीं निःशस्त्र सैन्यावर अवलंबून राहायचें तर त्यांत लोक स्वरक्षित होत नाहींत ते नाहींत च. यावर उत्तर एवढें च कीं समाज पुष्कळसा स्वरक्षित असता आणि आम्ही आपल्या योजनेनें त्याला परावलंबी बनवत राहिलों असतों तर गोष्ट निराळी होती,

पण आज समाज सर्वस्वी परावलंबी आहे. म्हणून आम्ही अशी योजना करावी कीं ज्यायोगें आम्ही लोकांना असें म्हणूं कीं आम्ही तुमचें रक्षण करणार म्हणजे तुमच्या च आधारावर तुम्हांला हिंमत देऊन करणार. जोंवर तुम्हांला हिंमत येत नाहीं तोंवर आम्ही सदासर्वदा तुमच्या सेवेला तयार आहोंत च. पण तुम्हांला हिंमत आल्यावर तुमचें रक्षण तुम्ही स्वतः करायचें आहे. तेव्हां या आक्षेपांतील दोष सध्या आपल्याला पतकरावा लागेल. तसा तो दोष तर आपल्या सर्व च कामाला लागू होईल. सर्व-सेवा-संघ च कशाला हवा असा हि आक्षेप घेतला जाऊं शकतो. पण जेव्हां लोक आपलें रक्षण स्वतः करूं शकतील अशी परिस्थिति येईल तेव्हां च ही विसंगति जाईल.

नवापूर, (प. खानदेश) १९-९-५८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...३५८२०.... दि: ११।३।७५
क्रमांक .................... नों. दि. १०।१२।७५

परिशिष्ट

## ग्रामोद्योगाचीं पांच बोटें : १ :

[ सर्वोदय प्रदर्शनी पंढरपूरच्या उद्‌घाटन प्रसंगीचें भाषण ]

### करण-उपकरण विवेक

या जगांत उत्पादनाचीं जेवढीं कामें आहेत तीं सर्व पांच बोटांनीं च होतात आणि ग्रामोद्योगाच्या कार्यांत तर पांच बोटांना च मोठेपणा आहे. त्यांना साह्य करण्यासाठीं कांहीं उपकरणें लागतात हें खरें आहे, पण तीं उपकरणाच्या च रूपांत असतात. मूळ करण व त्याचे उपकरण हा जो विवेक किंवा भेद आहे, तो च ग्रामोद्योग व यंत्रोद्योग यांच्यांत आहे. ग्रामोद्योगांत करण हें प्रमुख व उपकरण हें गौण असतें. डोळे प्रमुख आणि चष्मा गौण, हात प्रमुख आणि अवजारें गौण, पाय प्रमुख आणि सायकल गौण. जेथें उपकरण च प्रमुख बनतें, त्याला यंत्र म्हणतात. सध्यांच्या काळांत विशेषत: या विज्ञानाच्या युगांत कांहीं कामें यंत्राच्या साह्यानें करणें अवश्य च आहे. उपकरण प्रमुख बनलें, तरी करणावाचून त्याचें चालत नाहीं. दूरचीं नक्षत्रें पहायचीं असलीं कीं, दुर्बिण प्रमुख होते, तरी हि तिची योग्यता डोळ्यापेक्षां अधिक असूं शकत नाहीं. कारण डोळे च नसले, तर दुर्बिण कांहीं काम करूं शकणार नाहीं. तसे च दुर्बिणीवाचून डोळे हि दूरचीं असंख्य नक्षत्रें पाहूं शकत नाहींत. तेव्हां उपकरणांना महत्त्व असलें, तरी करणांना मदत करणारीं म्हणून च त्यांना स्थान आहे. मात्र करणांचें स्थान प्रमुख आहे.

### ग्रामोद्योग व यंत्रोद्योग यांचीं क्षेत्रें आखलेलीं हवींत

प्रत्येक काम ग्रामोद्योगानें च किंवा यंत्रोद्योगानें च झालें पाहिजे असा आग्रह आपल्या या विशाल देशांत आपल्याला धरतां येणार नाहीं. अशा तऱ्हेचा आग्रह धरण्यांत सत्य नाहीं, म्हणून तो सत्याग्रह असणार नाहीं. आपल्या देशांत कांहीं कामें ग्रामोद्योगानें व कांहीं यंत्रोद्योगानें करणें अवश्य आहे. व्यवहारांत या दोहोंचा विवेक केला पाहिजे. ग्रामोद्योग व यंत्रोद्योग

यांच्यांत वाटणी केली पाहिजे. विशिष्ट क्षेत्र ग्रामोद्योगाला मोकळें ठेवावें व विशिष्ट यंत्रोद्योगाला. आणि कांहीं क्षेत्रें दोघांना हि खुलीं ठेवावीं. मात्र त्या उभयतांत स्पर्धा होणार नाहीं अशा रीतीनें उभय क्षेत्रांची विभागणी आपल्या देशांत करणें अवश्य आहे. असें केल्यावाचून या विज्ञान युगांत आपण प्रगति करूं शकणार नाहीं. उत्पादन व वितरण योग्य रीतीनें होणार नाहीं व बेकारी हि नाहींशी करूं शकणार नाहीं. तेव्हां या दृष्टीनें सर्वांनीं विचार केला पाहिजे. आपल्या देशांतील मोठे विचारवंत आतां याच निर्णयाप्रत आले आहेत ही मोठी भाग्याची गोष्ट आहे.

## भिन्न भिन्न विचारकांना जवळ कोणीं आणलें

सर्वोदय-विचाराचा हाच मोठा विजय आहे की, त्या विचारानें वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांना जवळ आणून एकाच व्यासपीठावर उभें केलें. आतां आपल्या देशांत आर्थिक प्रश्नांसंबंधीं विशेष मतभेद उरले नाहींत. राजकीय दृष्टीनें विचार करणारे, काँग्रेस, प्रजासमाजवादी व कम्युनिस्ट हे जे तीन पक्ष आहेत, ते समाजवाद च मानतात. हे च तीन पक्ष आर्थिक समस्यांविषयीं चिंतन करतात. सर्वोदयविचार हा संपूर्ण जीवनविचारच असल्यामुळें त्यांत अर्थशास्त्राचा व समाजशास्त्राचा विचार अंतर्भूतच आहे आणि तो हि, लोकजीवनाच्या दृष्टीनें. आपल्या देशाच्या निर्माण योजनेच्या बाबतींत सगळे राजकीय पक्ष जवळ आले आहेत. त्यांना जवळ आणण्याचें श्रेय कोणाला आहे ? भारताच्या समस्यांविषयीं जे लोक गंभीरपणानें व प्रामाणिकपणानें विचार करूं लागतील, त्यांना त्या समस्या अधिकाधिक जवळ आणतील आणि केवळ पुस्तकपठनानें जे मतभेद निर्माण झालेले असतात, ते या समस्यांच्या चिंतनानें च मिटतील, जीर्णशीर्ण होऊन जातील. तेव्हां या सर्वांना जवळ आणण्याचें श्रेय कुणाला असेल, तर तें या समस्यांना आणि आजच्या विज्ञानयुगाला आहे. त्याच प्रमाणें या भिन्न भिन्न विचारांच्या लोकांना एकाच व्यासपीठावर आणणाऱ्या सर्वोदय-विचाराला हि थोडे श्रेय आहे असें मी नम्रतेनें म्हणतों. येलवाल येथें भरलेली सर्वपक्षीय ग्रामदान परिषद ही एक मोठी घटना आहे. त्यानंतर च वेगवेगळे पक्ष जवळ आणण्याची क्रिया वेगानें सुरू झाली. म्हणूनच आतां राष्ट्राच्या योजनेबद्दल फारसे

मतभेद उरलेले नाहींत. तपशिलाच्या बाबतींत कमी अधिक मतभेद हे राहणार च.

## ग्रामोद्योगाचें पहिलें बोट --शोधक वर्ग

ग्रामोद्योगांत पांच बोटांना महत्त्व आहे. पहिलें बोट म्हणजे शोधक वर्ग. शोधक वर्ग पुढें आला नाहीं तर ग्रामोद्योग चालणार च नाहींत. तुम्हांला माहीत च आहे कीं प्रथम तकलीचा शोध लागला. नंतर चरखा, तुनाई, धुनाई, अंबरचरखा हे सारे शोध लागले. याप्रमाणें शोधांची प्रगति चालू आहे. देशांत यामुळें एक चैतन्य निर्माण झालें व शोधकवर्गानें ग्रामोद्योगांच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत सूक्ष्म प्रकारचे शोध लावले. या शोधक वर्गाची वाढ झाली पाहिजे. त्यांच्या बुद्धींत तेजस्विता व परिस्थिति पाहून त्याप्रमाणें शोध करण्याची अक्कल आली पाहिजे.

## दुसरें बोट--करुणावान् सेवक वर्ग

पांच बोटांपैकीं दुसरें बोट म्हणजे सेवक वर्ग होय. गेल्या चाळीस वर्षांपासून हा सेवक वर्ग कांहींना कांहीं काम करीतच आहे. पण ही सेवा अपुरी आहे. चाळीस कोटि लोकांसाठीं मूठभर सेवक कसे पुरे पडतील ? प्रत्येक ५००० लोकांमागें एक सेवक एवढें प्रमाण पाहिजे. म्हणजे एक लाख सेवकांची माझी मागणी आहे. कामाच्या व्यापकतेच्या दृष्टीनें पाहिलें, तर माझी मागणी ही कांहीं मोठी नाहीं. या सेवक वर्गाचें हृदय करुणेनें भरलेलें असावें. या सेवकांना आपल्या जीवननिर्वाहासाठीं थोडेसेंच मिळेल. कारण देशांतील सर्वसामान्य लोकांचें जीवनमान उंचावण्यांत आपण यशस्वी होत नाहीं तोंपर्यंत आपल्या सेवकांना एकादशी व द्वादशी यांच्यामध्येंच आपलें जीवनमान ठेवलें पाहिजे. ही मधली स्थिति कांहीं वर्षेपर्यंत राहणारच आहे. देशांत द्वादशीची स्थिति नांदावी अशी माझी इच्छा आहे. पण त्याला कांहीं काळ लागणारच. पण मध्यंतरीच्या काळांत आमच्या सेवकवर्गाला जें थोडेसें मिळेल यांतच त्यांनीं प्रसन्नचित्त राहिलें पाहिजे. ही प्रसन्नता त्यांच्या हृदयांतील करुणभावनेमुळेंच उत्पन्न होईल. अशा प्रकारच्या सेवाप्रधान, करुणावान् सेवकांची गरज आहे.

## तिसरें बोट, अहिंसेच्या मूलभूत विचारांचा प्रचार करणारा प्रचारक वर्ग

पांच बोटांतील तिसरें बोट म्हणजे विचार प्रचारक. खादी व ग्रामोद्योग यांच्यामागें एक संपूर्ण विचार आहे. खादी म्हणजे नुसतें कापड नव्हे. आपल्या देशांत लिप्टन चहाचा केवढ्या जलदीनें प्रसार झाला हें तुम्हांला माहीत आहे च. त्यासाठीं तऱ्हेतऱ्हेच्या जाहिराती केल्या गेल्या. बिडीसारख्या वस्तूचा देखील किती लवकर प्रसार होतो ! या वस्तूंप्रमाणें च खादीचा देखील अतिशय लवकर प्रसार होईल, पण त्याच्या अगोदर विचारप्रचार व्हावयास हवा. खादीच्या मुळांत अहिंसा आहे. युद्धाची सिद्धता करण्याच्या दृष्टीनें जर देशाची घडण बनवायचें ठरलें, तर ज्या धंद्यांचा युद्धाच्या तयारीला उपयोग होईल ते च धंदे देशांत चालतील. खादी व ग्रामोद्योग यांचा युद्धाच्या तयारीच्या दृष्टीनें कांहीं उपयोग होणार नाहीं हें मी मान्य च करतों. पण त्यांचा शांततेची तयारी करण्याच्या दृष्टीनें फार उपयोग आहे. आपल्या देशाला आणि एकंदर जगालाहि युद्धापेक्षां शांतता अधिक महत्त्वाची वाटली, तर त्यांना खादी व ग्रामोद्योग पसंत पडतील. मी तर खादी-ग्रामोद्योगाला संरक्षण साधन म्हणतों. हिंदुस्थानचें युद्धापासून रक्षण करायचें असेल आणि युद्धकालांतहि खेड्यांचें रक्षण करायचें असेल तर ग्रामोद्योगांची फार जरूर आहे. त्यांच्यावाचून देश वाचूं शकणार नाहीं. म्हणून हा विचारप्रसार करण्यासाठीं आम्हांला विचारप्रचारकांची एक मोठी सेना अवश्य आहे. त्यांच्या मूलभूत विचारांत असा विचार अंतर्भूत राहील कीं, आम्हांला शांतता हवी आहे आणि म्हणून च आहांला खादी व ग्रामोद्योग हवे आहेत. आणि. या विज्ञान-युगांत शांतता अत्यावश्यक आहे, म्हणूनच आम्हांला शांतता हवी आहे. या विचारानुसार विज्ञानयुगांत हि खादीला योग्य स्थान मिळेल. विज्ञान ही एक गोष्ट आहे आणि यंत्र ही अगदीं वेगळी गोष्ट आहे. हीं दोन्ही एक च आहेत असें समजणें हा विचारदोष आहे. विज्ञानानें आतां कोणत्या दिशेनें जावें हें आत्मज्ञान ठरवील. कोणतीं यंत्रें वाढविणें अवश्य आहे हें आत्मज्ञान सांगेल. विज्ञान लहान यंत्रें बनवूं शकतें व मोठीं यंत्रें हि बनवूं शकतें. लहानशा घड्याळांत हि विज्ञानाचा कांहीं

कमी उपयोग करावा लागत नाहीं ! लहान व मोठ्या सर्व यंत्रांचें स्वतंत्र स्थान आहे.

## चौथें बोट–सरकार

पांच बोटांपैकी चौथें बोट म्हणजे शासन, सत्ता किंवा सरकार हें होय. खादी-ग्रामोद्योगाच्या कार्यांत या हि बोटानें व्यवस्थित काम करावें. हिंदुस्थानच्या निर्माण योजनेंत पूर्वी खादी–ग्रामोद्योगांबाबत जी कुचराई होती ती आतां पुष्कळ कमी झाली आहे हें सांगण्यास मला आनंद वाटतो. अजून सरकारच्या विचारांत पूर्ण स्पष्टपणा आलेला नसला तरी पुरेसा स्पष्टपणा आलेला आहे. म्हणून हें बोटहि आतां थोडें थोडें काम करूं लागलें आहे, थोडीबहुत मदत हि देत आहे. सरकारच्या विचारांत जेवढा अधिक स्पष्टपणा येईल तेवढ्या अधिक प्रमाणांत त्यांच्याकडून मदत मिळेल.

## पांचवें महत्वाचें बोट–जनता

पांचवें बोट म्हणजे जनता. हें सर्वांत महत्त्वाचें बोट आहे. या कामासाठीं जनतेची तयारी केली पाहिजे आणि गेलीं सात वर्षे मी हें च काम करीत आहें. खेड्यांत खादी तयार व्हावी व मुंबई-कलकत्त्यासारख्या शहरांत ती विकली जावी हें कांहीं योग्य नाहीं. खादी विकत घेणें हें शहरांचें कर्तव्य च आहे यांत कांहीं शंका नाहीं. कारण खड्यांतून त्यांना जें भरभरून मिळालें आहे त्यापैकीं थोडासा अंश तरी त्यांनीं खेड्यांना परत दिला पाहिजे. परंतु एवढें पुरेसें नाहीं. खादीला जनतेच्या साह्याच्या रूपानें संरक्षण मिळालें पाहिजे. या जगांत कोणत्या हि उद्योगाची वाढ संरक्षणावांचून कुठेंहि झालेली नाहीं. एकतर त्याला कायद्याचें संरक्षण अवश्य असतें नाहीतर लोकसंमतीचें संरक्षण. दोन्ही प्रकारचें संरक्षण मिळेल तर उत्तम च. पण खादी-ग्रामोद्योगांच्या पाठीशीं लोकसंमति उभी असणें अवश्य च आहे. याचें च नांव ग्रामदान. हें च मूलभूत स्वरूपाचें काम आहे. ग्रामदानांत असा ग्रामसंकल्प असतो कीं आमच्या गांवाचें जास्तींतजास्त आयोजन व नियोजन आम्ही च करूं. याशिवाय सरकारला जी मदत आम्हांला द्यावयाची असेल ती त्यानें द्यावी. याप्रमाणें संकल्प करून कार्य झालें तर च

ग्रामराज्य स्थापन होऊं शकेल. म्हणून खादी-ग्रामोद्योग हें ग्रामराज्याचें च एक अंग आहे हें समजून काम केलें पाहिजे.

## खेड्याबाहेरील मालावर बहिष्कार

देशाला स्वराज्य प्राप्त व्हावें म्हणून पूर्वी आपण ज्याप्रमाणें परदेशी मालावर बहिष्कार टाकला होता व स्वदेशीला उत्तेजन दिलें होतें, त्या च प्रमाणें आतां ग्रामस्वराज्यासाठीं गांवांत जो कच्चा माल पैदा होतो आणि ज्याचा पक्का माल गांवांत च बनूं शकतो, तो माल गांवांत च बनविला जाईल इकडे लक्ष दिलें पाहिजे. खेड्यांतील लोकांनीं खेडयाबाहेरचा माल स्वदेशी असला तरी खरेदी करतां कामा नये. खेड्याबाहेरील मालावर त्यांनीं बहिष्कार घातला पाहिजे. बहिष्कार हा शब्द आपल्याला कठोर वाटेल. पण मी कांही तो बहिष्कार-आंदोलनांतून उचलला नाहीं. तो आमच्या सांस्कृतिक वारशांतून मिळालेला आहे. गीतेंत तो आला आहे. सहाव्या अध्यायांत '**स्पर्शान् कृत्वा बहिः**' म्हणजे बाह्य स्पर्शावर बहिष्कार केला पाहिजे असें लिहिलें आहे. मराठी गीताईंत मी याचा अनुवाद पुढील प्रमाणें केला आहे; '**विषयांचा बहिष्कार.**' ज्या गोष्टी तुमच्या जीवनावरच हल्ला चढवितात त्या बाहेर ठेवा. त्यांना बाहेर स्थान नाहीं असें नव्हे, पण आपल्या मनांत त्यांना स्थान देतां उपयोगी नाहीं. याप्रमाणें खेड्यांनीं ग्रामीणेतर मालावर बहिष्कार टाकला पाहिजे. खेड्याच्या आयातनिर्यातीवर खेड्यांचें च नियंत्रण असलें पाहिजे. निदान ग्रामदानी खेड्यांत तरी हा नियंत्रणाचा अधिकार असलाच पाहिजे. खेडयाच्या सार्वमतानें आयातनिर्यातीचें नियंत्रण करण्याचा अधिकार हा खेड्याचा मूलभूत स्वरूपाचा अधिकार आहे. लोकमान्य टिळकांच्या शब्दांत तो त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे. याच्या बरोबरच आणखी एक गोष्ट जोडावी असें मला वाटतें. ती म्हणजे त्यांचें जन्मसिद्ध कर्तव्य आहे. तेवढें जर त्यांनीं केलें, तर खादी-ग्रामोद्योगाला भक्कम पाया मिळेल. या पायावर पक्की इमारत बांधतां येईल.

हीं पांचीं बोटें मिळून मिसळून काम करतील तर हिंदुस्थानचा निश्चित उद्धार होईल.

पंढरपुर, जि. सोलापुर ता. २८-५-५८

## भारतीय स्त्री आणि संन्यास :२:

[कस्तुरबा ट्रस्टच्या कार्यकर्त्यांसमोर दिलेलें भाषण]

### 'गोपीजनप्रिय कृष्ण'

हिंदुस्थानच्या स्त्रियांना एक स्वतंत्र स्थान आहे. व त्यांचा एक वेगळा इतिहास हि आहे. स्त्रीपुरुषांचा मिळून इतिहास असतो हें खरें असलें, तरी येथील स्त्रियांचा वेगळा इतिहास आहे. भारतीय संस्कारांची परंपरा दहा हजार वर्षांपासून चालत आलेली आहे आणि तिचा इतिहास हि उपलब्ध आहे. ज्या प्रकारें लिखित इतिहास असतात, तसा तो नसला, तरी हजारों ग्रंथांमधून त्या इतिहासाचें उज्वल दर्शन होत आलें आहे. माझ्या समजुतीप्रमाणें स्त्रियांच्या उद्धारासाठीं प्राचीन काळीं ज्यांनीं प्रयत्न केले, त्यांत भगवान् श्रीकृष्ण व महावीर यांचीं नांवें घेतलीं जातात व अर्वाचीन काळांत गांधीजींचें. मध्यतरींचा काळ या दृष्टीनें कोरडा राहिला असे नव्हे. त्या काळांतलाहि इतिहास आहे. पण हीं तीन नांवें मात्र अविस्मरणीय आहेत. भगवान् श्रीकृष्णांनीं स्त्रियांसाठीं जें केलें त्याचें गुणगान पांच हजार वर्षांपासून उभ्या भारतांत गाइलें जात आहे. जेव्हां द्रौपदीवर भर राजसभेंत वस्त्रहरणाचा दुर्धर प्रसंग ओढवला, तेव्हां तिनें श्रीकृष्णाचें स्मरण केलें. त्यावेळचे तीन श्लोक आहेत. हे तीन श्लोक मनुष्याला भवसागरांतून तारण्यास समर्थ आहेत असे मानलें जातें. गांधीजींनीं आश्रमांत जी प्रार्थना सुरू केली तिच्यांत स्त्रियांसाठीं म्हणून हे श्लोक म्हटले जातात. भगवान् श्रीकृष्णाचें स्मरण करून द्रौपदीनें प्रार्थना केली कीं, 'आज माझे पति हरले असतांना आणि भीष्म द्रोणादि वृद्ध व इतर बंधु हे नुसते हतबुद्ध होऊन पाहत राहिले असतांना, आतां तुझ्यावांचून माझें रक्षण दुसरे कोण करील?'– या श्लोकांत कृष्णाला उद्देशून जें संबोधन घातलें आहे तें '-गोपीजनप्रिय कृष्ण', असें आहे. "गोपीजनप्रिय कृष्णा ज्या तुझ्यावर गोपींची प्रीति होती आणि तुझीहि गोपीवर होती, असा तूं, आज माझ्या रक्षणार्थ धांवून ये" अशी प्रार्थना द्रौपदीनें केली. या एका कथेवर सारें भागवत उभ आहे. श्रीकृष्णाचें गोपींवर जें प्रेम होतें,

स्त्रियांविषयीं त्याला जो आदर होता आणि बंधूच्या नात्यानें स्त्रियांना तो जें साह्य करीत असे तें भारताच्या इतिहासांत केवळ अलौकिक आहे. कृष्ण-कथेहून अधिक मधुर कथा भारतांत ऐकायला मिळाली नाहीं कीं, वाचायला मिळाली नाहीं.

## स्त्रियांना समान आध्यात्मिक अधिकार देणारा महावीर

महावीरांचाहि इतिहास अद्भुत आहे. महावीरांनंतर चाळीस वर्षांनीं गौतम बुद्ध झाले. लोकमान्यांच्या व आजच्या पिढींत जेवढें अंतर आहे तेवढें महावीर व बुद्ध यांच्या काळांत होतें. दोघांचा संचार एकाच प्रदेशांत झाला असल्यामुळें बुद्धानें महावीरस्वामींना कदाचित् पाहिलें असावें. महावीर तेव्हां वृद्ध व बुद्ध तरुण असावेत. महावीर-संप्रदायांत स्त्री-पुरुष असा भेद केला जात नसे. पुरुषांना जे अधिकार होते, ते सर्व स्त्रियांना हि दिले गेले होते. आज-काल ज्या समान अधिकारांची चर्चा चालते त्या अधिकारांबद्दल मी सांगत नाही. मी आध्यात्मिक अधिकारांसंबंधीं सांगतों. पुरुषांना जेवढे आध्यात्मिक अधिकार महावीर संप्रदायानें दिले, तेवढे सर्व, भेदाभेद न करतां स्त्रियांना हि प्रदान केले. म्हणून महावीर-संप्रदायांत जेवढे श्रमण-पुरुष होते त्यांपेक्षां अधिक श्रमणी-स्त्रिया होत्या. ही प्रथा आजपर्यंत जैनधर्मांत चालू आहे. संन्याशानें एकटयानें संचार करतां कामा नये, दोघांनीं मिळून संचार केला पाहिजे, असा जैन धर्मांत नियम आहे. त्याप्रमाणें संन्यासिनी हि जोडी जोडीनें हिंडत असत.

## महावीर व बुद्ध यांच्या भूमिकांतील फरक

महावीरांच्या जैन धर्माचें हें मोठेंच वैशिष्टय मानलें पाहिजे. कारण त्यांच्या नंतर चाळीस वर्षांनींच ज्या गौतम बुद्धांचा उदय झाला त्यांनीं स्त्रियांना संन्यासदीक्षा देणें हें उचित मानलें नाहीं. स्त्रियांना संन्यास देण्यांत धर्माची मर्यादा पाळली जाणार नाहीं असें त्यांना वाटलें असावें. पण एक दिवस त्यांच्या आनंद नांवाच्या शिष्यानें एक स्त्री भगवान् बुद्धां-समोर उभी केली व आपला उपदेश ग्रहण करण्यास ही सर्वथा पात्र आहे असा निर्वाळा दिला व संन्यासाचा उपदेश तिला मिळावा अशी विनंति केली. भगवान् बुद्धांनीं तिला संन्यास-दीक्षा दिली, पण ते आनंदाला म्हणाले, 'तुझ्या

प्रेमाच्या आग्रहामुळें मीं हें केलें आहे, पण यामुळें आपल्या संप्रदायापुढें मोठें संकट उभें राहील असें मला वाटतें.' बुद्धांच्या म्हणण्याप्रमाणें दुष्परिणाम पुढें झाले. ज्या संकटाची बुद्धाला भीति वाटत होती, तें संकट बौद्धांच्या इतिहासांत उत्पन्न झालें च. तसा बौद्धांचा इतिहास पराक्रमशाली आहे व त्यांत कांहीं दोष असले, तरी देशानें अभिमान बाळगावा असा तो इतिहास आहे.

## महावीरांचा पराक्रम

परंतु मला असें सांगायचें आहे कीं, जें भय बुद्धाला वाटलें तें महावीराला वाटलें नाहीं. अगोदर होऊन गेलेल्या महावीराला हें भय वाटलें नाहीं हें आश्चर्य आहे. महावीर अतिशय निर्भय होते आणि या निर्भतेचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला आहे. म्हणून च महावीरांविषयीं मला विशेष आकर्षण वाटतें. बुद्धांचा मोठेपणा थोर आहे. साऱ्या जगांत त्यांच्या कारुण्यभावनेचा प्रसार होत आहे. म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वांत कांहीं कमीपणा असू शकेल असें मला वाटत नाहीं. महापुरुषांच्या वृत्ति भिन्न भिन्न असतात. पण बुद्धांच्या वृत्तीला व्यावहारिक भूमिकेचा स्पर्श झाला व महावीरांना व्यावहारिक भूमिका स्पर्शू शकली नाहीं आणि परिणामतः त्यांनीं स्त्री-पुरुषांत भेद मानला नाहीं हें सत्य आहे. या बाबतींत ते दृढनिश्चयी राहिल्यामुळें माझ्या मनांत त्यांच्यासंबंधीं विशेष आदर आहे. यांत च त्यांची महावीरता सांठली आहे. रामकृष्ण परमहंसांच्या संप्रदायांत त्यांची पत्नी शारदादेवी ही एक च स्त्री होती. शारदादेवी या केवळ नाममात्र पत्नी होत्या. त्या वस्तुतः त्यांच्या मातेच्या ठिकाणीं च होत्या व त्यांच्या संप्रदायांतील सर्वांना त्या मातृस्थानीं होत्या. पण त्यांच्याशिवाय दुसऱ्या स्त्रीला त्यांनीं दीक्षा दिली नाहीं. महावीरांच्या नंतर पंचवीसशें वर्षें लोटलीं, तरी स्त्रियांना दीक्षा देण्याची हिंमत झाली नाहीं. चार वर्षांपूर्वीं मात्र रामकृष्ण परमहंसांच्या मठांत स्त्रियांना दीक्षा देण्याचा निर्णय घेण्यांत आला. स्त्री-पुरुषांचे आश्रम वेगवेगळे असावेत असें ठरलें. पण आजवर स्त्रियांना दीक्षा च दिली जात नसे ती आतां मिळूं लागली आहे. या एका च गोष्टीवरून अडीच हजार वर्षांपूर्वीं ही गोष्ट करणाऱ्या महावीरांचा पराक्रम केवढा मोठा आहे याची कल्पना करतां येते. श्रीकृष्णानें जें कार्य केलें तें संन्यास-

दीक्षा देण्याचें नव्हे, तर भक्तिभावांत स्त्री-पुरुषांची समानता असावी व अनासक्त व निर्लेप राहून परस्परांमध्यें संकोच न ठेवतां त्यांनीं वागावें हा जीवनांतील मूलभूत विचार त्यानें दिला. स्त्रियांना संन्यासाचा अधिकार दिला तर पुष्कळजणी संन्यास घेतील असें मुळीं च नव्हे. परंतु असा अधिकार देण्यांत धोका आहे अशी पूर्वीच्या काळीं समजूत होती. परंतु गृहस्थाश्रमांत हि स्त्रीपुरुषांनीं संकोच न ठेवतां बंधुभगिनीप्रमाणें वागावें हें श्रीकृष्णानें दाखविलें. जीवनाच्या दृष्टीनें श्रीकृष्णानें हें दाखविलें, परंतु तत्त्वविचाराच्या दृष्टीनें मला महावीरांचा इतिहास अद्वितीय वाटतो.

## गृहस्थांना गांधीजींचे मार्ग-दर्शन

आणि गांधीजींनीं काय सांगितलें ? त्यांनीं फार मोठी गोष्ट सांगितली असें नाहीं. जुन्या ग्रंथांत ज्याला आधार सांपडत नाहीं, असा क्वचितच विचार आपणामध्यें असेल. आपल्याकडे ब्रह्मचिंतन इतकें झालें आहे कीं, कोणत्याहि क्षेत्रांतील नव्या विचाराला कुठेतरी आधार मिळतो च. त्यामुळें व्यावहारिक क्षेत्रांत गांधीजींनीं जी गोष्ट सुरू केली, तिला शास्त्रांत आधार होता, तरी प्रत्यक्ष जीवनांत तिचा प्रयोग केला जात नव्हता. गृहस्थाश्रमांत हि वानप्रस्थाश्रमाप्रमाणें माणसाला राहतां येईल हें गांधीजींनीं नव्यानें दाखविलें. गृहस्थाश्रमांत असतां प्रजोत्पादन करतांना पतिपत्नींनीं परस्परांशीं एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा करावी, संतानाची जबाबदारी स्वीकारावी, परंतु हळू हळू ही वासना सोडून गृहस्थाश्रमांत च वानप्रस्थ वृत्तीनें राहणें शक्य आहे. गृहस्थाश्रम जितक्या लवकर सुटेल तितका बरा, लग्नानंतर एक मूलहि न होतां सुटला तर अधिक चांगला व एका मुलानंतर सुटला तरी चांगला हा विचार गांधीजींनीं दिला. अर्थात् ही वृत्ति व आचरण मोठ्या प्रमाणांत आचरलें जाईल असें मुळीच नाहीं. त्यासाठीं गांधीजींनीं साध्या राहणीचा जरी विशेषच आग्रह धरला होता तरी तशा आचरणासाठीं जें वातावरण हवें तें आपण निर्माण करूं शकलों नाहीं.

## कृत्रिम संततिनियमनाचे परिणाम

आजकाल तर भोगाचीं साधनें सारखीं वाढत च आहेत. स्वराज्य मिळाल्यानंतरच्या या दहा वर्षांत अभिमान वाटण्यासारखा कांहीं फरक

झाला आहे खरा, पण ज्यामुळें दुःख व्हावें असेहि फरक घडून आले आहेत. भोगविलासाचीं साधनें वाढतच आहेत व भोगविलासी वृत्तींत कांहीं वाइट आहे याची सुद्धां जाणीव राहिलेली दिसत नाहीं. आतां तर संतति-नियमनाचा हि प्रचार निर्लज्जपणानें चालला आहे. मी कठोर शब्दांत बोलतों खरा, पण त्याला माझा नाइलाज आहे. माझ्यानें हें सहन होत नाहीं. संततिनियमनाचा प्रचार करणाऱ्यांमध्यें दयाळू व करुणापूर्ण असे लोक आहेत हें मला माहीत आहे. मी त्यांना अन्याय करूं इच्छीत नाहीं. परंतु या लोकांची करुणा ही वरवरची आहे, सखोल नाहीं, ती नुकसान करणारी आहे. देशाची आत्मशक्ति क्षीण बनविणारी ही करुणा आहे. फ्रान्समध्यें असेंच घडलें. तेथें पुरुषत्वहीनता दृष्टीस पडते. पुरुषार्थशक्ति तेथें क्षीण झालेली आढळून येते. हल्लीं सारें वातावरणच प्रतिकूल आहे. म्हणूनच गांधीजींच्या विचाराचा प्रसार होत नाहीं. परंतु तो विचार नाहींसा होणरा नाहीं. कारण त्यामुळें एक नवा मार्ग मिळाला आहे. गृहस्थांना त्यामुळ एक वेगळेंच क्षेत्र मिळत आहे. गृहस्थाश्रमांत राहून पहिल्या दिवसापासून च ब्रह्मचर्य पाळण्याचा प्रयत्न करणारे या विचारामुळें निघतील. आणि असा प्रयत्न करीत असतां जर संतान झालें तर तें हि पराक्रमी निपजेल. गृहस्थाश्रमांत राहूनहि वानप्रस्थवृत्ति कशी ठेवावी हें गांधीजींनीं या प्रकारें दाखवून दिलें आहे.

## मध्ययुगांतील भक्तिमार्गी स्त्रिया

मध्यंतरीचा काळ असा गेला कीं, महावीरांप्रमाणें स्त्रियांना संन्यास-दीक्षाहि देण्याचा प्रयत्न झाला नाहीं व गांधीजींप्रमाणें गृहस्थाश्रमांत राहून वानप्रस्थानें वागण्याचाहि प्रयत्न झाला नाहीं. त्याचप्रमाणें श्रीकृष्णानें दाख-विल्याप्रमाणें स्त्रीपुरुषांनीं संकोचावांचून सर्व क्षेत्रांत सहकार्यानें काम करण्या-चाहि यत्न झाला नाहीं. परंतु या काळांत भक्तिमार्गाच्या द्वारां स्त्रियांना मुक्तीचें द्वार मोकळें केलें गेलें. स्त्रियांना संन्यास-दीक्षा देण्यास तेव्हां परवानगी नव्हती एवढें च नव्हे तर संन्यासीपुरुष स्त्रियांचें मुखावलोकन हि करीत नव्हते. मिराबाई एकदां वृंदावनांत आली असतांना एका संत पुरुषाचा विशेष बोलबाला तिनें ऐकला, तेव्हां त्या संताचें दर्शन करण्याची इच्छा

तिनें प्रकट केली. परंतु स्वामी महाराज स्त्रियांचें मुखावलोकन करीन नाहींत असें तिला उत्तर मिळालें. हें ऐकतांच मिराबाईला फार आश्चर्य वाटलें. तिनें यावर एक भजन लिहिलें—

"हुं तो जाणती हती कि व्रजमां पुरुष छे एक।
व्रजमां वसीनें तमे पुरुष रह्यां छो भलो तमारो विवेक ॥"

व्रजामध्यें श्रीकृष्णाची उपासना करण्यासाठीं भक्त येतात. उपासना-बुद्धीनें स्वतःला स्त्री कल्पून ते श्रीकृष्णाची भक्ति करतात. परंतु व्रजामध्यें राहून हि पुरुषत्वाचा अहंकार मात्र गेलेला नाहीं, असा यांत एक टोमणा दिलेला आहे.

माझ्या सांगण्याचा सारांश हा कीं, स्त्रियांना तेव्हां संन्यास-दीक्षेचा तर अधिकार नव्हताच परंतु संन्यासी पुरुष स्त्रियांचें दर्शनहि घेत नसत अशा काळीं भक्तिमार्गानें स्त्रियांना मुक्तीचा मार्ग खुला करून दिला. मारवाड-मध्यें मिराबाई, उत्तर प्रदेशांत सहजाबाई व महाराष्ट्रांत मुक्ताबाई इत्यादि स्त्रिया भक्तशिरोमणि म्हणून गाजल्या ही गोष्ट हिंदुस्थानला अतिशय गौरवास्पद अशी आहे. याप्रमाणें प्राचीन काळापासून आतांपर्यंत स्त्रियांची प्रगति कोठून कोठवर झाली याचें चित्र मीं आपणापुढें मांडलें आहे. आतां पुढें काय करायचें तें पाहूं.

## ज्ञान-वैराग्याविना स्त्रियांचा उद्धार अशक्य

कस्तुरबा निधिद्वारां जेव्हांपासून कार्य सुरू झालें, तेव्हांपासूनच हा कार्यक्रम अगदीं क्षीण स्वरूपाचा आहे असें माझें मत होतें. पण स्वतः आश्रम सोडून बाहेर काम करीत नव्हतों म्हणून माझीं मतें मी बाहेर बोलून हि दाखवीत नव्हतों. पण खासगी रीतीनें कोणीं विचारलें तर सांगत असे. साबरमती आश्रमांतील एक प्रसंग या संबंधांत मला वारंवार आठवतो. साबरमती आश्रमांतून स्नान करण्यासाठीं नदीवर जावें लागे. नदीचा एक लहान प्रवाह वाळूंतून वाहत जाऊन नदीला मिळालेला होता. या लहान प्रवाहांत मासोळ्या उड्या मारतांना दिसत. उन्हाळ्यांत या लहान प्रवाहाचें पाणि आटूं लागलें. एक दिवस स्नानाला जातांना पाणी इतकें

कमी झालेलें दिसलें कीं दुसऱ्या दिवशीं सारें पाणी आटून मासोळ्या मरून जातील असें मला वाटलें. म्हणून मीं थोडें खणून तो लहान प्रवाह नदीला जोडून दिला. नदीला प्रवाह जोडला जातांच त्या मासोळ्या इतक्या उत्साहानें उड्या मारीत नदींत गेल्या कीं; त्या उत्साहाचें दृश्य मी कधींच विसरणार नाहीं. तें पाणी आटून जाणार आहे याची त्या मासोळ्यांना जाणीव नव्हती. त्याचप्रमाणें कस्तुरबा निधीच्या कार्याबद्दल जेव्हां मी विचार करूं लागतों, तेव्हां मला तें साबरमतीचें दृश्य आठवतें. प्रारंभापासूनच जें कार्य क्षीण आहे; त्यांत अक्षीण शक्ति कधींच येऊं शकणार नाहीं, अशी माझी समजूत आहे. माझी अशी निश्चित धारणा आहे कीं, शंकराचार्यांप्रमाणें प्रखर वैराग्यसंपन्न स्त्री जोंपर्यंत निर्माण होणार नाहीं, तोंपर्यंत कृष्ण, बुद्ध व गांधी यांच्यासारखे पुरुष हि स्त्रियांचा उद्धार करूं शकणार नाहींत. हें होणें असंभव नाहीं. असा प्रयत्न हि केला गेला आहे. परंतु आत्मोद्धाराच्या ज्या मर्यादा आहेत, त्यांच्याप्रमाणें स्त्रियाच स्त्रियांचा उद्धार करूं शकतील. शंकराचार्यांच्या पीठावर बसूं शकणारी अशी स्त्री निर्माण झाली पाहिजे. वैराग्यशील, ज्ञानप्रचार करणारी, शास्त्र निर्माण करणारी, धर्म बदलूं शकणारी अशी स्त्री कां निघूं नये हें मला समजत नाहीं. कस्तुरबाचा कार्यक्रम ठीक आहे, पण त्याला भक्ति व आत्मज्ञान यांचा पाया मिळाला असता तर फारच चांगलें झालें असतें. या उणेपणाबद्दल त्या वेळीं हि मी आपला असंतोष जाहीर रीतीनें प्रकट केला होता. कस्तुरबाचें जें कार्य भगिनी करीत आहेत, त्याबद्दल मला अतिशय आदर आहे. कारण अतिशय प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं काम केलें. परंतु तरुण स्त्रियांनीं दोन चार वर्षें यांत काम करावें आणि मग लग्न करून संसारांत पडावें, अशाने काम कसें चालणार ? या भगिनींना सरस्वतीप्रमाणें ज्ञान मिळालें पाहिजे. आज असें ज्ञान त्यांना मिळत नाहीं. ज्ञानाचा झराच जर त्यांना मिळणार नाहीं, तर सर्वोदयाचें इतर शिक्षण हें क्षीणच होत राहील. स्वतःच्या पायावर उभे राहून प्रगति करण्यासारखें स्थान हिंदुधर्मानें स्त्रियांना दिलेलें नाहीं. तें स्थान अजून मिळवायचें आहे.

## हिंदुधर्मानें स्त्रियांना संन्यासाचा अधिकार दिला नाहीं

एका गृहस्थानें मला सांगितलें कीं, बिहारमध्यें अनेक स्त्रिया कॅथॉलिक ख्रिस्ती बनल्या व नंतर ब्रह्मचारिणी राहून स्त्रियांची सेवा करूं लागल्या. ब्रह्मचारिणी राहण्याचा अधिकार स्त्रियांना दिल्यावर पुष्कळजणी ब्रह्मचारिणी निघतील असें नाहीं. परंतु तो अधिकार दिला नाहीं, तर त्यांच्यांत एकप्रकारची दीनता येते. कॅथॉलिक धर्मांतील स्त्रिया जें करूं शकतात तें हिंदु धर्मांतील स्त्रिया कां करूं शकत नाहीत? या प्रश्नाचें उत्तर स्पष्ट आहे. कॅथॉलिक धर्मानें स्त्रियांना तो मार्ग खुला करून दिला आहे. बुद्ध व जैन धर्मांनींहि खुला केला आहे पण हिंदुधर्मानें मात्र तो खुला केला नाहीं. प्राचीन काळीं स्त्रियांना तो मार्ग मोकळा होता, पण आतां नाहीं.

आज मी हे विचार विस्तारानें मांडीत नाहीं. पण माझ्या मनांतील भाव तुम्ही समजून घ्या. कस्तुरबा केंन्द्रांत जें शिक्षण दिलें जात आहे, तें सेवेचें आहे. पण भक्ति व आत्मज्ञान यांच्यावाचून सेवा ही केवळ सांसारिक सेवा बनते. संसाराच्या पलीकडे जाऊन समाजाला आकार देण्याचें, समाजांत क्रांति घडवून आणण्याचें सामर्थ्य तिच्यांत राहत नाहीं. हें घडून येण्यासाठीं स्त्रियांना भक्तीचें व आत्मज्ञानाचें शिक्षण मिळालें पाहिजे.

पंढरपुर, जि.–सोलापुर ३१-५-'५८

## स्त्रियांनीं अहिंसेचें शस्त्र हातीं घेऊन जगाचें नेतृत्व करावें

: ३ :

### वर्तमानपत्र-वाचन कां बंद केलें

आज हिंदुस्थानांत सार्वजनिक कार्याविषयीं ज्या तऱ्हेनें विचार केला जातो ती तऱ्हाच बदलल्याशिवाय देशाला आपल्या निजस्वरूपाचें दर्शन घडणार नाहीं. राजकारणाला जीवनांत चांगलें स्थान अवश्य आहे, परंतु आज सुशिक्षित लोक व वृत्तपत्रकार राजकारणालाच सर्वस्व मानून जें चिंतन करतात, त्यानें देशाचें उत्थान कदापी हि होणार नाहीं. आजकाल तर लोकशाही म्हणजे एकमेकांचा मत्सर असेंच समजलें जातें. तेव्हां जरी राजकारणाला कांहीं महत्त्व असलें तरी जगांत राजकारणाहूनहि महत्वाच्या गोष्टी आहेत, याची जाणीव आम्हांला व्हायला पाहिजे. मीं नुकतेंच वर्तमानपत्र-वाचन बंद केलें आहे. पण अजून त्यावर अगदीं पूर्ण बहिष्कार घातला नाहीं. कारण दैनिकें मी वाचत नसलों तरी अजून साप्ताहिकें वाचतों. कांहीं दिवसांनीं तें हि बंद करीन. रामकृष्ण परमहंस वर्तमानपत्रांना स्पर्श देखील करीत नसत. ते म्हणत कीं वर्तमानपत्रांना हात लावल्यानें विंचु चावल्यागत वाटतें. कारण त्यामध्यें जगांतल्या सर्व वाईट गोष्टींचा भरणा असतो. मी स्वतः रामकृष्णांच्या विचारांचा अनुयायी आहें व लहानपणा-पासूनच मी त्यांचें अनुसरण करण्याचा प्रयत्न करीत आहे. मीं त्यांचें साहित्य इतर भाषांत वाचलें होतेंच. परंतु मूळ बंगालींत वाचतां यावें म्हणूनच केवळ मी बंगाली शिकलों. हें सर्व असूनहि गांधीजींचा शिष्य या नात्यानें वर्तमानपत्रें मला चिकटलींच. त्यामुळें मी तीं नाइलाजानेंच पण वाचत असे. आतां मात्र मला आपल्या मूल स्वरूपाची जाणीव होऊं लागलेली असल्यामुळें मध्यंतरीं माझ्यांत जी कांहीं थोडीफार विकृति आली होती, ती नाहींशी होईल अशी मला आशा आहे. असो.

सांगायचें तात्पर्य असें कीं खरा हिंदुस्थान कुठें आहे याची वर्तमानपत्रांना अजिबात जाणीवच नाहीं. त्यांनीं मला क्षमा करावी. कारण

वृत्तपत्रांना भारताचें सत्यस्वरूप माहीत नाहीं, असें मला मोठ्या खेदानें म्हणावें लागत आहे. दुसऱ्या दिवशीं देखील कोणी वाचायला तयार होणार नाहीं असल्या गोष्टींचाच वर्तमानपत्रांत भरणा असतो. त्यामुळें बुद्धीची दिशाभूल होते, साहित्याचें अत्यंत नुकसान होतें, चुकीची भाषा रूढ होते, रागद्वेष वाढतात, देशांत फूट पडते आणि देशाची शक्ति क्षीण होते. सत्याचें भान व संयम असेल, व्यर्थ निंदा नसेल तर वर्तमानपत्रें म्हणजे एक शक्ति होऊं शकते, हें मला माहीत आहे. पण ज्या घटनांचा दूरगामी परिणाम होतो, अशांचें या वर्तमानपत्रांना कांहींच महत्त्व वाटत नाहीं. ३५०० ग्रामदानें झालीं, याचा त्यांना पत्ताहि नाहीं. पण दहा पांच गावांनीं देखील मारपीट वगैरे करून जबरदस्तीनें दुसऱ्यांच्या जमिनीचा कब्जा घेतला असता तर हिंदुस्थानांतल्या यच्चयावत् वर्तमानपत्रांत ती बातमी अगदीं जाडच्या टाईपांत छापली गेली असती आणि परदेशांत हि ती वार्ता चटकन पोहोंचली असती. पण बिचाऱ्या ग्रामदानी गावांचा अपराध हाच कीं त्यांनीं जमिनीचें वितरण प्रेमानें केलें. तेवढ्या एका अपराधाखातर त्यांची कींमत केली जात नाहीं.

## भूदान आरोहणांत स्त्रियांचें अद्भुत कार्य

वर्तमानपत्रांनीं भूदान कार्याकडे थोडी दृष्टि टाकली असती तर कोरापुटच्या जंगलांत अेकेकट्या स्त्रीनें हिंडून जनतेला जागृत करण्याचें जें महान् कार्य केलें त्याची गाथा घराघरांत लोकांनीं मोठ्या आदरानें वाचली असती आणि साऱ्या हिंदुस्थानला ती माहीत झाली असती. या आरोहण-कार्यांत स्त्रियांनीं जें अद्भुत काम केलें, त्याचा पुढें एक स्वतंत्र इतिहासच लिहीला जाईल. त्या गांवोगांवीं हिंडून अहिंसेचें जें शौर्य प्रकट करीत आहेत, त्यांच्या विचाराचा अनादर करण्याची कुणांत हि हिंमत नाहीं. मिराबाईनें म्हटलें आहे "**मातु छांडि पिता छांडि छांडी सब कोई । असुवन जल सींच सींच प्रेम बेली बोई ।**" अगदीं या कवनाप्रमाणेंच घरदार, नोकरी, अभ्यास वगैरे सारें कांहीं सोडून ज्यांनीं भूदानकार्यांत उडी घेतली, अशांची संख्या थोडी असली तरी त्यांनीं फार मोठें काम केलेलें आहे. म्हणून च स्त्रियांच्या आध्यत्मिक अधिकारांविषयीं मीं जे विचार मांडले आहेत, ते त्यांनीं आपल्या

हृदयांत जतन करून ठेवून या पुरुषांच्या समाजांत बंड करून उठलें पाहिजे. त्याशिवाय आजचीं चुकीचीं मूल्यें बदलणार नाहींत.

## स्त्रियांनीं समाजव्यवस्था हातीं घ्यावी

स्त्रियांचें क्षेत्र म्हणजे घर, अशी लोकांची आजवरची समजूत होती. तें घर तर आजहि त्यांच्याच हातीं राहील पण त्याशिवाय देखील त्यांना कांहीं जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील. पुरुषांनीं समाजव्यवस्था अशी कांहीं करून टाकली आहे कीं सारी दुनिया अगदीं त्रस्त झाली आहे. गेल्या पंचवीस वर्षांत दोन विश्वयुद्धें झालीं आणि तीसरें कधीं सुरू होईल तें सांगतां येत नाहीं. पुरुषांना युद्धापासून परावृत्त करण्याकरतां समाजाचा लगाम स्त्रियांच्या हातीं दिला तर च त्या आपल्या मातृत्वशक्तीचा प्रभाव जगावर पाडूं शकतील. पण असें होण्याऐवजीं आजकाल स्त्रि-पुरुषसमानतेच्या नांवावर स्त्रियांच्या हातीं बंदूका देऊन त्यांच्या पलटणी बनवल्या जातात. निर्भयतेच्या नांवावर हें सारें चालतें आहे आणि स्त्रियांनाहि असें वाटतें कीं आपल्या हातीं बंदूक आल्यास आपण निर्भय होऊं. पण निर्भयतेचा बंदुकीशीं काडीइतकाहि संबंध नाहीं. रावणानें सीतेला पळवून नेलें पण सीतेशीं शब्द देखील बोलण्याची त्याची कधीं हिंमत झाली नाहीं. एकदां त्यानें तिला कांहीं प्रश्न विचारले तर सीतेनें एक गवताची काडी त्याच्या समोर ठेवून हें दर्शविलें कीं मी तुझी किंमत या काडीइतकी च समजतें. लंकेत राक्षसींच्या समवेत राहून तिनें राक्षसींचें हृदयपरिवर्तन केलें असल्यामुळें रावणाचें तिच्यापुढें कांहीं हि चालेना. वाल्मीकीनें असा हा आदर्श आपल्यासमोर ठेवला आहे. बंदुकीच्या जोरावर निर्भयता निर्माण होऊं शकत असती तर मग आज शस्त्रास्त्रसंपन्न पाश्चात्य राष्ट्रांच्या हृदयांत भीति कशाला राहीली असती? पुरुषांनीं केलेल्या व्यवस्थेमुळें समाजांत ही सारी अव्यवस्था झालेली आहे. तेव्हां आतां स्त्रियांनीं आपल्या आत्मशक्तीचें भान करून घेऊन सामाजिक क्षेत्रांत पदार्पण करून पुरुषांना काबूत ठेवण्याचें काम केलें पाहिजे. भारतीय स्त्रियांकडून माझी हीच अपेक्षा आहे. यापुढें समाजावर अंकुश ठेवण्याचें काम स्त्रियांना हातीं घ्यावें लागणार आहे व त्याकरतां त्यांनीं तयार व्हायला हवें.

## स्त्रियांनीं जगाला मुक्तीचा मार्ग दाखवावा

ओरिसांतील शांतिसेनेचें कार्य रमादेवींनीं हातीं घेतलें हें ऐकून मला फार आनंद झाला. याच प्रमाणें स्त्रिया सर्वत्र शांतिसेनेचें काम हातीं घेतील तर दुनिया बदलून जाईल व आज जगासमोर असलेल्या समस्या सुटतील. हें काम पुरुष करूं शकणार नाहींत. कारण आज त्यांचें डोकें च ठिकाणावर नाहीं. त्यांना कांहीं सुचत च नाहीं आणि सुचलें च तर सैन्य वाढवायची अक्कल सुचते. याप्रमाणें पुरुषांची बुद्धि कुंठित झालेली असतांना स्त्रिया पुढें येऊन आपल्या दैवी गुणांच्या व मातृशक्तीच्या आधारावर काम करूं लागतील तर जगांत करुणेचें राज्य स्थापित करूं शकतील. मागें एका अमेरिकन बंधूनें मला विचारलें होतें कीं, तुम्हांला कशा प्रकारचें राज्य हवें आहे ? मीं त्याला उत्तर दिलें, मला 'किंगडम् ऑफ काइंडनेस' (करुणेचें राज्य) हवें आहे. आज जगांत करुणा दया नाहींत असें नाहीं पण त्यांना दासीचें स्थान आहे, राणीचें नव्हे. दयाळू रेडक्रॉसवाले लढाई थांबवूं शकत नाहींत तर जखमी शिपायांची सेवा करून लढाईची रुचि वाढवतात. ही जी हिंसेला रुचि आणणारी अहिंसा आहे, तिनें अगदीं महाभारताच्या काळापासून तों आजपर्यंत अनेकांना आकर्षित केलें आहे. धर्मरक्षणाकरतां हिंसा अपरिहार्य आहे हा युक्तिवाद तेव्हांपासून आजपर्यंत चालत च आलेला आहे. आजचे मुत्सद्दी हि तोच युक्तिवाद पुढें करीत म्हणतात कीं आम्ही लाचार आहोंत. आज हिंदुस्थानचें प्लॅनिंग काय हिंदुस्थान करीत आहे ? हिंदुस्तानचें प्लॅनिंग पाकिस्तान करीत आहे. पाकिस्तान काय करीत आहे, त्याचा सैन्यावर किती खर्च होतो, हें सर्व बघून आम्ही प्लॅनिंग करतों. म्हणजे प्लॅनिंगचें नुसतें ढोंग चाललें आहे. ज्यांची बुद्धिच स्वतंत्र नाहीं, ते काय प्लॅनिंग करणार ? तेव्हां आतां आम्हांला असें ठरवलें पाहिजे कीं देशांत खेड्यांचें प्लॅनिंग दिल्ली करणार नाहीं, तर खेडींच आपलें प्लॅनिंग करतील. याप्रमाणें खेड्याखेड्यांत ग्रामस्वराज्य स्थापन झालें तरच देश आजच्या अडचणींतून मुक्त होईल. जगाला मुक्तीकडे नेणारा हाच एकमेव मार्ग आहे. सैन्य ठेवलें नाहीं तर पाकिस्तान आक्रमण करील अशी भीति कित्येकजण दाखवतात. तिकडे पाकिस्तानचे नेते हि आपल्या जनतेला भारताच्या आक्रमणाची भीति दाखवून

सैन्य राखतात. दोघांनाहि माहित आहे कीं कोणी आक्रमण करणार नाही, पण जनतेला त्याचेंच शिक्षण दिलें जातें. साऱ्या जगभर हेंच चाललें आहे. अमेरिकेंतल्या मुलांना तर असें शिकविलें जातें कीं हा हैड्रोजन बाँब म्हणजे रक्षणकारिणी देवता, भयहारिणी काली, आहे. या सगळ्यांतून जगाला वांचवण्याचें काम आतां स्त्रियांना करायचें आहे.

## भारतांत महिलांचें महान् स्थान

या संमेलनांत देखील पुरुषांच्या मानानें स्त्रियांची संख्या फारच कमी दिसते आहे. देवानें जगांत पुरुष च अधिक निर्माण केले आहेत असें कांहीं नाहीं. मग असें कां व्हावें? याचें कारण असें कीं आज सारी सत्ता पुरुषांच्या हातीं आहे. त्यामुळें अल्पसंख्यांकाप्रमणें स्त्रियांना हि लहानसें स्थान दिलें जातें. प्रयेक कमिटींत एखादी स्त्री असावी, असें म्हणतात. स्त्रिया अजून या विरुद्ध बंड करून उठत नाहींत. कारण ज्या शिक्षणानें पुरुषांचीं डोकीं बिघडलीं आहेत, तें च शिक्षण त्यांनाहि दिलें जातें. स्त्रियांच्या शिक्षणांत तर आध्यात्मिक भाग असायला हवा. लोकमान्य टिळकांनीं म्हटलें आहे कीं भारतांत धर्माचें रक्षण जर कोणीं केलें असेल तर तें स्त्रियांनींच केलें आहे. भारतांत स्त्रियांना फार मोठी प्रतिष्ठा आहे. शास्त्रांत तर म्हटलें आहे कीं एका मातेचा गौरव हजार पित्याहून हि अधिक आहे. श्रुतींनीं प्रथम '**मातृदेवो भव**' म्हटलें आणि मग '**पितृदेवो भव**' '**आचार्यदेवो भव**' म्हटलें. '**महिला**' हा शब्दच मुळीं महानतेचा निदर्शक आहे. स्त्रियांचा महिमा दर्शविणारा असा शब्द दुसऱ्या भाषांमध्यें आढळणार नाहीं.

## पुरुषांना सौभाग्यलक्षणें हवींत

हें सर्व असूनहि मध्यंतरीं एक असा काळ आला कीं लोक स्त्रियांना 'अबला' म्हणूं लागले, 'महिला' गेली 'अबला' आली. तीच संस्कृत भाषा पण लोकांनीं तिला इतकें खालीं आणलें कीं स्त्रीला मोठ्या आदरानें 'भीरू' म्हटलें जाऊं लागलें. त्याच काळांत दागिन्यांच्या नांवावर स्त्रियांच्या नाकाकानांत हाता-पायांत बेड्या घातल्या गेल्या. दागिन्यांनीं स्त्रियांना कैदी बनवले आणि त्याच दागिन्यांना समाजानें स्त्रियांचीं सौभाग्यलक्षणें मानलें! जर पुरुषांच्या

नांवानें स्त्रियांना सौभाग्यलक्षण म्हणून कांहीं दागिने घालावे लागतात तर स्त्रियांच्या नांवानें पुरुषांनीं सौभाग्यलक्षणें कां घालूं नयेत ? स्त्री सौभाग्यवति असावी तर पुरुष देखील सौभाग्यवान् नसावा का ? कोणत्या हि स्त्रीच्या कपाळाकडे पाहून तिचा पति जिवंत आहे किंवा नाहीं हें समजतें. त्याच प्रमाणें पुरुषांच्या कपाळाकडे पाहून त्याची पत्नी जिवंत आहे किंवा नाहीं, तें कां कळूं नये ? पत्नीचें महत्त्व पति इतकें च आहे, पण पुरुषांना सौभाग्यलक्षणें असावीं असें कांहीं समाजाला वाटत नाहीं. याविषयीं मी जेव्हां विचार करूं लागतों तेव्हां मला तीव्र वेदना होतात व वाटतें कीं मी स्त्री असतों तर बरें झालें असतें ! हिंदुस्थानांत च नव्हे तर साऱ्या जगांत स्त्रियांची स्थिति अगदीं असह्य अशी आहे. जोंपर्यंत त्यांना आध्यात्मिक पुरुषार्थ करण्याचें स्वातंत्र्य मिळत नाहीं, तोंपर्यंत त्यांची स्थिति अशी च राहणार.

## पतिव्रता कोण ?

ज्ञानेश्वरींत एक वाक्य आहे, **'पतीचिया मता अनुसरोनी पतिव्रता'**– पतीच्या मताचें अनुसरण करण्यांत पतिव्रता स्त्रीचें कल्याण आहे. मीं जेव्हां हें वाचलें तेव्हां माझ्या मनांत विचार आला कीं ज्ञानेश्वर महाराजांना हें भलतें च काय सुचलें ! नंतर राजवाड्यांची ज्ञानेश्वरीची संशोधित प्रत माझ्या हातांत आली आणि त्यांत **'पतीचिया व्रता, अनुसरोनी पतिव्रता'** असा पाठभेद पाहिला. याचा अर्थ असा कीं पतीच्या व्रताचें अनुसरण करणारी पतिव्रता होय. ज्ञानदेवानें तें पहिलें वाक्य लिहिलें नसेल, दुसरें च वाक्य त्याचें असेल पण समाजाला ज्ञानदेवांचें विवेचन पसंत न पडून मागून कोणीतरी **'व्रता'** ऐवजीं **'मता'** करून दिलें असेल. साहित्यांत किती अत्याचार झाले असतील, याची यावरून कल्पना येते. ती सारी कहाणी फारच हृदयविदारक आणि मनोभंजक होईल.

## स्त्रीचें शस्त्र अहिंसा–

भूदान यज्ञाच्या कामांत स्त्रिया पुढें येत आहेत, परंतु शांतिसेनेचें काम त्यांनींच उचलून घ्यावें, अशी माझी इच्छा आहे. शांति, मुक्ति, भक्ति हे

सारे शब्दच मुळीं स्त्रीलिंगी आहेत. मी हें कांहीं साहित्यिकाप्रमाणें अलंकारिक भाषेंत सांगत नाहीं तर खुद्द भगवद्गीतेंत च भगवंतांनीं सांगितलें आहे कीं "**कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणाम् स्मृतिर्मेधा धृतिःक्षमा ।**" स्त्रियांमध्यें श्री, कीर्ति, क्षमा, मेधा, स्मृति, धृति हे सारे गुण आहेत.–हा एक फारच सुंदर विषय आहे. पण आजच्या शाळाकॉलेजांत शिकणाऱ्या मुलींना याचें कांहीं ज्ञान च नसतें. त्याबद्दल मला फार वाईट वाटतें. स्त्रियांना हें सर्व समजून घ्यायला हवें.— शांति-सैनिकांनीं पक्षमुक्त असायला हवें. पण आज सारे पुरुष या ना त्या राजकीय पक्षाचे समासद आहेत. मी पुरुषांना म्हणतों कीं तुम्ही स्त्रियांना पक्षमुक्त करा मग तुम्ही खुशाल पक्षग्रस्त रहा. पूर्वीं स्त्रियांबाबत एवढें च म्हटलें जात असें कीं त्या सुरक्षित रहाव्या. पण मी म्हणतों कीं त्यांनीं सुरक्षित च नव्हे तर स्वरक्षित झालें पाहिजे. स्वतःचे रक्षण करण्याची शक्ति त्यांच्यामध्यें आली पाहिजे. आजवर ती नव्हती, पण आतां गांधीजींनीं स्त्रीशक्तीच्या आविष्काराला मुक्तद्वार करून दिलें आहे. अहिंसेचें शस्त्र स्त्रिया पुरुषाहून अधिक चांगल्या रितीनें वापरूं शकतात. पंचवीस वर्षांपूर्वी दारूच्या गुत्त्यांवर पिकेटिंग करायला कोणाला पाठवायचें यावर चर्चा चालली असतांना गांधीजी म्हणाले कीं हें काम स्त्रियांनीं करावें. हें ऐकून लोक थक्क च होऊन गेले. त्यांना वाटलें कीं अगदीं अनीतिमान लोकांच्या अड्डयांत, वाटेल ते वाईट प्रकार चालणाऱ्या ठिकाणीं स्त्रिया काय काम करूं शकतील ! पण गांधीजी म्हणाले कीं त्या लोकांशीं सामना करण्याकरतां आपल्याजवळील सर्वांत श्रेष्ठ नैतिक शक्ति च पाठविली पाहिजे. त्यांच्या आदेशानुसार स्त्रियांनीं पिकेटिंगचें जें अद्‌भुत काम केलें तें साऱ्या देशानें पाहिलें च आहे. एकदा अण्णासाहेब कर्वे वर्ध्याला आले असतां मजजवळ म्हणाले कीं आम्ही स्त्रियांच्या उन्नतीकरतां पंचवीस वर्षें कष्ट करून देखील जें साधूं शकलों नाहीं किंवा ज्याची कल्पना देखील करूं शकलों नाहीं तें काम गांधीजींनीं करून दाखवलें. त्यांनीं अगदीं जादु च केली.— ह्यांत गांधीजींनीं केलें असें म्हणण्यापेक्षां अहिंसेनें केलें असें च म्हणावें लागेल. जोंपर्यंत हिंसा हें रक्षणाचें साधन राहील तोंपर्यंत तुम्ही कोणतेहि वाद आणा, स्त्रियांचें स्थान गौण च राहणार.

म्हणून स्त्रियांना समाजांत प्रथम स्थान मिळावें असें वाटत असेल तर अहिंसा हेंच रक्षणाचें साधन स्वीकारावें लागेल. महावीर बुद्ध गांधीजी या सर्वांच्या काळांत स्त्रियांचा उद्धार होण्याचें कारण हें च कीं त्यांनीं रक्षणाचें साधन म्हणून अहिंसेचा स्वीकार केला होता.

यापुढें भारतीय महिला शांतिसेनेचें कार्य हातीं घेतील व त्याकरतां घरोघर सर्वोदयपात्राची स्थापना करतील अशी माझी अपेक्षा आहे.

पंढरपूर, जि. सोलापूर ३१-५-'५८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५५२० वि: ग्रंथ
क्रमांक ........ नों. दि. १०१२५३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२८७

REFBK-0010281